# निवडक लेख

## [ भाग १ ला ]

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २५२
1832

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. निबंध
ता.
ग्रं. ग्रं.

REFBK-0004599

नारायण गोविंद चापेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. निबंधन नं. ८३६
ता. ३१।५।३५
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७२०१
ठाणे

# निवडक लेख

## [ भाग १ ला ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४५९०
०२०९
REFBK-0004599
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ ९त
निबंध
391-2/3

**नारायण गोविंद चापेकर**

'एड्मंड बर्कचें चरित्र', 'पैसा', 'गच्चीवरील गप्पा', 'वैदिक निबंध'
इत्यादि पुस्तकांचे कर्ते

द्वितीयावृत्ति

बदलापूर

चैत्र शु. १५ शके १८५४

मुद्रक :—
सीताराम वासुदेव फडणीस, बी. ए., 'आर्यसंस्कृति-
मुद्रणालय', १९८(१८), सदाशिव पेठ, चिमणबाग, टिळकरस्ता,
पुणें नं. २

ह्या पुस्तकांतील लेखन शुद्धलेखनसमितीनें ठरविलेल्या नियमानुसार अस-
लेलें वाचकांस आढळून येईल.

प्रकाशक :—नारायण गोविंद चापेकर
बदलापूर, जि. ठाणे.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

ह्या पुस्तकांत एकंदर २२ लेखांचा संग्रह केला आहे. गेल्या पंचवीस वर्षांत वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांचें संकलन करून प्रसिद्ध करण्याची कल्पना कांही प्रेमळ मित्रांनी सुचविली. व ती मला पटलीहि. पण महाराष्ट्रांतील लेखकांची दैना माहित असल्यामुळे हा दगदगीचा, लुप्ताभिमानाचा व आंतबट्याचा व्यवहार करण्याकडे मनाची प्रवृत्ति होईना. नाटकें, कादंबऱ्या व शालोपयोगी पुस्तकें ह्यांवाचून इतर मराठी पुस्तकांकडे बहुधा कोणाची धांव जात नाही. तेव्हा आपणच हौसेने लिहावें पण शिवाय छापखाना पहावा, पैसे खर्च करावे आणि ते वसूल करण्याकरता ऐपतदार स्नेह्यांच्या दाराशीं जाऊन त्यांस पुस्तक विकत घेण्याबद्दल आळवावें ही नामोशीची गोष्ट करण्यास कोणाला हुरूप असणार? पण दैवयोगाने गणेश महादेव आणि कंपनीचे उत्साही मालक रा. वीरकर ह्यांनी पुस्तकप्रसिद्धीची जबाबदारी पतकरल्यामुळे मनांत योजिलेल्या कार्याला व्यक्त स्वरूप देतां आलें. रा. वीरकर यांनी छपाईचें काम वक्तशीर व उत्कृष्ट करून दिल्यामुळे त्यांचे आभार मानणें हें माझें आद्य कर्तव्य आहे.

ह्या पुस्तकांतील बहुतेक लेख ग्रंथमाला, विश्ववृत्त व विविधज्ञानविस्तार ह्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. फलज्योतिषावरील निबंध लोकशिक्षणांत प्रसिद्ध झाला असून वैदिकधर्मावरील चार लेख धर्मजागृति मासिकांत प्रसिद्ध झाले.[१] बाकीच्यांपैकी अनुक्रमें १ ते ४, ६–७ व १४ ते १७ हे लेख ग्रन्थमाला, विश्ववृत्त ह्या मासिकांत येऊन गेले आहेत. ह्याशिवाय जे राहिले ते सर्व विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध करण्यांत आले होते.[१]

मासिकांतील माझा पहिला लेख "शिकवावें कसें" हाच होय. ह्या[१] लेखसमूहांत वैदिक धर्मावर ४, चलनविषयक ५, परीक्षणात्मक ५ व बाकीचे इतर विषयांवर आहेत.[१] लेखांच्या योग्यतेविषयी अर्थातच निःपक्ष-

---

१ ह्या आवृत्तीत फेरफार केल्यामुळे हीं विधानें अर्थहीन झालीं आहेत.

पाताने अभिप्राय देणें मला शक्य नाही. त्याचा निर्णय वाचकांवरच सोंपविणें जरूर आहे. तथापि[१] चलनविषयक निबंध त्या विषयांतील विद्यार्थ्यांना अंशतः तरी उपयुक्त होतील असा भरंसा वाटतो.[१] त्याचप्रमाणे, आठवर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले वैदिकधर्मावरील लेख हिंदुसमाजघटनेचा विचार करणाऱ्या धुरीणांना सध्या बऱ्याच अंशाने उपकारक होतील अशी माझी खात्री आहे. ह्या लेखांत निर्दिष्ट केलेलीं मतें अश्रुतपूर्व असावींत असें वाटतें. निदान बुद्धिपुरःसर तरी मी ह्या लेखांनी निव्वळ प्रतिध्वनि काढलेला नाही. आमच्या आचारांना स्मृतिप्रामाण्य नसून सदाचार हाच प्रमाण आहे हें ह्या निबंधांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बाकीच्या निबंधांबद्दल विशेष लिहिण्याचें कारण नाही.

हे निबंध प्रसिद्ध करतांना मला कै. रा. विनायक कोंडदेव ओक यांचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. विद्यार्थी म्हणून माझ्यावर त्यांचा लोभ असे व माझें लहानपणापासून त्यांच्याकडे जाणें असे. त्यामुळे लेखनव्यवसायाचें प्रोत्साहन मला त्यांच्याकडून मिळालें. ह्या गोष्टीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें हाच एक त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचा अल्पसा मार्ग आहे. मनुष्य जात्या अनुकरणशील आहे. म्हणून विद्यार्थीदशेंत अनुकरणीय माणसांशीं निकट संबंध घडल्यास इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. असो.

मराठीमध्ये निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र मोठी ग्रंथरचना खरोखर व्हावयास पाहिजे. पण अशा ग्रंथरचनेला अवश्य अशा फुरसुतीच्या अभावीं निबंधवजा लेखच सध्याच्या परिस्थितींत प्रसिद्ध होणें अपरिहार्य आहे. परिस्थिति झपाट्याने बदलत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. विश्वविद्यालयाचे पदवीधर मराठींत लिहूं लागले आहेत. सरकारी नोकरीचीं बंधनें ज्यांना नाहीत असेहि बरेच पदवीधर ह्यांपैकी आहेत; विश्वविद्यालयांत मराठीला ठाव मिळाला आहे तेव्हा आता विस्तृत व भरीव ग्रंथरचना प्रसवण्याची आशा करण्यास जागा झाली आहे. प्रस्तुत पुस्तक मात्र निर-

---

१ ह्या आवृत्तींत फेरफार केल्यामुळे हीं विधानें अर्थहीन झालीं आहेत.

निराळ्या विषयांवरील लेखांची खिचडीच आहे; ती मराठी वाचक वर्गाला रुचकर लागो म्हणजे झालें. अठरा धान्यांच्या ह्या कडबोळ्याचा निदान एवढा तरी फायदा असतो की, त्याचा अव्हेर सर्वस्वी होत नाही. विद्यार्थी, सामान्य वाचक, प्राचीन विद्याभ्यासक ह्यांपैकी कोणाच्या तरी अभिरुचीला ह्या पुस्तकांतील निबंध पात्र होण्याचा संभव आहे. सारांश, तरुण, होतकरू मंडळीला यत्किंचितहि ह्या पुस्तकापासून फायदा झाला तरी सुद्धा छपाई व्यर्थ गेली नाही असें समाधान मानून घेतां येईल.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति गणेश महादेव आणि कंपनीने स.१९२४ सालीं प्रसिद्ध केली. पहिली आवृत्ति संपल्यामुळे दुसरी आवृत्ति काढण्याचें मनांत आलें. ह्या पुस्तकांतील लेख विद्वानांकरता नाहीत; कारण ते तितक्या किंमतीचे नाहीत हें उघड आहे. तथापि विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होण्याचा संभव आहे. ह्या आशेने निरनिराळ्या वेळी लिहिलेले हे किरकोळ लेख पुनः मुद्रित होत आहेत. शिवाय बाजारांत दमडीचीहि किंमत येण्या-सारखी नसली तरी मी आणि माझें ह्या दुकलीने पछाडलेला माणूस आपण आणि आपलें हींच काय तीं जगांत किंमतवान आहेत असें समजत असतो. हें मनुष्यस्वभावांतील व्यंग त्याला स्वस्थ बसूं देत नाही. आपण बाजारांत गेलों तर सर्व पदार्थांची किंमत कमी करतों; फार तर बरोबर करूं. परंतु स्वतःची योग्य ती किंमत ठरवणारा ह्या जगांत तरी दुर्मिळ. ह्याशिवाय हे लेख प्रसिद्ध करण्याचें दुसरें कारण देणें अशक्य आहे.

निरनिराळ्या लेखांच्या दरम्यान कालाचें अंतर बरेंच असल्यामुळे कित्येक ठिकाणीं विचारसंगति अथवा द्विरुक्ति होणें अपरिहार्य आहे. परंतु त्यामुळे लेखकाचें विचारविकसन समजण्यास साधन होत असल्याकारणाने किरकोळ फेरफार खेरीज करून सर्व लेख जसेच्या तसे छापले आहेत. हिंदुधर्माचें स्वरूप हा लेख ह्याच आवृत्तींत प्रथम घातला आहे. पहिल्या आवृत्तींतील बरेच लेख ह्या आवृत्तींतून कमी केले आहेत. परीक्षणें सर्व गाळलीं आहेत. परीक्षणांचें स्वतंत्र पुस्तक छापण्याचा विचार आहे. तसेंच ऐतरेयब्राह्मण-विषयक लेख "वैदिक निबंधां"त समाविष्ट केल्यामुळे प्रस्तुत आवृत्तींतून गाळले आहेत. त्याचप्रमाणे चलनविषयक निबंध "पैसा" पुस्तकांत घातल्या-कारणाने ह्या आवृत्तींत आढळणार नाहीत. ह्या प्रमाणे ह्या आवृत्तीचें स्वरूप बरेंच पालटलें आहे. कायदा, सौंदर्य, समाजशास्त्राची तोंडओळख, मराठी भाषेचा फुलोरा वगैरे कांही निबंध ह्या आवृत्तींत अगदी नवीन आहेत.

ह्या पुस्तकाचे दोन भाग केवळ सोयीकरता केले आहेत.

---

# अनुक्रमणिका


रामायण .... .... .... .... १

चरित्रनायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं? ३२

फलज्योतिष .... .... .... .... ४२

स्नेह .... .... .... .... .... ५२

सौंदर्य.... .... .... .... .... ६५

समाजशास्त्राची तोंडओळख .... .... .... ७८

मराठी भाषेवरील सावट .... .... ... ८८

मराठी भाषेचा फुलोरा .... .... .... ११५

मराठी मासिकें .... .... .... .... १३९

# निवडक लेख

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे

## रामायण

—:o:—

## समाजस्थिति

—:o:—

आजकाल सर्वत्र असा समज झालेला आढळतो की, सांप्रतच्या अमलाखाली हिंदुसमाज जितका सुखी, निर्भय, व्यसनपराङ्मुख, शिक्षणसंपन्न व आनंदी आहे इतका पूर्वी कधीहि नव्हता. परंतु, मुसलमानी रियासतीच्या पूर्वींचा व प्राचीन कालचा हिंदुसमाज ह्यांची जी कांही माहिति उपलब्ध आहे तिच्यावरून वरील विधानांत सत्याचा अंश फारच थोडा आहे असें दिसून येईल. कवीची जर केवळ मानसिक उभारणी नसेल तर रामायणकालीन समाजाची स्थिति आमच्याहून फारच सुखावह असली पाहिजे ह्यांत संदेह नाही. समाजघटनेचा मुख्य उद्देश त्यांतील व्यक्तीला शक्य असेल तेवढें सुख लाधणें हा होय; आणि हें सुख ज्या समाजांत मिळत असेल तो समाज पूर्णावस्थेला पोचला आहे असें म्हणण्यास हरकत नाही. कोसल देशाची राजधानी जी अयोध्या तिचें वर्णन जें रामायणांत केलें आहे त्यावरून तत्कालीन सुधारणेची मजल किती गेली होती ह्याची कल्पना होईल. ही नगरी बारा योजनें लांब आणि तीन योजनें रुंद असून शहरांतील रस्ते विपुल व प्रशस्त होते. रस्त्यांवर हल्लीप्रमाणे प्रत्यहीं पाणी शिंपडीत असत व दिवे लावीत असत. आता हे रस्ते साधे होते अथवा हल्लीप्रमाणे सडका

होत्या हें रामायणावरून खात्रीपूर्वक सांगतां येत नाही. तथापि, घोड्यांच्या गाड्या त्या वेळीं चालत होत्या ह्यावरून व राम बनवासास गेल्यावर त्याला भेटण्याकरिता सर्व सैन्य व मोठा परिवार घेऊन जाण्याची तयारी केली तेव्हा पुढे मार्ग करण्याकरिता सूत्रकार, पाषाण-भेदक, पूल बांधणारे वगैरे हजारों लोक पाठवून "ससुधाकुट्टिमतलपन्था:" बनविला, त्यावरून सडकाही असतील असें अनुमान करण्यास थोडीशी जागा आहे. निरनिराळे प्रदेशभाग जोडणारे लांब रस्ते असत; त्यांच्या दुतर्फा झाडें लावीत व ठिकाठिकाणीं विहिरी व विश्रांतिस्थानें बांधून प्रवासी जनांचा प्रवास सुखावह होण्याची तरतूद केलेली असे.

**रस्ते**

अयोध्यानगरींतल्या राजमार्गावर दोहों बाजूस दुकानें असत व प्रत्येक दोन दुकानांत बरीच जागा सोडलेली असे. शहरांतील गृहें सात सात मजली उच्च असून शोभायमान होतीं. सायंकालीं घरोघरीं धूप, चंदन वगैरे जळून जिकडे तिकडे सुगंध होऊन जाई. त्याचप्रमाणे वधूंच्या नाटकशाला व उद्यानभूमिका सर्वत्र आढळून येत. साधारणपणें असें दिसतें कीं, प्रत्येक शहरीं उद्यानभूमिका असून तेथे स्त्रीपुरुष सायंकालीं क्रीडा करण्यास जात असत. राजनिवासस्थान असल्यामुळे अयोध्या नगरी सामंत राजांनी व परप्रांतस्थ व्यापाऱ्यांनी भरलेली असे. परदेशाशीं व्यापार ह्या वेळीं चालत होता किंवा नाही हें खास समजण्यास रामायणांत कांही साधन नाही; पण "सीदन्महति कांतारे सार्थहीन इवाध्वग:" ह्यासारख्या उपमांवरून आशियाखंडांतील अरबस्थान वगैरे परदेशांत हिंदुस्थानचे लोक त्या वेळीं व्यापाराकरिता जात असावेत असें वाटतें. देशांतल्या देशांत धंदे व कला हीं मागसलेलीं नव्हतीं. सुतार, गवंडी, न्हावी, बेलदार, क्षेपणीय वगैरे यंत्रें करणारे, चित्रकार, कांचेच्या कुप्या व आरसे करणारे, कापसाचीं वस्त्रें, घोंगड्या वगैरे करणारे, त्याचप्रमाणें ज्योतिषी,

**उद्यान-भूमिका**

सामुद्रिक, मन्त्री, नट, नर्तक, गवयी, वाजंत्री वगैरे अनेकविध कलांत निपुण असणाऱ्या लोकांची तत्कालीं उणीव नव्हती.

धंदे

सुगंधीं द्रव्यें, धूप इत्यादि विकणारे, मणि, मोतीं यांस भोकें पाडणारे, मद्य करणारे असे लोकही त्या वेळीं होते असें दिसून येतें. वैद्यकीचा धंदाही प्रचारांत असून नच्छास्त्रज्ञ गर्भांतील मूल शस्त्राने कापून काढीत असत.

अग्निहोत्रसंभार आणण्याकरिता शकटी व बसण्याकरितां अश्वयुक्त रथ हीं स्थलवाहनें प्रचारांत होतीं. शिवाय, दूत शीघ्रगामी अशा अश्वावर आरूढ होऊन निरोप्याचीं कामें करीत असत. नदीप्रवाह तरून जाण्यास नावांची सोय असे. ह्या नावांस कर्णधार असे व गरजेप्रमाणे हव्या तितक्या नावा मिळू शकत. रामभेटीस भरताची स्वारी निघाली त्यावेळेस पांचशें नावा गंगेंत त्याचें सैन्य व सामान नेण्यास तयार होत्या. "ततः स्वस्तिकविज्ञेयां पांडुकम्बलसंवृताम्। सनन्दिघोषां कल्याणीं गुहो नावमुपाहरत्" ॥ ह्यावरून असें दिसतें की, नावांना निरनिराळीं नांवें ठेवीत असत व वस्त्रावरणाने बसण्यास सुखावह होईल अशी योजना केलेली असे. असो. ह्यावरून व लोखंड, शिसें, सोनें, रुपें, मोलवान् वस्त्रें ह्यांचा सर्वत्र यथेच्छ उपयोग करीत असत ह्यावरून समाजाची स्थिति बरीच सुधारलेली असली पाहिजे यांत संशय नाही.

त्याचप्रमाणे ह्या भौतिक सुधारणेबरोबर नैतिक, धार्मिक व आत्मिक सुधारणा झालेली होती. किंबहुना पहिलीपेक्षा दुसरीचीच प्रगति विशेष झाली होती. न तेष्वहःसु श्रांतो वा क्षुधितो वा न दृश्यते। नाविद्वान्ब्राह्मणः कश्चिन्नाशतानुचरस्तथा ॥"

विद्याप्रसार

ह्या श्लोकांत तत्कालीन समाजस्थितीचें संक्षेपाने निरूपण केलें आहे. हल्लीं विद्वान् ब्राह्मण जसा क्वचित् आढळतो तसा अविद्वान् ब्राह्मण त्या कालीं विरळा सांपडे. तत्कालीन ब्राह्मण वादकुशल, वेदशास्त्रसंपन्न, व्रतस्थ व

व्यसनपराङ्मुख असत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद ह्या चारी वेदांपैकीं आपआपल्या वेदांचें अध्ययन ब्राह्मण करीत. वेदाध्ययनाचे अनध्यायदिन ठरले होते. प्रतिपदा हा एक त्यांपैकीं दिवस होय. " प्रतिपत्पाठशीलस्य विद्येव तनुतां गता "—प्रतिपदेला पाठ घेणाराची विद्या ज्याप्रमाणे कमी होते तद्वत्. सुरापी ब्राह्मण निघालाच तर त्याची रस्त्यावर उघड उघड निंदा होत असे. वर्णाश्रमांची व्यवस्था ठरून गेलेली होती. अन्य वर्णाचे धर्म आचरणारास महाशासन होत असे. एका शूद्राने आपल्या वर्णाला अनुक्त अशी तपश्चर्या केल्यामुळे रामाने त्याचा शिरच्छेद केला. ह्यावरून वर्णधर्म पाळण्याबद्दल लोकांचा फार कटाक्ष असे असें दिसतें. रामाच्या सर्व चरित्रांत त्याला न शोभण्यासारखी अशी एवढीच गोष्ट दिसते.

**जन्मसंस्कार**

इतक्या प्राचीन काळीं सुद्धा हल्लीप्रमाणे सर्व संस्कार विधिपूर्वक होत असत. मूल जन्मल्यावर त्याची भूतविनाशिनी रक्षा व जन्मक्रियादि सर्व कर्मे करून अकरा दिवस झाल्यावर त्याचें नामकरण करीत असत. ह्या काळीं स्वयंवराची फारशी चाल होती असें वाटत नाही. "पिता हि प्रभुरस्माकं दैवतं परमं च सः । यस्य नो दास्यति पिता स नो भर्ता भविष्यति "॥ तसेंच " प्रतिग्रहो दातृवशः श्रुतमेतन्मया पुरा" हीं वाक्यें स्वयंवराच्या कल्पनेच्या विरुद्ध आहेत. लग्नविधि मन्त्रपूर्वक होत असे हें खालील रामविवाहसंबंधी उताऱ्यावरून सहज समजेल.

**प्रपामध्ये तु विधिवद्वेदिं कृत्वा महातपाः ॥**
**अलंचकार तां वेदिं गंधपुष्पैः समन्ततः ।**
**सुवर्णपालिकाभिश्च चित्रकुम्भैश्च साङ्कुरैः ॥**
**लाजपूर्णैश्च पात्रीभिरक्षतैरपि संस्कृतैः ।**
**दर्भैः समैः समास्तीर्य विधिवन्मन्त्रपूर्वकम् ॥**
**अग्निमाधाय तं वेद्यां विधिमन्त्रपुरस्कृतम् ।**
**जुहावाग्नौ महातेजा वसिष्ठो मुनिपुङ्गवः ॥**

नोंद नं. ....
स्थळ प्रत
निबंधन
ता. ३९/४१३

ततः सीतां समानीय सर्वाभरणभूषिताम्।
समक्षमग्नेः संस्थाप्य राघवाभिमुखे तदा॥ (१-७३-२०ते२५)

नंतर 'ही माझी मुलगी सीता तुझी सहधर्मचारिणी, हिचा तूं अंगिकार कर व आपल्या हस्ताने तिचें पाणिग्रहण कर;' असें रामास म्हणून जनक राजाने आपल्या कन्येचें अर्पण केलें.

**लग्नविधि** पुढे वाद्यांच्या घोषामध्ये तिवार अग्निप्रदक्षिणा करून राम व त्याचे अनुज ह्यांनी आपआपल्या वधूंचा अंगिकार केला. 'त्वया सह चरिष्यामि' अशी प्रतिज्ञा लग्नसमयीं वराला वधूला उद्देशून करावी लागत असे. ह्या प्रतिज्ञेच्या जोरावरच वनवास-कालीं सीतेने आपणांस बरोबर नेण्यास रामाला भाग पाडलें. "संश्रुतं गृह्णता पाणिं चरिष्यामीति यत्त्वया। स्मर तन्नाम काकुत्स्थ नय मामपि दुःखिताम्॥"

लग्नसंस्काराप्रमाणे अंत्य विधिही मन्त्रोक्त करण्यांत येत असे. प्रेत दहन करण्याची पद्धति ह्या कालीं सर्वसामान्य होती. प्रिय पुत्राच्या वियोगाने विव्हल झालेला दशरथराजा गतप्राण झाल्यावर मामाच्या घरा-हून भरताला आणीपर्यंत दशरथराजाचें प्रेत तेलाने भरलेल्या डोणींत ठेवलें होतें. पुढें भरत आल्यावर त्याच्याकडून प्रेतसंस्कार कर-ण्यांत आला. शिबिकेमध्ये प्रेत घालून श्मशानभूमीवर नेत असतां पुढे मार्गांत सोनें, रुपें व नानाप्रकारचीं वस्त्रें वाटीत लोक चालले होते. चंदन, अगुरु, गुग्गुल, सरल व पद्मक झाडांचीं काष्ठें व देवदारु ह्यांची चिता बनविली होती. अशा तयार केलेल्या चितेवर ऋत्विजांनी प्रेत ठेवून अग्नि तयार केला व यथाशास्त्र जप केला. सामवेदी ब्राह्मणांनी आपलीं सामस्तोत्रें म्हटलीं. नंतर दग्ध झालेल्या राजाला इतर वृद्ध लोकांबरोबर यानांत बसून आलेल्या राजपत्न्यांनी ऋत्विजांसहित सव्य प्रदक्षिणा घालून त्या विलाप करीत करीत सरयूनदींत भरतासह तिलांजलि देऊन नगरांत परतल्या व दहा दिवस अशुचि राहिल्या. ह्याप्रमाणे सुतकाचे दहा दिवस

गेल्यावर बारावे दिवशीं श्राद्धकर्म आटपून तेराव्या दिवशीं अस्थि-संचयनाकरता व रक्षा टाकण्याकरिता पुन्हा स्मशानांत जाऊन भरताने पित्याचा अंत्यविधि उरकला. ह्या उत्तरकार्या-

**अंत्यविधि**

निमित्त ब्राह्मणांना धन, धान्य, गाई त्याचप्रमाणे वाहनें, गृहें, छाग वगैरे देऊन भरताने पुष्कळ दानधर्म केला. भरतमुखांतून दशरथराजाच्या निधनाची वार्ता ऐकिल्यावर राम—लक्ष्मणांनीही ताबडतोब नदीतटाकीं जाऊन आपल्या पूज्य पित्यास पाणी दिलें. ह्याप्रमाणे और्ध्वदेहिकसंस्कार होत असे. प्रेतदहनाची चाल जरी सर्वत्र म्हणजे जटायूसारख्या पक्षिगणांत व सुग्रीववालीसारख्या कपिजातींत देखील होती तरी ज्यांना राक्षस म्हणत असत त्या राक्षसांत ही चाल सर्वत्र दिसून येत नाही. " अवटे चापि मां राम निक्षिप्य कुशली व्रज । रक्षसां गतसत्त्वानामेष धर्मः सनातनः ॥"( ३-४-२२,२३ ) अशी रामाला विराध राक्षसाची विनंती आहे. असें जरी आहे तरी रावणाच्या प्रेताला दशरथराजाप्रमाणेच अग्निसंस्कार घडला ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. "स ददौ पावकं तस्य विधियुक्तं बिभीषणः । स्नात्वा चैवार्द्रवस्त्रेण तिलान्दर्भविमिश्रितान् ॥ " ह्याप्रमाणे जन्म, लग्न व मरणसंस्कारांविषयीं रामायणांत जें कांहीं आढळलें तें येथे नमूद केलें. तशीच त्या वेळच्या लोकांच्या दैनिक व धार्मिक आचारांविषयीं सांगितलें पाहिजे. प्रभातकालीं उठून स्नानसंध्या जपजाप्यादि उरकून घेण्याचा तत्कालीं साधारण परिपाठ पडलेला दिसतो. पितृतर्पण करण्याची तर चाल होतीच. शहरांत देवालयें असून शिवाय घरोंघरींही देवता-

**देवपूजा**

यतनें असत. " दध्यक्षतघृतं चैव मोदकान्हविषस्तथा । लाजान्माल्यानि शुक्लानि पायसं कृसरं तथा॥" २-२०-१७,१८ इत्यादि साहित्यांनी स्त्रिया देवपूजा करीत; इतकेंच नाही तर त्या अभ्यस्त पुरुषांप्रमाणे प्राणायामांत सुद्धा मग्न असत. " तस्मिन्कालेऽपि कौसल्या तस्थावामीलितेक्षणा । ....प्राणा-

यामेन पुरुषं ध्यायमाना जनार्दनम् ॥" प्राणायाम करून ध्यानस्थ राहणे हें अगदी सामान्य झालें होतें असें दिसतें व त्याची मजल इतकी गेली होती की, एकचित्त करून बाह्य गोष्टी सुद्धा अन्तर्ज्ञानाने समजून घेण्याची शक्ति लोकांत आली होती. व्रतें व उपवास करणें हा तर एक दैनिक आचारभाग बनला होता. ज्या दिवशीं रामाला अभिषेक करण्याचें ठरलें होतें त्याच्या आदल्या रात्रीं त्यास सीतेसह उपवास करून नुसत्या दर्भांवर निजावें लागलें. वैश्वदेव व श्राद्ध करण्याची पद्धति पडली होती. गयेस पितृश्राद्ध केलें असतां श्रेयस्कर आहे असा लोकांचा विश्वास होता व श्राद्धकालीं मांसग्रहण करण्याचा ब्राह्मण निषेध मानीत नसत. "यज्ञोपवीतवच्चैनं चिच्छेद कपिकुञ्जरः ।" ह्यासारख्या वाक्यांवरून यज्ञोपवीतें द्विजजाति घालीत असे असें अनुमान करण्यास हरकत नाही. नवीन घर बांधिल्यास त्याची प्रथम वास्तुशांति करीत असत. चित्रकूट पर्वतावर रामाज्ञेने लक्ष्मणाने पर्णशाला तयार केल्यावर त्या भ्रातृद्वयाने अगोदर वास्तुशमन केलें. "ऐणेयं मांसमाहृत्य शालां यक्ष्यामहे वयम् । कर्तव्यं वास्तुशमनं सौमित्रे चिरजीविभिः ॥"

**दैनिक विधि**

हिमालय व विंध्य ह्यांमधील प्रदेशास आर्यावर्त म्हणत व तोच यज्ञकर्माला प्रशस्त मानला जात असे. "स हि देशो नरव्याघ्र प्रशस्तो यज्ञकर्मणि." निरनिराळ्या प्रकारांनी तप करणारे लोक ह्या कालीं किती होते ह्याची कल्पना खालील श्लोकांवरून होईल.

**यज्ञकर्म**

**वैखानसा वालखिल्याः संप्रक्षाला मरीचिपाः ।**
**अश्मकुट्टाश्च बहवः पत्राहाराश्च तापसाः ॥**
**दन्तोलूखलिनश्चैव तथैवोन्मज्जकाः परे ।**
**गात्रशय्या अशय्याश्च तथैवानवकाशिकाः ॥**

**मुनयः सलिलाहारा वायुभक्षास्तथा परे ।**
**आकाशनिलयाश्चैव तथा स्थण्डिलशायिनः ॥**
**तथोर्ध्ववालिनो दान्तास्तथार्द्रपटवाससः ।**
**सजपाश्च तपोनिष्ठास्तथा पञ्चतपोन्विताः ॥ ( ३·१ )**

ह्या कालीं यज्ञ वारंवार व बरेच होत असत व त्यांत पशुहत्याही शास्त्रोक्त म्हणून होत असे; तथापि, खालील उताऱ्यावरून लोकमत पशुहत्येच्या विरुद्ध होतें असें दिसतें: " निश्चेष्टानां वधो राजन्कुत्सितो जगतीपतेः । क्रतुमध्योपनीतानां पशूनामिव राघव ॥"

**समजुती**

आता तत्कालीन लोकांचे समज कसे होते ह्याचा थोडक्यांत उल्लेख करूं. मुलगे बापाप्रमाणे होतात व मुली आईच्या वळणावर जातात असा समज त्या वेळीं असे. " सत्यश्चात्र प्रवादोऽयं लौकिकः प्रतिभाति माम् । पितॄन् समनुजायन्ते नरा मातरमङ्गनाः ॥" पण मुलगा मुलगी हा भेद न करितां एकंदर मनुष्यजातीचा विचार केला तर त्यांच्यांत मातृस्वभाव विशेष उतरतो असा ग्रह होता. " न पित्र्यमनुवर्तन्ते मातृकं द्विपदा इति । ख्यातो लोकप्रवादोऽयं भरतेनान्यथा कृतः ॥" पूर्व जन्मावर विश्वास असून त्या जन्मीं आपल्या हातून जें घडलें असेल तसेंच ह्या जन्मीं आपणांस प्राप्त होतें अशाविषयी लोकांची खात्री असलेली दिसते. " मन्ये खलु मया पूर्वं विवत्सा बहवः कृताः । प्राणिनो हिंसिता वापि तन्मामिदमुपस्थितम् ॥ " हे पुत्रवियोगाने सुचलेले दशरथाचे उद्गार आहेत व अशाच मासल्याचे कौसल्येचे उद्गार व सीतेचे उद्गार आहेत. कालिन्दी नदीच्या मध्यभागीं येतांच, इक्ष्वाकुपुरीला राम सुखरूप परत आल्यावर सहस्र गाई व शंभर सुराघट यांनी मी तुझें यजन करीन " यक्ष्ये त्वां गोसहस्रेण सुराघटशतेन च । " असें जें सीतेने कालिन्दीनदीची प्रार्थना करून म्हटलें त्यावरून इष्ट देवतांस नवस करीत असत असें

दिसतें. " नवमासधृतं गर्भं भास्करस्य गभस्तिभिः। पीत्वा रसं समुद्राणां द्यौः प्रसूते रसायनम् ॥ " त्याचप्रमाणे " अपास्य हि रसान्भौमां-स्तप्त्वा च जगदंशुभिः। परेताचरितां भीमां रविराचरते दिशम् ॥ " सर्व जगाला तापवून व पृथ्वीवरील रसांचें शोषण करून गतासूंनी भरलेल्या अज्ञानभयोत्पादक दक्षिण दिशेला सूर्य जात आहे. ह्यामध्यें शास्त्रीय ज्ञानाचा व पौरा-णिक कल्पनेचा उल्लेख स्पष्ट आहे. दुष्ट स्वप्नें पडलीं असतां कांही-तरी अपायकारक घडणार असा समज असे. दशरथराजाच्या मरणा-पूर्वीची हकीकत कळण्यापूर्वी भरताला अप्रिय स्वप्न पडलें होतें. " नरो यानेन यः स्वप्ने खरयुक्तेन याति हि। अचिरात्तस्य धूमाग्रं चितायां संप्रदृश्यते। " स्वतःचें मरण ओढवलें असलें म्हणजे सोन्याचीं झाडें, रुधिरवाहिनी वैतरणी नदी, कण्टकयुक्त शाल्मली-वृक्ष वगैरे दिसूं लागतात असें लोकांस वाटत असे. शकुनापशकुनां-वरही लोकांचा विश्वास असे. कोल्हीं ओरडणें, डावा डोळा लवणें

**नवस**

वगैरे अपशकुन मानीत. मुहूर्त पाहिल्याशिवाय कोणतेंहि कार्य होत नसे. " युक्तो मुहूर्ते विजये प्राप्तो मध्यं दिवा-करः " असें सुग्रीवास सांगून राम सैन्यासह लंकेस जाण्यास निघाला. मुहूर्त जर चांगला लाभला नाही तर प्रस्थान ठेवीत नसत. नवीन मैत्री करावयाची म्हणजे ती नेहमी अग्निसमक्ष हातांत हात घालून होत असे. राम व सुग्रीव ह्यांची मैत्री झाली तेव्हा खालील विधि करण्यांत आला, " रोचते यदि मे सख्यं बाहु-रेष प्रसारितः। गृह्यतां पाणिना पाणिर्मर्यादा बध्यतां ध्रुवा ॥ ततो हनुमान...........। काष्ठयोः स्वेन रूपेण जनयामास पावकम्। दीप्यमानं ततो वह्निं पुष्पैरभ्यर्च्य सत्कृतम् ॥ तयोर्मध्ये तु सुप्रीतो निदधौ सुसमाहितः। ततोऽग्निं दीप्यमानं तौ चक्रतुश्च प्रदक्षिणम् ॥"

**शकुन**

ह्या कालीं लोकांचा पोषाख कसा होता हें नीटसें समजत नाही. तरी पण डोक्याला उष्णीष, पायांत उपानह व डोक्यावर छत्री हीं

लंकेवर स्वारी करण्यास राम निघाला त्या वेळेस तो सुग्रीवाला सांगत आहे की आज (चंद्र) उत्तराफल्गुनींत आहे, उद्यां हस्तांत जाईल, करितां आपण सैन्य घेऊन निघावें. " उत्तराफल्गुनी ह्यद्य श्वस्तु हस्तेन योक्ष्यते । अभिप्रयाम सुग्रीव सर्वानीकसमावृताः ॥ " ( ६-४-५ ). तिथि, वार, नक्षत्रें, महिने ह्यांचा उल्लेख आढळतो. राशींविषयी मात्र कोठे निर्देश केलेला सापडत नाही. तारागणांत त्रिशंकु, वसिष्ठ, अरुंधती, सप्तर्षि ह्यांचीं नांवें आलीं असून नक्षत्रांत रोहिणी, पुनर्वसु, पुष्य, स्वाती, विशाखा, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा ह्यांचा नामनिर्देश केलेला आहे. रोहिणीचा इतर ग्रहांशीं व विशेषतः

**ज्योतिष.**

चंद्राशीं जो योग होतो तो कवीचा आवडता अलंकार-विषय दिसतो. " बुधः खे रोहिणीमिव " "ग्रहेणाङ्गार-केणेव पीडितामिव रोहिणीम् " "शशांक इव रोहिणीम्" इत्यादि अनेक उदाहरणें देतां येतील. "गगने ग्रहयोर्घोरं बुधाङ्गारकयोरिव" ह्यासारख्या वाक्यांवरून लोकांचा ग्रहांशीं चांगला परिचय झाला होता असें दिसतें. एकंदर बुध, गुरु, मंगळ, सूर्य, राहु व चंद्र ह्या ग्रहांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. भगवान् अगस्त्य मुनींनी रामाला एक सर्व-शत्रुविनाशी सूर्यस्तोत्र सांगितलेलें आहे; त्यांत खाली लिहिल्याप्रमाणे एक श्लोकार्ध आहे. " एष सुप्तेषु जागर्ति भूतेषु परिनिष्ठितः " ह्याचा अर्थ हा म्हणजे सूर्य लोक निजले असतांही जागृत असतो असा करावा; अथवा ह्याचे किरण सुप्त म्हणजे दिसेनासे झाले असतांही तो स्वतः जागृत असतो असाही अर्थ करावा. कसाही अर्थ केला तरी त्यावरून उघड होतें की, रात्रीं सूर्य पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्या तरी भागाला प्रकाशित करीत असतो अशी यथार्थ कल्पना लोकांची झाली होती.

## राज्यें.

प्राचीनकालीं ह्या भरतखंडभर असंख्य लहान लहान राज्यें पसरलीं होतीं. तीं कांही स्वतंत्र व कांही माण्डलिक असत. सर्व राजांचा

पराभव करून त्यांपासून खंडणी घेणारा एकादा विक्रमशील राजा मधून मधून निघे हें खरें. पण सर्व देश येथून तेथून एकाच भूपतीच्या प्रत्यक्ष अमलाखाली असल्याचें दिसत नाहीं. रामायणांत

**निरनिराळीं राज्यें**

मिथिला, काशी, केकय, अंग, कोसिल, मगध, सिंधु, सौराष्ट्र, द्राविड, मत्स्य, कौशिक, आन्ध्र, पुण्ड्र, चोल, केरल, पाण्ड्य, कारुपथ, मद्रक, कुरु, भरत आणि प्रस्थल इतक्या राज्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. ह्यांशिवाय दाक्षिणात्य म्हणजे दक्षिणेकडील राजे व त्यांचे प्रांत आणि म्लेंच्छाचार्य—बर्बर, यवन, पल्हव वगैरे राजांचीं राज्यें निराळींच.

राजे लोक आपल्या मंत्रिमंडळाच्या साहाय्यानें राज्यकारभार चालवीत असत. लोक वाटेल त्याला जरी राजा नेमित नसत तथापि राजघराण्यांतील पुरुष राज्यपदावर आरूढ होण्याच्या पूर्वी त्या गोष्टीस प्रजेची अनुमति असावी लागत असे.

**राज्यव्यवस्था**

रामास राज्याभिषेक करण्याच्या अगोदर दशरथानें आपल्या सर्व प्रजेस बोलावून तुमची ह्या गोष्टीस संमति आहे काय असें स्पष्ट विचारलें होतें. प्रजेनें आपला अनुकूल अभिप्राय दिल्यावर न जाणो कदाचित् तोंडापुरते हे उद्गार असतील अशी शंका येऊन दशरथानें जमलेल्या लोकांस पुन्हा विचारलें की, मी धर्माला अनुसरून राज्य करीत असतां तुम्ही रामाची इच्छा कां करितां? ह्यावरही पुन्हा असंशयात्मक उत्तर आल्यावर दशरथानें आपला बेत कायम करून रामास सांगितलें की, “ अद्य प्रकृतयः सर्वास्त्वामिच्छन्ति नराधिपम् । अतस्त्वां युवराजानमभिषेक्ष्यामि पुत्रक ॥ ” सर्व प्रजेची इच्छा आहे की, तूं राजा व्हावें; म्हणून मी तुला, हे पुत्रा, राज्याभिषेक करणार आहें. त्याचप्रमाणे वैदर्भक राजाचा पुत्र श्वेत हा आपला पूर्व वृत्तांत कथन करीत असतां म्हणतो “ ततः पितरि स्वर्याते पौरा मामभ्यषेचयन् ।

तत्राहं कृतवान्राज्यं धर्म्यं च सुसमाहितः ॥" पिता वारल्यावर पौरजनांनी मला राज्याभिषेक केला तेव्हा मीं धर्माप्रमाणे राज्य केलें.

ह्याप्रमाणे राज्यपदप्राप्ति प्रजेच्या संमतीवर अवलंबून असल्या-कारणाने प्रजापालन हें राजाचें आद्य कर्तव्य ठरलें.

**प्रजावा-त्सल्य** प्रजापालनदक्ष होण्यास अवश्य लागणारे सद्गुण राजामध्ये लागत असत. प्रजेच्या सुखाशिवाय इतर सुखाची राजे बिलकूल अपेक्षा करीत नसत. प्रजानुरंजनाकरिता रामाने आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या सीते-चाही त्याग केला. त्याप्रमाणेच रामाच्या पूर्वजां-पैकी एका राजाने प्रजेचें प्रिय करण्याकरिता आपल्या पुत्राचाही त्याग केला. हा मुलगा इतका खोड्याळ होता की, तो रस्त्यावर खेळत असलेल्या मुलांस उचलून सरयूनदींत नेऊन सोडी. ह्यामुळे संतप्त झालेले नागरिक एक दिवस राजाकडे जाऊन म्हणाले की, तुला मुलगा पाहिजे असेल तर आम्हांस सोड किंवा आम्ही हवे असल्यास मुलाला सोड. एवढ्या भीतीचें कारण काय म्हणून विचा-रिल्यावर त्यांनी मुलाची कृति राजास निवेदन केली. तें ऐकिल्या-बरोबर राजाने आपल्या दुष्ट मुलाचा त्याग केला. लगेच त्याने त्या मुलाला व त्याच्या बायकोला गाडींत घालून यावज्जीव राज्यांत परत पाय न टाकण्याविषयी फरमाविलें. "स तासां वचनं श्रुत्वा प्रकृतीनां नराधिपः । तं तत्याजाहितं पुत्रं तासां प्रियचिकीर्षया ॥ तं यानं शीघ्रमारोप्य सभार्यं सपरिच्छदम् । यावज्जीवं विवास्योऽयमिति तान-न्वशात्पिता ॥" ह्या गोष्टीवरून तत्कालीन राजे किती सद्गुणी असले पाहिजेत ह्याचें अनुमान करितां येईल. चिरकाल राज्य चाल-विणाऱ्या राजाच्या अंगीं नीति व विद्या हीं असलींच पाहिजेत. "विद्यास्वभिविनीतो यो राजा राजन्नयानुगः । स शास्ति चिरमै-श्वर्यमरींश्च कुरुते वशे ॥" ह्याच्या उलट जो नीच मनोवृत्तींचा महीपति असेल त्याची किंमत प्रजानन श्मशानांतील अग्नीप्रमाणे

कांहीच समजत नसत. "सक्तं ग्राम्येषु भोगेषु कामवृत्तं महीपतिम् । लुब्धं न बहु मन्यन्ते स्मशानाग्निमिव प्रजाः ॥" अशाच प्रकारचा उपदेश दशरथराजाने रामास राज्याभिषेकप्रसंगीं केला आहे. तो असाः "गुणवत्यपि तु स्नेहात्पुत्र वक्ष्मामि ते हितम् । भूयो विनयमास्थाय भव नित्यं जितेन्द्रियः ॥ कामक्रोधसमुत्थानि त्यज स्वव्यसनानि च । परोक्षया वर्तमानो वृत्त्या प्रत्यक्षया तथा ॥ अमात्यप्रभृतीः सर्वाः प्रजाश्चै-वानुरञ्जय । कोष्ठागारायुधागारैः कृत्वा संनिचयान्बहून् ॥" ( २-३-४२ ते ४४ ) खरा मुत्सद्दीपणा म्हणजे लबाडी, लुच्चेगिरी, छपवाछपवी, लपंडाव ह्यांत भरलेला आहे असा पुष्कळांचा समज आहे; पण तो अगदी चुकीचा आहे. अत्यंत धार्मिक बुद्धीने राज्यकारभार करणाऱ्यालाही उत्कृष्ट मुत्सद्दी बनतां येतें. प्राचीन हिंदु राजांचाही समज असाच होता. सत्य हाच राज्यकारभाराचा पाया होय असा त्यांचा दृढ विश्वास होता. "सत्यमेवानृशंसं च राजवृत्तं सनातनम् । तस्मात्सत्यात्मकं राज्यं सत्ये लोकः प्रतिष्ठितः ॥"

वनवासार्थ गेलेल्या पूज्य भ्रात्याला भेटण्याकरिता जेव्हा भरत आला तेव्हा राज्यासंबंधीं रामानें त्याला अनेक प्रश्न विचारिले आहेत त्यावरून त्या वेळच्या राजनीतीची कल्पना करितां येईल. राम विचारितो—"कोणतीही मसलत तूं एकटाच करीत नाहीस ना? त्याचप्रमाणे मसलत करते वेळेस पुष्कळांवर विश्वास ठेवीत नाहीस ना? गुप्त मसलत तुझी सर्व राष्ट्रभर पसरत नाही ना? अल्प यत्नांनी साध्य होणारें फार फायदेशीर काम करण्याचें योजिल्यावर तें करण्याच्या कामीं दिरंगाई करीत नाहीस ना? तूं मनांत आणशील तें झालेंच असेंच तुझे मांडलिक राजे समजतात ना? तूं आपली मसलत दुसऱ्यास सांगितली नाहीस तरी ती तर्कानें ते जाणत नाहीत ना? तसेंच परमंत्र तुला अथवा तुझ्या मंत्रिमंडळाला समजल्यावांचून रहात नाही ना? हजारों मूर्ख पदरीं असलेले गेले तरी चालेल पण

**राज्य-कारभार**

जवळ एक पण्डित पाहिजे अशी इच्छा धरतोस ना? कारण तो तिजोरीची स्थिति सुधारून सुव्यवस्था करूं शकतो. हजारों किंवा लाखों मूर्ख जरी जवळ असले तरी त्यांच्या ठिकाणीं कार्यक्षमता आढळणार नाही. एक जरी अमात्य असला पण तो जर बुद्धिमान्, दक्ष, शूर, शहाणा असा असेल तर राजाला विपुल संपत्ति प्राप्त करून देईल. नोकरांच्या योग्यतेप्रमाणेच त्यांना तूं कामें सांगितलीं आहेस ना? अतिशय कडक शिक्षा करून तूं आपल्या प्रजेस उद्विग्न करून टाकिलें नाहीस ना? त्याचप्रमाणे राष्ट्रांत तुझा किंवा तुझ्या मंत्र्यांचा कोणी अवमान करीत नाही ना? तुझा सेनापति कुलीन, दक्ष, शूर, बुद्धिमान्, धीट, शुद्ध व तुझ्या ठिकाणीं सप्रेम असा आहे ना? तुझ्या सैन्यापैकी ज्यांना दररोजच्या दररोज व ज्यांना महिना भरल्यावर पगार द्यावयाचा त्यांना तो मुदतशीर तूं देतोस ना? कारण मुदतशीर न दिल्यास सेना क्रुद्ध होते व भयंकर परिणाम घडतो. सर्व किल्ल्यांमध्ये धन, धान्य आयुधें, उदक, यंत्रें, वाकबगार सैन्य हीं भरपूर आहेत ना? तुझा वसूल मोठा असून खर्च बेताचा आहे ना? अपराधाची शाबिती झाल्यावर पैशाच्या लोभाने चोराची मुक्तता होत नाही ना? इत्यादि.

ह्यावरून स्पष्ट दिसतें की, अर्वाचीन देशी राजांमध्ये दृष्टीस पडणाऱ्या अवगुणांपैकी एकही अवगुण प्राचीन हिंदु राजांत नव्हता. ते आपल्या सैन्याचा पगार कधीही थकवीत नसत. पैसे खाऊन अपराधी सोडीत नसत. आद्यापेक्षा खर्च जास्त करीत नसत व कधीही गाफिल नसत. निदान वर सांगितलेली प्राचीन हिंदु राजनीति आहे ती हल्लींच्या राजनीतितत्त्वांशीं ताडून पाहतां कांकणभर सरसच ठरेल ह्यांत संशय नाही. स्वतः हिंदु राजे प्राचीन काळीं किती विद्याविनयसंपन्न, नीतिमान्, प्रजाहितदक्ष व न्यायी असत हें रामाचें चरित्र पुढे देण्यांत येईल त्यावरून उत्तम रीतीने समजेल.

खुद्द राजाच्या ठिकाणीं इतके अप्रतिम गुण पाहिजेत मग त्याला

साहाय्य करणाऱ्या मंत्र्यांमध्ये कमी असणें असंभवनीय आहे. मोठा पंडित असून राजाचें हित चिंतणारा असेल तोच

**मंत्रिमंडळ** मंत्री राजाने नेमिला पाहिजे असें वर दिलेल्या उत्तऱ्यावरून उघड होतें. दशरथराजाच्या मंत्र्याचें वर्णन दिलें आहे त्यावरूनही तीच गोष्ट सिद्ध होते. दशरथाचे मंत्री एकंदर आठ होते. त्यांच्या गुणांचें वर्णन खालील श्लोकांत केलें आहे.

" मन्त्रज्ञाश्चेङ्गितज्ञाश्च नित्यं प्रियहिते रताः ।
" शुचयश्चानुरक्ताश्च राजकृत्येषु नित्यशः ।
" विद्याविनीता ह्रीमन्तः कुशला नियतेन्द्रियाः ।
" श्रीमन्तश्च महात्मानः शस्त्रज्ञा दृढविक्रमाः ।
" कीर्तिमन्तः प्रणिहिता यथावचनकारिणः ।
" तेजःक्षमायशःप्राप्ताः स्मितपूर्वाभिभाषिणः ।
" क्रोधात्कामार्थहेतोर्वा न ब्रूयुरनृतं वचः ।
" तेषामविदितं किंचित् स्वेषु नास्ति परेषु वा ।
" क्रियमाणं कृतं वापि चारेणापि चिकीर्षितम् ।
" कुशला व्यवहारेषु सौहृदेषु परीक्षिताः ।
" प्राप्तकालं यथादण्डं धारयेयुः सुतेष्वपि ।
" कोशसंग्रहणे युक्ता बलस्य च परिग्रहे ।
" अहितं चापि पुरुषं न हिंस्युरविदूषकम् ।
" सुवाससः सुवेषाश्च ते च सर्वे शुचिव्रताः ।
" हितार्थाश्च नरेन्द्रस्य जाग्रतो नयचक्षुषा । " इत्यादि.

( १-७-१ पासून )

म्हणजे दशरथाचे मंत्री त्याच्या आज्ञेप्रमाणे चालणारे, कधीहि असत्य भाषण न करणारे, प्रसंग आला असतां प्रत्यक्ष पुत्रास सुद्धा शासन करणारे व शत्रु असून देखील निरपराधी असेल तर त्याच्या वाटेस न जाणारे, राष्ट्रकोश वृद्धिंगत करणारे, श्रीमान् , शस्त्रज्ञ व पराक्रमी असे होते.

राजा व त्याचे मंत्री हे कसे असावे ह्याविषयींचीं वचनें वर दिलीं आहेत. ह्या वचनानुसार राज्यचालकांचें वर्तनही असे. हें प्रत्यक्ष रामाच्या कारकीर्दीवरून स्पष्ट समजेल ह्या उद्देशानें

**रामचरित्र** रामचरित्र संक्षिप्त रीतीनें येथे देण्याचें योजिलें आहे. क्रतूनंतर बारा महिने लोटल्यावर चैत्र महिन्यांत नवमीच्या दिवशीं पुनर्वसु नक्षत्रीं राम जन्मास आला. त्या वेळेस पांच ग्रह उच्चीचे होते. चंद्र व गुरु एकाच राशीचे होते व लग्न कर्क होतें. "ततश्च द्वादशे मासे चैत्रे नावमिके तिथौ ॥ नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पञ्चसु । ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना सह ॥" राजपुत्र व त्यांतहि नवससायास करून प्राप्त झालेला पुत्र असूनसुद्धा बालपणीं रामाच्या शिक्षणाविषयी यत्किंचितही हयगय झाली नाही. बालपणींच वेदाध्ययन करून धनुर्विद्येंत व घोड्यावर बसण्यांत तो वाकबगार झाला होता व इतकें असूनही तो नेहमी "पितृशुश्रूषणरत" असे. रामाचे डोळे लाल, बाहु विस्तृत, ओष्ठ रक्तवर्ण व आवाज दुंदुभीप्रमाणे असे. "लोहिताक्षं महाबाहुं रक्तोष्ठं दुन्दुभिस्वनम्." पंधरा वर्षांचा असतांच यज्ञक्रियेस व्यत्यय आणणाऱ्या राक्षसांचें निर्दलन करण्याकरिता रामास विश्वामित्र घेऊन गेला. पुढे "गोब्राह्मणहितार्थ" व "देशहितार्थ"

**शिक्षण** मुनिवर्यांचा उद्देश सिद्धीस नेल्यावर जनकराजाच्या धनुष्याचा भंग करून वीर्यशुल्कसीतेचा पत्न्यर्थ रामाने अंगीकार केला. वयोवृद्धीबरोबर रामाची गुणवृद्धिही होत होती. देशकाल पाहून कोठे कसें वागावें हें त्यास चांगलें समजत असे. त्याची स्मरणशक्ति वाखाणण्यासारखी होती. प्राकृतमिश्रित संस्कृत नाटकें त्याने वाचलीं होतीं. राज्यकारभाराचें सर्व शिक्षण त्याला मिळालें असून त्याचें खासगी आचरण सरल, सत्याला धरून व विनययुक्त असे; "व्यसनेषु मनुष्याणां भृशं भवति दुःखितः ॥" दुसऱ्यास दुःख झालें असतां त्यास अत्यंत

दुःख होई असा त्याचा स्वभाव असे. अशा गुणवान् पुत्रास राज्याभिषेक करून पुष्कळ वर्षे राज्यधू वाहिल्याने थकलेल्या दशरथास विश्रांति घेण्याची मनीषा झाली. परंतु, भरतास राज्य मिळत नाही एवढ्यावरून उत्पन्न झालेल्या कैकेयीच्या मत्सरामुळे रामास चौदा वर्षे वनवास काढणें भाग पडलें. दशरथानें कैकेयीस पूर्वी दोन वर दिले होते ते त्या दुष्टबुद्धिस्त्रीने त्या संधीस मागितले. आपल्या पित्यास आपण दिलेलें वचन राखितां यावें व सत्यापासून त्याने भ्रष्ट होऊं नये म्हणून त्या पितृभक्तिपरायण पुत्राने वनांत जाण्याचें मोठ्या खुषीने कबूल केलें. ह्याचें नांव पितृभक्ति व सत्यनिष्ठा !

**रामाचें व्यवहार-ज्ञान**

वनांत जाण्याच्या पूर्वी सीतेला भेटण्याकरितां तिच्याकडे राम गेला त्या वेळेस त्याने आपल्या भार्येला एखाद्या व्यवहारज्ञ मनुष्याप्रमाणे मोठ्या शहाणपणाचा व धूर्तपणाचा उपदेश केला आहे. घटकाभर राम ही काल्पनिक व्यक्ति मानली तरी काव्यकाराच्या चाणाक्षपणाविषयीं कौतुक वाटल्यावांचून रहात नाही. “ सोऽहं त्वामागतो द्रष्टुं प्रस्थितो विजनं वनम् । भरतस्य समीपे ते नाहं कथ्यः कदाचन ॥ ऋद्धियुक्ता हि पुरुषा न सहन्ते परस्तवम् । तस्मान्न ते गुणाः कथ्या भरतस्याग्रतो मम ॥ अहं ते नानुवक्तव्यो विशेषेण कदाचन । अनुकूलतया शक्यं समीपे तस्य वर्तितुम् ॥........याते च मयि कल्याणि वनं मुनिनिषेवितम् । व्रतोपवासपरया भवितव्यं त्वयानघे ॥ कल्यमुत्थाय देवानां कृत्वा पूजां यथाविधि । वन्दितव्यो दशरथः पिता मम जनेश्वरः॥ माता च मम कौसल्या वृद्धा संतापकर्षिता । धर्ममेवाग्रतः कृत्वा त्वत्तः संमानमर्हति ॥ ” ( २-२६-२४ ते ३१ ). “ओसाड वनांत जावयास निघालेला मी तुला भेटण्याकरिता आलों आहें. भरत जवळ असतांना त्याच्या समक्ष माझे गुण केव्हांहि गाऊं नकोस. कारण, संपन्न स्थितींतल्या पुरुषांना दुसऱ्याची केलेली प्रशंसा सहन होत नाही. माझी किंवा माझ्या स्वरूपाची वाखाणणी कोणा-

जवळ तूं कधींही करूं नकोस; कारण, त्याच्या योगानें भरताविषयीं प्रतिकूल ग्रह करण्यासारिखें आहे. मी वनांत गेल्यावर उपवास व व्रतें करून तूं कालक्रमण कर. प्रातःकालीं उठून यथाविधि देवांची पूजा केल्यावर माझ्या पित्याला – दशरथाला नमस्कार करीत जा आणि माझ्या दुःखी वृद्ध मातेचा नेहमी मान राखीत जा." अशासारिख्या व्यावहारिक उपदेशाची हल्लींच्या विधवांना किती तरी अवश्यकता आहे. अशा प्रकारचे उपदेश ज्या पुराणांत सांपडतात त्या पुराणांची योग्यता निःसंशय कमी नाही. परंतु, आमच्या दृष्टीवरचें आवरण अद्यापि निःशेष गेलें नाही. तें जाईपर्यंत पुराणांची उपयुक्तता आमच्या मनावर ठसावी तशी ठसणार नाही. सुमंत्राबरोबर आपल्या आईला रामानें वनांतून जो निरोप पाठविला तोही वरच्यासारखाच; धूर्तपणाचा आहे. राम म्हणतोः— माझ्या आईला सांग कीं, "अभिमानं च मानं च त्यक्त्वा वर्तस्व मातृषु । अनुरागमार्यां च कैकेयीमम्ब कारय ॥" "मी राजाची वडील बायको आहें हा गर्व सोडून राजाच्या दुसऱ्या स्त्रियांशीं आपलें वर्तन ठेव. एवढेंच नव्हे तर राजा जिचें ऐकतो अशा कैकेयीलाच मान दे."

**रामाचें सरळ मन**

वनवासाचे क्लेश सहन करण्याचें भाग पडून राज्यपद हातचें गेलें व भरताला तें प्राप्त झालें ह्याबद्दल रामाला वाईट वाटलें नाही व भरताचाही त्यानें मत्सर केला नाही. अयोध्येहून निघते वेळीं तद्वासी पौरवांना त्यानें केलेल्या उपदेशावरून त्याच्या निष्कलंक मनाची अटकळ होईल. "या प्रीतिर्बहुमानश्च मय्ययोध्यानिवासिनाम् । मत्प्रियार्थं विशेषेण भरते सा विधीयताम् ॥ स हि कल्याणचारित्रः कैकेय्यानन्दवर्धनः । करिष्यति यथावद्वः प्रियाणि च हितानि च ॥ ज्ञानवृद्धो वयोबालो मृदुर्वीर्यगुणान्वितः । अनुरूपः स वो भर्ता भविष्यति भयापहः ॥ "(२-४५ ६ते८) "अयोध्यावासी जनांची जशी प्रीति मजवर आहे; मला ते जसा मान देतात तशीच प्रीति व

तसाच मान किंबहुना त्याहीपेक्षां विशेष त्यांनीं भरताला द्यावा. भरताचें वर्तन शुद्ध आहे. तो तुम्हांला प्रिय व हितावह असेल तेंच करील. भरत वयानें लहान आहे तरी पण तो ज्ञानसंपन्न, मृदुभाषी, शूर व गुणवान् असून योग्य रीतीनें राज्यकारभार करण्यासारखा आहे." ह्यावरून उघड दिसतें कीं, कैकेयीच्या दुष्ट कृतीनें संतापून जाऊन रामानें भरताविषयीं आपलें मन कलुषित होऊं दिलें नाहीं.

उच्च नीच कशीही स्थिति येवो; प्रसंग येईल तो स्वावलंबनानें पार पाडितां येण्यासारिखें शिक्षण राजपुत्रांना मिळालें होतें. अरण्य-मार्ग आक्रमीत असतां वाटेंत नदीनाले लागल्यास पलीकडे जाण्या-करिता जंगलांतलीं लाकडें आणून तराफा बनवून रामलक्ष्मण पैलतीरीं जात असत. अरण्यांत निरनिराळ्या ठिकाणीं वस्ती करितां पर्णकुटिका ते स्वतः बांधीत व जटायूसारख्या आप्ताचें देहावसान झालें असतां त्याचा अन्त्यविधि स्वतः मन्त्रोक्त रीतीनें उरकून टाकीत. ह्यावरून प्राचीन कालच्या लोकांना व्यावहारिक व व्यापक शिक्षण कसें मिळत असे व कोणत्याही स्थितींत तद्-नुरूप होण्यास ते किती लायक असत ह्याची कल्पना करितां येईल.

**पत्नीप्रेम**

रामाच्या अंगीं जे अनेक गुण होते त्यांपैकीं सीतेच्या ठिकाणीं अनुराग हा एक होय. "मयि भावो हि सीतायास्तत्त्वतो विनिवेशितः । ममापि भावः सीतायां सर्वथा विनिवेशितः ॥" ह्याप्रमाणें ह्या पतीपत्नींचें एकमेकांवर निःसीम प्रेम असे व त्याबद्दल एकमेकांची पूर्ण खात्री होती. रावणानें सीतापहार केल्यावर रामाला शोकानें कसें विह्वल केलें होतें हें सर्वांस माहीत आहे. सीतेसाठीं हळहळणाऱ्या व तत्प्राप्ती-साठीं आतुर झालेल्या रामाचें वर्तन युद्धांत रावणाचा पराभव करून सीता पुन्हा फार दिवसांनीं भेटल्यावर फारच निराळ्या प्रकारचें होतें. आनंदांत मग्न होऊन सीतेचा अंगीकार एकदम न करितां

सं. ता.

तो फार सावधपणाने वागला. त्याची मुद्रा गंभीर झाली. पत्नी-प्रेमाला वश होऊन त्याने विवेकशक्तीला सोडिलें नाही. बिभीषण सीतेला घेऊन आला तेव्हा जवळ असलेल्या लोकांना एकीकडे सारण्याची एकच गर्दी उडाली. सीतेच्या मार्गावर व आसपास कोणीही फिरकूं नये म्हणून वेत्रधारी शिपायी इतस्ततः छडी फिरवीत फिरूं लागले. पण दुसऱ्यांना निरर्थक यत्किंचितहि त्रास पोहोंचूं नये अशी इच्छा बाळगणाऱ्या रामाला हें सहन कसें व्हावें ? "उत्सार्यमाणान्दृष्ट्वाथ जगत्यां जातसंभ्रमान् । दाक्षिण्यात्तदमर्षाच्च वारयामास राघवः॥ संरम्भाच्चाब्रवीद्रामः चक्षुषा प्रदहन्निव । बिभीषणं महाप्राज्ञं सोपालम्भमिदं वचः ॥ किमर्थं मामनादृत्य क्लिश्यतेऽयं त्वया जनः । निवर्तयैनमुद्वेगं जनोऽयं स्वजनो मम ॥" लोकांना तेथून घालवून दिल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं भीति उत्पन्न झालेली पाहून तें सहन न होऊन व सभ्यपणाला तें अनुचित आहे असें वाटून रामाने त्या गोष्टीचें निवारण केलें व बिभीषणाला तो जरा टोंचून बोलला. मला विचारल्यावांचून ह्या लोकांना त्रास कां देतां ? त्यांना उद्विग्न करूं नका. हे लोक माझेच आहेत. हल्लीच्या बड्या अधिकाऱ्यांनी ह्यापासून बोध घेतला तर बरें होईल. पुढे राम म्हणतोः—गृहें,

**रामाचा थोर स्वभाव**

वस्त्रें किंवा प्राकार ह्यांनी स्त्रियांचें आवरण होत नाही. त्यांचें शुद्धाचरण हेंच त्यांना आवरण होय. संकटांत असतां, युद्धांत, यज्ञभूमीवर अथवा लग्नांत स्त्रिया पुरुषांच्या दृष्टीस पडल्या तरी त्यांत दोष नाही. पालखी सोडून सीतेला पायांनीच मजकडे येऊं द्या. पुढे सीता जवळ आली. परंतु, पूर्वी प्रेमळ व पत्नीचें कुतूहल पुरविण्यांत तत्पर असलेला भर्ता ह्या क्षणीं कठोरचित्त झालेला तिने अवलोकिला व खाली लिहिल्याप्रमाणे रामाने उच्चारिलेले शब्द ऐकून तर तिला फारच दुःख झालें. रामाने तिला सांगितलें:—

" विदितश्चास्तु भद्रं ते योऽयं रणपरिश्रमः ।
" सुतीर्णः सुहृदां वीर्यान्न त्वदर्थं मया कृतः ॥
" रक्षता तु मया वृत्तमपवादं च सर्वतः ।
" प्रख्यातस्यात्मवंशस्य न्यङ्गं च परिमार्जता ॥
" प्राप्तचारित्रसंदेहा मम प्रतिमुखे स्थिता ।
" दीपो नेत्रातुरस्येव प्रतिकूलासि मे दृढा ॥
" तद्गच्छ त्वानुजानेऽद्य यथेष्टं जनकात्मजे ।
" एता दश दिशो भद्रे कार्यमस्ति न मे त्वया ॥ "

( ६-११५-१५-१८ )

" स्नेह्यांच्या शौर्याने सफल झालेला हा युद्धाचा खटाटोप जो मीं केला तो तुझ्याकरिता नव्हे हें तूं पक्कें समज. बायकोला पळवून नेणाराचें ह्याला शासन करितां येत नाही असा अपवाद मला लागूं नये व कुळाला कमीपणा येऊं नये एवढ्याचकरिता मी ह्या युद्धाच्या भरीस पडलों. तुझ्या चरित्राविषयी संशय उत्पन्न झाल्यामुळे नेत्ररोग झालेल्या मनुष्याला जसा दिवा सोसत नाही तसाच प्रकार तुझ्याविषयी माझा झाला आहे म्हणून वाटेल तिकडे तूं जा; माझी तुला परवानगी आहे. तुझ्याशीं मला कांही कर्तव्य नाही". ह्यावरून हें उघड होतें कीं, रामाचें मन जितकें प्रेमळ होतें तितकेंच निश्चयी होतें. पण सीता ही तरी रामाचीच बायको. तिला आपल्या निर्दोष वर्तनाची खात्री होती. आता ही लज्जेची वेळ नाही असें पाहून तिनेही रामाला बाणेदार उत्तर दिलें:—

"किं मामसदृशं वाक्यमीदृशं श्रोत्रदारुणम् । रूक्षं श्रावयसे वीर प्राकृतः प्राकृतामिव ॥ न तथास्मि महाबाहो यथा मामवगच्छसि । प्रत्ययं गच्छ मे स्वेन चारित्रेणैव ते शपे ( ६-११६-५, ६ )". "एखादा असंस्कृत मनुष्य आपल्या असंस्कृत पत्नीला बोलतो तद्वत् हें कठोर, कानाला कठीण लागणारें, अनुचित वाक्य मला कां ऐकवितां ? मला आपण समजतां तशी मी नाही असें खास समजा;

हें मी आपल्या चरित्राची शपथ घेऊन सांगतें." एवढेंच म्हणून ती राहिली नाही. रामाच्या व जमलेल्या सर्व लोकांच्या समक्ष "माझें आचरण जर निष्कलंक असेल तर सर्वसाक्षी अग्नि माझें संरक्षण करो" असें म्हणून तिने प्रदीप्त केलेल्या अग्नींत प्रवेश केला. परंतु, अग्निज्वालांनी तिचा देह भडकून न जातां विभावसूने तिला आपल्या अंकावर घेऊन रामाच्या स्वाधीन केलें. तेव्हा हिच्या ठिकाणीं पापाचा लवलेश नाही अशाविषयी रामाची खात्री झाली. रावणाच्या अन्तःपुरांत दीर्घ काल राहणाऱ्या सीतेचा एकदम अंगीकार केला असतां बालिशत्वाचा आरोप येईल तो चुकवावा म्हणून रामाने वरील प्रकार केला. ज्या राजनीतीच्या शिक्षणाने लोकमताला मान देणारे राजे पूर्वी निपजत त्या राजनीतितत्त्वांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.

तथापि, एवढयाच प्रसंगाने सीतेचें संकट टळलें नाही. चौदा वर्षे वनवासांत काढून रावणाचा पराभव केल्यानंतर सीतेसह राजधानींत राम परत आल्यावर राज्य चालवीत असतां सीतेविषयी लोकांची कुजबुज त्याच्या कानावर आली. " रक्षसां वशमापन्नां कथं रामो न कुत्स्यति ॥ अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति । यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते ॥ " (७-४३-१८, १९) अशा प्रकारची टीका लोक सर्वत्र करीत आहेत असें रामास त्याच्या सोबत्यांनी कळविलें. तेव्हा रामाचें मन पुन्हा उद्विग्न झालें आणि सीतेचा त्याग करण्याचा त्याने निश्चय केला. " अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभाः। अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥ " (७-४५-१४, १५). लोकापवादाच्या भीतीने मी आपल्या आयुष्याचाही त्याग करीन, मग सीतेची कथा काय ? असा विचार करणाऱ्या रामाने हा आपला अभिप्राय त्रिवर्गबंधूंस कळविला व सीतेला वाल्मीकीच्या आश्रमाच्या आसपास सोडून देण्याची आज्ञा त्याने लक्ष्मणाला केली. ज्या कालीं प्रजाजनांकरितां आपल्या आवडत्या

भार्येसही सोडून देण्यास राज्यकर्ते तत्पर असत त्या कालच्या राज्य-व्यवस्थेच्या प्रशंसनार्थ जास्त लिहिण्याची अवश्यकता नाही.

रामाच्या अशा वर्तनाबद्दल जसें सानंद आश्चर्य वाटतें त्याहूनही जास्त सीतेला सोडून लक्ष्मण परत फिरतांना त्याच्या बरोबर तिने जो निरोप रामाला पाठविला तो वाचून वाटतें.

**सीतेचा बाणेदार-पणा**

" यथा भ्रातृषु वर्तेथास्तथा पौरेषु नित्यदा । परमो ह्येष धर्मस्ते तस्मात्कीर्तिरनुत्तमा ॥ यत्तु पौरजने राजन्धर्मेण समवाप्नुयात् । अहं तु नानुशोचामि स्वशरीरं नरर्षभ ॥" ( ७-४८-१५,१६ ) "भावांबरोबर जसें तुझ वर्तन आहे तसेंच प्रजाजनांबरोबर सदोदित असो. हाच धर्म श्रेष्ठ आहे. ह्याच्यापेक्षा दुसरी कीर्ति उत्तम नाही. पौरजनांच्या ठिकाणीं धर्माने वागणाऱ्या तुला पुण्य प्राप्त होवो. माझ्या शरिराला क्लेश होतील त्याविषयी मी दुःख बाळगीत नाही." आपल्यामुळे आपल्या पतीला अपवाद लागण्याची भीति आहे ह्मणून खुषीने व धैर्याने पतीचा वियोग सहन करणाऱ्या स्त्रिया फार क्वचित् सापडतात. आपल्या त्यागाच कारण लक्ष्मणाच्या तोंडून ऐकिल्यावर रामाला पाठविलेल्या वरील निरोपावरून सीतेच्या मनोनिग्रहाची प्रशंसा केल्याशिवाय राहवत नाही.

वरील विवेचनावरून राम धार्मिक, प्रजाहितदक्ष, सरळ मनाचा, कोमल अंतःकरणाचा व दृढनिश्चयी होता हें दिसून येईल. त्याचप्रमाणे तो फार दूरदर्शी आणि मनुष्यस्वभावाची पारख करणारा होता. तो जरी साधा होता तरी एकदम फसून जाण्यासारिखा भोळा नव्हता. दशरथाच्या मरणानंतर राम वनवासास गेल्याकारणाने भरत राज्यकारभार पहात होता. चौदा वर्षे राजलक्ष्मीचा उपभोग घेतल्याने न जाणों कदाचित् भरताच्या स्वभावांत विपर्यास झाला असेल असें मनांत येऊन वनवासांतून परत आल्यावर अयोध्या नगरात शिरण्याच्या पूर्वी रामाने हनुमंताला भरताचा अभिप्राय

जाणण्याविषयीं पुढे धाडिलें:—"एतच्छ्रुत्वा यमाकारं भजते भरतस्ततः। स च ते वेदितव्यः स्यात्सर्वं यच्चापि मां प्रति ॥ ज्ञेयाः सर्वे च वृत्तान्ता भरतस्येंगितानि च । तत्त्वेन मुखवर्णेन दृष्टया व्याभाषितेन च ॥ सर्वकामसमृद्धं हि हस्त्यश्वरथसंकुलम् । पितृ-

**रामाचा धोरणी स्वभाव**

पैतामहं राज्यं कस्य नावर्तयेन्मनः ॥" (६-१२५-१४ ते १६)."मी आलों आहें असें भरताला समजल्यावर त्याची मुद्रा कशी होते व माझ्या संबंधाने एकंदर त्याची वागणूक कशी आहे तें सर्व पाहून ये. त्याचप्रमाणे तोंडावरून, दृष्टीवरून व भाषणावरून भरताच्या मनांतला अभिप्राय जसा असेल तसा काढून मला कळीव. कारण, सर्व वासना परिपूर्ण होत असून, हत्ती, घोडे, रथ ह्यांची अनुकूलता असून व वडिलार्जित राज्य प्राप्त झालें असून कोणाचें मन बदलल्याशिवाय राहणार नाही ? जर कदाचित् कैकेयीच्या संगतीने स्वतः राज्य करण्याची भरताला इच्छा झाली असेल तर त्याला राज्य करूं दे." "संगत्या भरतः श्रीमान्राज्येनार्थी स्वयं भवेत् । प्रशास्तु वसुधां सर्वामखिलां रघुनन्दनः ॥" (६-१२५-१७). वरील उताऱ्यावरून रामाचा शहाणपणा व स्वार्थ-त्याग हे दोन्ही दिसून येतात.

रामाने ह्या जगामध्ये किती वर्षे घालविलीं हें निर्णयात्मक ठरविणें कठीण आहे. "दश वर्षसहस्राणि दश वर्षशतानि च । कृत्वा वासस्य नियमं स्वयमेवात्मना पुरा ॥" (७-१०४-१२) ह्या रामायणांतील वाक्यावरून अकरा हजार वर्षे रामाची आयुर्मर्यादा ठरते. पण सहस्रशब्दाचा अर्थ हजार होतोच असा निय नाही. रामायणाच्याच एका टीकाकाराने अन्य ठिकाणीं सहस्रशब्द दिनवाचक ठरविला आहे. तथापि, हाही अर्थ येथे लागू पडत नाही. कारण तेहतीस वर्षांपेक्षां जास्त रामाची आयुर्मर्यादा निःसंशय होती. पण ह्यावरून एवढेंच ठरतें की, सहस्रशब्दाचा अर्थ निराळा असला पाहिजे. रामाचें लग्न झालें तेव्हा तो पंधरा वर्षांचा होता आणि

सीता सहा वर्षांची होती. पुढे सीता म्हणते:—वनवासास येण्याच्या पूर्वी मीं बारा वर्षें इक्ष्वाकूंच्या घरीं काढिलीं. "उषित्वा द्वादशसमा इक्ष्वाकूणां निवेशने" (३-४७-४०) म्हणजे वनवासास निघते वेळीं रामाचें वय सत्तावीस वर्षांचें होतें. पुढचीं चौदा वर्षें वनवासांत गेलीं. म्हणजे परत अयोध्येस राम आला त्या वेळीं त्याचें एकेचाळीस वर्षांचें वय होतें. रामाच्या बरोबर आलेली बिभीषण, सुग्रीव वैगेरे मंडळी एक वर्ष ( कांहीं टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणे पांच महिने ) आनंदांत काढून निघून गेली. तेव्हापासून "अत्यक्रामच्छुभः कालः शैशिरो भोगदः सदा"

**रामाचें वय** ( ७।४२।२६ ). आणखी एक संवत्सर गेला. पुढच्या वर्षांत रामाने शत्रुघ्नाला लवणावर स्वारी करण्यास पाठविलं. लवणाला मारून त्याचें राज्य घेऊन बारा वर्षांनी शत्रुघ्न परत अयोध्येस आला. "ततो द्वादशमे वर्षे शत्रुघ्नो रामपालिताम् । अयोध्यां चकमे गन्तुमल्पभृत्यबलानुगः ॥" ( ७।७१।१ ). ह्या वेळेस रामाचीं चौपन वर्षें पुरीं झालीं असलीं पाहिजेत. नंतर रामाने अश्वमेध केला. त्यास एक वर्षावर दिवस लागले "संवत्सरमथो साग्रं वर्तते न च हीयते" ( ७।९२।१९ ). ह्याप्रमाणे त्याने "दशवर्षसहस्राणि" ( ७।९९।८ ) यज्ञ केले. सहस्र शब्दाचा अर्थ दिवस केला तर अश्वमेध धरून सरासरी तीस वर्षें रामाचें यज्ञकृत्य चाललें होतें असें दिसतें. तेव्हा ह्या वेळीं रामाचें वय चवऱ्याशीं वर्षांचें होते असें ठरतें. पुढे लगेच रामाने भरताला सिंधुदशावर पाठविलें. तेथून ता पांच वर्षांनी परत अयोध्येस आला. "निवेश्य पञ्चभिर्वर्षैर्भरतो राघवानुजः। पुनरायान्महाबाहुरयोध्यां कैकयीसुतः ॥" ( ७।१०१।१६ ). भरत परत आल्यावर तावडतोब रामाने लक्ष्मणास सांगितलें कीं, तुझे दोन मुलगे आहेत, त्यांच्या स्वाधीन कोठला तरी मुलुख केला पाहिजे. करिता कारुपथदेशांत जाऊन तेथे दोन राज्यें स्थापून आपल्या मुलांना

तेथे राज्याभिषेक कर. त्याप्रमाणे लक्ष्मणाने करून तो एक वर्षाने परत अयोध्येस आला. " लक्ष्मणस्त्वङ्गदीयायां संवत्सरमथोषितः । पुले स्थिते दुराधर्षे अयोध्यां पुनरागमत् ॥ " ( ७।१०२।१३ ). ह्या वेळीं अर्थात् रामाचें वय नव्वदावर गेलें. नंतर थोडक्या दिवसांनी कालाने रामाला आठवण दिली की, तुझी भूलोकींच्या अवताराची इयत्ता संपली. त्यावर रामाने उत्तर केलें की, " भद्रं तेऽस्तु गमिष्यामि यत एवाहमागतः । " ( ७।१०४।१८ ). त्याप्रमाणे लागलीच सरयूकांठीं जाऊन रामाने मनुष्यदेहाचा त्याग केला. ह्यावरून रामाचें वय मरणसमयीं एक्याण्णव ब्याण्णव वर्षांचें असावें असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाही.

ह्या त्रोटक रामचरित्रावरून तत्कालीन राजे व राज्यव्यवस्था ह्यांविषयी कांहींशी कल्पना करितां येईल. लोकसत्तात्मक व अनियंत्रित राज्यव्यवस्थेमधील दोष जींत नाहीत अशी ही शक्य तितकी निर्दोष राज्यव्यवस्था असलेली दिसते. रामराज्यांत लोक सुखी होते तसे नंतर केव्हाहि नसतील.

## युद्धस्थिति

मागे राज्यव्यवस्थेविषयी लिहितांना सांगितलें आहे की, आपला खजिना व युद्धसामग्री जय्यत ठेवण्याविषयी राजांचा मोठा कटाक्ष असे. साधारण मोठ्या शहराला प्राकार असून त्यावर लढाईचीं यंत्रें ठिकठिकाणीं ठेविलेलीं असत. हे तट बळकट असून त्यांवर ध्वज फडकत असत. "उच्चाट्टालध्वजवतीं शतघ्नीं शतसंकुलाम् " ( १।५।११ ) असें अयोध्येचें वर्णन आहे. त्याचा अर्थ, तटावर उंच चावड्या असून ध्वज फडकत होते व शतघ्नींची गर्दी होती. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून गिरिदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग असे नानाप्रकारचे किल्ले बांधीत असत. सैन्यामध्ये बहुधा पायदळाचाच भरणा विशेष असे. रामाची स्वारी लंकेवर निघाली तेव्हा सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या करून त्यांवर निरनिराळ्या वानरप्रमुखांची

सीता सहा वर्षांची होती. पुढे सीता ह्मणते:—वनवासास येण्याच्या पूर्वी मीं बारा वर्षें इक्ष्वाकूंच्या घरीं काढिलीं. "उषित्वा द्वादशसमा इक्ष्वाकूणां निवेशने" (३-४७-४०) ह्मणजे वनवासास निघते वेळीं रामाचें वय सत्तावीस वर्षांचें होतें. पुढचीं चौदा वर्षें वनवासांत गेलीं. म्हणजे परत अयोध्येस राम आला त्या वेळीं त्याचें एकेचाळीस वर्षांचें वय होतें. रामाच्या बरोबर आलेली बिभीषण, सुग्रीव वैगेर मंडळी एक वर्ष ( कांही टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणे पांच महिने ) आनंदांत काढून निघून गेली. तेव्हापासून "अत्यक्रामच्छुभः कालः शैशिरो भोगदः सदा"

**रामाचें वय** ( ७।४२।२६ ). आणखी एक संवत्सर गेला. पुढच्या वर्षांत रामाने शत्रुघ्नाला लवणावर स्वारी करण्यास पाठविल. लवणाला मारून त्याचें राज्य घेऊन बारा वर्षांनी शत्रुघ्न परत अयोध्येस आला. "ततो द्वादशमे वर्षे शत्रुघ्नो रामपालिताम् । अयोध्यां चकमे गन्तुमल्पभृत्यबलानुगः ॥" ( ७।७१।१ ). ह्या वेळेस रामाचीं चौपन वर्षें पुरीं झालीं असलीं पाहिजेत. नंतर रामाने अश्वमेध केला. त्यास एक वर्षावर दिवस लागले "संवत्सरमथो साग्रं वर्तते न च हीयते" ( ७।९२।१९ ). ह्याप्रमाणे त्याने "दशवर्षसहस्राणि" ( ७।९९।८ ) यज्ञ केले. सहस्र शब्दाचा अर्थ दिवस केला तर अश्वमेध धरून सरासरी तीस वर्षें रामाचें यज्ञकृत्य चाललें होतें असें दिसतें. तेव्हा ह्या वेळीं रामाचें वय चवऱ्याशीं वर्षांचें होते असें ठरतें. पुढे लगेच रामाने भरताला सिंधुदशावर पाठविलें. तेथून ता पांच वर्षांनी परत अयोध्येस आला. "निवेश्य पञ्चभिर्वर्षैर्भरतो राघवानुजः। पुनरायान्महाबाहुरयोध्यां कैकयीसुतः॥" ( ७।१०१।१६ ). भरत परत आल्यावर तावडतोब रामाने लक्ष्मणास सांगितलें की, तुझे दोन मुलगे आहेत, त्यांच्या स्वाधीन कोठला तरी मुलुख केला पाहिजे. करिता कारुपथदेशांत जाऊन तेथे दोन राज्यें स्थापून आपल्या मुलांना

तेथे राज्याभिषेक कर. त्याप्रमाणे लक्ष्मणाने करून तो एक वर्षाने परत अयोध्येस आला. " लक्ष्मणस्त्वङ्गदीयायां संवत्सरमथोषितः । पुत्रे स्थिते दुराधर्षे अयोध्यां पुनरागमत् ॥ " ( ७।१०२।१३ ). ह्या वेळीं अर्थात् रामाचें वय नव्वदावर गेलें. नंतर थोडक्या दिवसांनी कालाने रामाला आठवण दिली की, तुझी भूलोकींच्या अवताराची इयत्ता संपली. त्यावर रामाने उत्तर केलें की, " भद्रं तेऽस्तु गमिष्यामि यत एवाहमागतः । " ( ७।१०४।१८ ). त्याप्रमाणे लागलीच सरयूकांठीं जाऊन रामाने मनुष्यदेहाचा त्याग केला. ह्यावरून रामाचें वय मरणसमयीं एक्याण्णव ब्याण्णव वर्षांचें असावें असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाही.

ह्या त्रोटक रामचरित्रावरून तत्कालीन राजे व राज्यव्यवस्था ह्यांविषयीं कांहींशी कल्पना करितां येईल. लोकसत्तात्मक व अनियंत्रित राज्यव्यवस्थेमधील दोष जींत नाहीत अशी ही शक्य तितकी निर्दोष राज्यव्यवस्था असलेली दिसते. रामराज्यांत लोक सुखी होते तसे नंतर केव्हाहि नसतील.

## युद्धस्थिति

मागे राज्यव्यवस्थेविषयी लिहितांना सांगितलें आहे की, आपला खजिना व युद्धसामग्री जय्यत ठेवण्याविषयीं राजांचा मोठा कटाक्ष असे. साधारण मोठ्या शहराला प्राकार असून त्यावर लढाईचीं यंत्रें ठिकठिकाणीं ठेविलेलीं असत. हे तट बळकट असून त्यांवर ध्वज फडकत असत. "उच्चाट्टालध्वजवतीं शतघ्नीं शतसंकुलाम् " ( १।५।११ ) असें अयोध्येचें वर्णन आहे. त्याचा अर्थ, तटावर उंच चावड्या असून ध्वज फडकत होते व शतघ्नींची गर्दी होती. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून गिरिदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग असे नानाप्रकारचे किल्ले बांधीत असत. सैन्यामध्ये बहुधा पायदळाचाच भरणा विशेष असे. रामाची स्वारी लंकेवर निघाली तेव्हा सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या करून त्यांवर निरनिराळ्या वानरप्रमुखांची

योजना झाली होती; " यास्यामि बलमध्येऽहं बलौघमभिहर्षयन् " (६।४।१८) असें म्हणून राम स्वतः सैन्याच्या मध्ये राहिला होता.

हल्ली सुधारणेच्या काळांत सुद्धा युद्धांत भूतदयेचे नियम पाळले जात नाहीत. पण अशी स्थिति रामायणासारख्या प्राचीन काळीं नव्हती. युद्धामध्येहि भूतदया व न्याय ह्यांचे नियम अक्षरशः पाळले जात असत. शत्रूकडला दूत आला असतां प्राणास मुकण्याची त्यास कधीहि धास्ती नसे. कारण " दूता न वध्या समयेषु राजन्सर्वेषु सर्वत्र वदन्ति सन्तः" ( ५।५२।१३ ). न मारण्याचें कारण की, "साधुर्वा यदि वाऽसाधुः परैरेष समर्पितः । ब्रुवन्परार्थं परवान्न दूतो वधमर्हति " (५।५२।१९) : "दूत सज्जन असो अथवा असज्जन असो; तो दुसऱ्याने पाठविलेला असतो. तो केवळ निरोप्या असतो. तो जें कांही बोलतो तें त्याचें स्वतःचें नसतें. एवढ्याकरिता त्याचा वध करणें योग्य नाही." रावणाचा दूत शुक हा रावणाकडून सुग्रीवाला निरोप घेऊन आला असतां सर्व वानर त्याच्यावर पडून त्यांनी त्याला त्राहित्राहि करून सोडलें, तेव्हा रामाकडे त्याने आपली दाद लाविली. " न दूतान्घ्नन्ति काकुत्स्थ वार्यन्तां साधु वानराः । यस्तु हित्वा मतं भर्तुः स मतं संप्रधारयेत् । अनुक्तवादी दूतः सन्स दूतो वधमर्हति " ( ६।२०।१८ ). तो रामाला म्हणालाः– "दूतांना कधी मारीत नसतात. ह्या वानरांचें तूं निवारण कर. आपल्या यजमानाचा अभिप्राय बाजूला ठेवून आपलेंच मत जो स्थापूं लागेल व यजमानाने न सांगितलेली गोष्ट सांगेल तो दूत मात्र वध करण्यास योग्य होतो." ह्याप्रमाणे,

**युद्धांतील नियम**

जरी दूताचा वध करणें कधीहि उचित मानलें जात नसे, तथापि त्यास प्रसंगानुसार शासन करणें झाल्यास अन्य मार्गाने करीत हें खालील श्लोकावरून समजेल. " वैरूप्यमङ्गेषु कशाभिघातो मौण्ड्यं तथा लक्षणसंनिपातः । एतान्हि दूते प्रवदन्ति दण्डान्वधस्तु दूतस्य न नः

श्रुतोऽस्ति ॥" (५।५२।१५). दूतवधाप्रमाणेच स्त्रीवधाचा निषेध केलेला आहे. स्त्री असल्यामुळेच रामाने क्रोधाविष्ट होऊन आलेल्या ताटकेला सोडून दिलें. स्त्रीस्वभावाने रक्षित असलेल्या ताटकेला मारण्यास रामाचा हात धजेना " न ह्येनामुत्सहे हन्तुं स्त्रीस्वभावेन रक्षिताम् " ( १।२६।१२ ). युद्धामध्ये दुसऱ्यावरोबर शत्रु सामना करण्यांत गुंतला आहे हें पाहून त्याच्यावर तुटून पडणें हें खऱ्या वीर्याचें लक्षण मानलें जात नसे. त्याचप्रमाणे युद्धांत थकून पडलेल्यावर शस्त्र उपसून त्याचा प्राण घेणें हें अनुचित कृत्य गणलें जात असे. " तस्मात्परिश्रांत इति व्यवस्य न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि. " ह्यावरून युद्धामध्ये रामायणकालीं अमानुष व क्रूर कृत्यें होत नसत असें दिसतें. तथापि, ह्या उत्कृष्ट नियमांचें बंधन राक्षसांत कांही कमी असावेंसें दिसतें. कारण, राक्षस कदाचित् वाटेंतील फळें, मुळें व पाणी विष कालवून अथवा अन्य तऱ्हेने खाण्यास नालायक करतील अशा भीतीने रामाने वाटेचें संरक्षण करण्याकरिता मुद्दाम पुढे कांही सैन्य पाठविलें होतें. " दूषयेयुर्दुरात्मानः पथि मूलफलोदकम्। राक्षसाः पथि रक्षेथास्तेभ्यस्त्वं नित्यमुद्यतः ॥" ( ६।४।११ ). वरील नियमांत जसा सौम्यपणा दिसतो तशी आपल्या सैन्यांत उत्कृष्ट व्यवस्था रहावी म्हणून कडक नियमांचें अवलंबन केलेलेंहि आढळतें. आपल्या जाग्यावरून पळ काढणाऱ्या शेंदाड शिपायाला देहान्त शासन होत असे. सैन्याची व्यवस्था लावल्यावर वानरराज सुग्रीवाने खालील सक्त हुकूम फरमाविला होता. " आसन्नं द्वारमासाद्य युध्यध्वं च प्लवङ्गमाः । यश्च वो वितथं कुर्यात्तत्र तत्राप्युपस्थितः । स हन्तव्योऽभिसंप्लुत्य राजशासनदूषकः ॥ " ह्याप्रमाणे धाक, उत्साह, निंदा व लालूच ह्यांच्या योगाने सेनानायक आपली सेना कार्यदक्ष ठेवीत असे. शत्रूने वानरसेनेंत गोंधळ उडवून दिला असतां वानरसेना पळावयास लागली तेंव्हा अंगद त्यास म्हणतोः— "आपले प्राण रक्षीत काय

बसलां आहां. आपापल्या जागीं परत फिरा. आयुधें टाकून निर्वीर्य होऊन पळत सुटणाऱ्या तुम्हांला पाहून बायकाहि तुमचा उपहास करतील. अल्पायु प्राणी आपण मरून पृथ्वीवर पडलों तर भेकड योद्ध्यांना प्राप्त होण्यास कठीण असा ब्रह्मलोक आपणांस प्राप्त होईल. अथवा आपण जर शत्रूला युद्धांत मारिलें तर कीर्ति मिळून पृथ्वीचें राज्य करण्यास सापडेल. " स्थानं सर्वे विवर्तध्वं किं प्राणान्परिरिक्षथ । निरायुधानां क्रमतामसङ्गगतिपौरुषाः । दारा ह्युपहसिष्यन्ति स वै घातः सुजीविनाम् । शयामहे वा निहताः पृथिव्यामल्पजीविताः । प्राप्नुयामो ब्रह्मलोकं दुष्प्रापं च कुयोधिभिः ॥"

लढायांचीं वर्णनें रामायणांत जीं कांहीं आढळतात त्यांवरून प्रत्येक बाजूचें सर्व सैन्य झटापटींत गुंतलेलें असे असें खात्रीपूर्वक सांगतां येणें कठीण आहे. बहुतेक ठिकाणीं द्वंद्वयुद्धाचे प्रसंग वर्णिलेले आढळतात. अशा ठिकाणीं अर्थातच शस्त्रांचा उपयोग फारसा होत नसे. दोन वीरांची प्रत्यक्ष गांठ पडल्यावर बाहुयुद्ध, मुष्टियुद्ध ह्यांपैकीच एखाद्याचा अवलंब करण्यांत येत असे व हा युद्धप्रसंग बहुधा बाण न वापरणाऱ्या योद्ध्यांचा होत असे. निरनिराळ्या प्रकारचीं अस्त्रें, कवच, गदा व बाण ह्यांचा उपयोग लढाईंत करीत असत. ह्यांशिवाय हातास लागेल तें शस्त्राप्रमाणें वापरण्यांत येई. झाडें, दगड वगैरे वस्तूंचें साहाय्य युद्धेच्छु जनांस फार होई. " केचिदस्त्राणि संत्यज्य बाहुयुद्धमकुर्वत । तलैश्च चरणैश्चापि मुष्टिभिश्च द्रुमैरपि ॥ जानुभिश्च हताः केचि-

**शस्त्रास्त्रें**

द्भग्नदेहाश्च राक्षसाः । शिलाभिश्चूर्णिताः केचिद्वानरैर्युद्धदुर्मदैः ॥" ( ६ । ५३ । २३ । २४ ). त्याचप्रमाणे " गदां त्यक्त्वा ततस्तत्र मुष्टियुद्धमकुर्वत । अन्योन्यं जघ्नतुस्तत्र तावुभौ हरिराक्षसौ ॥ " (६।५४।२७ ). झाडांदगडांनी लढणारे व बाणांनी युद्ध करणारे ह्यांत भेद गणिला जात असे असें दिसतें. रामलक्ष्मणांनी ह्या पहिल्या रानटी हत्यारांत जा वस्तूंचा

उपयोग कधीहि केलेला दिसत नाही. हीं हत्यारें वानर व राक्षस ह्यांचीं होत. राक्षसांमध्येहि रावण बाणांनी युद्ध करीत असे. ह्यावरून बाणांनी युद्ध करणाराची पायरी जरा वरचढ दिसते. राक्षस कोणतीं हत्यारें वापरीत हें खालील श्लोकावरून समजेल. " मुद्गरैरायसैः शूलैः प्रासैः खड्गैः परश्वधैः । राक्षसाः समरे शूरं निजघ्नू रोषतत्पराः ॥ " रामाच्या बाणांचें वर्णन खालील श्लोकांत केलेलें आढळतें. " ततः कनकपुङ्खैस्तु शरैः संनतपर्वभिः । चिच्छेद रामः संक्रुद्धः खरस्य समरे ध्वजम् ॥ " ( ३।२८।२० ). ह्याप्रमाणे युद्धासंबंधी जी थोडीबहुत हकीकत रामायणांत आढळली ती येथे दिली आहे.

रामायणासंबंधाने वादविषयक प्रश्नांची चर्चा पुढील भागांत करण्याचा इरादा होता; परंतु कांहीं आगान्तुक कारणांमुळे तो बेत रहित करणें भाग पडलें. पुढे साधल्यास ते भाग तयार करितां येतील. रामायणासंबंधाने सर्व गोष्टी एके ठिकाणीं याव्या असा हेतु होता. पण तूर्त तरी तो सिद्धीस जाईलसें दिसत नाही. तथापि एकंदर जनसमूहाला हाच भाग बोधप्रद होईल. रामायण वाचीत असतां लक्षांत ठेवण्यासारखीं वचनें खुणा करून ठेविलीं होतीं. तींच वर्गीकरण करून प्रसिद्ध केल्यास आपल्या प्राचीन समाजाची बरीच माहिती होईल असें वाटल्यावरून हा उद्योग केला आहे. तो विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल अशी आशा आहे.

---

श्री ग्रंथ संग्रहालय
सं. ... नं. ...
ता. ...

बसलां आहां. आपापल्या जागीं परत फिरा. आयुधें टाकून निर्वीर्य होऊन पळत सुटणाऱ्या तुम्हांला पाहून बायकाहि तुमचा उपहास करतील. अल्पायु प्राणी आपण मरून पृथ्वीवर पडलों तर भेकड योद्धयांना प्राप्त होण्यास कठीण असा ब्रह्मलोक आपणांस प्राप्त होईल. अथवा आपण जर शत्रूला युद्धांत मारिलें तर कीर्ति मिळून पृथ्वीचें राज्य करण्यास सापडेल. " स्थानं सर्वे विवर्तध्वं किं प्राणान्परिरक्षथ । निरायुधानां क्रमतामसङ्गगतिपौरुषाः । दारा ह्युपहसिष्यन्ति स वै घातः सुजीविनाम् । शयामहे वा निहताः पृथिव्यामल्पजीविताः । प्राप्नुयामो ब्रह्मलोकं दुष्प्रापं च कुयोधिभिः ॥"

लढायांचीं वर्णनें रामायणांत जीं कांहीं आढळतात त्यांवरून प्रत्येक बाजूचें सर्व सैन्य झटापटींत गुंतलेलें असे असें खात्रीपूर्वक सांगतां येणें कठीण आहे. बहुतेक ठिकाणीं द्वंद्वयुद्धाचे प्रसंग वर्णिलेले आढळतात. अशा ठिकाणीं अर्थातच शस्त्रांचा उपयोग फारसा होत नसे. दोन वीरांची प्रत्यक्ष गांठ पडल्यावर बाहुयुद्ध, मुष्टियुद्ध ह्यांपैकीच एखाद्याचा अवलंब करण्यांत येत असे व हा युद्धप्रसंग बहुधा बाण न वापरणाऱ्या योद्धयांचा होत असे. निरनिराळ्या प्रकारचीं अस्त्रें, कवच, गदा व बाण ह्यांचा उपयोग लढाईत करीत असत. ह्यांशिवाय हातास लागेल तें शस्त्राप्रमाणें वापरण्यांत येई. झाडें, दगड वगैरे वस्तूंचें साहाय्य युद्धेच्छु जनांस फार होई. " केचिदस्त्राणि संत्यज्य बाहुयुद्धमकुर्वत । तलैश्च चरणैश्चापि मुष्टिभिश्च द्रुमैरपि ॥ जानुभिश्च हताः केचि-

**शस्त्रास्त्रें**

द्भग्नदेहाश्च राक्षसाः । शिलाभिश्चूर्णिताः केचिद्वानरैर्युद्धदुर्मदैः ॥" ( ६ । ५३ । २३ । २४ ). त्याचप्रमाणे " गदां त्यक्त्वा ततस्तत्र मुष्टियुद्धमकुर्वत । अन्योन्यं जघ्नतुस्तत्र तावुभौ हरिराक्षसौ ॥ " (६।५४।२७ ). झाडांदगडांनी लढणारे व बाणांनी युद्ध करणारे ह्यांत भेद गणिला जात असे असें दिसतें. रामलक्ष्मणांनी ह्या पहिल्या रानटी हत्यारांत्रजा वस्तूंचा

उपयोग कधीहि केलेला दिसत नाही. हीं हत्यारें वानर व राक्षस ह्यांचीं होत. राक्षसांमध्येहि रावण बाणांनी युद्ध करीत असे. ह्यावरून बाणांनी युद्ध करणाराची पायरी जरा वरचढ दिसते. राक्षस कोणतीं हत्यारें वापरीत हें खालील श्लोकावरून समजेल. " मुद्गरैरायसैः शूलैः प्रासैः खड्गैः परश्वधैः । राक्षसाः समरे शूरं निजघ्नू रोषतत्पराः ॥ " रामाच्या बाणांचें वर्णन खालील श्लोकांत केलेलें आढळतें. " ततः कनकपुङ्खैस्तु शरैः संनतपर्वभिः । चिच्छेद रामः संक्रुद्धः खरस्य समरे ध्वजम् ॥ " ( ३।२८।२० ). ह्याप्रमाणे युद्धासंबंधी जी थोडीबहुत हकीकत रामायणांत आढळली ती येथे दिली आहे.

रामायणासंबंधाने वादविषयक प्रश्नांची चर्चा पुढील भागांत करण्याचा इरादा होता; परंतु कांहीं आगान्तुक कारणांमुळे तो बेत रहित करणें भाग पडलें. पुढे साधल्यास ते भाग तयार करितां येतील. रामायणासंबंधाने सर्व गोष्टी एके ठिकाणीं याव्या असा हेतु होता. पण तूर्त तरी तो सिद्धीस जाईलसें दिसत नाही. तथापि एकंदर जनसमूहाला हाच भाग बोधप्रद होईल. रामायण वाचीत असतां लक्षांत ठेवण्यासारखीं वचनें खुणा करून ठेविलीं होतीं. तींच वर्गीकरण करून प्रसिद्ध केल्यास आपल्या प्राचीन समाजाची बरीच माहिती होईल असें वाटल्यावरून हा उद्योग केला आहे. तो विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल अशी आशा आहे.

ग्रंथ संग्रहालय
सं. नं.
ता.

# चरित्रनायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं ?

ह्या विषयाची चर्चा कै. देव यांनी थोडीशी केली आहे. तथापि विषयाच्या महत्त्वाच्या मानाने त्याचें सर्वांगपूर्ण विवेचन व्हावयास पाहिजे तसें अद्यापि झालें नाही. मराठी वाङ्मयांत अशा प्रकारची चर्चा नवीनच आहे. जशजशी अधिक चरित्रें मराठींत लिहिलीं जातील तसतशी ह्या चर्चेची अवश्यकता लोकांस अधिक पटूं लागेल ह्यांत संशय नाही.

चरित्रांत नायकाच्या गुणांबरोबर त्याच्या दोषांचें वर्णन करावें कीं नाही ह्या प्रश्नाचें उत्तर निश्चित करण्यापूर्वी चरित्रलेखनाचा उद्देश मनांत आणणें अवश्य आहे. त्याशिवाय वरील सामान्य प्रश्नाचें उत्तर सामान्य अतएव निष्फल झाल्याविना राहणार नाही.

ज्या व्यक्ति समाजास पूज्य होतात, देहविसर्जनानंतरहि कीर्तिरूपाने ज्या ह्या नश्वर जगांत अनश्वरत्व पावतात, ज्यांत जन्म घेतला त्या समाजास उपकारबद्ध करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत असतें, अशा व्यक्तींच्या अंगीं कांही विशिष्ट गुण अगर गुणबाहुल्य असावें लागतें. हे गुण कोणते, त्यांचा उद्भव व विकास कसा झाला, दृष्टकार्याला ते कितपत कारणीभूत झाले इत्यादि महत्त्वाच्या बाबींचें विवेचन चरित्रलेखकास प्राधान्येंकरून करावयाचें असतें. चरित्रलेखकाने चरित्र लिहितांना अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, चरित्रांत चरित्रनायकाच्या अंगचा विशिष्ट गुण पदोपदीं दृश्यमान व्हावा. इतर गोष्टींचा ऊहापोह केला तरी तो ह्या उद्दिष्ट हेतूला पोषक होईल अशाच रीतीने केला पाहिजे. तात्पर्य, चरित्रनाय-

काच्या अद्वितीय गुणाची जर योग्य परीक्षा लेखकास झाली नाही, अगर तो गुण दृष्टीसमोर ठेवून जर चरित्र लिहिलें गेलें नाही तर तें चरित्र अगदी नीरस झाल्याशिवाय राहणार नाही. मराठी वाङ्मयांत अशा नीरस चरित्रांचा भरणा कमी आहे असें नाही. मोठा मनुष्य असला की लिहा त्याचें चरित्र व चरित्र लिहावयाचें म्हणजे चरित्रनायकासंबंधीं उपलब्ध होतील तितक्या गोष्टी एकत्र गुंफावयाच्या, असाच क्रम सामान्य प्रतीच्या चरित्रलेखकांचा दिसतो. कित्येक चरित्रें तर अशीं निघतील की नायकाच्या कोणत्या विशिष्ट गुणांला मोहित होऊन लेखकाने त्याचें चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला ह्याचा उलगडा सबंध चरित्र वाचूनहि होणें दुर्घट जाईल.

उपरिनिर्दिष्ट चरित्र लिहिण्याची तऱ्हा जर मान्य होण्यासारखी असेल, तर चरित्रांत नायकाच्या अंगीं असलेल्या दोषांचें वर्णन करावें कीं नाही ह्या प्रश्नाचा निकाल लावण्यास कठीण जाणार नाही. कारण, दोषनिरूपणाने मुख्य गुणाची हानि अंशतःसुद्धा होण्याचा संभव नसल्यास त्या दोषाचा निर्देश अप्रस्तुत असल्या-मुळे सन्मान्य चरित्रांत त्याला जागा मिळणेंहि रास्त नाही, मग त्याचा ऊहापोह करण्याची गोष्टच काढावयास नको. उदाहरणार्थ, कांही थोर पुरुषांच्या ठिकाणीं आपण कांही सदोषता कल्पून तिचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत कितपत साजला असता ह्याचा विचार केला म्हणजे अप्रस्तुत दोषोद्घाटनाची अनुपयुक्तता तेव्हाच निदर्शनास येते. अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या वॉशिं-ग्टनच्या चरित्रांत त्याच्या हातून एके प्रसंगीं परस्त्रीगमनासारखा अत्याचार झाला होता ह्या आपण कल्पिलेल्या दोषाचा उल्लेख केवळ अप्रस्तुत व म्हणूनच निंद्य होय. ज्या गुणांच्या जोरावर तो अमेरिकन लोकांस स्वतंत्रता देण्यास कारणीभूत झाला त्या गुणांची त्याच्या एकवार परस्त्रीगमनाने किंचितहि हानि होण्याचा संभव नाही; ह्या दोषनिदर्शनाने चरित्रकार आपल्या वाचकांस काय बोध

घ्यावयास सांगणार? जॉर्ज वॉशिंग्टन हा कोणी देवमाणूस नव्हता; मनुष्यच होता व इतर मनुष्यांप्रमाणे त्याच्या ठिकाणीं गुणवैकल्य होतें हेंच कीं नाही? पण आपल्या दत्तक देशास परावलंबनांतून मुक्त करणारा वॉशिंग्टन ह्याचीं खासगीं कृत्यें येथून तेथून सर्व दोषवर्जित असलीं पाहिजेत; त्याशिवाय त्यास इतका पराक्रम करितां येणार नाही असें मानणारे वाचक फार निघण्याची भीति नको.

वॉशिंग्टन, शिवाजी, नेपोलियन इत्यादि राज्यपटु वीरांचीं चरित्रें वाचण्याची लालसा प्रत्येक विद्याभिलाषी माणसास असते. म्हणून त्यांच्या चरित्रांत सदोष अंगाचा उल्लेख एक वेळ चरित्र पूर्ण करण्याकरिता केला आहे म्हणून क्षम्य मानतां येईल. कारण या थोर व परमपूज्य नायकांसंबंधी प्रत्येक गोष्ट त्यांच्या अद्वितीय पराक्रमामुळे जाणण्याची उत्कंठा प्रत्येकास असते. परंतु कांहींचीं चरित्रें त्यांच्या विशिष्ट गुणामुळे विशिष्ट वर्गालाच प्रिय असतात. नाईल नदीचा उगम शोधणारा, हिमालयाच्या उच्चतम शिखरावर आरूढ होणारा, नवी वसाहत करणारा, सुएझ काल्व्यासारखे प्रचंड कालवे खणून जलमार्ग सुगम करणारा, विमानांची कल्पना काढून वातावरणांत विहंगमांशीं स्पर्धा करणारा, तारेच्यासुद्धा साहाय्यावांचून इकडला संदेश तिकडे पाठवण्याची हांव धरणारा, इत्यादिकांसारख्यांचीं चरित्रें तत्तद्व्यासंगी लोकच विशिष्ट उद्देशाने वाचीत असतात. अशा चरित्रांत नायकांचे साद्यंत दोष अगर अवगुण वर्णन करण्याचा खटाटोप निष्कारण होय. तात्पर्य, चरित्रांत नायकाचे दोष वर्णन करावे कीं नाही हें ठरवितांना तें चरित्र साऱ्या जनसमूहाकडून अथवा विशिष्ट वर्गाकडूनच वाचलें जाण्यासारखें आहे ह्याचा विचार केला पाहिजे.

तसेंच, जें दोषनिदर्शन एका चरित्रांत त्याज्य ठरेल तेंच दुसऱ्या चरित्रांत केवळ प्रासंगिकच नव्हे तर अवश्य समजलें जाईल. आपल्या चलाख बुद्धिमत्तेच्या जोरावर हायकोर्टांत उत्कृष्ट वकिली

करून नांवारूपास आलेल्या गृहस्थांचें तेवढ्याचकरिता चरित्र लिहिणें झाल्यास त्यांत त्यांच्या वेश्यासहचारित्वाचा अथवा मदोत्पादक पदार्थसेवनलोलुपतेचा उल्लेख न केल्यास फारसें बिघडणार नाही. पहिला अत्याचार तर अप्रस्तुत म्हणून अग्राह्यच ठरेल. परंतु ह्याच गोष्टी एखाद्या प्रमुख प्रार्थनासमाजस्थापकाच्या चरित्रांत वगळणें म्हणजे जाणून बुजून असत्याचा अंगीकार केल्याचें पाप लागणार आहे; शिवाय अशा वगळण्याने चरित्रावर अपूर्णतेचा दोष येईल तो निराळाच.

वरील उदाहरणांवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की, एकाच माणसाचीं निरनिराळीं चरित्रें वेगवेगळ्या दृष्टीने लिहितां येतील. कै. आपटे हे कोणत्या गुणांनी अत्युत्तम वकील बनले हें प्राधान्येंकरून ज्यांत वर्णिलें आहे असें एक चरित्र आणि दुसरें ज्यांत त्यांच्या धार्मिक मतांतराचा ऊहापोह विशेषेंकरून केला आहे असें लिहितां येईल. दुसऱ्या चरित्रांत त्यांच्या सर्व गुणावगुणांचा निर्देश चरित्रकाराने स्पष्टपणें करणें अगत्याचें आहे. ह्यावरून आमचें असेंहि म्हणणें आहे की, चरित्रांत कोणताहि दोष प्रस्तुत असल्यास वगळणें बरें नाही. 'ज्या दोषांचें नामाभिधान नुसतें उच्चारण्यास मूर्तिमंत निंदेसहि लज्जा वाटते, इतिहास ज्यांकडे नुसता दृष्टिक्षेप करण्यासहि धजत नाही, सर्व प्रकारच्या मानवी मूर्तिमंत भ्रष्टतेच्या रसातळास जाऊन पोहोचलेल्या जीवाने ज्यांकडे नुसता दृष्टिपात केला तरी देखील त्यास ओकारी आल्यावांचून राहत नाही' अशा वर्गांतील दोषांचा नामनिर्देशहि चरित्रांत उपयोगाचा नाही, असें मेकॉले साहेबांचें मत रा० देवांनी दिलें आहे. परंतु मेकॉले साहेबांच्या ज्या कित्येक अतिशयोक्ति आहेत त्यांपैकीच ही एक समजली पाहिजे. अगोदर असे नीच दोष कोणते तें समजत नाही. दुसरें, असे दोष चरित्र लिहिण्यास पात्र झालेल्या माणसांत क्वचित् आढळतील. त्यांतूनहि जर असलेच तर

ते प्रस्तुत असल्यास त्यांचा अवश्य निर्देश झाला पाहिजे. साधुसंत म्हणून जो कांहीं लोकांस पूज्य झाला त्याच्यांत जर मेकॉले साहेब म्हणतात असे कांहीं दोष अथवा दुर्गुण लेखकांस खात्रीपूर्वक सिद्ध करतां येतील, तर ते दोष दाखवून त्याच्या साधुपदास गौणत्व येतें असें म्हणण्यास काय हरकत आहे आम्हास तरी कळत नाही. एखाद्या यन्त्रशोधकाच्या चरित्रांत त्याने एखादे प्रसंगीं हलकटपणाचें कृत्य केलें असल्यास त्याचा उल्लेख नसावा हें म्हणणें ठीक आहे, पण नीतितत्त्ववेत्त्याच्या चरित्रासंबंधाने हें म्हणणें कधीहि सयुक्तिक होणार नाही.

जे दोष दुर्गुणाभिधान पावतात, त्यांचा उल्लेख जर कित्येक प्रसंगीं अपरिहार्य होतो, तर दोषसुद्धा म्हणतां न येणारे जे अवगुण त्यांचा निर्देश करणें भाग आहे. असे अवगुण बारीकसारीक गोष्टींवरून जसे सिद्ध होतात तसे लौकिक गोष्टींवरून होत नाहीत. म्हणून दिसण्यांत क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींचाहि स्फोट चरित्रांत लेखकाने अवश्य केला पाहिजे. उघडच आहे की, मनुष्याच्या स्वभावाचें प्रतिबिंब त्याच्या वर्तनांत अगर कृतींत दृश्यमान होतें. एवढ्याकरिता त्याची कोणतीहि कृति उपेक्ष्य मानतां कामा नये. मात्र तिचा उल्लेख प्रासंगिक पाहिजे. रावबहादुर रानड्यांची देशावर अगर अर्थावर जास्त भक्ति होती हा त्यांच्या चरित्रांत प्रस्तुत मुद्दा असल्यास अर्थभक्ति सिद्ध करणाऱ्या त्यांच्या पुष्कळ बारीकसारीक गोष्टींचा निर्देश करणें अवश्य आहे. सामाजिक सुधारक ह्या नात्याने त्यांच्या प्रौढपणीं कुमारिकाविवाह करण्याच्या कृत्याचा निर्देश न करणें अशक्य आहे. मोठ्या माणसांच्या ठिकाणीं निष्कारण दोष लादण्याकडे जशी कित्येकांची प्रवृत्ति असते तशी वास्तविक दोष तोंडांतून न उच्चारण्याकडे दुसऱ्या कित्येकांची असते हेंहि येथे प्रसंगोपात्त सांगणें जरूर आहे.

"कविचरित्रांतील" ॲडिसनच्या चरित्रांत जॉनसनने त्याच्या

दोषनिदर्शक कृत्यांचा उल्लेख केला आहे. ॲडिसनचे हे दोष इतके ठळक आहेत की, ते त्याच्या चरित्रांत न येणें अपरिहार्य आहे. ॲडिसन हा मोठा निबंधकार व नीतितत्त्ववेत्ता होता व अशाच दृष्टीने त्याचें चरित्र लिहिलें जाणार. दुसऱ्याच्या वर्तनावर टीका करून तें सुधारण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या माणसास स्वतःचें वर्तन कलंकहीन करितां येईना हा मुद्दा प्रस्तुत चरित्रांत अगदी अवश्य आहे. तसेंच ज्याला आपण आपला मित्र म्हटला त्यास थोड्याशा रुपडक्यांकरिता कोर्टांत खेचणें हें कृत्य मनाच्या अनुदारतेचें व असहृदयतेचें स्पष्ट व्यंजक आहे.

"कविचरित्रें" हीं पूर्ण चरित्रें नव्हत. जॉनसनने प्रथम केवळ प्रास्ताविक लेख लिहिण्याचें ठरविलें होतें. हेच लेख पुढे लिहितां लिहितां विस्तृत झाले एवढेंच. प्रास्ताविक चरित्रात्मक लेखांत आणि पूर्ण चरित्रांत फरक आहे. पहिल्या प्रकारचीं चरित्रें कोणत्याहि उद्देशाने लिहिलीं नसतात. वाचकांना त्या व्यक्तीची त्रोटक माहिती देण्याचाच नियमित संकल्प चरित्रलेखकाने केलेला असतो. अशा चरित्रांत प्रस्तुत अप्रस्तुत हा भेदाभेद रहात नाही. कोणतीहि ठळक गोष्ट—मग ती चांगली असो अगर दोषास्पद असो—वगळली नाही म्हणजे झालें. कै. मंडलीक ह्यांचे लेख व भाषणें ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांस रा. पाध्यांनी जें इंग्रजींत लिहिलेलें चरित्र जोडलें आहे तें प्रास्ताविक आहे. आधुनिक कवींचीं निवडक काव्यें ग्रथित होऊन प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत कवींचीं संक्षिप्त चरित्रें दिलीं आहेत. 'बालबोधां'तील चरित्रें अशाच मासल्याचीं असतात. अशा प्रकारच्या चरित्रांत चरित्रनायकाचे दोष वर्णिलेच पाहिजेत, अशी जबाबदारी लेखकावर असण्याचें कारण नाही. तथापि ठळक अशा दोषार्ह कृत्यांचा उल्लेख केल्यास तोहि अस्थानीं म्हणतां येणार नाही.

त्यांतल्यात्यांतहि 'बालबोधां'तील चरित्रांत दोषवर्णन येऊं नये

असेंच आम्हांस वाटतें. कारण 'बालबोधां'तील चरित्रें हीं अल्प-वयस्क व परप्रत्ययनेय अशा बालांनी वाचावीं ह्या उद्देशाने लिहिलेलीं असतात. परिपक्क बुद्धीच्या, स्वतंत्र विचारांच्या, प्रौढ माणसांकरिता तीं लिहिलेलीं नसतात. ह्या चरित्रांच्यायोगाने लहान मुलांस थोर पुरुषांची ओळख करून द्यावयाची असते. ते आपल्या अंगच्या गुणांनी व कर्तृत्वशक्तीने बहुमानास चढले तसे आपण चढूं; त्यांनी स्वार्थत्याग करून देशकार्य केलें तसें आपण करूं अशी भावना चरित्रवाचनाने मुलांच्या मनांत जागृत करावयाची असते. त्यांच्या ठिकाणीं स्फूर्ति व उत्साह ह्यांचें आरोपण करावयाचें असतें. त्यांस प्रौढ वयांत अभ्यासण्यास योग्य असें मानसशास्त्र शिकवावयाचें नसतें. अप्रस्तुत अशा दोषवर्णनाने उत्साह व स्फूर्ति ह्यांचा अंशतः तरी भंग झाल्याशिवाय राहणार नाही. तात्पर्य, मुलांकरिता जीं चरित्रें लिहावयाचीं त्यांत चरित्रनायकाच्या दोषांचें वर्णन टाळणेंच श्रेयस्कर आहे.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट दिसून येईल की, प्रस्तुत प्रश्नाचा निकाल लावतेवेळीं कोणाकरतां चरित्रें लिहिलेलीं आहेत ह्याचाहि विचार करणें अवश्य आहे व ह्या विचारावरच त्या प्रश्नाचा निर्णय एकाबाजूने अवलंबून रहाणार आहे. कोणाकरिता व कोणत्या उद्देशाने चरित्र लिहावयाचें आहे ह्याची स्पष्ट कल्पना चरित्रलेखकास झाली पाहिजे. म्हणून सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेल्या समाजांत एकाच नियमाने चरित्रें लिहिणें कधीहि हितकारक व्हावयाचें नाही. सुशिक्षित, संपन्न व स्वास्थ्य उपभोगणाऱ्या समाजांत चरित्रनायकाच्या दोषांचें वर्णन त्यांच्या गुणांबरोबर करण्यास कांहीं हरकत नाही. तेथें कोणत्याहि गोष्टीचा सर्व बाजूंनी शांतपणें विचार करण्यास लोक पात्र असतात. समाजाला स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे चरित्रलेखकाने समाजांत कोणत्याहि विशिष्ट कल्पनांचा प्रक्षोभ करावयाचा नसतो. कोणत्याहि गुणाने

लोकादरास प्राप्त झालेल्यांची इत्थंभूत हकीकत समजून घेण्याची लोकांची उत्कटेच्छा तृप्त करणें हाच अशा समाजांत चरित्रलेखनाचा प्रधानहेतु असतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका ह्या देशांत चरित्रनायकाचे दोष यथातथ्य वर्णन करून चरित्रें लिहिण्यास हरकत नाही. पण रशिया, चीन अथवा हिंदुस्थान यांसारख्या अज्ञानरूपी महानिद्रेंतून जागृत होऊं पाहणाऱ्या देशांत गुणां-बरोबर दोषांचाहि परिस्फोट करून थोर व पराक्रमी पुरुषांचीं चरित्रें लिहिणें केव्हाहि श्रेयस्कर होणार नाही. अशीं चरित्रें लिहि-तांना लेखकाने तारतम्याचा उपयोग अवश्य केला पाहिजे.

इतर चरित्रनायकांच्या संबंधाने प्रस्तुत वादाचा निर्णय कसाहि लागो; पण राष्ट्रांतील परमपदारूढ विभूतींसंबंधाने विचार करतां या प्रश्नाचें उत्तर एकच असलें पाहिजे. महाराष्ट्रांत अशा विभूति दोन होत. एक शिवाजी महाराज व दुसरे विष्णुशास्त्री चिपळूणकर. विष्णुशास्त्री हे महा-राष्ट्राचे खरे नायक होत. महाराष्ट्रांतील सर्व लोकांच्या विचारांचा ओघ बदलून इष्ट मार्गाकडे नेण्याचें अद्वितीय कार्य त्यांनी केलें आहे. आज प्रत्येक महाराष्ट्रीयाला ते पूज्य आहेत. महाराष्ट्रांतील तरुणांची तर त्यांच्यावर अनुपम भक्ति आहे. शास्त्रीबोवांच्या लेखांची छाप ज्याच्यावर बसली नाही असा एकहि विचारशील प्राणी निघणार नाही. चिपळूणकरांच्या विचारांचें प्रतिबिंब आज प्रत्येकाच्या कृतींत व उक्तींत दिसत आहे. ह्याप्रमाणे निखिल महाराष्ट्रीयांस दीपस्थानीं झालेल्या थोर व्यक्तींचे काल्पनिक अगर अकाल्पनिक दोष विकारा-भिनिविष्ट जनतेच्या समोर उच्चारण्याने आपण हितापेक्षा अन-हितच करूं.

ज्या व्यक्तींनी राष्ट्राला कायमचें इष्ट वळण लावलें, ज्यांच्या पश्चात्‌हि लोक त्यांचें अनुकरण उत्साहपूर्वक करीत आहेत व विशेषतः हें अनुकरण जोंपर्यंत राष्ट्राभिवृद्धीस श्रेयस्कर आहे, तों-पर्यंत तरी निदान अशा व्यक्तींचे दोष अगर अवगुण वास्तविक

असलें तरी चरित्रांत न आणणें एकंदरीत देशाच्या फायद्याचें आहे. ज्याच्याविषयी आपल्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि वसत असते अशा माणसासंबंधी एखादी वाईट गोष्ट जर आपल्या कानीं आली तर त्या माणसाबद्दलची पूज्यबुद्धि कमी झाल्याशिवाय राहणार नाही. एवढेंच नव्हे, तर त्याच्यांतील गुणांचें आपल्या ठिकाणीं अबुद्धिपुरःसर होणारें जें संक्रमण त्यास व्यत्यय आल्यावांचून चुकत नाही. हा अनुभव प्रत्येकास असतोच. हीच गोष्ट राष्ट्रासहि लागू पडते. राष्ट्रीय पुरुषांच्या अंगच्या गुणांचें लोकांनी अनुकरण करावें, हा जो अशा पुरुषांचें चरित्र लिहिण्याचा मुख्य हेतु तो निष्फल होतो. विचारांपेक्षा विकारांचें प्राबल्य मनुष्यावर नेहमी असणारच. सामान्यजनसमूहावर तर तें फारच असतें. सबब अशा प्रकारचीं चरित्रें राष्ट्रप्रगतीस विघातक होत. चिपळूणकर गर्विष्ठ होते, ढोंगी होते, त्यांचे खरे विचार त्यांच्या लेखांतून प्रकट केलेल्या विचारांहून भिन्न होते, इत्यादि खऱ्या खोटया गोष्टी चरित्रांत आल्यास त्यांच्याविषयी पूज्यबुद्धि लुप्तप्राय होईल. तसें झालें असतां त्यांचे लेख वाचण्याकडे कोणाची प्रवृत्ति होणार नाही. अर्थात् त्यांच्या गुणांचें आरोपणहि कोठे होण्याचा संभव नाही. मग देशांत जागृति उत्पन्न कशी होणार? म्हणून राष्ट्रनायकांच्या चरित्रांत राष्ट्रप्रगतिविघातक दोषवर्णन केव्हाहि येतां कामा नये.

हाच नियम धार्मिक बाबतींत पूज्य असलेल्या देवतातुल्य विभूतींना लागू पडतो. आम्हां सर्व आर्यांस रामचरित्र परम पूज्य वाटतें-रामाचें एकपत्नीव्रत, स्वप्रजानिष्ठा, सत्यप्रीति इत्यादि गुणांनी ह्या चरित्राने लोकांवर आपला पूर्ण अम्मल बसवला आहे. अशा वेळीं निष्पाप व शूर अशा रामाच्या अंगीं नसते आरोप लादण्याचा कधी कधी झालेला बालिश प्रयत्न पाहून आश्चर्य वाटतें. चांगलें आहे तें काढून टाकून त्याच्याऐवजी त्याहून चांगलें आपण कांही ठेवीत नाही हें अशा दोषदर्शकांनी कधीहि विसरतां कामा नये.

सारांश, नायकाचे दोष दाखवितांना लेखकाने आपण कोणाचें चरित्र लिहीत आहों, काय उद्देशाने लिहीत आहों व कोणत्या काळांत लिहीत आहों ह्याचा विचार अवश्य केला पाहिजे. असा उद्देश निश्चित केला म्हणजे प्रस्तुत कोणतें अप्रस्तुत कोणतें हें पहावें लागतें. दोष जर चरित्रांत प्रस्तुत असतील तर त्यांचा अन्तर्भाव अवश्य झाला पाहिजे. अप्रस्तुत असल्यास त्यांचा निर्देश करण्याचें कारण नाही.

# फलज्योतिष

लोकांच्या आचारविचारांवरून त्यांच्या नैतिक संपत्तीची, पुरुषार्थाची वगैरे अटकळ करण्यासारखी असते. समाजाच्या निकृष्ट स्थितींत चेटकें, भुतेंखेतें, ज्योतिष, शकुन, अपशकुन यांवर मनुष्यांचा फाजील विश्वास असतो. स्वातंत्र्याची एकदा चटक लागल्यावर इतर जुलमी व अन्यायाचीं बंधनें झुगारून देण्याकडे ज्याप्रमाणे मनुष्याची प्रवृत्ति होऊं लागते, त्याप्रमाणे वर निर्दिष्ट केलेल्या पूर्वग्रहांची दास्यग्रंथि शिथिल करण्यासहि तो तत्पर होतो. ह्या निबंधांत फक्त ज्योतिषासंबंधाने विचार करण्याचें योजिलें आहे.

आकाशस्थ ग्रहांची अमुक स्थिति असली म्हणजे अमुक मनुष्यास अमुक फल प्राप्त होतें असें सांगणाऱ्या शास्त्राला फलज्योतिष म्हणतात. ग्रहांचे परिणाम मनुष्यांप्रमाणे इतर प्राण्यांवर व वृक्षादिकांवर होतात किंवा नाही त्याचा विचार ह्या शास्त्रांत केला नाही व त्याचा अनुभव कोणीं घेतल्याचें ऐकिवांत नाही. सध्या तरी ज्योतिषी मनुष्यांचींच फलें त्यांच्या ग्रहांवरून वर्तवीत असतात.

आपल्या इकडील एखाद्या ज्योतिष्याचा पत्रव्यवहार पाहिला असतां फलज्योतिषाचा अंमल आमच्या लोकांवर अद्यापि किती जोराचा आहे ह्याची चांगली कल्पना करतां येईल. सुशिक्षित, अशिक्षित, साक्षर, निरक्षर, सर्व दर्जाचे लोक ज्योतिष्यांना आपली भावी हकीकत मोठ्या उत्सुकतेने विचारीत असतात. मला स्त्रीसुख आहे किंवा नाही? बढती कधी मिळेल? माझी वकिली अमुक ठिकाणीं कशी काय चालेल? व्यापार करीत आहें त्यांत फायदा होईल कीं नाही? माझ्या साहेबांचें व माझें जुळेल कीं नाही?

पुत्रयोग कसा आहे? हेच प्रश्न लोक बहुधा विचारीत असतात. मातृसुख, पितृसुख, अगर बंधुसुख कोणी विचारीत नाही. लोकोपयोगी पडण्याचा योग आहे कीं नाही, ह्याची चौकशी करण्याचें कोणाच्या मनांत येत नाही. आपल्या देशाचे ग्रह कसे आहेत ह्याची विचारपूस करावीशी कोणास वाटत नाही. ह्यावरूनच फलज्योतिषाचा उपयोग सांप्रत किती कोत्या स्वार्थबुद्धीने केला जात आहे हें कोणाच्याहि सहज ध्यानांत येईल. ज्योतिषशास्त्र खोटें असें आमचें म्हणणें नाही. आकाशांतील ग्रहांचा व पृथ्वीवरील माणसांचा काय संबंध आहे असें विचारणारे, ज्योतिषशास्त्र निराधार आहे म्हणणारे व खोट्या पत्रिकांवरून लोकांना फसविण्यांत भूषण मानणारे लोक नाहीत असें नाही; पण त्याचें कारण त्यांचें अज्ञान अगर विकारवशता हेंच होय. ह्या निबंधांत आम्हांला इतकेंच सिद्ध करावयाचें आहे की, फलज्योतिष जरी निव्वळ थोतांड नसलें तरी त्याच्या अनुमानाने अगर तदनुरोधाने वर्तविलेल्या फलांत इतकी अनिश्चितता आहे की, शास्त्र या पायरीला फलज्योतिष केव्हाहि येणें शक्य नाही. म्हणून लोकांनी एखाद्या पंगु माणसाप्रमाणे फलज्योतिषावर सर्व भार टाकून आपली व आपल्या समाजाची अवनति करून घेऊं नये. कुंडलीवरून निश्चित फलें सांगतां येतात असें जर कित्येकांचें म्हणणें असेल तर त्यांना फलावरून कुंडली बिनचूक अगर जवळजवळ तरी बरोबर मांडून देतां आली पाहिजे. चेहऱ्यांवरून पत्रिका तयार करून देऊन आकाशांतील ग्रहांचा व मनुष्याचा निकट संबंध महाडकर ज्योतिष्यांनी अस्खलित रीतीने स्थापित केला, त्याप्रमाणे मनुष्याच्या आयुष्यक्रमावरून जर एखादा ज्योतिषी कुंडली तयार करील तर मात्र फलांचा अनुभव पूर्णपणें येतो, असें थोडेंबहुत मानतां येईल. परंतु अशा रीतीने कुंडली तयार करून देणारा ज्योतिषी आमच्या पाहण्यांत नाही. एवढ्या एका गोष्टीवरूनच फलांचा धरसोडपणा

सहज सिद्ध करतां येण्यासारखा आहे.

फलें अनुभवास न येण्याचें मुख्य कारण असें आहे की, मनुष्यास परमेश्वराने पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. आपलें हित अगर अनहित करून घेण्याचें मनुष्याच्याच हातीं आहे. पुढील जन्माची गोष्ट राहो ! पण ह्या जन्मांतील सुखसुद्धा बहुतांशीं त्याच्याच प्रयत्नावर अवलंबून आहे. तुम्ही कांही करा, ग्रहांचीं फलें अनुभवास आलींच पाहिजेत असें मानलें तर मनुष्य ग्रहाधीन अगर प्रारब्धाधीन आहे; परतंत्र आहे; ललाटांत लिहिलें असेल, त्याप्रमाणे ह्या जन्मांत सुखदुःख त्यानें भोगावयाचें आहे व त्याकारितांच त्याचा अवतार आहे असें म्हणावें लागतें. पण ही विचारसरणी शास्त्रांस असंमत आहे. मनुष्य स्वाधीन असल्यामुळे ग्रहसूचित अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार त्याच्या हातून होणें दुर्घट नाही. म्हणून परमेश्वराने दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करणाऱ्या सुसंस्कृत मनाच्या सुशिक्षित माणसासंबंधाने ज्योतिष्यांनी वर्तविलेलें भविष्य चुकण्याचा पुष्कळ संभव असतो; पण त्याचें कारण ज्योतिष्यांच्या लक्षांत येत नाही. अशिक्षित 'रानटी' माणसासंबंधाने फल बरोबर उतरण्याचा संभव अधिक. ग्रह उत्तम आहेत पण जाणूनबुजून मीं जर विस्तवावर पाय ठेवला तर तो भाजलाच पाहिजे. तेथे विचारे ग्रह काय करणार ? सन्मार्ग व दुर्मार्ग दोन्ही परमेश्वराने आपल्यापुढे ठेवलेले आहेत. वाटेल त्या मार्गाचें अवलंबन करणें आपल्या हातीं आहे. एकदा का आपली निवड झाली म्हणजे मग मात्र ज्योतिष्यांचीं फलें कदाचित् बिनचूक जमतील. पण हा मुलगा अमकाच मार्ग स्वीकारील असें आग्रहाने कोणत्याहि ज्योतिष्याने सांगणे अनुचित आहे. कारण, सुशिक्षणाच्या योगाने सन्मार्गाला लावणें हें त्या बालकाच्या पालकाच्या स्वाधीन आहे. तात्पर्य, ग्रहफलें खोटीं पाडण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे हें प्रत्येकाने लक्षांत ठेवावें. यंदा संतति होईल असें ज्योतिष्याने सांगितल्यावर संततिप्रतिबंधक उपाय एखाद्याने योजिले

तर फल अनुभवास कसें येणार ? तेव्हा ग्रहांचीं फलें अनुभवास येण्यास प्रयत्नाची सांगड पाहिजे हें उघड आहे. ग्रह फक्त अनुकूल अगर प्रतिकूल स्थिति दाखवितील इतकेंच. आपले प्रयत्न अनुकूल असतील तर फलसिद्धि सुलभ होईल. विरोधी असतील तर ग्रहांच्या अनुकूलतेचा उपयोग काय होणार ? तात्पर्य, ज्या मानानें आपल्या मनाचा निश्चय बळवत्तर त्या मानानें ग्रह दुर्बल होतात; त्यांचा अनुभव येत नाहीं. दुसऱ्याच्या कृतीवर आपलें सुखदुःख अवलंबून असलें तर तेथें आपला नाइलाज आहे, पण आपल्या स्वतःच्या वर्तनावर जर तें अवलंबून असेल तर प्रायः ग्रहांचें आपल्या पुढे कांहीं चालणार नाहीं. एखादा मनुष्य मिताहारी, सुव्यवस्थित व नीतिमान असला तर त्याची प्रकृति निरोगी राहणारच; मग पत्रिकें-तील ग्रह कांहीं सांगोत. शिवाय, सुखदुःखाच्या कल्पना प्रत्येकाच्या निरनिराळ्या असतात. एकामध्ये ज्यास सुख वाटेल त्यांतच दुस-ऱ्याला दुःख वाटेल, पण ज्योतिषी तर सामान्य माणसांच्या कल्पना घेऊनच तद्विषयक फलें वर्तवीत असतात. तेव्हा तीं एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या संबंधानें अनुभवास न आलीं तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. धनपुत्रदारादिकांच्या योगानें सामान्यतः मनुष्य सुखी असतो; पण ज्याच्या ठिकाणीं पूर्ण वैराग्य बिंबल्यामुळे मनाची तळमळ परमार्थाकरितां होत आहे तो आपल्याला सुखी समजत नाहीं. तात्पर्य, मनुष्य स्वतंत्र आहे. आयुष्यांत शिक्षणाचा व संगतीचा मनावर परिणाम होऊन त्याप्रमाणें त्याचा चरित्रमार्ग ठरला जातो. हे शिक्षणरूपी व संगतिरूपी दोन ग्रह आकाशस्थ नवग्रहांचे रिपु होत ! व ते नजीक असल्यामुळे त्यांचा जोर जास्त होऊन आका-शस्थ ग्रह मागे पडतात व त्यांच्या फलांचा अनुभव येत नाहीं. शिक्षण व सहवास ह्यांचा संस्कार ज्यांच्या मनावर तादृश झाला नसेल त्यांच्याविषयी फार तर ज्योतिष्यांना कांहीं निश्चितपणें सांगतां येईल.

स्वातंत्र्याप्रमाणे पारतंत्र्यहि ग्रहांच्या फलांचा अनुभव येऊं देणार नाही. स्वातंत्र्य ग्रहांच्या फलांच्या आड येतें. तसेंच तें फलांचा अनुभव येण्यासहि अवश्य आहे. कारण ग्रहांच्या केवळ अनुकूलतेवरून हातपाय न हालवितां कार्यसिद्धि होईल असें कोणीहि म्हणणार नाही. म्हणून प्रयत्न करण्याला मूलभूत असलेलें स्वातंत्र्यच जर आपणांस नसेल, इकडे जावयाचें किंवा तिकडे जावयाचें हें दुसऱ्याच्या इच्छेवरच जर अवलंबून असेल तर तेथे ग्रहांचा अनुभव कसा यावा ? आणि ज्योतिष्यांनी पारतंत्र्यस्थितीमध्ये फलें सांगण्याची उठाठेव तरी कशाला करावी ? हा सिद्धांत व्यक्तिशः तसाच समाजशः ही खरा असला पाहिजे. जो समाज परतंत्र आहे त्यांतील व्यक्तींचीं सर्व फलें वर्तविण्याच्या भरीस ज्योतिष्यांनी पडूं नये. मराठी साम्राज्य असतांना पुष्कळांच्या कुंडलींत राजयोग असले पाहिजेत, पण आता राजयोगाचीं माणसें जन्मासच येत नाहीत असें म्हणावयाचें काय ? शिवाजीच्या अगर अकबराच्या कुंडलींत बलिष्ठ ग्रह अगर उत्तम योग असतील, तशाच प्रकारच्या ग्रहयोगांवर हल्लींहि माणसें जन्मास येत असतील; पण त्यांना राज्य तर राहोच, पण हजारांत ज्यांचा पगार सांगतां येईल असें एखादें सेवापदहि लाभणार नाही !

एवढ्याचकरिता लहान मुलांचे ग्रह पाहूं नयेत असें शास्त्रकारांनी ठरविलें आहे. अशा अवस्थेंत मूल असतांना त्याच्या ग्रहांचीं फलें कशीं अनुभवास येणार ? हातपाय हालवितां येत नाहीत व दूध दुसऱ्याकडून बोंडल्याने पाजावें लागतें अशा तान्ह्या बालकाचे ग्रह मोठे पराक्रमी असले तरी त्या बालकाला पराक्रम करून दाखविण्याचें सामर्थ्य असेपर्यंत ते ग्रह मुग्धावस्थेंतच असणार हें उघड आहे. ह्यावरून निष्पन्न इतकेंच होतें की, फलें दृष्टोत्पत्तीस येण्यास शारीरिक व मानसिक हीं दोन्ही सामर्थ्ये माणसांत असलीं पाहिजेत. परंतु आपलें शरीर आणि मन हीं जर आपण दुसऱ्यास वाहिलेलीं

असलीं तर ग्रहयोग उत्तम असूनही वाया जाणार. तात्पर्य, परतंत्रपणांत ग्रहांचा अनुभव येणार नाही. विवाहानंतर स्त्रियांच्या पत्रिका आपल्या इकडे कोणी पहात नाहींत ह्याचें कारण हेंच आहे.

ह्याशिवाय फलांचा अनुभव न येण्याचें मुख्य कारण असें आहे की, आपण समाजापेक्षा व्यक्तीला ज्योतिषांत महत्त्व फार देतो. मनुष्य हा समाजाशीं निगडित आहे. समाजावर सुखदुःखाची लाट येईल त्याबरोबर व्यक्तिही वाहून गेल्याच पाहिजेत. व्यक्तींचें हिताहित देशाच्या हिताहिताशीं अव्यभिचाराने संलग्न आहे. देशाचे ग्रह जर अनिष्ट असतील तर त्यांतील एखाद्या व्यक्तीचे ग्रह कितीहि परमोच्च असले तरी त्याचा किमपिहि उपयोग होणें नाही. देशाचे ग्रह अगोदर पाहून नंतरच व्यक्तींच्या ग्रहांचीं फलें तदनुरोधाने सांगितलीं पाहिजेत. तदभावीं, एखाद्या पत्रिकेंत शास्त्रपठित राजयोग आढळतांच हा मुलगा खचित राजा होणार असें सांप्रतच्या स्थितींत एखाद्या ज्योतिष्याने सांगितलें तर तो आपलें हसेंच करून घेईल! शिवाय राजयोग म्हणजे काय हें तरी कोणीं ठरविलें आहे! एकाला जो राजयोग वाटेल, तोच दुसऱ्याला गुलामयोग वाटेल. हुकूम सोडण्याचें ज्याच्या हातांत नाही. दुसऱ्यांनी सोडलेल्या हुकुमांची अंमलबजावणी करणें एवढेंच ज्याचें काम, त्याच्यासंबंधाने हा शब्दप्रयोग करणें हास्यास्पद आहे. अगर देशकालाप्रमाणे सेवायोगालाच राजयोग शब्द लावणें भाग पडत आहे असें म्हटलें तरी चालेल. मनुष्य हा समाजाचा घटक आहे. त्याचें सुखदुःख दुसऱ्याच्या कृतीवर अवलंबून आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या लहान मोठ्या प्रत्येक कृत्याचा थोडाबहुत परिमाण दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीवर होत असतो, इतके त्याचे हितसंबंध परस्परसंलग्न आहेत. तेव्हा समष्टीच्या ग्रहांच्या कार्यक्षेत्रापलीकडे व्यक्तीच्या ग्रहांचें कार्यक्षेत्र जाणें शक्य नाही. म्हणून ज्योतिष्यांनी इतःपर व्यक्तीचीं वर्षफलें वर्तविण्याचा नाद सोडून देशाचीं फले वर्तविण्यास लागावें हें बरें. ही गोष्ट अद्यापि यावी

तशी लोकांच्या लक्षांत येत नाहीं असें दिसतें. कारण, ह्या दिवसांत आगगाडीनें प्रवास करावयाचा असूनहि मुहूर्त बघून निघणारी पुष्कळ मंडळी आढळते. एकाकी प्रवास करावयाचा असतो तेथें सुलग्न पहाणें युक्त होईल. परंतु जेथें हजारों माणसें एकाच अग्निरथांतून प्रवास करितात तेथें एखाद्या प्रवाश्याचे त्याच्या प्रवासारंभीं कितीहि अनिष्ट ग्रह असले तरी ते काय करूं शकणार? कारण बाकीचे कांहीं प्रवासी सुमुहूर्तावर निघाले असणारच आणि आगगाडींतील एका मनुष्याला धक्का पोहोंचावयाचा म्हणजे त्याच्याबरोबर दुसऱ्याहि कित्येकांना धक्का बसल्यावांचून सहसा रहावयाचा नाहीं. सारांश, सर्व लोकांचें शुभाशुभ जेथें एकाच गोष्टीवर अवलंबून असतें तेथें एखाद्या व्यक्तीनें मुहूर्त पहाणें अस्थानीं होय. नुकत्याच झालेल्या आगगाडीच्या अपघातांत सापडलेल्या कित्येक सुज्ञात माणसांच्या कुंडल्या प्रसिद्ध करून त्यांवरून त्यांचे ग्रह फार अनिष्ट होते व त्यांना मृत्यु आला तो बरोबर आला असें ज्योतिषशास्त्रावरून सांगण्याचा प्रयत्न कित्येक ज्योतिष्यांनीं केला आहे. पण त्यांस आमचें असें विचारणें आहे कीं, मेलेल्यांपैकीं प्रत्येकाची कुंडली त्यांस माहीत आहे काय? एखाद्याच्याहि जरी पत्रिकेवरून त्यास आलेल्या मृत्यूचें कारण समजण्यासारखें नसलें तर ह्या ग्रहांची वाट कशी लावणार? जेवढे लोक मेले तेवढ्या सर्वांच्या पत्रिकेंत मृत्युयोगच त्या वेळेस स्पष्ट दिसले पाहिजेत असें निश्चयानें कोणी ज्योतिषी सांगण्याचें धार्ष्ट्य करील असें आम्हांस वाटत नाहीं. समजा:—दहा माणसें एकत्र आहेत व प्रसंग आला तर सगळ्यांनाच तो सारखा भोंवला पाहिजे अशी स्थिति आहे. आता त्यांपैकीं एकाचे ग्रह मृत्यु सुचवीत आहेत व बाकीच्या माणसांची ग्रहस्थिति मृत्युयोगकारक मुळींच नाहीं तर अशा प्रसंगीं नऊ माणसांना मरण आलें तर त्याचें कारण कोठें शोधावयाचें? अर्थात् दुसऱ्याच्या ग्रहदशेंत नऊ माणसांचा मृत्यूनमुख अशा एका माण-

साशीं सहवास झाला, हें त्या इसमांच्या आपत्तीचें कारण होय. या प्रसंगीं टिटानिक बोटीच्या अपघातांत ज्यांना मरण आलें त्या प्रत्येकाचा मरणकाल कोणत्याहि ज्योतिर्विदाला अगोदर निःसंदेह सांगतां आला असता असें जर म्हणणें असेल तर त्यास आमच्याजवळ कांही उत्तर नाही; कारण ही पुराव्याची गोष्ट आहे. पण आम्हांस तर तें अगदी असंभवनीय दिसतें. सारांश, आमचें असें म्हणणें आहे की, एका मनुष्याच्या ग्रहावरून कोणताही कष्टप्रद प्रसंग सूचित होत नाही आणि दुसऱ्याच्या ग्रहांवरून त्याचा मृत्युयोग मात्र निःसंशय दिसून येतो अशीं हीं दोघेंहि माणसें प्रसंगानें एकत्र झालीं तर एका माणसाच्या ग्रहांचा परिणाम दुसऱ्यावर होईल कीं नाही हा प्रश्न आहे. आमच्या मतें ज्याचे ग्रह अत्यंत उत्कृष्टफलदायक असतील त्या ग्रहांचा परिणाम दुसऱ्यावर झाल्याविना राहणार नाही. दोन माणसांचा संबंध जडला म्हणजे त्यापैकी एकाच्या ग्रहाचा परिणाम दुसऱ्यावर होतो ही गोष्ट आपण कित्येक ठिकाणीं मान्य करितों. स्त्रीचे ग्रह अत्युच्च असतील तर त्या ग्रहांचा फायदा तिला मिळण्यापूर्वी तिच्या पतीस मिळणें अवश्य आहे हें बहुधा सर्वसंमत आहे. पेशवाई बुडाल्याबरोबर खुद्द पेशव्यांचें घराणें राहो पण दुसरीं कित्येक थोर घराणीं एकदम अधोगतीस लागलीं; कित्येक लोक अन्नाला महाग झाले; सर्व राष्ट्राची राज्यलक्ष्मी विलयास गेली; त्या वेळीं त्या सर्वांची रावापासून रंकापर्यंत ग्रहदशा अनिष्टप्रसंगसूचक होती अगर असलीच पाहिजे असें कोणी म्हणण्यास तयार आहे काय? नुकत्याच पेढया बुडाल्या; त्यांचा परिणाम अनेक लहानमोठया स्त्रीपुरुषांवर झाला. ह्या प्रत्येकाच्या पत्रिकेंत गुदस्ता धनहानीचा योग होता काय? सारांश, समाजाच्या आपत्तीचीं कारणें व्यक्तीच्या पत्रिकेंत दृग्गोचर होतील असें वाटत नाही.

तसेंच कुटुंबांतील एका माणसाची पत्रिका पाहून फलें सांग-

ण्यापूर्वी कुटुंबांतील बाकीच्या माणसांच्या पत्रिका पाहणें जरूर आहे. स्त्रीवियोग पाहणें असेल तर मातृसुख किती आहे, हेंहि मुलांच्या पत्रिकेवरून पाहणें जरूर आहे. पण अशा रीतीने सर्वांच्या पत्रिका पाहून फळ ठरविणारे ज्योतिषी दुर्मिळ. ह्या कारणास्तव पुष्कळ चुका होण्याचा संभव असतो. मनुष्याचा व्यवहार विविध व गुंतागुंतीचा, मनुष्यस्वभावाच्या असंख्य भिन्नभिन्न छटांचें वर्णन करणें दुर्घट; हींहि कारणें फलानुभवाला विघातक आहेत. क, ख, ग अशीं तीन माणसें परस्परसंबद्ध आहेत. क, ख ह्यांच्या पत्रिकेवरून त्यांचा सलोखा राहील असें आहे. क, ग ह्यांचें तर चांगलेंच सख्य आहे. परंतु ख, ग ह्यांचें मात्र जमणार नाही असें त्यांच्या ग्रहांवरून दिसतें. आता क, ग जर प्रेमाधिक्याने शृंखलित असतील तर क, ख ह्यांचा संबंध कमी सुखाचा झालाच पाहिजे. तेव्हा नुसत्या क, ख च्या पत्रिका पाहून त्यांच्यांत प्रेम वसेल म्हणून वर्तविणाऱ्या ज्योतिर्विदाची वासलात काय करावी ?

क्रूर व सौम्य असे ग्रहांचे दोन वर्ग आहेत. क्रूर ग्रहांचीं फलें अनुभवास येतात तशीं सौम्य ग्रहांचीं येत नाहीत. व्यवहारांतहि असाच अनुभव आहे. दुष्ट मनुष्य—मग तो किती का क्षुद्र असेना—दुसऱ्यास सहज त्रास देऊं शकतो. पण सज्जन माणसांच्या हातून दुसऱ्याचें कल्याण चटकन् होऊं शकत नाही. निद्राभंग कोणत्याहि तद्विषयक औषधाने निश्चयाने करतां येतो. ढेकूण, पिसवा, डांस हीं तर प्रत्यहीं मनुष्यांवर जुलूम व अन्याय करीत असतात! पण निद्रा येण्याला वैद्यांचीं नामांकित औषधें पुष्कळ वेळां लटपटतात. पापग्रह अकरावे आले असतां जितकी फायदा होण्याची खात्री जास्त तितकी शुभग्रह तत्स्थानीं आले असतां कमी.

शिवाय, नानाविध योगांचीं परस्परविरुद्ध फळें एकवटून त्यांतून संकीर्ण फळ बरोबर सांगतां येण्यास लागणारा भरपूर अनुभव पुष्कळांना नसतो. ह्याखेरीज ह्या शास्त्रांत मतांतरेंहि कमी नाहीत. परंतु

त्याविषयीं लिहिण्याचा आमचा विचार नसल्यामुळे ह्या गोष्टीचा फक्त उल्लेखच केला आहे. आमचा मुख्य मुद्दा असा आहे की, मनुष्याला समाजापासून विलग करतां येत नाही. समाजाचा तो घटक आहे. त्याचें सुखदुःख समाजांतील इतर व्यक्तींवर अवलंबून असतें. आता एखाद्याच्या नशिबांत सुख असेल तर तें इष्टच असतें; परंतु दुःख असल्यास त्याचा परिहार करण्यास प्रत्येक मनुष्य झटत असतो. तरी ह्या कामीं उत्तम उपाय म्हटला म्हणजे समाजसेवेंत मनुष्याने आपलें आयुष्य खर्च करावें. समजा, एखाद्याच्या पत्रिकेवरून अकालीं मृत्युयोग दिसत आहे तो इसम जर समाजास अतिशय उपयोगी असेल तर त्याच्या एकट्याच्या मृत्यूने पुष्कळांची हानि होत असल्यामुळे समाजाच्या दैवबलाने त्याचा अकालीं मृत्यु टळेल असें मानणें अगदीच असमंजसपणाचें होणार नाही. तात्पर्य, सुख प्राप्त करून घेणें व दुःख टाळणें हीं दोन्ही मनुष्याच्या स्वाधीन आहेत; मग त्याचे ग्रह कसेहि असोत. ग्रहांवर सर्वस्वी अवलंबून राहणें निव्वळ वेडेपणाचें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र ४५००

# स्नेह

पापान्निवारयति योजयते हिताय । गुह्यं च गूहति गुणान् प्रकटीकरोति ।
आपद्गतं च न जहाति ददाति काले । सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः ॥

**सांप्रतच्या** कौटुंबिक व सामाजिक ऱ्हासाचा विचार करीत असतां आपल्या समाजांत स्नेहबुद्धीचा पूर्ण अभाव वसत आहे ही गोष्ट प्रमुखत्वाने पुढे येते. आता समाजाची अवनति व स्नेहबुद्धीचा अभाव ह्यांत कार्यकारणभाव कसा आहे हें निश्चित करणें जरी कांहीं अंशीं दुर्घट असलें, तरी आपला समाज विगलितेन्द्रिय झाला आहे हें सिद्ध करण्यास स्नेहबुद्धीचा अभाव हें उत्कृष्ट साधन आहे ह्यांत संदेह नाही. हा विचार कित्येक दिवस मनांत घोळत असल्यामुळे आपल्या समाजांत हल्ली ज्यांना स्नेही म्हणतां येईल असे भाग्यशाली पुरुष कोणी आहेत कीं काय ह्या जिज्ञासेने प्रेरित होऊन निरीक्षण करीत असतां नकारार्थींच अनुभव आला. एवढेंच नव्हे तर विरुद्ध क्रियाच जास्ती जोरांत आहे असें आढळून आलें. हवा खाण्यास बाहेर पडलेल्या दोन दृढपरिचित गृहस्थांची मार्गांत भेट झाल्यास व एकाने दुसऱ्यास अमुक ठिकाणीं आज फिरावयास जाऊं असें म्हटल्यास, दुसरा ही विनंती मान्य करीलच इतकाहि भरंसा देतां येणार नाही. मग स्नेहाच्या गोष्टी एकीकडेच राहिल्या ! इतकी विस्कळित स्थिति आपल्या समाजाची झाली आहे. घरोबा हा शब्द हल्ली कोशांतच आढळतो. कोशाच्या बाहेर त्याला अस्तित्वच नाही.

परंतु पूर्वी हा प्रकार खास नसला पाहिजे. स्नेहशीलपणाला प्राचीन ग्रीस देशांत तसेंच आपल्या देशांत फार प्राधान्य दिलें जात होतें. स्नेही अगर मित्र हा एक आपल्या कुटुंबांतीलच आहे

अ. निबंध ५३५ ३९।५५३८५

अशी आमची समजूत होती. स्नेह्याच्या मृत्यूनंतर अशौच धरणें व त्यास उदक देणें ह्यावरून ही गोष्ट चांगली प्रत्ययास येते. ॲरिस्टॉट्लने तर आपल्या सर्वमान्य नीतिशास्त्रावरील ग्रंथांत ह्या विषयाचा विस्तृत व शास्त्रीय ऊहापोह केला आहे. आम्ही हा विषय आज हातीं घेण्याचें कारण समाजांतील हें मुख्य व्यंग लोकांच्या निदर्शनास आणावें हेंच आहे.

स्नेह हा शब्द संस्कृत स्निह् ह्या धातूपासून झाला आहे. ‘स्निग्ध’ हें त्यापासून विशेषण आहे. अंगाला लावलेलें तेल जसें अंगाशीं एकजीव होतें तद्वत् आपल्या स्नेह्याचा व आपला एकजीव झाला पाहिजे.

ज्याप्रमाणे पुरुषाला स्त्रीची अवश्यकता आहे त्याचप्रमाणे स्नेह्याचीहि आहे, असें आम्हांस वाटतें. ह्या संसारामध्ये एखाद्यास मातृसुख, पुत्रसुख, स्त्रीसुख, बन्धुसुख ह्यांपैकीं एखादें कमी असल्यास त्या माणसास जसें आपण दुर्दैवी समजतों, तसेंच वरील सर्व सुखें असून ‘मित्रसुख’ जर नसेल तरी सुद्धा त्याच्या सुखाला न्यूनत्व आल्याशिवाय रहात नाहीं. सर्व प्रकारचीं सुखें उपलब्ध आहेत; पण मित्रसुख जर नसेल तर कोणीहि मनुष्य खुषीनें जगण्यास तयार होणार नाही, हें ॲरिस्टॉट्लचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. ( Without friends no one would choose to live even if he had all other goods. Ethics Book VIII.). आईच्या सहवासापासून जें सुख होईल तें पुत्रापासून होणार नाही; पुत्रापासून मिळणारें सुख स्त्रीपासून लाभणार नाहीं; आणि स्त्रीसुखाचा अनुभव पित्याच्या ठिकाणीं येणार नाही. त्याचप्रमाणे मित्रसुखाची उपलब्धि कुटुंबांतील वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि माणसाकडून होणें शक्य नाही. ह्याचें कारण असें आहे की, ह्या प्रत्येकासंबंधाने आपल्या मनोवृत्ति भिन्न भिन्न असतात. स्त्रीच्या आलिंगनाने ज्या मनोवृत्ति क्षुब्ध होतात त्यांहून अत्यंत भिन्न अशा मनोवृत्ति सुतालिंगनानें प्रादुर्भूत

होतात. पिता आणि पुत्र दोघेहि आपणांस प्रिय असतात; तथापि पित्याच्या संबंधाने जी आपली मनोवृत्ति असते तद्भिन्न मनोवृत्ति पुत्राच्या संबंधाने असते. तोच प्रकार मित्राचा आहे. माणसाच्या अन्तःकरणांत असणारी ही स्नेहविषयक वृत्ति अगदी स्वतंत्र आहे. तेव्हा आपणांस स्नेही नसेल तर त्याचा अर्थ असा की, आपलें मन अपरिपक्व आहे. त्याचा पूर्ण विकास झाला नाही म्हणून त्यांत स्नेहवृत्ति उत्पन्न होत नाहीत. आपणां बहुतेकांना आईबाप, बायकामुलें असतात; पण तत्तद्विषयक वृत्ति आपल्या सर्वांच्या मनांत सारख्याच विकसित झालेल्या आहेत असें म्हणतां येणार नाही. विवाहपद्धतीमुळे कुटुंब बनतें व कुटुंबांतील कांही माणसांचा व आपला संबंध तद्वि-षयक मनोवृत्ति उत्पन्न होण्यापूर्वीच घडतो. त्यामुळे आपणांस आपल्या मनोवृत्तींचें खरें स्वरूप कळत नाही. पण स्नेहाची गोष्ट तशी नसते. मनोवृत्ति उद्भूत झाल्यावांचून स्नेहसंबंध घडत नाही. ह्यावरून आपल्या समाजाची मानसिक अवनति किती झाली आहे हें निदर्शनास येईल. नीतिदृष्ट्या ही फार मोठी हानि आहे. सर्वांगांनी जर मन पूर्ण विकास पावलें नसेल तर मनुष्यत्वालाच कमीपणा येतो असें आम्हांस वाटतें. मातापिता, स्त्री, बंधु इत्यादिकांच्या संबंधाने सुद्धा आमच्या मनोवृत्ति असाव्यात तशा नाहींत. परंतु ह्या वृत्ति असोत वा नसोत, ह्यांचा संबंध जडणें त्यांवर अवलंबून नस-ल्यामुळे वृत्तींचें वैगुण्य आपल्यास प्रमुखत्वाने भासत नाही. परंतु सूक्ष्म विचार करणारास योग्य मनोवृत्तींचा ऱ्हास हेंच समाजाच्या विस्कळित स्थितीचें कारण आहे असें दिसून येईल.

आपल्या समाजांत हल्ली परस्पर स्नेह कोठे आढळत नाही असें आम्ही गृहीत धरूनच चाललों आहों. ज्यांस ही गोष्ट मान्य असेल त्यांस ह्या समाजाच्या अवनतीचें आणखी एक प्रमाण आढळून येईल. कारण, स्नेहाचें बीज सद्‌गुणांतच रुजतें. तेव्हा स्नेह जेथे नाही तेथे सद्‌गुणही नाही हें अनुमान अगदीच चुकीचें ठरणार

नाही. ह्यावरून ह्या विषयाचें महत्त्व फार आहे हें कोणासहि पटेल असें वाटतें.

स्नेहवृत्ति हें मनाचें कार्य असल्यामुळे माणसांमाणसांतच स्नेह असणें शक्य आहे. निर्जीव पदार्थांबद्दल आपल्या ठिकाणीं स्नेहबुद्धि असूं शकणार नाही; म्हणून राष्ट्राराष्ट्रांतहि स्नेह असणें अशक्यच आहे. कारण राष्ट्र ही एक व्यक्ति नाही.

आता स्नेहाचा पाया सद्‌गुणांत आहे हें वर सांगितलेंच आहे. त्यावरून दुर्गुणी अगर निर्गुणी माणसांत स्नेह असणें शक्य नाही हें उघड होतें. दारुबाज, जुगारी, दरोडेखोर इत्यादि दुष्ट लोकांचें ऐक्य लवकर होतें व ते एकजुटीने कामेंहि करतात. पण परस्परां-विषयीं स्नेहवृत्ति त्यांच्यांत असत नाही. सर्वांचा हेतु एक असल्या-मुळे तो साधण्याकरता दरोडेखोर एकत्र होतात, परंतु स्नेह घडून येण्याला मुळीं हेतुच लागत नाही; एवढेंच नव्हे तर हेतु मनांत असतांच कामा नये. कोणता तरी हेतु मनांत धरून आपण दुस-ऱ्याबरोबर सख्य ठेवणें त्यास स्नेह म्हणतां यावयाचें नाही. ज्या कार्याकरता असले स्नेह घडून येतात तें कार्य संपतांच ते नष्ट होतात. परंतु खरा स्नेह प्रायः चिरकालीन असतो. कारण तो मनाचा धर्म आहे. तेव्हा मनच विकृत होईल त्याच वेळेस खरा स्नेह लुप्त होण्याची भीति असते. एकंदरींत स्नेहाचा सद्‌गुणाशीं अन्वय-व्यतिरेकी संबंध आहे हें सिद्ध होतें.

आजपासून आपण स्नेही होऊं असें म्हणून स्नेह बनत नसतो. कराराने कोणी स्नेही होत नाहीत. दोन सद्‌गुणी माणसांचा परिचय व सहवास झाल्यावर हळूहळू स्नेह घडून येतो. चोर एकत्र जुळून दरोडा घालतात, त्यांच्यामध्ये स्पष्ट नसला तरी गर्भित करार असतो. तात्पर्य, स्नेह केव्हाहि एकदम जुळत नाही. अशा रीतीने दोन सद्‌गुणी माणसांमध्ये खरा जडलेला स्नेह क्वचितच अनुभवास येतो. स्नेहाच्या नांवाखाली सर्वसामान्य हेतु अगर व्यसन ह्यांच्या योगानेच

एकवटलेले लोक बहुधा दृष्टीस पडतात. ह्यांचा हेतु समान असला तरी मनोवृत्ति विसदृश असतात. त्यामुळे असल्या लोकांचा स्नेह क्षणिक असतो. तो शाश्वत टिकणारा नाही. परंतु सद्गुणी माणसांच्या स्नेहाची गोष्ट तशी नसते. त्यांचा स्नेह चिरकालीन असतो. नेहमी एके ठिकाणीं ज्यांची बैठक असते अशा लोकांत वितुष्ट आलेलें आपल्या वारंवार अनुभवास येतें. त्याचें वस्तुतः कारण हेंच की सद्गुणांत त्यांच्या सहवासाचें मूळ नसतें.

स्नेह्यांच्या मनांत परस्परांविषयी सदिच्छा वसत असली पाहिजे; जें कांही चांगलें असेल तें आपल्या मित्राला असावें, अशीच स्नेह्यांची परस्परांशीं बुद्धि असावी लागते. म्हणूनच दुर्गुणी लोकांत स्नेह असणें शक्य नाही असें आम्हीं म्हटलें. प्रारंभीं दिलेल्या श्लोकांतील प्रथम चरणावरून भवभूतीचाहि उद्देश तोच दिसतो.

आता परस्परांविषयी सदिच्छा असली म्हणजे त्यांस स्नेही म्हणतां येईल असें मात्र नाही. तर स्नेह घडण्यास ही गोष्ट परस्परांस माहीत असावी लागते. नुसती माहीत असूनहि उपयोग नाही; त्यांचा सहवास घडावा लागतो. कारण चांगल्या माणसांत इतरांविषयी सदैव सदिच्छाच वसत असते. परंतु तेवढ्यावरून त्यांस स्नेही म्हणतां येणार नाही. तसेंच इंग्लंडमध्ये चांगलें काम करणारा इसम व हिंदुस्थानांतहि चांगलें काम असणारा इसम ह्यांमध्ये परस्पर सद्वासना असूं शकेल व ही गोष्ट एकमेकांना माहीतहि असेल; पण एवढ्याने ते स्नेही आहेत असें म्हणतां यावयाचें नाही. स्नेह घडण्याच्या पूर्वी त्यांचा सहवास होणें जरूर आहे. सहवासानंतर परस्परांच्या मनांत परस्परांविषयी स्नेहवृत्ति उद्भूत होतात. ह्या वृत्ति प्रकट झाल्याशिवाय स्नेह घडत नाही. स्नेहवृत्ति म्हणून स्वतंत्र वृत्ति आहेत व त्या सद्वासनेहून भिन्न आहेत. जे आपले स्नेही नाहीत त्यांचें सुद्धा चांगलें असावें असें आपण इच्छितों.

ॲरिस्टॉट्लच्या मतें तर स्नेह घडण्यास व तो टिकण्यास सहवास अगदी अपरिहार्य आहे. म्हणून दूर अंतरावर राहणाऱ्या माणसांचा स्नेह घडणें शक्य नाही. त्याच्या मताप्रमाणे दोन स्नेह्यांची कायमची ताटातूट झाली असतां त्यांच्यांतील स्नेहाचें नातेंहि तेव्हाच विलीन होतें. ॲरिस्टॉट्लचें हें मत ह्या आगगाडीच्या आणि तारायंत्रांच्या दिवसांतहि मान्य होण्याजोगें आहे. कारण उघडच आहे की, समागमाशिवाय मनोवृत्ति कायम राहात नाहीत. स्नेहभाव ही एक मनोवृत्ति असल्यामुळे स्नेही नष्ट झाल्याने वृत्तिहि भंग पावते. तात्पर्य, पत्रद्वारा स्नेह कायम टिकणें शक्य नाही. त्यास निकट सहवासाची जरूरी आहे.

दोन माणसांचा स्नेह प्रथम तारुण्यांत जडण्याचा संभव फार. कारण वृद्धापकाळीं माणसाच्या मनोवृत्ति क्षीण होतात. समाजापासून त्याचें अतःपर समाधान होत नाही. त्याचें चित्त एकांताकडे धांव घेत असतें. मनाची शक्ति कमजोर होत चालल्यामुळे स्वतंत्र नवीन विचार त्यास सुचत नाहीत. जुन्या शिळ्या विचारांवरच त्याला निर्वाह करावा लागतो. म्हातारीं माणसें दुसऱ्याला नेहमी आपल्या पूर्व वयांत घडलेल्या गोष्टी त्याच त्याच पुन्हा पुन्हा सांगत असतात ह्याचें कारण तरी हेंच आहे. अखेरपर्यंत ज्याचें मन तरतरीत असतें व ज्याच्या मनांत नवीन विचार उद्भूत होत असतात त्या माणसास मात्र आपल्या पूर्वकथा वारंवार सांगत बसण्याचा प्रसंग येत नाही. पण अशीं माणसें थोडीं असतात. आणि यदाकदाचित् मनाची तरतरी कायम असली तरी शरिराची मनाबरोबर धांव घेण्याची तयारी नसते. तेव्हा उतार वयांत नवीन स्नेह जडणें अशक्य नसलें तरी कठीण असतें. तात्पर्य, स्नेह जडण्यास तारुण्यदशाच योग्य होय. तारुण्यांत जडलेला स्नेह वृद्धावस्थेंत टिकण्यास मात्र कांही हरकत दिसत नाही.

स्नेह जमण्याला ज्या अनुकूल व अवश्य गोष्टींचा उल्लेख वर

केला त्यावरून हें उघडच होतें की, एका माणसाचा पुष्कळ माणसांशीं स्नेह होणें प्रायः अशक्य आहे. सद्‌गुण, निकट सहवास, स्वभावसादृश्य, विशिष्ट परिस्थिति, आणि शिवाय परस्परांविषयी मनांत जागृत होणाऱ्या नैसर्गिक स्नेहवृत्ति, इत्यादि कारणांनी एका माणसाचा शेंपन्नास माणसांशीं स्नेह जडलेला आपणांस पहावयास मिळणार नाही. **अ** आणि **ब** हे दोघे परस्पर स्नेही आहेत, व **ब** आणि **क** ह्या दोघांचा स्नेह आहे. तेव्हां **अ** व **क** ह्यांचा स्नेह बनेल कीं नाहीं? ह्या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाही. परंतु स्नेह जमणें हें जर मनाच्या विशिष्ट वृत्तीवर अवलंबून असेल तर **अ** व **क** हे स्नेही बनतीलच असें खात्रीने म्हणतां येणार नाही. **ब** हा दोघांचा सामान्य स्नेही आहे, एवढ्यावरूनच **अ** व **क** ह्यांचा स्नेह जमला पाहिजे असें मानल्यास सर्व जग स्नेहबद्ध होईल असें म्हणावें लागेल. पण ही अशक्य कोटींतीलच गोष्ट आहे.

आता भिन्न दर्जाच्या माणसांचा स्नेह घडेल कीं नाही ह्याचा आपण विचार करूं. ॲरिस्टॉट्‌लच्या मतें उच्च नीच स्थितींतील माणसांचा स्नेह जुळणें संभवनीय नाही. परंतु ही गोष्ट अशक्य आहे असें मात्र आम्हांस वाटत नाही. कमी अधिक दर्जाच्या माणसांचा निकट सहवास होण्यास कारणें फार कमी असतात; ह्यामुळेच प्रायः स्नेह जडण्यास अडचण पडते. पण दोन सद्‌गुणी माणसांचा कोणत्याही कारणाने सहवास झाल्यास व इतर मानसिक स्थिति अनुकूल असल्यास केवळ सामाजिक दर्जाची भिन्नता स्नेह जुळण्याच्या आड येणार नाही असें आम्हांस वाटतें. कारण, प्रेम आणि स्नेह हीं बहिरुपाधींवर अवलंबून नसतात. स्नेह म्हटला की बरोबरीचें नातें पाहिजे. ह्यामुळे सेव्यसेवकभाव जेथे असेल तेथे स्नेह घडावयाचा नाही. ह्यासाठीच राजेलोकांची स्थिति ह्या बाबतींत मोठी अनुकम्पनीय आहे. सर्व देशांत राजा सेव्य व प्रजाजन वस्तुतः सेवक असा प्रकार असल्यामुळे स्नेह करण्यास लायक असा कोणीच राजास

मिळत नाही. निरनिराळ्या राजांचा स्नेह होण्यास व्यत्यय फार असतात. त्यांत निकट सहवासाचा अभाव हा प्रमुख होय. निरनिराळ्या राजांचा दृढपरिचय व समागम घडवून आणण्याची जर कांही योजना झाली तर राजेलोकांना तर फायदा होईलच; पण एकंदर जगालाही त्यापासून सुखच होईल. अलीकडील परिषदांच्या कालांत निरनिराळ्या देशांच्या राजांची परिषद अद्यापि भरली नाही हा चमत्कारच म्हणावयाचा[१]! तात्पर्य, सेव्यसेवकभाव नसेल तर कमी अधिक दर्जाच्या माणसांचा स्नेह जुळण्यास हरकत नाही. भिन्न दर्जाच्या माणसांप्रमाणेच, सुशिक्षित व अशिक्षित ह्यांचा स्नेह जुळणें अशक्य नसलें तरी दुर्घट होय. दोघांचे व्यवसाय भिन्न; आचार विचार भिन्न; कदाचित् मनोरचनाहि भिन्न. अशा स्थितींत दोघांचा निकट सहवास घडून परस्परांचीं मनें परस्परांकडे ओढणें प्रायः असंभवनीय असतें. तथापि दोन सद्गुणी माणसांचा स्नेह जमल्यावर प्रसंगवशात् दोघांच्या शिक्षणांत कालान्तराने फार फरक पडला तरी तेवढ्यामुळे स्नेहांत विघात झालाच पाहिजे असें नाही. उलट, सुशिक्षणाने सद्गुणांची परीक्षा ज्यास्त होऊन स्नेह दृढतर होण्याचाच संभव अधिक. आमच्याकडे ह्याच्या अगदी उलट स्थिति अनुभवास येते हें खरें. पण त्याचें कारण निराळें आहे. आमच्या हल्लीच्या समाजांत विश्वविद्यालयाचें उच्च शिक्षण ज्यांस प्राप्त झालें आहे व सरकारी नोकरींत बऱ्याच हुद्याच्या जागा ज्यांस लाभल्या आहेत त्यांच्या ठिकाणीं लीनतेच्याऐवजी फाजील घमेंड व इतरांविषयी तिरस्कारबुद्धि हींच प्रायः दृष्टीस पडतात. ह्याचें मूळ सांप्रतच्या शिक्षणपद्धतींत आहे. आधुनिक शिक्षणाने अक्कलेचा विकास होतो, पण बुद्धीवर संस्कार होत नाही. असंस्कृत बुद्धि व तीव्र अक्कल ( Intellect ) ह्यांचा योग झाला असतां तेथे सद्गुणांची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आपल्याहून कमी दर्जाच्या माणसाच्या

१ अलीकडे नरेन्द्रपरिषद सरकारीरीत्या भरूं लागलेली आहे.

पत्रास उत्तर न लिहिणें, त्याची ओळख पूर्वीं झाली असली तरी विस्मरण झाल्याचा आव आणणें, आपणांस दुसऱ्यापासून कांहींच शिकण्यासारखें नाहीं असा समज करून घेणें, दुसऱ्याचे गुण कधींहि कबूल न करणें, इत्यादि प्रकार हीं आधुनिक थोरांच्या मोठेपणाचीं लक्षणें म्हणून मानण्यास सबळ कारणें आहेत. असो. सद्गुणांत लोहचुम्बकाची शक्ति असते, आपणांमध्ये जर सद्गुण असतील तर दुसऱ्या सद्गुणी माणसाकडे आपलें मन स्वभावतःच आकृष्ट झालें पाहिजे. सारांश, दर्जाच्या व शिक्षणाच्या व्यस्त प्रमाणानेच अगोदर असलेल्या स्नेहांत अंतर पडलेंच पाहिजे असें नाहीं.

आमच्या समाजांत जातिभेदहि स्नेहाभावास अंशतः कारणीभूत आहे, तरी पण हल्लींच्या अननुभूत स्थितीचा संबंध जातिभेदाशीं कोणत्याच प्रकारें लावणें शक्य दिसत नाहीं. कारण एका जातीच्या माणसाचा दुसऱ्या जातीच्या माणसाशीं स्नेह कदाचित् जमणार नाहीं; पण एकाच जातीच्या माणसांचा तरी परस्पर स्नेह जुळण्यास अडचण येऊं नये. तथापि आरंभीं सांगितल्याप्रमाणे तोहि प्रकार दुर्दैवाने दृष्टोत्पत्तीस पडत नाहीं. कॉलेजमध्ये असतांना निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांना तरूणपणीं एकत्र राहण्याचा प्रसंग येतो. अशा वेळीं स्नेहगत मनोवृत्ति विद्यार्थ्यांत जर उद्भूत होतील तर स्नेह जुळण्यास विलंब लागणार नाहीं व अशा वयांत जडलेला स्नेह केवळ जातिभेदामुळे विघात पावणार नाहीं. उलट, जातिभेदाची तीव्रता कमी होण्यास तरूणपणीं जडलेला स्नेह फारच उपयुक्त होईल. परतु सांप्रत तरी आमच्या समाजांत स्नेहवृत्ति विकसित न झाल्यामुळे स्नेहाच्या आड जातिभेद येतो असें मानतां येत नाहीं. जातिमात्सर्यापेक्षा व्यक्तिमात्सर्यच ह्या कालीं विशेष जोरदार दिसत आहे व त्याचें कारण अर्थात् शिक्षणांतील वैगुण्य हें होय.

स्नेह आणि प्रेम ह्यांत अंतर आहे. स्नेह दोन व्यक्तींचा आश्रय करून असतो; परंतु प्रेम एकाच व्यक्तीमध्ये स्वतंत्रपणें असूं शकतें.

आईचें प्रेम मुलांवर असतें, पण मुलांचें आईवर असतेंच असा नियम नाही. एखादा मुलगा दुराचारी असला तरी त्याच्यावरील आईचें प्रेम कमी होत नाही. परंतु दुराचाररूपी पायावर स्नेह-मंदिराची रचना कधींच होणें शक्य नाहीं. प्रेम निरपेक्ष आहे; तर स्नेह सापेक्ष आहे. वियोगाने स्नेह नाश पावतो; पण प्रेम उलट दुणावतें.

स्नेहाची उत्पत्ति सद्‌गुणांत आहे त्याचप्रमाणें तो चिरस्थायी होणें हेंही सद्‌गुणांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. किंबहुना स्नेह आणि सद्‌गुण ह्यांचें तादात्म्य आहे असें म्हटलें तरी चालेल. करितां, कर्मधर्मसंयोगाने दोन स्नेह्यांपैकी एकास व्यसन व दुर्गुण जडले असतां त्यांचा स्नेह टिकणें शक्य नाही. कारण स्नेहवृत्तीचें अधिष्ठान सद्‌गुण आहे. अधिष्ठानाचाच लोप झाला तर आश्रिता-चाही लोप झालाच पाहिजे. आता खरा सद्‌गुणी मनुष्य क्वचितच दुर्गुणी निघतो, हें खरें आहे. तथापि पुष्कळ वेळां आपण ज्यास गुणी मनुष्य समजतों तो वस्तुतः तसा नसून त्याच्यांत दुर्गुणी वृत्ति लीन असतात; व्यक्त नसतात. परिस्थिति अनुकूल होतांच त्या दुर्वृत्तींचा प्रादुर्भाव होतो. परंतु त्यांतही हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, सर्वच दुर्गुण स्नेहविघातक होतील असें नाही. कारण क्षम्य आणि अक्षम्य असे दुर्गुणांचे प्रकार करतां येण्यासारखे आहेत. मानवी प्राणी निर्दोष नाही. लहानसहान प्रमाद त्याच्या हातून वारंवार होत असतात; पण अशामुळे स्नेहांत व्यत्यय येण्याचें कारण नाही. दुर्बलमनस्क होऊन माणसाच्या हातून प्रमाद घडतात तेव्हा त्याच्याबद्दल आपणांस रोष न येतां त्याची कींव येते. अन्तः-करणरूपी झरा जोंपर्यंत निर्मळ आहे तोंपर्यंत त्या माणसाबद्दल निराश होण्याचें कारण नाही. पण अंतःकरणच जेव्हा दुर्गुणाश्रित होईल तेव्हा त्या मनुष्याशीं संबंध ठेवणें शक्य नाहीं.

आता लहानसहान चुकांबद्दल आपल्या स्नेह्याची बाजू घेणें हें

आपलें काम आहे. कारण स्नेही म्हणजे आपला दुसरा आत्माच होय. आपल्या हातून घडलेल्या चुकांचें जसें आपण प्रदर्शन करीत नाही त्याचप्रमाणे आपल्या स्नेह्याच्या चुकांवरहि पांघरूण घालणें आपलें कर्तव्य आहे. जे दोन स्नेही सार्वजनिक कामांत पडतात त्यांनी तर ही गोष्ट लक्षांत वाळगणें अत्यन्त जरुरीचें आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रांतील समाजधुरीणांमध्ये एकच अपवाद खेरीज करून —हा गुण आढळत नाही. अथवा खरें म्हटलें असतां, ह्या लोकांत आम्हीं वर सांगितलेल्या तऱ्हेचा स्नेहच दिसत नाही. स्नेह्याला ज्या वेळीं मदतीची अवश्यकता फार, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास सोडून देण्यास ज्यांस यत्किंचिताहि संकोच वाटत नाही अशीच मंडळी फार. एकंदरींत स्नेह्याच्या बाबतींत न्यायाचा धारवाडी कांटा वापरणें दुर्घट होय. परंतु हा दोष नसून सद्गुण आहे. सार्वजनिक बाबतींत मतभेद पडल्यास स्नेह राहील काय? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आमच्या मतें मतभेदच प्रामाणिक असेल तर त्यामुळे स्नेहांत अंतर पडण्याचें यत्किंचितही कारण नाही. आता सार्वजनिक कामांत मतभेद असलेल्यांचा नवीन स्नेह जडण्याचा संभव प्रायः नाहीच म्हणावयास हरकत नाही. शिवाय आपल्या मनांत स्नेह्याविषयी सदिच्छा वसत असली पाहिजे म्हणून आपल्या स्नेह्याचें जेणेंकरून वाईट होईल असें कोणतेंही कृत्य आपल्या हातून होणार नाही.

वस्तुतः पाहतां सदिच्छा ही स्नेहवृत्तींना मूलभूत आहे. ज्याच्या अन्तःकरणांत सद्वासनांचा अंकूर कधीच फुटलेला नाही त्याच्या ठिकाणीं स्नेहवृत्तीचाही प्रादुर्भाव होणार नाही. म्हणून दुसऱ्याचें अनिष्ट चिंतणारीं माणसें स्नेहाला नालायक असतात. खरें म्हटलें असतां दुष्ट मनुष्य स्वतःचाच शत्रु असतो; मग दुसऱ्याबरोबर त्याचें मित्रत्व कसें व्हावें?

स्नेह्याची उणीव कशाऱ्यानेही भरून यावयाची नाही. अखिल

वैभवसंपन्न मनुष्यालाही स्नेही नसेल तर त्याचें आयुष्य सुखांत जाणार नाही. श्रीमंती असली म्हणजे स्नेह्याची गरज राहिली नाही असें म्हणतां यावयाचें नाही. स्नेहाचें दारिद्र्य पैशाच्या श्रीमन्तीने नाहींसें कसें होणार? पूर्णावस्थेला पोंचलेलें मन स्नेहशील असल्यामुळे अशा मनाची तळमळ स्नेहसुख लाभल्यावांचून राहणार नाही. म्हणून दरिद्री आणि श्रीमंत दोन्ही माणसांस स्नेह्याची अवश्यकता सारखीच आहे असें आम्हांस वाटतें. श्रीमंत माणसास स्नेही पुष्कळ असतात असें दिसतें; पण ते वस्तुतः पैशाचे स्नेही असतात. दुर्दैवाने विपर्यस्त स्थिति आल्यास अशा स्नेह्यांचा मागमूसही लागत नाही!

एकंदरींत आमच्या समाजांत स्नेह बनण्यास विघातक कारणें पुष्कळ आहेत; तीं सांगणें म्हणजे आमच्या दुर्गुणांची मालिका पुढे आणणें होय. पण त्यांतल्या त्यांत स्वतःविषयी फाजील अभिमान व एकंदर सदिच्छेचा अभाव हीं कारणें प्रमुखत्वाने सांगितलीं पाहिजेत. मी फार शहाणा आहे ह्या पिशाच्चाने एकदा का मन पछाडलें, म्हणजे बाकी सर्व मूर्ख आहेत ह्या भावनेने मन घेरून जातें. त्यामुळे दुसऱ्याशीं बरोबरीच्या नात्याने वागण्याचें त्याच्या हातून होत नाही. अशा रीतीने उच्चस्थानीं आपण आपल्यास उभें करून घेतलें म्हणजे तेथे स्नेहाचें बीज कसें रुजणार? ह्याचाच दुसरा परिणाम असा असतो की, दुसऱ्याच्या अंगच्या निर्विवाद गुणांबद्दल आपणांस मत्सर वाटूं लागतो. हल्लीच्या समाजाला मत्सराने तर अगदी ग्रासून टाकल्यासारखे दिसतें. ह्याच कारणाने दुसऱ्याचे गुण कबूल करण्याची प्रवृत्ति नष्ट होते. आमच्या समाजांत कांही माणसें अशीं आहेत की, त्यांच्याकडे तुम्ही गेलां तर सर्व थोर मानल्या जाणाऱ्या गृहस्थांचीं छिद्रें त्यांच्याकडून तुम्हांस एका क्षणांत कळतील. गुणग्राहकता तर नाहीच, पण दुसऱ्याचीं व्यंगें आम्हांस चटकन् दिसतात. असलेले गुण कबूल करून त्यांचें चीज केल्याने

विरोध एकदम नाहीसा होतो व स्नेह जमण्यास मार्ग खुला होतो. आपले दोष कबूल करणें व दुसऱ्याचे गुण घेणें हा थोर मनाचा धर्म आहे. पण अशा थोर मनाचीं माणसें आमच्या समाजांत दैव-दुर्विपाकाने फार कमी आढळतात. भाषणावरून व लेखावरून एखाद्याच्या स्वभावाचा अदमास केला व वस्तुस्थितीशीं त्याचा मेळ घालूं लागलों, तर पुष्कळ वेळां केलेला अंदाज चुकीचा ठरतो.

असो. आमच्यांत स्नेहशीलवृत्ति जोंपर्यंत उद्भवल्या नाहीत तोंपर्यंत आमच्या समाजाची प्रगति कोणत्याही तऱ्हेने होणार नाहीं असें पुष्कळांस वाटतें, तें खरें आहे.

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

# सौंदर्य

प्राचीन व अर्वाचीन सर्व तत्त्ववेत्ते जमेस धरले तरी सौंदर्यशास्त्राचा विचार करणारे आजपर्यंत फारच थोडे लोक होऊन गेले असेंच म्हणावें लागेल. सौंदर्यप्राप्तीसाठी प्रत्येक

**सौंदर्यविषयक कल्पनांचा विकास**

मनुष्य सदैव धडपड करीत असतांहि सौंदर्याच्या अस्फुट कल्पनाहि पुष्कळांना नसतात हें पाहून आश्चर्य वाटतें. याचें एक कारण असें असावें की, सौंदर्याची व्याख्या करणें हें अतिशय अवघड असतें. आणि या अवघडपणाचें कारण कदाचित् असें असूं शकेल की, निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या लोकांच्या सौंदर्यविषयक कल्पना निरनिराळ्या असतात. म्हणजे सौंदर्याच्या स्वरूपाबद्दल एकवाक्यता आढळून येत नाही. या एका निःसंदिग्ध गोष्टीवरून असें अनुमान निघतें की, सौंदर्य हें बुद्धिग्राह्य असल्यामुळे बुद्धीच्या विकासाप्रमाणे सौंदर्याच्या कल्पनांत फेरबदल होत असतो. नखशिखांत अलंकारांनी मढविलेली स्त्री एका काळीं सौंदर्याचा आदर्श म्हणून मानली जात होती. परंतु आज कित्येक समाजांत तरी अशा स्त्रीकडे पाहून लोक नाकेंच मुरडतील. तेव्हा सौंदर्यविषयक कल्पनांचा इतिहास म्हणजे बुद्धीच्या विकासाचा इतिहासच होय असें म्हणण्यास हरकत नाही.

सौंदर्य हा शब्द सुंदर या विशेषणावरून बनला आहे हें उघड आहे. संस्कृतमध्ये बहुतेक नामें धातूंवरून बनलेलीं असतात. पण सुंदर हा शब्द कोणत्याहि धातूवरून सिद्ध झालेला दिसत नाही. यावरून असें दिसतें की, सौंदर्याची कल्पना मनुष्याला बऱ्याच कालानंतर आली असावी; आणि असें असणें अगदी स्वाभाविक

आहे. कारण, सौंदर्य हा पदार्थहि नाही अथवा प्राणधारकहि नाही.

**सौंदर्याच्या कल्पनेचा उगम**

म्हणजे आवश्यक वस्तूंची कल्पना मनुष्यामध्ये प्रथमच उद्भूत होते तशी अनावश्यक वस्तूंची होत नाही. सुंदर हें मदनाचें नांव आहे. यावरून सौंदर्याच्या कल्पनेचें मूळ मदनाच्या कल्पनेंत असावें असें वाटतें. मदनाची बाधा झालेल्या माणसाच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचें तेज चमकत असतें व त्यामुळे तो मनुष्य सुंदर दिसूं लागतो. तेव्हा यांतच सौंदर्याच्या कल्पनेचा जन्म झाला असावा.

सौंदर्याची जरी स्पष्ट व्याख्या करतां आली नाही तरी सुखोत्पादन हेंच सौंदर्याचें कार्य अथवा लक्षण आहे यांत संशय नाही.

**सौंदर्याचा अनुभव कोण घेऊं शकेल ?**

सौंदर्यामुळे सुखोत्पत्तिच झाली पाहिजे. सुखाचा उपभोग घेणारा मनुष्य सुख उपभोगण्याच्या स्थितींत जर नसेल तर त्याच्या ठिकाणीं सौंदर्याच्या सुखाचा अनुभव उत्पन्न करतां येणार नाही हें उघड आहे. आजारी व दुःखी माणसें सुखाचा अनुभव घेण्याच्या मनःस्थितींत नसतात, म्हणून त्यांच्यावर सौंदर्याचा कोणताहि परिणाम होणार नाही; पण तेंच सौंदर्य इतर माणसांवर आपला परिणाम करूं शकेल हें निर्विवाद आहे. तापकरी माणसाला साखर जशी कडू लागते त्याप्रमाणे सौंदर्याचाहि त्याच्यावर विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे. तात्पर्य, सुखानुभवाच्या स्थितींत जर आपण असूं तरच आपल्यास सौंदर्यसृष्टीचा अनुभव घेतां येईल. नाही तर आपल्यापुरती तरी सौंदर्यसृष्टि नाही असें म्हणावयास प्रत्यवाय नाही. यावरून असें उघड होतें की, सौंदर्याचा अनुभव येण्यास सुसंस्कृत बुद्धि व पूर्ण आरोग्य त्याचप्रमाणे उल्हासवृत्ति यांची अवश्यकता आहे. समाजांत समृद्धि व स्वस्थता नांदत असतात त्याच वेळीं सौंदर्याचा परिपोष होतो.

सौंदर्य ही वस्तु नाही व ह्या कारणामुळेच सौंदर्य म्हणजे काय याची यथार्थ कल्पना दुसऱ्यास करून देणें कठीण पडतें. परंतु विचार केला असतां असें दिसतें की, अनुरूप वस्तूंच्या प्रमाणबद्धतेंत सौंदर्याची उत्पत्ति होते.

**सौंदर्याची जननी**

शेण, केरसुणी आणि गुलाब-मोगऱ्याचीं फुलें हीं एकत्र ठेवलीं असतां त्यांच्या योगानें सौंदर्य-प्राप्ति होणार नाही. म्हणून अनुरूप वस्तूंच्याच साहचर्यानें सौंदर्यो-पलब्धि होते असें म्हणावें लागतें. दिवाणखाना सजवितांना कोठची वस्तु कोठे ठेवली असतां शोभा उत्पन्न होते याचा आपल्याला अनुभव असतोच. तेव्हा अनुरूप वस्तूंची विशिष्ट मांडणी ही सौंद-र्याची जननी आहे.

दिवाणखान्याच्या कोपऱ्यांत जो पदार्थ ज्या स्थितींत आपण ठेवतों तो पदार्थ त्या स्थितींत दिवाणखान्याच्या भिंतीशीं आपण ठेवणार नाही. अनेक पदार्थांच्या संयोगानें सौंद-र्योपलब्धि होते तशी ती एकाच पदार्थापासून होत नाही असें नाही; पण वस्तुतः ज्याला आपण एक पदार्थ असें म्हणतों तो पदार्थ अनेक पदा-र्थांचा अथवा गुणांचा समुदाय असतो. कोण-त्याहि पदार्थाची लांबी, रुंदी, उंची, तकाकी इत्यादि गोष्टी योग्य प्रमाणांत असतील तरच तो पदार्थ सुबक आहे असें आपण म्हणतों. मनुष्याला जेव्हा आपण सुंदर म्हणून ठर-वितों त्या वेळेला तरी त्याच्या शरिराचे बहुविध अवयव हे योग्य प्रमाणांत असतात असें आपण पहातों. फूल सुंदर आहे असें जेव्हा आपण म्हणतों तेव्हा सुद्धा फुलाच्या पाकळ्या, फुलाचा रंग, फुलाचा देठ इत्यादि गोष्टींचा विचार करून आपल्याला त्या फुलाचें सौंदर्य ठरवितां येतें. यावरून असें निष्पन्न होतें की, सौंदर्य हें वस्त्वधीन अथवा रूपाधिष्ठित असतें. म्हणून सौंदर्याचें ज्ञान होण्याचें साधन

**सौंदर्य मनुष्याच्या कल्पनेंतच असतें**

दर्शेंद्रिय हेंच होय. श्रवणेंद्रियाने सुद्धा सौंदर्याचें ज्ञान होतें असें जे कित्येक पाश्चात्य लोक म्हणतात तें आम्हांला पटत नाही. गाण्याचे मधुरालाप ऐकून मनुष्याला आनंद होतो हें खरें पण तो सौंदर्यजन्य नव्हे. प्रत्येक इंद्रियाचा अनुकूल विषयांशी संयोग झाला असतां सुखोद्भव अथवा आनंदोद्भव होतच असतो. तिखट, मीठ, चिंच, गूळ इत्यादिकांच्या योग्य प्रमाणांत बनलेली भाजी जिव्हेला रुचकर लागते व त्यापासून आनंद होतो. तथापि हा सौंदर्याचा आनंद आहे असें म्हणणें म्हणजे शब्दांचा दुरुपयोग करणें होय. म्हणून सौंदर्य हें रूपाधिष्ठित असतें हेंच खरें आणि हें जर खरें असेल तर जन्मांधाला सौंदर्याची कधीहि कल्पना असणार नाही असें म्हणणें ओघानेच प्राप्त होतें. सौंदर्य हें पदार्थांच्या जुळणीतून प्रसविणारें असल्यामुळे तें नुसतें कल्पनामय आहे. पदार्थांची अमुकच मांडणी ही सौंदर्यवाहक कां असावी हें जसें सांगतां येणार नाही, तसेंच एकच प्रकारची मांडणी प्रत्येकाच्या ठिकाणीं सौंदर्याची प्रतीति उत्पन्न करीलच असा नियम नाही. या कारणास्तव असेंच म्हणावें लागतें की, सौंदर्य हें मनुष्याच्या कल्पनेंतच असतें. मनुष्याच्या बाहेर सौंदर्याला अस्तित्वच नाही.

**असंस्कृत बुद्धीच्या माणसाचा सौंदर्यानुभव**

अगदी रानटी समाजाचा इतिहास अवलोकिला असतां असें दिसून येईल की, स्त्रियांच्या पलीकडे त्यांच्या सौंदर्यकल्पनेचा पल्ला जातच नाही. अलंकारांनी लपेटलेल्या स्त्रियांच्या ठिकाणींच सौंदर्य त्यांना प्रतीत होतें. अलंकारविरहित पण सुंदर अवयवांनी युक्त अशा स्त्रीचें सौंदर्य आकलन करण्याची शक्ति रानटी समाजांतील लोकांमध्ये नसते. म्हणून असंस्कृत बुद्धीच्या माणसाला सौंदर्याचा प्रथमानुभव अलंकारविभूषित स्त्रीच्या ठिकाणींच मिळाला असला पाहिजे.

सौंदर्याचा विचार करतां जडसृष्टि आणि जीवसृष्टि या दोहों-

मधील सौंदर्यविषयक भिन्नता दृष्टिआड करतां कामा नये. प्रमाणबद्धतेंत जडसृष्टीचें सौंदर्य गुरफटलेलें असतें तसेंच तें जीवसृष्टीचेंहि असतें हें जरी खरें असलें, तरी प्राण्याच्या अंतर्यामीं असलेल्या जीवशक्तीमुळेच त्याच्या जडदेहाचें सौंदर्य भासमान होतें हें विसरतां कामा नये. मनुष्याचे सर्व अवयव प्रमाणशीर असले म्हणजे आपण त्याला सुंदर म्हणतों. तथापि मनुष्याची जीवशक्ति त्याला सोडून गेल्यावर, म्हणजे त्याचें प्राणोत्क्रमण झाल्यावर, त्याच्या शरिराच्या अवयवांची प्रमाणबद्धता बिघडते अशांतला प्रकार नाही; तरी सुद्धा मेल्यानंतर अत्यंत स्वरूपवान स्त्रीच्या देहाला कोणीहि सौंदर्याकरतां म्हणून कवटाळून बसणार नाही! मेलेल्याची गोष्ट तर एकीकडे राहो; पण जिवंतपणीं सुद्धा निसर्गतः अत्यंत रूपवती असलेली स्त्री निरनिराळ्या काळीं कमी अधिक प्रमाणांत सुंदर दिसते, ही गोष्ट आपल्या अनुभवाला येतेच. तेव्हा प्राण्याचें सौंदर्य त्याच्या अवयवांच्या मांडणींत असून शिवाय त्याच्या जीव-शक्तींतहि असतें असें म्हणावें लागतें. ही प्रमाणशक्ति कमी अधिक होईल हें उघड आहे. म्हणून बालपणचें सौंदर्य आणि तारुण्यांतील सौंदर्य हीं दोन्ही निरनिराळीं असून या दोन्ही प्रकारच्या सौंदर्याचा लय वृद्धापकाळीं होतो. हा अनुभव जड सृष्टीच्या संबंधाने येणार नाही हें सांगावयास नकोच.

**जड सृष्टींतील सौंदर्य व जीवसृष्टींतील सौंदर्य**

एकाच जातीच्या अथवा सांचाच्या वस्तूंनी जसें सौंदर्य प्रतीत होतें तसेंच वस्तूंच्या विचित्रतेनेहि होतें. समोरासमोर दोन खुर्च्या ठेवायाच्या असल्या तर त्या आपण एकाच नमुन्याच्या ठेवूं; एवढेंच नव्हे तर त्या एकाच रंगाच्याहि असल्या पाहिजेत असा आपण आग्रह धरूं. कारण त्याच्या योगाने गृहाचें सौंदर्य

**सौंदर्यशास्त्राचा उपयोग**

वाढणारें आहे. पण याच्या उलट पांढरें स्वच्छ धोतर नेसून त्याच्यावर काळा अंगरखा घातल्यानेच अधिक शोभा येते असें आपण मानतों आणि याच्या उलट प्रकार कुरूपता उत्पन्न करण्यास मात्र कारणीभूत होतो! यावरून सौंदर्याच्या कल्पना परंपरागत असतात असेंहि मानण्याला जागा आहे. हें कांही असलें तरी सौंदर्यशास्त्राचा उपयोग प्रत्येक गृहस्थाला अगर गृहिणीला फार होतो यांत संशय नाही. घरांतील वस्तूंची रचना अथवा मांडणी ही जर सौंदर्यपोषक असेल तर घरांतील मनुष्यांची वृत्ति आनंदित राहील. आता ज्या स्त्रियांना सौंदर्याच्या अस्फुट कल्पनाहि नसतात त्यांना इतरांच्या मानाने दुःखाचा अनुभवहि येणार नाही हें जरी निर्विवाद असलें तरी आनंदाच्या एका साधनाला त्या मुकतात यांत कांही शंका नाही. यावरून आणखी असें सिद्ध होतें की, उपयुक्तता म्हणजे सौंदर्य असें घोकणाऱ्या ग्रीक तत्त्वज्ञान्यांना सौंदर्याची प्रतीति झाली नव्हती. केरसुणी कितीहि उपयुक्त असली तरी ती जवळ घेऊन जेवावयाला बसण्यांत कोणालाहि आनंद होणार नाही! उपयुक्ततेचा आणि सौंदर्याचा तादृक् संबंध दिसत नाही. साधुत्वाचा सौंदर्याशीं कसा संबंध येतो याची तर कोणालाहि कल्पना करतां येणार नाही! प्रमाणबद्धावयव म्हणजे सौंदर्य जेथे आढळेल तेथे सद्गुणहि असण्याचा संभव आहे. नुसता संबंधच नव्हे तर त्याच्यापुढे जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, सौंदर्याचें आणि सद्गुणांचें सामान्यतः साहचर्यच असतें. 'रूपानुवर्ती गुणः' हें वचन कांही खोटें नाही. पण चांगलें मन अथवा सद्गुण हें सौंदर्याचें अंग आहे असें कधीहि म्हणतां येणार नाही. सौंदर्यानंद इंद्रियग्राह्य नसून बुद्धिग्राह्य असल्यामुळे तो वैषयिक आनंदापेक्षां श्रेष्ठ दर्जाचा आहे यांत शंका नाही. सौंदर्य हें इंद्रियगोचर आहे, या हेगेलच्या मतापेक्षा तें मनोगोचर आहे हें कँटचें मतच बरोबर दिसतें.

सौंदर्य-सुखाचा अनुभव एकट्यालाच घेतां येतो व त्या सुखांत

तो अगदी तल्लीन होऊन जातो. ओसाड बेटांतील माणूस आपलें घर सुशोभित करणार नाही असें कॅन्ट कां म्हणतो समजत नाही. तो स्वतःला अलंकृत करणार नाही हें त्याचें म्हणणें मान्य आहे; कारण स्वतःला अलंकृत करण्याचा उद्देश आपल्या ठिकाणींच उत्पन्न होणाऱ्या सौंदर्याचा अनुभव दुसऱ्यास देण्याचा असतो. ओसाड बेटांत दुसरा कोणी नसल्यामुळे स्वतः आपलें शरीर अलंकृत करण्याचें प्रयोजनच उरत नाही. पण घर सुशोभित करण्याची गोष्ट तशी नसते. घर सुशोभित करण्याने घराच्या मालकाला जो आनंद होतो तो त्याने कां गमवावा? स्वतःचें शरीर अलंकृत करण्याने दुसऱ्यालाच आनंद होत असल्याकारणाने पुरुष बहुधा आपलें शरीर अलंकृत करीत नाहीत. स्त्रियांना आपल्या पतींना आनंदित करावयाचें असल्यामुळे त्यांच्याच ठिकाणीं विशेषतः ही अलंकार धारण करण्याची चाल पडली हें स्वाभाविकच झालें. आपल्या वस्त्रादिकांच्या योगाने दुसऱ्यांच्या मनांत उद्विग्नता उत्पन्न होऊं नये इतकी खबरदारी पुरुषांनी घेतली म्हणजे झालें. सौंदर्याची कल्पना फक्त मनुष्यालाच असते. मनुष्येतर प्राण्यांत ही कल्पना असेलसें वाटत नाही आणि जर असलीच तर ती मादीपुरतीच असावी. अवयवांच्या सूत्रबद्धतेप्रमाणे कोमलता हेंहि सौंदर्याचें मुख्य अंग असेल काय? अर्थात् हा प्रश्न प्राणिविषयक सौंदर्यापुरताच विचारतां येईल. अवयव नीटनेटके असूनहि एखादी स्त्री कोमल नसून जर राकट असेल तर तिला सुंदर म्हणतां येईल काय? जर म्हणतां येत नसेल तर कोमलता अथवा नाजूकपणा हें एक सौंदर्याचें मुख्य अंग म्हणूनच समजलें पाहिजे. आणि मग असें म्हणणें ओघानेच प्राप्त होतें की, पुरुष कधींहि सुंदर म्हणून गणला जाणार नाही. कारण राकटपणा हेंच पुरुषत्वाचें मुख्य

**निरनिराळ्या वस्तूंत निरनिराळ्या गुणांनी सौंदर्य प्रतीत होतें**

लक्षण समजलें जातें. मनुष्यांत स्त्री, पक्ष्यांत मादी व जड वस्तूंत पुष्प यांच्यासंबंधानें कोमलता हें सौंदर्याचें प्रमुख अंग दिसतें. विशेषतः फुलांच्या संबंधानें बोलावयाचें झालें तर ज्या फुलांना सुंदर हें विशेषण आपण लावतों तीं बहुधा कोमलच असतात. कोमल पदार्थ टिकाऊ नसतात हा अनुभव पुष्पांच्या संबंधानें पहावयास सांपडतो. तेव्हा कोमलता हा गुण दीर्घायुष्याला विघातक आहे असें अनुमान करणें अयोग्य होत नसल्यास कोमल स्त्री तिच्या कोमलत्वाच्या गुणामुळेच अल्पायुषी असण्याचा संभव आहे असें म्हणावें लागेल. पण याचा अनुभव कोणी संगृहीत करून न ठेविल्यामुळे हें तात्विक अनुमान प्रत्यक्ष अनुभवांनी कितपत खरें ठरेल हें निश्चित सांगतां येत नाही. निरनिराळ्या वस्तूंच्या मांडणींतून जो सौंदर्योदय होतो त्यामध्ये कोमलता हा गुण असण्याचें कारणच नाही. यावरून असें दिसतें की, निरनिराळ्या वस्तूंत निरनिराळ्या गुणांनी सौंदर्य प्रतीत होतें.

सजातीयत्व हें असें सौंदर्यपोषणाला कारणीभूत होतें तसें विजातीयत्वहि होतें, याचा उल्लेख मागे आलाच आहे. पण विजातीयत्वाच्या ठिकाणीं सौंदर्याचा परिपोष करण्याचा असलेला धर्म हा रंगाच्या संबंधानें विशेषतः प्रत्ययास येतो. विजातीय रंगाचें मिश्रण शोभादायक होतें. इंद्रधनुष्य जें इतकें सुंदर दिसतें त्याचें कारण निरनिराळ्या रंगांचें बेमालूम मिश्रण हेंच होय. एकंदरींत विजातीयत्व किंवा विविधता यांच्या योगानें उत्पन्न होणारें सौंदर्य हें जड पदार्थांच्या संबंधानें दिसून येतें. निसर्गाची विविधता जेथे असते तेथेच निसर्गाचें सौंदर्य अनुभवितां येतें. तसेंच निरनिराळ्या वस्तूंनीच आपल्या घराला शोभा आणतां येते. एकाच जातीच्या वस्तूंनी दिवाणखाना सजविला तर तेथे सौंदर्याची उत्पत्ति कधींहि होणार नाही. तात्पर्य, विविधतेंत सौंदर्याचें बीज

**विविधतेंत सौंदर्याचें बीज**

आहे यांत शंका नाही. जितकी विविधता अधिक तितका सौंदर्याचा परिपोष अधिक.

सौंदर्याचें ठोकळ रीतीने विवेचन केल्यानंतर सौंदर्याची कल्पना ज्यांत ग्रथित झाली आहे अशा एका कालिदासाच्या श्लोकाचें आपण निरीक्षण करूं. वल्कल परिधान केलेल्या शकुंतलेला बघून दुष्यंताला सौंदर्यविषयक विचार सुचले आहेत. दुष्यंत म्हणतो—काममननुरूपमस्या वयसो वल्कलं न पुनरलंकारश्रियं न पुष्यति । कुतः

**कालिदासाचें शाकुंतल व संयोगजन्य सौंदर्य**

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ॥

हिच्या वयाला वल्कल योग्य दिसत नाही. म्हणजे तारुण्यांत वल्कल परिधान करणें अनुचित होय. म्हातारपणीं वानप्रस्थाश्रमांतच वल्कलें धारण करणें योग्य होईल असें म्हणण्याचा दुष्यंताचा आशय. तथापि दुष्यंताच्या मतें तें वल्कल अलंकारानें प्राप्त होणारी शोभा शकुंतलेच्या शरिरास देत नाही असें नाही. या वाक्यांतील वयसः या पाठापेक्षा वपुषः हा पाठ अधिक ग्राह्य वाटतो. हिच्या शरिराला म्हणजे शरिराची कांति पाहिली असतां हें धारण केलेलें वल्कल अननुरूप वाटतें. पण तें अलंकाराची शोभा आणीत नाही असें मात्र नाही. कारण शेवाळीने युक्त असूनहि कमल रम्य दिसतें, चंद्रावरचा डाग काळा असूनहि तो चन्द्राच्या ठिकाणीं सौंदर्य उत्पन्न करतो. वल्कल नेसूनहि ही शकुंतला अधिक सुंदर दिसते. तेव्हा सुंदर वस्तूंना काय बरें अलंकार होणार नाही? वाटेल तो पदार्थ सौंदर्य खुलवील असें दुष्यंत म्हणत नाही. जो पदार्थ स्वतंत्र

रीतीनें सुंदर नाही तो दुसऱ्या सुंदर पदार्थाशीं युक्त झाला असतां त्याचें सौंदर्य वाढविण्यास कारणीभूत होतो. शेवाळ, काळा डाग अथवा वल्कल यांच्यामध्ये स्वतः मनोहारित्व नाही. परंतु त्यांचा सुंदर पदार्थाशीं संयोग झाला असतां त्या मूळच्या सुंदर पदार्थांचें सौंदर्य वृद्धिंगत करण्याचें काम या जातीच्या कुरूप पदार्थांकडून होतें. शेवाळीच्या योगानें कमळाला रम्यत्व येतें, काळा डाग चंद्राच्या ठिकाणीं सौंदर्य उत्पन्न करतो. पांढऱ्या धोतरावर काळा अंगरखाच शोभतो ही गोष्ट आपल्या परिचयाचीच आहे. हीं सर्व संयोगजन्य सौंदर्याचीं उदाहरणें आहेत. अननुरूप वस्तूंच्या संयोगानें सौंदर्य उत्पन्न होतें हें तत्त्व कालिदासानें श्लोकांत समाविष्ट केलें आहे. आता कोणत्या पदार्थांचा संयोग सौंदर्यावह होईल हें अनुभवानेंच ठरविलें पाहिजे. शेवाळीनें कमळाला रम्यत्व येतें असेंच कालिदासाचें म्हणणें असलें पाहिजे. कारण वल्कलांचा उपयोग अलंकारासारखा झाला आहे या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यानें पुढील दोन दृष्टांत दिले आहेत. 'शैवलं सरसिजस्य अलंकारश्रियं पुष्यति' असें कालिदासाला सांगावयाचें आहे. पण नुसतें कमळ रम्य आहे काय? याविषयीं कालिदासाचा काय अभिप्राय असावा बरें? का मुळचें सुंदर कमळ शेवाळीनें अधिक रम्य दिसतें असें कालिदासास म्हणावयाचें आहे? असें म्हणावें तर अधिक याला मुळांत शब्द नाही. म्हणून तसा अर्थ करतां येत नाही. जातिवंत सुंदर कमळ शेवाळीनें गुरफटलें तरी सुंदरच दिसतें; म्हणजे त्याच्या मुळच्या सौंदर्याची हानि शेवाळीनें होत नाही असा अर्थ केल्यास "वल्कलं न पुनरलंकारश्रियं न पुष्यति" याला हा दृष्टांत समर्पक होणार नाही. कालिदासाच्या मतानें शैवल हा अलंकार आहे. आणि सौंदर्यावहत्व हा तर अलंकाराचा धर्म आहे. दुसरा दृष्टांतहि पहिल्यासारखाच आहे. नुसता पांढरा सफेत चंद्र असता तर इतका मनोहर वाटला नसता. पण त्याजवरील डागामुळें त्यास रम्यत्व प्राप्त

स्थळ प्रत
सं. निबंध ८२६५
ता. ३१।१९।३२

झालें आहे. मग तिसऱ्या चरणांत " अधिक " शब्द कां वापरला असा प्रश्न येतो. त्याचें कारण असें की कमळ किंवा चंद्र यांच्या-सारखी शकुंतला नव्हती. ती मुळची सुंदर होती. तिच्या अंगावर वल्कल नसतें तरी ती सुंदर दिसली असती. वल्कलाने तिच्या अंगच्या सौंदर्यांत भर पडली. या सर्व चर्चेचा परिणाम काय होतो पहा. सौंदर्यहीन पदार्थाचा संयोग सौंदर्दोत्पादक होतो असें कालि-दास म्हणतो. शेवाळ आणि काळा डाग हीं सौंदर्यहीन, त्याचप्रमाणे कमल व चंद्र. असें असून शेवाळ कमळाला रम्य करते, तर काळा डाग चंद्राला शोभा आणतो. कमळ व चंद्र हे दोनहि पदार्थ जात्याच सुंदर आहेत. शेवाळीने व डागाने त्यांचें सौंदर्य वाढतें असा जर कालिदासाचा अभिप्राय असता तर पहिल्या चरणांत नुसता रम्य शब्द त्याने वापरला नसता. तन् धातूचा अर्थ उत्पन्न करणें आणि पसरविणें असा उभयविध होतो. पण पहिल्या चर-णांतील नुसत्या रम्य शब्दामुळे अडखळावें लागतें. अलंकाराचा धर्म शोभा उत्पन्न करणें व वाढविणें दोनहि प्रकारचा आहे. कुरूप देहाला दागिना शोभा आणतो आणि सुंदर देहाची मुळची शोभा वृद्धिंगत करतो. तसेंच नुसता दागिना टेबलावर ठेवला तर तो सुंदर भासणार नाही. शरिरावरच धारण केला तरच तो सौंदर्यकारक होतो. तात्पर्य, कुरूप शरीर आणि व्यक्तिशः सौंदर्यहीन अलंकार यांचा संयोग सौंदर्यवर्धक ठरतो. वरील श्लोकांत कालिदासाने दोनहि तत्त्वें प्रतिपादन केलीं असल्याचा संभव आहे.

**कांही शंका**

वर केलेल्या चर्चेवरून आणखीहि पुष्कळ शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. शेवटल्या चरणांत कालिदासाने सुंदर आकृतींना काय बरें शोभादायक होणार नाही, असा सूचक प्रश्न विचारला आहे. अर्थात् मधुरा-कृतींचाच तो विचार करीत आहे असें अनुमान करणें योग्यच होईल. अर्थात् कमल आणि चंद्र हे दोन्ही पदार्थ मधुराकृति

अथवा सुंदर आहेत असेंच कालिदासाचें मत असलें पाहिजे असें म्हणतां येण्यासारखें आहे. हें विवेचन जर बरोबर असेल तर पहिल्या चरणांत नुसत्या रम्य शब्दाने कालिदासाचा अभिप्राय व्यक्त कसा होतो हें समजण्यास मोठी अडचण पडते. कमल स्वयंभूत सुंदर आहेच आणि शेवाळहि त्या कमळाला दागिन्याप्रमाणे शोभादायक झाल्यामुळे कमळाच्या सहज सौंदर्यांत अधिक भर पडली पाहिजे हें उघड आहे. पण 'अधिक' वाचक शब्द पहिल्या चरणांत तर आढळत नाही या गोष्टीचा उल्लेख मागे केलाच आहे. आता 'रम्य' या शब्दामध्येच सौंदर्याधिकत्व सूचित करण्याचें सामर्थ्य असेल काय? अधिक सुंदर अशा अर्थानेच रम्य शब्द कालिदासाने उपयोजिला असल्यास एकंदर अर्थाची संगति नीट लागते असें म्हणण्यास हरकत नाही. 'रम्य' शब्दाचा अर्थ अशा प्रकारचा होणार नाहीच असेंहि निश्चयपूर्वक म्हणतां येणें कठीण आहे. दोन सुंदर पदार्थ घेतले तर त्यांपैकी एका पदार्थावर मन विशेष स्थिर होईल अथवा रमेल ही गोष्ट संभवते. तात्पर्य, अशा दृष्टीने 'रम्य' शब्दाचा अधिक सुंदर असा अर्थ करणें भाग पडतें. नाही तर शेवटल्या चरणांत कालिदासाने जो सिद्धांत प्रतिपादिला आहे त्याची व्याप्ति शकुंतलेपुरतीच घ्यावी लागेल. सरसिज आणि चंद्र यांच्यावरून त्याने आपला अनुमानिक सिद्धांत प्रतिपादिला नाही असें म्हटलें पाहिजे; पण हा अर्थ कालिदासाच्या काव्यकौशल्याचा अपकर्ष करणाराच होईल. श्लोकांतील विचार शकुन्तला आणि वल्कल यांवरूनच त्याला सुचला हें उघड आहे. आणि शकुन्तला सुंदर असून वल्कल हें जात्या सौंदर्यहीन ही त्याची समजूत होती याबद्दल कांही शंका रहात नाही. तेव्हा कमल आणि चंद्र हे दोन सुंदर पदार्थ आहेत असेंच कालिदासाचें म्हणणें असलें पाहिजे. संस्कृत काव्यसृष्टींत हे दोन पदार्थ सौंदर्याचे आदर्श म्हणून मानले असल्याचें प्रसिद्धच आहे. मुखकमल आणि

मुखचंद्रमा हे शब्दप्रयोग कोणत्या संस्कृत-वाचकाला अनवगत असतील? तरी पण येथे असा प्रश्न विचारावासा वाटतो की, ज्या चंद्रकमलांची सौंदर्याबद्दल इतकी ख्याति आहे तो चंद्र व तें कमल कोणतें? कलंकविरहित अथवा कलंकयुक्त चंद्र? तसेंच शेवाळ झाडून टाकून सरोवरांतून बाहेर काढिलेलें कमल अथवा शेवाळीने व्यापिलेलें सरोवरांतील कमल? यांपैकी कोणत्या स्थितीं-तील चंद्राची अगर कमलाची उपमा सुंदर मुखाला देण्यांत येते याचा विचार करणें अवश्य आहे. प्रस्तुत श्लोकांतील 'सरसिज' आणि 'हिमांशु' हे शब्द अत्यंत मार्मिक दृष्टीने कालिदासाने योजिलेले दिसतात. या विचारसरणींत जर कांही तथ्य असेल तर तळ्यांत असलेलें कमळ आणि कलंकविरहित चंद्रमा हे जास्त सुंदर नाहीत असा कालिदासाचा अभिप्राय असावा. पण 'रम्य' आणि 'तनोति' या शब्दांनी सौंदर्याधिकत्व ध्वनित होत असेल तर अर्थ लावण्याच्या मार्गांतील बरेच कांटे दूर झाले म्हणावयाचे. सारांश, कालिदासाच्या सौंदर्यविषयक कल्पना ज्या श्लोकांत ग्रथित झालेल्या दिसतात त्या श्लोकाचा निश्चितार्थ समजून घेण्याचा प्रयत्न कै. शिवरामपंत परांजप्यांखेरीज कोणी केला नाही याचें आश्चर्य वाटतें.

# समाजशास्त्राची तोंडओळख

समाज हा व्यक्तींचा बनतो ही गोष्ट जरी संशयातीत असली तरी व्यक्तींचा समूह म्हणजे समाज नाही हें समाजशास्त्राचें आद्य तत्त्व दृष्टीआड केल्यास ह्या शास्त्रांत पुढे पाऊलच टाकतां येणार नाही. आपआपल्या गाड्यांची वाट पाहात उभ्या असलेल्या बोरीबंदर स्टेशनवरील मनुष्यांचा घोळका याला समाज म्हणावयाला कोणीहि प्रवृत्त होणार नाही. समाजनिरपेक्ष व्यक्ति आणि समाजांतर्गत व्यक्ति या दोन भिन्न आहेत; कारण त्यांची कार्यक्षमता अथवा त्यांच्या कार्याचें स्वरूप यांतच भेद आढळून येतो. एक मनुष्य एकटा जें काम करील त्याहून दोन माणसें एकत्र काम करीत असतां ज्यास्त काम होतें असा सर्वसाधारण अनुभव आहे. एखादा मनुष्य कितीही स्वच्छ असला तरी त्याला त्याच्या अमंगळ शेजाऱ्यांच्या अस्वच्छ राहणीने बाधा झाल्याशिवाय राहणार नाही. अर्थात् आपल्या शेजाऱ्याला आपल्यापासून निष्कारण उपद्रव पोचणार नाही अशा रीतीने वागण्याची समाजांतील व्यक्तींवर जबाबदारी येऊन पडलीच पाहिजे. परंतु ही जबाबदारी समाजनिरपेक्ष व्यक्तीवर पडण्याचें वस्तुतः कांहीच प्रयोजन नाही. म्हणून समाजांतील व्यक्ति व समाजाबाहेरील व्यक्ति यांत महदंतर पडतें. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला सामाजिक व्यक्तींचाच विचार करावा लागतो. ज्या समाजांतील व्यक्तींना सामाजिक निर्बंध पाळण्याची सवय लागलेली असते तो समाज सुसंस्कृत मानला जातो. याचा अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीला समाजांत कांहीना कांहीतरी स्थान असतें. म्हणजे प्रत्येक व्यक्तीकडून समाज कांहीतरी कार्याची अपेक्षा करीत असतो. अर्थात् सर्व समाजाचा समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर सारखाच हक्क असतो.

सामाजिक व्यक्ति म्हणून प्रत्येकावर जी जबाबदारी आहे ती योग्य रीतीने पार पाडतां यावी असें मानलें तर समाजांतील सर्व व्यक्ति एकाच आचाराच्या, विचाराच्या व ध्येयाच्या असणें अवश्य आहे. निरनिराळ्या धर्मांचे, तसेंच निरनिराळ्या भाषा बोलणारे अशा लोकांचा समाज बनणें अर्थातच शक्य नाही. निराळी भाषा बोलणाऱ्या व्यक्तींची समाजोपयुक्तता कमी होते आणि निराळ्या धर्मांच्या व भावनांच्या लोकांमुळे तर समाजाचें हित वृद्धिंगत होण्याचेऐवजी सामाजिक कल्याणाला विघातक क्रिया मात्र उत्पन्न होते. म्हणून देशामध्ये अनेक धर्म व अनेक भाषा असणें हें जरी कांही अंशीं अपरिहार्य असलें तरी अनिष्ट आहे ह्यांत संशय नाही. अशी कल्पना करूं की, हजार माणसांचा एक समाज आहे; त्यांत आठशें माणसांची एक भाषा व दोनशें माणसांची एक भाषा असून हीं दोनशें माणसें आठशें माणसांची भाषा शिकण्यास तयार नाहीत. याचा परिणाम त्यांच्या उपयुक्ततेंत कमीपणा आल्यामुळे एकंदर समाजाची प्रगति स्तंभित होण्यांत होणार हें उघड आहे. त्याचप्रमाणे ह्या दोनशें माणसांचा धर्म व इतिहास ह्यांतहि निराळेपणा झाल्यास हीं दोनशें माणसें आठशें माणसांच्या सांस्कृतिक प्रगतीला अडथळा उत्पन्न केल्याशिवाय राहणार नाहीत.

समाजशास्त्र व्यक्तींची चिकित्सा न करतां व्यक्तीव्यक्तींमधील संबंध कसा आहे आणि तो कसा असला पाहिजे याची चिकित्सा करितें; परंतु हा संबंध कसा असला पाहिजे याविषयी समाजशास्त्रवेत्त्यांत मतभेद होतो. तथापि या मतभेदांकडे न वळतां समाजांतील व्यक्ति समाजोपयोगित्व-गुणान्वित असली पाहिजे हा जर आपल्या विचारसरणीचा निर्विवाद पाया ठरेल तर मतभेदांचें क्षेत्र संकुचित करितां येण्यासारखें आहे. समाजामध्ये प्रत्येक माणसाला कांही विशिष्ट स्थान आहे व त्या स्थानावर अधिष्ठित होऊन त्याने आपलें नियुक्त कार्य पार पाडलें पाहिजे असें मानलें म्हणजे निर-

निराळ्या व्यक्तींमध्ये निरनिराळे गुण असणें अगत्याचें आहे असा सिद्धांत प्रतिपादणें ओघानेंच प्राप्त होतें. कारण समाजाच्या गरजा अनेकविध असून समाजाची प्रगति एकाच तऱ्हेची नसते. ह्या-करिता एकाच गुणाची सर्व माणसें समाजांत असतील तर त्या समाजाची प्रगति होणें जवळ जवळ अशक्यच होय. समाजांतील अवाढव्य प्रगति निरनिराळ्या व्यक्तींनी आपल्या अंगच्या निरनि-राळ्या गुणांचा उपयोग करून घडवून आणावी लागते. म्हणून श्रमविभागाचें तत्त्व प्रत्येक समाजांत स्वभावतःच दृष्टोत्पत्तीस येतें. तेव्हा समाजाची कोणतीहि चळवळ ह्या तत्त्वाला विरोधी असेल तर अनिष्ट म्हणून बंद पाडणें हें समाजाचें कर्तव्यच होय. ह्याकरिता शिक्षणाचा प्रश्न समाजशास्त्राच्या दृष्टीने सोडवावा लागतो. प्रत्येक व्यक्तीला एकाच तऱ्हेचें शिक्षण देणें हें मूर्खपणाचें आहे हें वरील विवेचनावरून उघड दिसून येईल. ज्या व्यक्तीमध्ये जो गुण असेल तो गुण विकास पावण्याला व फलद्रूप होण्याला अनुकूल संधि त्या व्यक्तीला विशेष श्रमाविना प्राप्त होईल अशी योजना प्रत्येक राष्ट्राने करणें अवश्य आहे. नाही तर भलत्याच माणसाला भलतेंच शिक्षण दिल्याने त्याला निरुपयोगी करून राष्ट्रविघातकपणा करून घेण्याचें पाप समाजाला जडेल.

ह्या सृष्टीमध्ये एकच मनुष्य परमेश्वराने निर्माण केला असता तर संस्कृतीचा प्रश्नच उत्पन्न झाला नसता ही गोष्ट कोणालाहि पटण्या-सारखी आहे. पण जंगलांतील वृक्षांप्रमाणे जगभर असंख्य माणसें स्वतंत्रपणाने विखरलेलीं आहेत असें धरून चाललें तरी सुद्धा अशा माणसांत कोणत्याहि प्रकारची संस्कृति उद्भूत होणार नाही हें खास. म्हणून व्यक्तीव्यक्तींमधील अव्यक्त संबंधांतच संस्कृतीचा उगम होतो असें निश्चितपणें म्हणतां येतें. करिता कोणत्याहि समाजाला उच्च संस्कृतीचा लाभ मिळवावयाचा असेल तर त्या समा-जामध्ये दार्ढ्य आणि स्निग्धता हीं मोठ्या प्रमाणांत दृग्गोचर झालीं

पाहिजेत. समाज विस्कळित असेल म्हणजे एकजीव नसेल तर तो समाज संस्कृतीच्या मार्गावरहि लागला नाही असें म्हणण्यास हरकत नाही. अर्थात् समाजांतील व्यक्तींमध्यें सलोखा आणि एकवाक्यता थोड्याशा अंशाने तरी असल्याशिवाय समाजाची घटनाच सिद्ध होत नाही. पण सर्व समाज प्रत्येक बाबतींत एकमताचाच जर असेल तर तीहि गोष्ट समाजाच्या प्रगतीला आड येते हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. एखाद्या समाजांतील खडान्खडा व्यक्ति आचार, विचार, भावना, ध्येय, महत्त्वाकांक्षा इत्यादि गोष्टींत अगदी समसमान असतील तर त्या समाजाची प्रगति थबकून तो समाज अपकर्षाच्या घसरंडीला लागला असेंच समजलें पाहिजे. म्हणून चमत्कार हा कीं, प्रगमनशील समाजांतील व्यक्तींचें परस्परविरुद्ध असें दुटप्पी वर्तन असतें. आत्मवर्चस्वाची धडपड प्रत्येक मनुष्य करीत असतो आणि अशा प्रकारची धडपड ही समाजाच्या कल्याणाला पोषकहि होते; कारण समाज व्यक्तींचाच बनलेला असल्यामुळे व्यक्तींच्या गुणोत्कर्षाची पराकाष्ठा समाजाला मारक होणार नाही इतक्या प्रमाणांत असली म्हणजे ती समाजहिताला पोषकच होणारी आहे. स्तब्धतेंत प्रगतीचें बीज नष्ट झालेलें असतें हें सर्वांसच कबूल आहे. आणि विरोधी तत्त्वांचा संयोग झाल्याशिवाय ही स्तब्धता घालवावयाला दुसरा उपाय नसतो. समाजांत जन्मास येणारी सर्व माणसें त्यांच्या पूर्वजांचेच आचार विचार तंतोतंत पाळतील तर विचाराची गतिच खुंटल्यासारखी होते. तेव्हा समाजांतील कांही माणसें तरी स्वतंत्र विचारांचीं असावयास पाहिजेत हें उघड आहे. आणि प्रचलित विचारांपासून भिन्नत्व असल्याशिवाय विचाराची स्वतंत्रता असूं शकणार नाही. तात्पर्य, पूर्वपिढीच्या विचारांचा वारसा घेऊन पुन्हा प्रत्येक पिढीने स्वार्जित विचारांचें भांडवल कमावलेंच पाहिजे. अशा रीतीने जुन्या नव्याचा समतोलपणा ज्या समाजाला बाळगतां येतो तोच समाज बेफाम न होतां शिस्तीच्या

कैचींत असतो व आवश्यक बंधनांच्या पलीकडे कधींहि जात नाहीं. खेड्यांतील लोकांपेक्षा शहरांतील माणसें अधिक हुशार असतात याचें कारण रूढ कल्पनांव्यतिरिक्त अन्य कल्पना त्यांच्यापुढे उभ्या राहातात व त्यांमुळे त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते चीन व जपान या दोन देशांचा व्यापाराच्या निमित्ताने भिन्न आचार-विचारांच्या राष्ट्रांशीं संबंध आल्याबरोबर त्या देशांत जागृति उत्पन्न झाली हें आपण पाहातोंच. सारांश, दोन निरनिराळ्या संस्कृतींचा संघर्ष झाला म्हणजेच विचारांना चालना मिळून बिकट सामाजिक प्रश्न उत्पन्न होतात.

सामाजिक मनुष्याची वागणूक ही सामान्य माणसाला आकलन करतां येण्यासारखी नसते. समाजार्जित संस्कारांचें गाठोडें अशा माणसाला सोडतां येत नाहीच, पण शिवाय आर्थिक परिस्थिति व आत्मोत्कर्षाची हाव यांनी प्रेरित झाल्यामुळे ती विलक्षण भासते. समाजाची शिस्त न पाळतां आणि सामाजिक आचारविचारांचा वारसा अजिबात झिडकारून जर समाजांतील कांहीं व्यक्ति आपल्या अपूर्वताविशिष्ट कल्पना समाजावर लादूं लागतील तर त्या व्यक्ति बंडखोर ठरतील हें उघड आहे. कारण समाजबाह्य माणसानें आपल्या विचारांचा दुसऱ्या समाजांत धुडगूस घालण्यासारखेंच तें होतें. म्हणून समाजाची सुधारणा करूं पाहाणारा मनुष्य किती प्रमाणांत समाजाची शिस्त पाळतो हें पाहावेंच लागतें. मनुष्याच्या विचारांवर नेहमी कोणतें ना कोणतें तरी दडपण असतेंच. धर्माचा किंवा रूढींचा अंमल नाहीसा झाला तरी लोकमताचा अंमल कोणालाच दूर करतां येत नाही. समाजांतील रूढ कल्पना अगदीच उपेक्षणीय असतात असें मात्र यामुळे कोणी समजूं नये. समाजांतील अत्यंत विवेकहीन माणसाचे जे आचार व जे समज असतील त्यांवरून त्या समाजाची सांस्कृतिक प्रगति कोठपर्यंत झाली आहे हें अचूक रीतीने तोडतां येतें; पण जेथपर्यंत

मजल मारली आहे तेथपर्यंत न थांबतां समाजाने आणखी पुढ मजल मारावी म्हणून समाजांत विचारांना शिथिलता येणार नाही अशाकरितां समाजाने जपलें पाहिजे. याला उत्तम उपाय म्हटला म्हणजे समाजांत रूढ असलेल्या आचारविचारांचें मर्म तरुणांना समजावून पुढे विचार करण्यास त्यांची बुद्धि पात्र होईल असें शिक्षण दिलें पाहिजे. सुधारणेच्या सर्व पायऱ्या ओलांडल्याशिवाय समाजाला गत्यंतर नाही. समाजांतील रूढ नैतिक कल्पनांहून फारच पलीकडे असलेले असे नैतिक विचार आपण आपल्या कुटुंबांत आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तर तो गढूळ कल्पनांच्या सामाजिक परिस्थितीमुळे फोल होतो असा पुष्कळांचा अनुभव आहे. म्हणून समाज आणि समाजांतील व्यक्ति यांच्या आचारविचारांत एकरूपता व भिन्नत्व हीं एकसमयावच्छेदेंकरूनच असावीं लागतात. एका पिढीच्या महत्त्वाकांक्षा दुसऱ्या पिढीने जर सफल केल्या नाहीत तर त्या समाजांत विस्कळितपणा उत्पन्न झाला आहे असें अनुमान करण्यास जागा राहते.

समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींमधला परस्परसंबंध कसा असावा ह्याची यथार्थ कल्पना नसल्यामुळे कायद्याचीं तत्त्वें आजपर्यंत सारखीं बदलत गेलीं आहेत असा अनुभव येईल. हे संबंध धर्माज्ञेवर प्रथमतः उभारलेले होते, पण मागून रूढीवर ते अवलंबून ठेवण्यांत येऊं लागले. ह्याच्यानंतर सर्व व्यवहार व्यक्तींमधील करारांमुळेच उत्पन्न होतात असें मानण्यांत येऊं लागलें. प्रत्यक्ष करार नसला तर गर्भित करार तरी मानावा असा कायद्याचा कटाक्ष असे. एवढेंच नव्हे, तर सर्व समाजघटना व राज्यव्यवस्था यांच्या मुळाशीं करारच आहे अशींहि मतें सर्वमान्य झालीं होतीं. कालांतराने हीं मतें थोडीं मागे पडून कोणत्याहि विद्यमान घटनेचें पूर्वकालापासून कोणतें स्वरूप आहे हें पाहाण्याची ऐतिहासिक दृष्टि उत्पन्न झाली. कराराच्या काळांत संशोधनाला जागाच नव्हती;

पण ह्या ऐतिहासिक पंथामुळे मागें जाऊन संशोधन करणें भाग पडलें. कराराच्या युगांत समाजनिरपेक्ष जी व्यक्ति तिचेंच महत्त्व वाढलें आणि त्या मानाने समाजाचा विचार मागें पडला. हल्लीचा कल व्यक्ति सामाजिक म्हणून त्या व्यक्तीला अवश्य तें संरक्षण देण्याकडे आहे. माझी सर्व जिनगी तुझ्या पैशाला जबाबदार आहे असा जरी करार केलेला असला तरीसुद्धा माझ्या अंगावरचे कपडे, सैंपाकाचीं भांडीं आणि माझ्या धंद्याचीं हत्यारें यांचा सावकाराच्या पकडींतून सरकारने कायदा करून बचाव केला आहे. तसेंच समाजांतील सर्व वर्ग सारख्याच दर्जाचे आहेत असा घोष चालू असतांहि कामकऱ्यांच्या वतीने विशेष सवलतीचे कायदे मालकाला जाचक होत असतांहि करण्यास सरकार कचरत नाहीं. तात्पर्य, समाजांतील प्रत्येक व्यक्तीची समाजाला उपयुक्तता असल्यामुळे त्या व्यक्तीचें अवश्य तेवढें संरक्षण करून तिचा समूळ नाश होणार नाही याबद्दल विद्यमान समाज दक्षता बाळगतो.

समाज कुजून मरणाच्या पंथाला लागूं नये म्हणून समाजाची विवेकशक्ति जागृत राहणें अवश्य आहे. विवेकशक्ति नष्ट झाली म्हणजे समाज अधोगतीला जातो; परंतु ह्या विवेकशक्तीला टिकविण्याकरिता समाजांतील प्रत्येक व्यक्तीला पुरेसें अन्न, भरपूर वस्त्र व निवाऱ्याची जागा इतकें मिळणें अवश्य आहे. कारण मनुष्याला पुरेसें अन्नवस्त्र नसल्यास त्याच्या बुद्धीचा सर्व उपयोग पुरेसें अन्नवस्त्र मिळवून कसेंबसें करून आपण जिवंत रहावें ह्या कामींच करावा लागतो. म्हणून समाजांतील प्रत्येक व्यक्तीला अन्नवस्त्राची उणीव भासणार नाही अशा धोरणाने सर्व सामाजिक हालचाली कराव्या लागतात. विवेकशक्तीचा विचार करतांना हें लक्षांत ठेविलें पाहिजे की, त्या शक्तींत स्वतःचाच जीव असला पाहिजे. बाहेरचा प्राणवायु घालून टिकविलेली विचारशक्ति समाजाला फारशी उपयोगीं होणार नाही. शिथिल झालेल्या एका समाजाचा संयोग

दुसऱ्या तरतरीत समाजाशीं झाला म्हणजे त्या समाजाच्या कल्पना पहिला समाज उचलून त्या कल्पना म्हणजे आपल्याच विवेक-शक्तीचें फळ आहे असा भ्रम करून घेतो. पण अशामुळे या शैथिल्य पावलेल्या समाजाची प्रगति होईल असें नाही. दुसऱ्या समाजांतील नवीन वाटणाऱ्या कल्पनांमुळे पहिल्या समाजांतील व्यक्तींच्या विचारशक्तींत खळबळ उडणें हें निराळें आणि अशी खळबळ न उडतां दुसऱ्या समाजाच्या कल्पना आपल्याच म्हणून पत्करणें हें निराळें. स्वतःची विचारशक्ति स्फुरण न पावतां आपण दुसऱ्याचे आचार जेव्हां पतकरतों, तेव्हा त्याला अनुकरण हाच शब्द लावणें योग्य होईल. विचारशक्ति हें समाजाच्या जिवंतपणाचें निःसंशय द्योतक आहे. वैयक्तिक विचारशक्ति सारखी असणें अशक्यच असल्यामुळे समाजांत मतभेद माजून राहतात; पण ही गोष्ट अपरिहार्यच आहे. कांहीं जंगली जातींच्या लोकांत कोणत्याहि माणसांत आचारविचारांत फरक दिसून येत नाही. सगळ्यांची वागणूक व विचार एकसारखेच असतात. ह्याचें कारण त्यांच्यांतील विवेकशक्ति जागृतावस्थेंत नसते हेंच होय. म्हणून मतभेद हें विवेकशक्तीच्या जिवंतपणाचें लक्षण मानण्यांत येतें; पण या वैयक्तिक मतभेदाच्या जंजालांत सुद्धा सामुदायिक विचारैक्य असतें ही गोष्ट विसरतां कामा नये.

व्यक्तीव्यक्तींमधील संबंधांत समाजशास्त्र उगम पावतें असें का एकदा मनाला पटलें म्हणजे मनुष्याच्या सर्व हालचालींचा समावेश समाजशास्त्रांत करणें ओघानेच प्राप्त होतें. उदाहरणार्थ, इतिहास, तत्त्वज्ञान, कायदा, मानसशास्त्र हीं समाजशास्त्राचींच निरनिराळीं अंगें होत. समाजामध्ये कसकसे फेरबदल होत गेले याच गोष्टीला इतिहासानें प्रामुख्य दिलें पाहिजे. कारण समाज म्हणजे व्यक्ति नव्हे. म्हणून कोणता राजा कधी जन्मास आला, कधी मेला, त्याने किती लढाया केल्या, व त्यांपैकी कितींत त्याला विजय संपादन

करतां आला या गोष्टींना इतिहासांत कोणीच महत्त्व देणार नाही. इतिहास म्हणजे समाजाच्या प्रगतीचा अगर अपगतीचाच इतिहास होय. समाजशास्त्र समाजाच्या प्रगतीचा व अपगतीचा इतिहास सांगतें; पण इतिहासांत त्याच गोष्टी काल-स्थल-भेदपूर्वक निर्दिष्ट केल्या जातात. खरोखर इतिहासाला स्वतःचा असा विषयच नसतो. इतिहास म्हटला म्हणजे तो कशाचा तरी इतिहास असावा लागतो. सर्व समाजाचीं स्थित्यंतरें बहुधा सारखींच असतात. यामुळे मनुष्य-जातीच्या इतिहासांत जरी तो इतिहास निरनिराळ्या समाजांचाच आपल्यापुढे असला तरी एकप्रकारचें सादृश्य दृग्गोचर होतें. समाजाचें तत्त्वज्ञान काय आहे याची चौकशी करतांना कोणते समज समाजानें श्रद्धापूर्वक पोसले आहेत व त्या समजांचा व्यक्तींच्या आचरणावर कसा परिणाम झाला आहे याची चिकित्सा करावी लागते. पुनर्जन्म मानणाऱ्या समाजाचें आचरण पुनर्जन्म न मानणाऱ्या समाजाहून निराळें असणें स्वाभाविक आहे. जी गोष्ट तत्त्वज्ञानाची तीच राजकारणाची. राजनीतिशास्त्र म्हणजे कांही वेगळी विद्या आहे असें नाही. समाजांतील प्रत्येक व्यक्तीची उपयुक्तता वाढविणारा मुत्सद्दीच लोकांच्या प्रशंसेस पात्र होईल. मनुष्याची उपयुक्तता नैतिक व बौद्धिक प्रकर्षानेच वाढणारी असल्यामुळे त्याच्या नैतिक आचरणाला वळण लावणें हेंहि मुत्सद्याचें काम आहे. म्हणून दारू पिण्याच्या मार्गांत अडथळे उत्पन्न करणारे कायदे करणें दोषास्पद ठरत नाही.

समाजशास्त्राचा उदय होण्यापूर्वी व्यक्तिस्वातंत्र्याला मान देऊन व्यक्तींच्या व्यवहारांची युक्तायुक्तता निश्चित केली जाई. आता व्यक्तीच्या हिताकडे सर्व व्यवहारांचें तोंड फिरतें. कारण एखाद्या व्यवहाराने व्यक्तीचें अनहित होत असेल तर त्यामुळे त्याच्या उपयुक्ततेंत कमीपणा येतो. सामाजिक व्यक्तीची कार्यक्षमता अथवा उपयुक्तता हीच सर्व व्यवहारांची कसोटी होय. फार काय पण

प्रत्यक्ष धर्मांचा सुद्धा उगम व्यक्तीच्या समाजोपयोगित्वापासूनच होतो. ईश्वरोपासनेंत काळ घालविणारा खरा धार्मिक नाही. अशा उपासनेने फक्त चित्तशुद्धि होते असे शंकराचार्य म्हणतात त्याचें कारण हेंच. समाजोपयोगित्व वाढविण्यांतच धर्म आहे. मनुष्याच्या देहाप्रमाणे समाजाचें स्वरूप आहे. एकंदर मनुष्याचें बल वाढविणें अगर मनुष्याला उपयोगी पडणें हें जसें प्रत्येक अवयवाचें कार्य तसेंच समाजांतील प्रत्येक व्यक्तीचें आहे. म्हणून समाजांतील व्यक्तींचा वरिष्ठकनिष्ठपणा त्या त्या व्यक्तीच्या उपयुक्ततेवर अवलंबून आहे, हें उघड आहे. घटनेंत वरिष्ठकनिष्ठभाव नाही. सर्व इंद्रियांत मन किंवा बुद्धि ज्याप्रमाणे श्रेष्ठ समजतात त्याचप्रमाणे समाजांत बुद्धीचें काम करणारीं माणसें श्रेष्ठ ठरतात. राष्ट्राची श्रेष्ठता त्याच्याकडून जें बौद्धिक कार्य होईल त्याच्यावर निश्चित करावयाची असते. तेव्हा प्रत्येक माणसाने आपल्या बुद्धीचा उपयोग राष्ट्रकार्याकडे करणें हें त्याचें कर्तव्य आहे. कारण राष्ट्राच्या उत्कर्षांतच त्याचा उत्कर्ष साधला जातो.

ग्रंथ संग्रह
सं.
ता.

# मराठी भाषेवरील सावट[1]

'वाग्वा इदं सर्वं भूतं गायति च त्रायते च।'

आपल्या ह्या संस्थेच्या चालकांनी मला आजच्या समारंभाचें आमंत्रण दिलें ह्याबद्दल मी आपल्या सर्वांचा अत्यंत आभारी आहें. आज अध्यक्ष होण्याची पाळी मजवर आली ह्यामुळे आपल्या ह्या महाराष्ट्रांत विद्वानांचा दुष्काळ पडला कीं काय अशी भीति आपल्या मनांत उद्भवली असली पाहिजे. दुष्काळाची आपणांस नेहमीच संवय आहे. तथापि सुदैवाने विद्वद्दुर्भिक्ष अद्यापि आपणांस शिवलें नाही. महाराष्ट्रांतील विद्वान् रत्नें एकामागून एक कालमुखीं पडत आहेत ही गोष्ट खरी. कादंबरीकार **हरिभाऊ** गमावले, इतिहासकार **हरिभाऊ**हि गेले, तोंच यंदा कविवर्य रा. रा. **गणेश जनार्दन आगाशे** हेहि आपणांस सोडून आपलें काव्य यमचरणीं अर्पण करण्यास निघून गेले! गणपतराव आगाशे यांस कविता म्हणजे हातचा मळ होता. त्यांचीं पुष्कळ विलापकाव्यें प्रसिद्ध आहेत. सन १९०३ सालीं ह्याच जागेवरून अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनी आपला विद्वत्ताप्रचुर निबंध वाचलेला आपणांस अद्यापि स्मरत असेल. आगाशे ह्यांची जागा लवकर भरून येणें कठीण आहे. आणखीहि पुष्कळसे महाराष्ट्रवाङ्मयसेवक या एकदोन वर्षांत कालवश झाले, त्यांची नाममालिका गेल्या मार्च महिन्यांत भरलेल्या आपल्या १९ व्या संमेलनाचे अध्यक्ष रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांनी सवर्णन दिलेली आपणांस स्मरत असेलच.

---

[1] [ता. १४ दिसेंबर १९११ रोजीं मुंबई ग्रंथसंग्रहालयाच्या २० व्या संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने केलेले भाषण.]

ह्याप्रमाणे कालगतीने आमच्यांतील विद्वान् माणसें जरी नाहीशीं झालीं, तरी महाराष्ट्रांत कोणी विद्वान् राहिले नाहीत अशी भीति बाळगण्याचें कारण नाही. तर मग माझ्यासारख्यावर अध्यक्ष होण्याची पाळी कां बरें यावी? त्याचें कारण असें आहे की, आता आमची मॅनेजिंग कमिटी नवें धाडस करण्यास प्रवृत्त झाली आहे. आजपर्यंत गुणिजनांना बोलावून त्यांच्या गुणांचें चीज करावें, विद्वानांची विद्वत्ता उजेडांत आणावी, हेंच आपलें कर्तव्य, अशी ह्या कार्यकारी मंडळीची समजूत होती. परंतु इतःपर नुसत्या गुणपरीक्षक ह्या पदवीने त्यांचें समाधान होण्यासारखें नाही. गुणोत्पादक ह्या दैवी पदवीची हाव त्यांनी धरली आहे. निर्गुणाला सगुण करणें ही वासना आता त्यांच्या ठिकाणीं जागृत झाली आहे. अर्थातच ह्या नवीन साहसाचा प्रयोग माझ्यासारख्यावर प्रथम होणें स्वाभाविक आहे. प्रसंग आला असतां निर्बुद्धांना सुबुद्ध होण्याची संधि मिळते, हा सर्वत्र अनुभव आहे. गुणांचा अभाव असतांहि अगुणी अगुणी म्हणून ओरड करीत राहण्यापेक्षा, नसलेल्या गुणाचा आरोप उलट जर आपण करीत गेलों तर तेथे गुणाचा प्रादुर्भाव होतो. अशाच रीतीने समाजांतील दूरदर्शी व शहाणे लोक वागत असतात. अर्धवट माणसांच्या संबंधाने तरी हा प्रयोग यशस्वी झाल्यावांचून राहात नाही. देशाभिमानशून्य माणसाची आपण देशाभिमानी म्हणून प्रसंशा करीत गेलों तर लोक आपणांस देशाभिमानी म्हणून समजतात, एवढ्याकरताच आपण थोडा तरी देशाभिमान बाळगणें अवश्य आहे, असें त्यास वाटूं लागतें. पैहि खर्च न करणाऱ्या इसमाकडे आपण वर्गणी मागण्याकरिता गेलों तर, तुम्ही मोठे दाते आहां, आपल्यासारख्यांच्या दातृत्वावरच आमच्या संस्था चालणें शक्य आहे, इत्यादि तऱ्हेने स्तुतिपाठ गाऊनच कृपणाच्या ठिकाणीं आपण दातृत्वाचा अंकुर निर्माण करतों. तात्पर्य, निर्गुणांना सगुण बनविण्याचे असे मार्ग असतात. तेव्हा ह्या संस्थेच्या चालकांची

अशी ही अत्यन्त प्रशंसनीय महत्त्वाकांक्षा सफल व्हावी म्हणून मला त्यांचें आमंत्रण मान्य करणें प्राप्त झालें. कारण, अध्यक्षासाठी ते इतरत्र जाते तर त्यांचा वारंवार निरुत्साह झाला असता. त्यांना उत्तर मिळतें, महाराज ! आपला उपक्रम स्तुत्य आहे, पण आमचा उपयोग आपणांस व्हावयाचा नाही; आपण पुढे जावें, कारण आम्ही निर्गुण नाही.

असो. निर्गुणाला सगुण करणें, दुर्बलाला सबल करणें, निर्जीवाला सजीव करणें, हा एकच उद्देश कोणत्याहि अवनत देशांत निघणाऱ्या संस्थांचा असला पाहिजे. अर्थातच ‘ मराठी ग्रंथसंग्रहालया’चा उद्देशहि मराठी भाषेची उन्नति व्हावी, मराठी भाषेची वाढ व्हावी हाच असणार. आता कांही ठिकाणीं हा उद्देश व्यक्त असेल तर कांही ठिकाणीं अव्यक्त असेल. पण कार्य एकच. नाही तर कुटिल टीकाकारांच्या आरोपास आपण पात्र होऊं. ते म्हणतील, अहो ? मराठींत नांव घेण्यासारखे ग्रन्थच नाहीत, मग ‘ ग्रंथसंग्रहालय ’ हें अनुपपन्न नांव कशाला ! त्याला चोपडी—संग्रहालय कां म्हणत नाही ?

**विद्याधरो यथा मूर्खो जन्मान्धश्च दिवाकरः ।**
**लक्ष्मीधरो दरिद्रश्च नाम तेषां निरर्थकम् ॥**

असाच हा प्रकार म्हणावयाचा. पण महाराज ! आमचीं ग्रंथसंहालयें केवळ अजबखाने नव्हत. मराठी वाङ्मयाच्या परिपोषार्थ ज्या अनेक साधनांचा अवलंब केला जातो त्यांपैकी संग्रहालय हें प्रमुख साधन आहे; व हाच फरक मराठी ग्रंथसंग्रहालयें व इंग्रजी लायब्ऱ्या ह्यांत आहे. आपणांस इंग्रेजी पुस्तकें वाचावयास पाहिजेत ह्या एकाच हेतूने आपण लायब्ऱ्या स्थापन करतों. इंग्रेजी ग्रंथांना उत्तेजन देण्याची अंधुक कल्पनाहि आपल्या मनांत नसते. पण मराठी ग्रंथसंग्रहालयें ह्या दुहेरी हेतूने आपण स्थापन करतों हें अगदी उघड आहे. म्हणून मराठीवाङ्मयोत्तेजक या दृष्टीने ग्रंथसंग्रहालयांचा उप-

योग फार मोठा आहे. तथापि हा एकच उपाय आहे असें कोणी म्हणत नाही. मराठी भाषेचा ज्या मानाने प्रसार होईल त्या मानाने वाङ्मयाची वाढ होणार. कोणत्याहि भाषेचें वाङ्मय एकदम निर्माण करतां येत नाही, वृक्षाप्रमाणे त्याची वाढ होत असते, हें मेकॉलेचें म्हणणें कबूल आहे. " To hire 4–5 people to make a literature is a course which never has answered and never will answer in any part of the world. Languages grow. They cannot be built. We are attempting to raise a large class of enlightened natives. Among them some will be found who will have the inclination and the ability to exhibit European knowledge in their vernacular dialects. This I believe is the only way by which we can raise up vernacular literature in the country. भाडोत्री इसमांकडून ग्रंथ तयार करवून वाङ्मय बनविण्याचे प्रयत्न निष्फळ होतात. **बडोद्याच्या महाराजां**नी अशा प्रकारचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला असें म्हणतां येत नाही. दहा-मजली इमारत आपणांस बांधावयाची असेल, तर गवंडी बोलावून, मालमसाला जमवून, नियमित कालांत इमारत उभारतां येते; परंतु वाङ्मय असें कसें तयार करतां येईल ? प्रथम बीजारोपण होतें, नंतर अंकुर उद्भवतो, त्याचा पुढे वृक्ष बनतो. वाङ्मयाची वाढ अशीच व्हावी लागते. मेकॉलेचें हें म्हणणें खरें आहे; गेल्या १।२ पिढ्यांवर मेकॉलेच्या ह्या विधानाचा विलक्षण परिणाम झाला आहे. तथापि ह्याला दुसरी बाजू आहे, ही गोष्ट पुष्कळांच्या लक्षांत येत नाही. नुसतें बीं पेरून मोठा वृक्ष होत नाही. त्याला चांगली माती घालावी लागते, पाणी द्यावें लागतें, हवा व प्रकाश ह्यांची अवश्यकता असते, तेव्हा कुठे मोठा वृक्ष तयार होतो. पण तुम्हीं लावलेल्या रोपाला जर पाणी मिळणार नाही अशी व्यवस्था केलीत, चांगली माती आणून घातली नाही, हवा उजेड न मिळावा म्हणून वर सावट निर्माण केलें, तर

त्या रोपाची वाढ कशी व्हावी? तो लवकरच खुरटून मरण्याच्या पंथाला लागल्यावांचून राहणार नाही. निदान त्याचा जोमदार वृक्ष बनण्यास कल्पनातीत काल लागेल ह्यांत संदेह नाही. ह्या दृष्टीने मराठी भाषेची सांप्रत स्थिति कशी आहे ह्याचा आपण आता विचार करूं.

सध्या सरकारी दप्तर—म्हणजे सेक्रेटरिएटमधील रेकार्ड—इंग्रेजी भाषेंत असतें; कायदेकौन्सिलमध्ये भाषणें इंग्रेजींत होतात; हायकोर्टाचें काम इंग्रेजींत चालतें; विश्वविद्यालयांतलीं कामें व परीक्षा इंग्रेजींत; शिक्षण इंग्रेजीच्या द्वारें; आणि इंग्रेजी शिकलेल्यांचा व्यवहारहि इंग्रेजींत! हे लोक आपला खासगी पत्रव्यवहारसुद्धा इंग्रेजींत करतात; रस्त्यांचीं, कंपन्यांचीं, संस्थांचीं नांवें इंग्रेजींत; डॉक्टरवकिलांच्या पाट्या इंग्रेजींत; जणूं काय यांच्याकडे इंग्लिश लोक वकील-पत्र देण्यास येत असतात! लोकांत ज्ञानप्रसार करण्याकरता म्हणून जीं व्याख्याने होतात तींहि इंग्रेजींत! राष्ट्रीय सभेंत व प्रांतिक सभेंतसुद्धा भाषणें इंग्रेजींत! ह्यावरून, आपल्या घरांत इंग्रेजी भाषा किती घुसली आहे ह्याची कल्पना करतां येईल. ज्या मानाने इंग्रेजी भाषेचा व्याप, त्या मानाने अर्थात् देशी भाषांची पिछेहाट. परंतु ह्यांपैकी बऱ्याच गोष्टी अपरिहार्य आहेत ह्यांत कांही संशय नाही. जित व जेते ह्यांची भाषा निरनिराळी असली म्हणजे जेत्यांची भाषा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीने जितांवर लादली जाते. आजपर्यंत जगाचा अनुभव असाच आहे व तो इतिहासही मनोरंजक आणि बोधप्रद आहे.

हल्ली इंग्लंडचें साम्राज्य आहे तसें पूर्वी रोमन लोकांचें साम्राज्य होतें. खुद्द इंग्लंडदेश रोमनांच्या ताब्यांत होता हें आपणांस माहीतच आहे. रोमन लोकांनी इतर जिंकलेल्या देशांत लॅटिन भाषा सुरू केली, त्याप्रमाणे इंग्लंडांतहि त्यांनी आपल्या भाषेचा अंमल बसविला. "The Natives clustered around the castra (camp)

where justice was administered in the grand language which Cicero had ennobled in pleading the cause of dethroned kings and oppressed populations. We learn that many British chieftains at this time became masters of the Latin tongue and affected Roman manners and tastes."

नंतर युरोपखंडांत अरबी लोकांनी तरवार गाजविली हें सर्वविश्रुतच आहे. त्या वेळीं अरबांनी स्पेन देशांत अरेबिक भाषा सुरू केली. खुद्द इंग्लंडाने आयर्लंडमध्ये आयरिश लोकांना इंग्लिश भाषा शिकण्यास भाग पाडलें. (That the free-holders should cause their children to learn to speak English.) कोरिआ देश चीनच्या ताब्यांत असतां चिनी भाषेंत, चिनी वाङ्मयांत कोरिअन लोकांना परीक्षा द्यावी लागे व पास झालेल्यांसच सरकारी जागा मिळत. अशी स्थिति सन १८९४ पर्यंत होती. ह्या परीक्षा बंद झाल्यावर अर्थात् चिनी वाङ्मयविषयक जिज्ञासा नष्ट झाली. जपान जागृत होण्यापूर्वी चिनी भाषेचा अंमल जपानी लोकांवर चांगलाच बसला होता. जागृतीनंतरहि जपानला आपल्यावरील चिनी भाषेचें दडपण झुगारून देतां येईना:—' There has not yet been any real escape from the trammels of a tradition which assigned the crown of scholarship to whatever author drew upon the resources of the Chinese tongue.' फिलिपाईन बेटें अमेरिकेच्या ताब्यांत आहेत. स. १९०२ च्या रूझवेल्ट-बिलानें इंग्रेजी अगर स्पॅनिश ज्यांस बोलतां येत असेल, अशा जमीनदारांसच 'लोअर-हाऊस'चें मेंबर होतां येत असे. अर्थात् राज्यकारभार परकी भाषेंत चालावयाचा. महाराज, परकी भाषेचे अनिष्ट परिणाम फक्त देशी भाषेवरच घडतात हें मानणें चुकीचें आहे. तिची व्यापकता फार मोठी आहे. पोलिश लोक आमच्यापेक्षा शहाणे. परकी भाषेचें घातक स्वरूप त्यांस पूर्णपणें ज्ञात होतें. रशियाच्या ताब्यांत

पोलंड देश गेल्यावर इ. स. १८१५ मध्ये अलेक्झांडर बादशहा-कडून १६५ कलमांची सनद पोलिश लोकांनी मिळविली. नवीन राज्यघटना बनविणारांनी ही सनद अवश्य वाचण्याजोगी आहे. त्या सनदेंतील २८ वें कलम असें होतें की, सर्व राज्यकारभार पोलिश भाषेंतच चालविला पाहिजे. 'All public business will be transacted in the Polish language.' दुर्दैवाने हे सुखाचे दिवस पोलिश लोकांना चिरकाल लाभले नाहीत. कारण इ. स. १८९९ सालीं वॉर्सा-विश्वविद्यालयांत सर्व शिक्षण रशियन भाषेंतून दिलें जात असे ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. जर्मनपोलंडमध्ये राज्यकर्त्यांनी अर्थात् आपली भाषा सुरू केली. परंतु पोलिश लोकांनी हें भाषा-विषयक जू झुगारून देण्याची शिकस्त केली. ते असें म्हणत की, घरींदारीं, देवळांत, कोर्टांत एकदा जर्मन भाषा सुरू झाली की, लोकांना जर्मन बनविणाऱ्या सरकारच्या उद्योगाला यश आलेंच म्हणून समजावें. सरकारी हुद्याच्या जागांच्या लालुचीलाहि ते बळी पडले नाहीत. जर्मन न शिकून ह्या जागांवरहि त्यांनी पाणी सोडलें.

पोलिश लोकांप्रमाणेच बोअर लोकहि भाषेचें महत्त्व जाणणारे होते. युद्धांत बोअर लोक जिकिरीस आले तरी सुद्धा त्यांनी आपणांस पाहिजे तसा तह करून घेतला. ह्या तहाच्या अटींपैकी भाषे-संबंधाने थोडें रण माजलें होतें. बोअर लोक डच भाषा सोडण्यास कबुली देतना व इंग्लिशांच्या मनांत आपल्या भाषेचें घोडें पुढे दाम-टावयाचें होतें. शेवटी तडजोड होऊन इंग्लिश व डच ह्या दोन्ही भाषांचे समान हक्क शाळांतून राखण्यांत आले. 'Equal rights for the Dutch and English languages in Educational matters' असें एक कलम तहांत घालावें लागलें. हें सर्व **डी वेट** ह्यांच्या आग्रहामुळे साधलें गेलें. ('Three Years War' by *C.R. De Wett.*) बोअर लोकांप्रमाणे जितांनी भाषाविषयक दक्षता ठेविली नाही कीं जेत्यांची भाषा स्वीकारणे त्यांना भाग पडतें. चीन-जपानी युद्धानंतर

स. १८९५ सालीं फोर्मोसा बेट जेव्हा जपानच्या ताब्यांत गेलें, तेव्हा जपान सरकारने त्या बेटांतल्या लोकांना प्रथम जपानी भाषा व जपानी इतिहास शिकविण्याचा आरंभ केला. एका देशाने दुसरा देश जिंकला म्हणजे जेत्यापुढे शिक्षणविषयक असे दोन प्रश्न मुख्यतः असतात. व्यावहारिक शास्त्रीय शिक्षण देऊन जिंकलेल्या देशांतील लोकांना अधिक सुखी करावयाचें? अथवा अशा रीतीनें शिक्षण द्यावयाचें की, जितांचें जेत्यांशीं पूर्ण तादात्म्य व्हावें. हे दोन मार्ग परस्परविरुद्ध असतात. "Should they give the people a practical scientific education and thus enable them to better themselves, have more comfortable homes and make more money or should they give such an education as would assimilate them with us Japanese?' अशा शब्दांनी हें शिक्षणविषयक धोरण टेक्कोशी ह्या जपानी मुत्सद्याने निर्दिष्ट केलें आहे. हिंदुस्थानांत इंग्रजांचें धोरण ह्या assimilation theoryला म्हणजे तादात्म्य-तत्त्वाला अनुसरून आहे अशी टेक्कोशीची समजूत आहे. फोर्मोसा बेटांत हें तादात्म्यतत्त्व कधी काळी तरी मूर्त स्वरूप पावेल कीं नाही अशी एकाने शंका दर्शविली तेव्हा टेक्कोशीने उत्तर दिलें "You must have a great deal of patience . . It is fully a hundred years since England gained possession of India, but the people of that country are not yet fully assimilated." (*Japanese Rule in Formosa*)

भाषेचा प्रश्न सामान्य नव्हे हें आपणांस ह्यावरून दिसून येईल. भाषेच्या द्वाराने शासितांच्या संस्कृतीचा लोप होऊन त्या ठिकाणीं शास्ते आपली संस्कृति स्थापन करतात. जर्मन लोक मुत्सद्दी. पोलिशांना जर्मन करून सोडण्याचा उत्तम उपाय म्हणजे जर्मन भाषेचा त्यांच्यांत सर्वत्र प्रसार करणें होय, हें त्यांस चांगलें कळलें होतें. तुर्की लोकांत हा मुत्सद्दीपणा कमी, त्यामुळे त्यांच्या ताब्यांतील बल्गे-

रिया देशांत त्यांनी ह्या अत्युत्तम साधनाकडे दुर्लक्ष केलें व त्याबद्दल इतिहासकारांनी त्यांस दोष दिला आहे. " The contemptuous indifference with which the Turks regarded the Christian Rayahs ( persons who are not Mahomedans ) was not altogether to the disadvantage of the subject race. Military service was not exacted from the Christians, no systematic effort was made to extinguish either their religion or their language." परकी भाषा आपणांस पूर्णपणें परकी करते. परकीयांचे आचारविचार, परकीयांची आवडनावड, परकीयांचा पोषाक इत्यादि सर्व बाबतींत आपण आपलें सोडून परकी बनतों. इंग्लंडच्या संबंधानें वर जो एक इतिहासांतील उतारा दिला आहे, त्यांतील शेवटलीं दोन वाक्यें मनन करण्यासारखीं आहेत. " British Chieftains at this time became masters of the Latin tongue *and affected Roman manners and tastes.*" जे परकी भाषा बोलतात त्यांचे विचार परकी होतात. परकीयांच्याप्रमाणे ज्यांचे विचार चालतात त्यांची ध्येयें परकीं बनतात; आणि परकीयांच्या रीतिभाती उचलण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते—ह्या वुडरफ साहेबांच्या म्हणण्याला इतिहासाचें पूर्ण पाठबळ आहे. " Is India Civilized " ह्या पुस्तकांत ते म्हणतात: " Those who speak a foreign language will tend to think foreign thoughts. Those who think in foreign thoughts will have foreign aims and tend to adopt foreign ways and so forth." भाषेमध्ये किती जबरदस्त शक्ति आहे हें पहावयाचें असेल तर आल्सेस-लोरेन ह्या प्रांतांकडे नजर फेकावी. हे प्रांत पूर्वीचे फ्रान्सचे. ते स. १८७० च्या युद्धांत जर्मनीने घेतले. पण इतक्या अल्पावधींत ते इतके जर्मन झाले आहेत की, तहपरिषदेला ते प्रांत फ्रान्सला मुकाट्याने परत देतां येईनात. असा हा परकी भाषेचा प्रभाव आहे. ह्यानंतर आमच्यांतील विद्वान् व थोर मंडळी आम्हांला

इंग्रेजी भाषेंतूनच सर्व विषय शिकविले पाहिजेत असा आग्रह धरतात याचें आश्चर्य वाटण्याचें कारण काय? असो. ईजिप्तदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आहे, तेथेहि इतिहास व शास्त्रीय विषय इंग्रेजींतूनच शिकवितात.

आता आपण हिंदुस्थानाकडे वळूं. ब्रिटिश अमलापूर्वी सर्व समाजाला हल्लीच्या अर्थानें शिक्षण मिळत नसे. हिंदूंमध्ये विशिष्ट वर्गांचें शिक्षण संस्कृतमधून होत असे; मुसलमानांचें शिक्षण अरेबिकमधून दिलें जाई. मराठेशाहींत सरकारी दप्तर मराठींत असे व मोंगलाईत परशिअनमध्ये असे. कंपनीकडे राज्यकारभार असतांना शिक्षणाच्या बाबतींत इंग्रेजीला उत्तेजन मिळालें नाही. इ. स. १७९७ मध्ये सर चार्लस् ग्रँट यांनी सर्व शिक्षण इंग्रेजींतून द्यावें असा रिपोर्ट केला असूनही तो न जुमानतां कंपनीनें संस्कृत व अरेबिक ह्या भाषांच्या द्वारा शिक्षण देण्याचें चालू ठेवल. पण मेकॉले साहेबांचा खलिता सुप्रसिद्धच आहे. पुढे इ. स. १८३५ मध्ये सर्व मनु बदलला. " Henceforth all the funds available for educational purposes should be mainly devoted to the maintenance of schools and colleges of Western learning to be taught through the medium of English."

तेव्हापासून सर्व शिक्षण इंग्रेजींतून देण्यास सुरवात झाली. तथापि हा निर्णय देशी भाषांतून शिक्षण देण्याइतक्या देशी भाषा समृद्ध नाहीत ह्या मुद्यावर झाला. देशी भाषेतून शिक्षण देण्याचें तत्त्व अमान्य नव्हतें; उलट अखरास देशी भाषेंतून शिक्षण देण्याचा हेतु सदैव डोळ्यांपुढे ठेवला पाहिजे ही गोष्ट सर्वांस कबूल झाली. " In regard to vernaculars all parties agreed that the vernaculers contained neither the literary nor scientific information necessary for a liberal education. *But it was admitted* that the instruction of the masses of the people through the medium of their own language was the ultimate object to be kept in view." ( *Trevelyan*'s *Edu-*

*cation of the People of India.)* उत्तर हिंदुस्थानांत कोर्टाची भाषा परशिअन असे तीहि इ. स. १८३७ च्या कायद्याने बंद झाली. पुढे इंग्रेजी शिक्षण ज्यांनी संपादन केलें असेल त्यांनाच सरकारी नोकऱ्या मिळतील असें जाहीर करण्यांत आलें. 'Lord Hardinge announced in 1844 that thenceforward preference would be given in all appointments under Government to those who had received Western education.' ह्याप्रमाणे इंग्रेजी भाषेचा प्रसार सर्वत्र सरराह होऊं लागला.

आता आपणांस ह्या अडचणी कशा दूर करतां येतील ह्याचा विचार करणें अवश्य आहे. प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे की, इतर उपरिनिर्दिष्ट लोकांपेक्षा आपल्या देशाची स्थिति थोडी वेगळी आहे. ह्या देशांत अनेक भाषा असल्यामुळे आपणांस इंग्रेजी भाषा आपण होऊन अनिर्वाहपक्ष म्हणून पतकरणें भाग झालें आहे. ह्या दृष्टीने भाषावार प्रांतविभागणीचें महत्त्व किती आहे ह्याची आपणांस कल्पना करतां येईल. भाषाविषयक अडचणीमुळे सरकारी दफ्तर इंग्रजी भाषेंत राहणारच. परंतु कायदेकौन्सिलांतील भाषणें देशी भाषेंत होणें देशी भाषांच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे. देशी भाषांत कोणी भाषण करतां कामा नये व इंग्रेजींतच प्रत्येकाने बोललें पाहिजे असा कायद्याचा स्पष्ट प्रतिबंध नाही. मुंबई सरकारने जे ह्या बाबतींत नियम केले आहेत त्यांत १३ वा नियम असा आहे:—' Any member may, with the permission of the President, speak at the request and on behalf of another member who is unable to express himself in the English language (*Bombay Legislative Council Manual*). म्हणजे इंग्रेजींत ज्यास बोलतां येत नाही त्याच्याकरतां दुसऱ्या सभासदाने अध्यक्षाच्या परवानगीने बोलावें. देशी भाषेंत बोलण्याची मनाई कायद्याने केली नसतां ती कानूच्या रूपाने करण्याचा अधिकार कोणाला आहे कीं नाही ह्याचा निर्णय कायदेपंडितांनी करणें

अवश्य आहे. मराठींत भाषण करण्यास कायद्याची हरकत नसावी असा माझा समज आहे. कायदेकौन्सिलांतील भाषणांनी मराठी वाङ्मयांत भर पडण्यासारखी आहे, त्यामुळे आपलें ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष पाहिजे. कानडी जिल्हे मुंबई इलाख्यांत सामील केल्याने भाषेचा प्रश्न घोटाळ्याचा झाला आहे. गुजराथीची आपणांस अडचण फारशी भासत नाही. गुजराथी लोकांना मराठींत बोललेलें समजतें व आपणांस गुजराथींत बोललेलें साधारण समजतें. परंतु कानडी व मराठी ह्यांत कोणतेंच साम्य नसल्यामुळे त्या भाषेचें अक्षरहि समजणें शक्य नाही! तथापि पुष्कळ वेळां कानडी प्रांतांतले मेंबर मराठी जाणणारे असल्यामुळे ही अडचणसुद्धा फार करून आड येत नाही. ह्यास्तव मराठी सभासदांनी कायदेकौन्सिलांत मराठींत भाषणें करण्याचा प्रयत्न करावा[1]. ह्या कामीं त्यांना मनाई झाल्यास कोर्टाकडे जाऊन त्यांनी आपला हक्क शाबीत करून घ्यावा. सुधारणांनंतर मतदारक्षेत्रहि फार वाढ होणार आहे. अशा वेळीं इंग्रेजी न जाणणारे लोक कौन्सिलमध्ये येण्याचा संभव फार. नाहीतर इंग्लिश भाषेचें ज्ञान ही एक नवीनच अट उमेदवारांवर लादण्यांत येईल. सध्याहि इंग्रेजी न जाणणाऱ्या इसमास कौन्सिलचें सभासद होतां येतें; मात्र बोलतां येत नाही. तेव्हा ह्या विषयाकडे आमच्या मंडळीचें लक्ष लागणें अवश्य आहे.

विश्वविद्यालयाडे पाहिलें असतांहि देशीभाषांना अनुत्तेजक अशीच ह्या संस्थेची रचना आहे. ' धन्यास धत्तूरा आणि चाकरास मलिदा ' अशी या ठिकाणीं स्थिति आहे. देशी भाषेपेक्षा परकी भाषेचेंच स्तोम फार; एवढेंच नव्हे तर देशी भाषासंबंधाने युनिव्हर्सिटीने कोल्हांटी उडी मारली आहे. इ. स. १८६८ पर्यंत मराठी सर्व परीक्षांत असे. पुढे मराठीला विश्वविद्यालयाने अजीबात फाटा दिला. नंतर, आपणां सर्वांस माहीतच आहे की, इ. स.

---

१ अलीकडे ही सोय अंशतः झाली आहे.

१९०३ सालीं न्या. रानड्यांच्या परिश्रमाने एम. ए.च्या परीक्षेला मराठी ऐच्छिक विषय म्हणून ठेवला गेला. तथापि मराठीच्या दुर्दैवाने मराठी शिकविण्याची सोय विश्वविद्यालयाने अगर कोणत्याहि कॉलेजाने केलेली नाही. त्याचा परिणाम असा झाला की, आज सोळा वर्षांत सोळा विद्यार्थीहि मराठी घेऊन एम. ए. झाले नाहीत! ह्यास्तव मराठी शिकविण्याची व्यवस्था विश्वविद्यालयाने तरी स्वतंत्र करावी, अगर प्रत्येक कॉलेजांत मराठीचा प्रोफेसर नेमला जाईल एवढी तरी विश्वविद्यालयाने खबरदारी घ्यावी अशी ओरड आपण केली पाहिजे. दुसरें, मराठी घेऊन पहिला येणाऱ्याला निदान ५०० रुपयांचें बक्षीस मिळेल तर त्या लालुचीने अधिक विद्यार्थी मराठी घेतील. महाराष्ट्रांत १०००० रुपये जमा करणें कांही अवघड नाही. १०००० रु. आपण विश्वविद्यालयाच्या स्वाधीन केले तर त्यांतून ५०० रु. चें बक्षीस ठेवतां येईल. अलाहाबाद व मद्रास विश्वविद्यालयांत मराठीस योग्य स्थान प्राप्त झालें आहे, पण मराठी मुलखांत मराठीची हेळसांड होत आहे, ही गोष्ट आमच्यापेक्षा आमच्या विश्वविद्यालयालाच लाजिरवाणी आहे. मराठी वाङ्मय निर्माण करा, म्हणजे आम्ही मराठीला विश्वविद्यालयांत जागा देऊं, असें प्रतिपादन करणारा एक पक्ष आहे. पण विश्वविद्यालयानेच मराठीचा अव्हेर केल्यावर तिने अंग तरी धरावें कसें? हल्लीच मराठींत जे ग्रंथ आहेत ते संग्रहालयांच्या कपाटांत धूळ खात पडले आहेत ही गोष्ट ह्या मंडळीस माहीत नाही काय? ज्यांची दुसरी आवृत्ति निघाली आहे असे कितीसे ग्रंथ मराठींत आहेत? रा. शंकरराव राजवाड्यांच्या 'गीताभाष्या'च्या ५०० प्रतींची पहिली आवृत्ति अद्यापि खपली नाही ह्याचें कारण काय? रा. वामनराव जोशी यांचा 'नीतिशास्त्रप्रवेश' इतका सुरेख असूनहि त्याची दुसरी आवृत्ति लवकरच निघण्याचा संभव आहे काय? कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचा भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास किती

४७८०

लोक वाचतात ! अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. ह्यांचें सयुक्तिक उत्तर कोणी तें द्यावें, आणि मग मराठींत वाङ्मय निर्माण होत नाही म्हणून आम्ही विश्वविद्यालयांत तिचा प्रवेश होऊं देत नाही, असें म्हणावें. ज्या मानाने तुम्ही आमच्या तरुण पिढीला मातृभाषेचा स्पर्शहि होऊं देणार नाही त्या मानाने हे तरुण स्वभाषेपासून दूर दूर जाणारच. आपलीच भाषा त्यांना अपरिचित होते, मग त्या भाषेचा त्यांस अभिमान कसा यावा ? आणि अभिमान असून तरी उपयोग काय ? ' मला मराठींत बोलतां येत नाही, क्षमा करा, मी इंग्रेजींत बोलतों—' असें विनविण्याचा प्रसंग थोड्या लोकांवर येतो काय ? मराठींत उत्तम वाङ्मय निर्माण होण्याकरतांच आम्हांला सर्व विषय मराठींतून शिकविणें अवश्य आहे. मराठींत ग्रंथ नाहीत अशी सबब सांगण्यांत येते. पण विषय शिकविण्यास ग्रंथ कशाला ? तुम्हांला ग्रंथ शिकवायचा कीं विषय शिकवायचा ? ग्रंथ प्रोफेसरांस पाहिजेत, विद्यार्थ्यांस नकोत. शिक्षकांनी इंग्रेजी पुस्तकांचा उपयोग करावा. त्यास ना कोणाची आहे ? पण त्यांचें व्याख्यान मराठींत होण्यास काय हरकत आहे ? ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयें स्थापन झालीं तेव्हा इंग्रेजी भाषेची जी स्थिति होती तिच्यापेक्षा मराठीची सांप्रतची स्थिति कमी दर्जाची आहे असें म्हणतां येणार नाही. जॉनसनच्या इंग्रेजी कोशांत फक्त ४०००० शब्द आहेत. ह्या कोशांत सर्व शब्दांचा संग्रह नाही ही गोष्ट खरी आहे; तथापि प्रमुख, भारदस्त, प्रचारांतले शब्द त्यांत सोडलेले नाहीत हेंहि विसरतां कामा नये. मोल्स्वर्थच्या मराठी कोशांत ६०००० शब्द आहेत. तेव्हापासून आतापर्यंत मराठींत आणखी किती तरी शब्द रूढ झाले आहेत. ह्याप्रमाणे मराठी भाषेचें शब्दभांडार फार मोठें आहे. निरनिराळ्या प्रांतांत रूढ असलेले पुष्कळ शब्द कोशांत समाविष्ट झालेले नाहीत. बरें, मराठींत मूळचा जोम नसून इतर भाषांतील शब्दांनी ती समृद्ध झाली

आहे असेंहि म्हणण्याचा कोणास अधिकार नाही. कारण उपरिनिर्दिष्ट ६०००० शब्दांपैकी फक्त ३००० शब्द हिंदुस्थानी आहेत. ह्याउपर उच्च विषय शिकविण्यास मराठींत शब्दसंग्रह नाही असें म्हणणें अनुचित होय. कॉलेजांतूनहि सर्व विषय मराठींत शिकवा, परीक्षा मराठींत घ्या आणि मग वाङ्मय निर्माण होतें कीं नाही पहा. ह्या कामीं मराठी ट्रेनिंग कॉलेजचें उदाहरण अप्रस्तुत होय. तेथे विद्यार्थी थोडे असतात. ते गरीब व बुद्धीनेहि कमी आणि पुढे पास झाल्यानंतरहि त्यांची उपासमार; अशा स्थितींत ते बिचारे काय करणार? तरी पण तेथे सर्व विषय मराठींतून शिकवितां येतात, मग इतरत्रच ती अडचण कां भासावी? तसेंच मराठी वर्तमानपत्रकार सर्व विषयांची चर्चा करितातच. त्यांस जर मराठींत आपले विचार व्यक्त करण्यास अडचण भासत नाही तर ती कॉलेजांतच भासण्याचें कारण काय? माझ्या मतें वाचकवर्ग नसल्यामुळे मराठींत चांगले ग्रंथ होत नाहीत; आणि तरुणांचें सर्व शिक्षण मराठींतून झाल्याविना वाचकवर्ग वाढणें शक्य नाही. मराठींत उत्कृष्ट वाङ्मय निर्माण झालें म्हणजे आम्ही विश्वविद्यालयांत मराठीचा प्रवेश करून घेऊं असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण महाराज! मराठींत एकदा का उत्तम वाङ्मय निर्माण झालें म्हणजे मग आम्ही तुमच्याकडे भिक्षा मागण्यास येतों कशाला? मग विश्वविद्यालयाची पर्वा तरी कोण करतो? विश्वविद्यालयाला आपली अब्रू घालवावयाची नसेल तर तेंच आपण होऊन मराठीच्या पाठीस लागेल. आता दुसरा आक्षेप असा आहे की, 'इतर विषय फार झाल्यामुळे विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत मराठीला जागा नाही—विद्यार्थ्यांवर अधिक अभ्यासाचा बोजा पडतो.' मराठीपुरता तरी हा आक्षेप अज्ञानमूलक आहे असें मला वाटतें. मराठी संस्कृतापासून निघाली आहे. संस्कृत ही मराठींत रूपांतर पावली आहे. म्हणून संस्कृताच्या अध्ययनाला मराठीची व मराठीच्या अध्ययनाला संस्कृताची अवश्यकता

आहे. संस्कृत पुस्तक एखादें कमी करून त्याऐवजी मराठी पुस्तक लावण्यास कांहीं हरकत नसावी. महाभारताचें पर्व लावलें असतां त्याच्याबरोबर मोरोपंतांचें महाभारत ठेवलें तर संस्कृताच्या अध्ययनालाहि पूर्णता येईल. संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत. तेव्हा संस्कृताबरोबर मराठी शिकविल्यास दोनहि भाषांचें शिक्षण मिळून विद्यार्थ्यांवरील बोजाहि फार वाढणार नाही. तात्पर्य, इच्छा असल्यास कांही तरी तडजोड काढणें अशक्य नाही. पंजाब युनिव्हर्सिटीला जें कार्य करतां येतें तें मुंबई युनिव्हर्सिटीला कां करतां येऊं नये? 'The Punjab University takes an active part in the improvement of vernacular literature' अशी शिफारस विश्वकोशांत ह्या विश्वविद्यालयाची केली आहे.

ही सर्व सुधारणा विश्वविद्यालयाची घटना बदलल्यावांचून होणें संभवनीय नाही. मराठीच्या दृष्टीने ही घटना अत्यंत विघटित आहे. हल्ली ८० साधारण फेलोजपैकी खिस्ती ३८, पारशी २१, आणि मराठी फक्त १७ आहेत. मुंबई इलाख्यांत मराठी बोलणारांची संख्या ९ लाखांवर आहे. त्यांशी हें प्रमाण १ लाखांत २ पडतें. पारशी एक लाख असून त्यांचें प्रमाण एका लाखांत २१ पडतें. हा अक्षम्य अन्याय आहे. ह्याचा प्रतिकार करण्याची जबाबदारी मराठी बोलणारांवर आहे. पण आजपर्यंत ह्या कामीं जसे कसून प्रयत्न करावे तसे कोणी केले नाहीत. ह्या विलक्षण घटनेमुळेच आमच्या विश्वविद्यालयाचें नेहमी प्रतिगामी धोरण असतें. समजा, आमच्या दुर्दैवाने इंग्रज हिंदुस्थानांत आले नसते, तर मराठी वाङ्मय समृद्ध नाही ह्या सबबीवर महाराष्ट्रांत शिक्षणच देण्याचें ह्या मंडळींनी बंद केलें असतें काय? संस्कृतविषयक अर्वाचीन वाङ्मय जर्मन भाषेंतच आहे. सायन्समध्येहि जर्मन राष्ट्राची प्रगति सर्वांत अधिक आहे. मग हे विषय इंग्रेजींतून न शिकवितां जर्मन भाषेंतून कां शिकवीत नाहीत? सॅडलर कमिशनने देशी भाषांसंबंधाने बऱ्याच सुधारणा

सुचविल्या आहेत. पण कॉलेजमधील शिक्षण इंग्रेजींतूनच द्यावें अशी शिफारस कमिशनने केली आहे. खालचें, म्हणजे इंटरमीजिएटपर्यंत, सर्व शिक्षण देशी भाषांच्या द्वारें दिलेंच पाहिजे अशी शिफारस कमिशनने न केल्यामुळे त्या रिपोर्टांत मोठेंच वैगुण्य राहिलें आहे. इंग्रेजींतून शिकवावयाचे विषय शक्य तितके कमी करावे अशी कमिशनची सूचना आहे. तथापि इंटरमीजिएटपर्यंत ह्यापुढे 'अवश्य भाषा' म्हणून देशी भाषांचा अभ्यास होणार ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. शिवाय विश्वविद्यालयानेहि देशी भाषांचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करण्यास उत्तेजन द्यावें अशी जी कमिशनने शिफारस केली आहे तिचाहि आपणांस कांही उपयोग होईल. पण ह्याहीपेक्षां हितकर अशी एक गोष्ट कमिशनने केली आहे. देशी भाषांच्या उद्धाराकरितांच आम्ही त्या भाषांचा पद्धतशीर अभ्यास करवावा असें म्हणतों असें नाही, तर विवेचनांत विशदता येण्यास देशी भाषांचा अभ्यास कारणीभूत होतो. "We attach great importance to the systematic study of the vernacular not only for its own sake; but as a *means to clear thinking.*" इंग्रेजींतून सर्व विषय शिकविलेच पाहिजेत अशी सक्ति नसतांना खासगी शाळांत देशी भाषांच्या द्वारें शिक्षण दिलें जात नाही हा चमत्कार आहे. प्रवेशपरीक्षेंत उत्तरें इंग्रेजी भाषेंत द्यावीं लागतात ही गोष्ट खरी. पण ६ वर्षांत सर्व विषय मराठींत शिकवून शेवटल्या वर्षांत तेच विषय पुनः इंग्रेजींत सांगतां येणार नाहीत असें नाही; निदान अशा तऱ्हेचे प्रयोग करूं न इच्छिणाऱ्या संस्थेला लोकांनी मदत देण्यापूर्वी विचार करावा. वर निर्दिष्ट केलेल्या पुष्कळ अडचणी पुण्यास स्वतंत्र विश्वविद्यालय झाल्याने दूर होऊन सुधारणांचा मार्ग निष्कटंक होण्याचा संभव आहे. म्हणून मराठी भाषाभ्युदयेच्छूंचें ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधणें अवश्य आहे. ह्याशिवाय मराठी भाषेच्या हिताच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यांत एक मराठी पूर्ण ट्रेनिंग

कॉलेज असणें जरूर आहे. ह्या विद्यालयांचा प्रसार जितका होईल तितका मराठीला फायदा होण्याचा संभव अधिक आहे. त्याचप्रमाणे ह्लीच्या स्थितीतहि मराठी ७ इयत्तांपर्यंत शिकविणाऱ्या शाळांतून इंग्रेजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण देण्याची तरतूद झाली असतां मराठींतून आपोआपच पुष्कळ विषय विद्यार्थ्यांना शिकतां येतील. पूर्वी मराठी शाळांत पुष्कळ विषय शिकवीत. संपूर्ण बीजगणित, सिद्धांताचीं ६ पुस्तकें, त्रिकोणमिति, दादोबांचें संपूर्ण मोठें व्याकरण, आणि पुष्कळशा कविता, इतकी तयारी विद्यार्थ्यांची मराठी शाळेंत असतांनाच होत असे. ह्या पूर्वीच्या पद्धतीला अनुसरून जर सध्याचा शिक्षणक्रम बदलला तरी सुद्धा थोडेंसें कार्य होण्याजोगें आहे. ह्याच्याच जोडीला ७ वी यत्ता झाल्यावांचून हायस्कुलांत मुलगा घ्यावयाचा नाहीं असा नियम व्हावयास पाहिजे. पण ह्याबद्दल आपण जर उचल केली नाहीं तर दुसऱ्यास दोष देऊन काय उपयोग? आपल्या क्षेत्रांत शेजाऱ्याचें हळू हळू चाललेलें अतिक्रमण मूर्खपणाने आपण तसेंच चालूं दिलें तर कांहीं वर्षांनी सर्व क्षेत्र आपल्या हातून गेलें असतां दुसऱ्यास दोष कोणत्या तोंडाने देतां येईल? मराठी भाषेचें हिताहित पाहणें ज्यांचें आद्य कर्तव्य आहे अशा संस्था आपल्याकडे नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

असो, ज्या गोष्टींसंबंधाने आपण स्वतंत्र नाहीं त्याविषयीं नाइलाज म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे. पण ज्या बाबतींत पारतंत्र्याची सबब आपल्याला नाहीं तेथेहि आपण इंग्रेजी भाषेचा अवलंब करावा हें चमत्कारिक नाहीं काय? लोकांमध्ये ज्ञानाचा प्रसार करण्याच्या हेतूनें भरलेल्या सभांत भाषणें इंग्रेजीमध्ये आपण करतों याची आपणांस शरम वाटली पाहिजे. परकी भाषेंत बोलण्याच्या घातक सवयीमुळे आपण आपल्या देशाचें कल्पनातीत नुकसान करीत असतों. आपण आपल्या लोकांनाच परकी होतों. आपल्या लोकांची व आपली कायमची फारकत होते. आपलें वजन लोकां-

वर पडत नाही. लोकांना शिक्षणाचा मार्ग बंद केल्यासारखा होतो. आपलें मनोगत लोकांस समजत नाही. सारांश, आत्मतृप्तीवांचून दुसरा कोणताहि फायदा परकी भाषेंतून केलेल्या भाषणांनीं होत नाहीं. " Only a race's own language can express its soul. " असें वुडरफसाहेबांनीं म्हटलें आहे तें सर्वांनीं मनन करण्यासारखें आहे. आपलें हृद्गत परभाषेंतून व्यक्त कसें होणार ? ज्या वर्तमान-पत्रांची अथवा वक्त्यांची भाषा चांगली असते त्यांचा परिणाम, त्यांचें वजन, समाजावर अधिक, हा आपला नेहमीचा अनुभव आहे. आपल्यांतील दृष्टांत उपमा इत्यादि आपल्या माणसांना जशा समजतील तशा परभाषेंतल्या कशा समजाव्या ? व दृष्टांत-उपमांनीं अनलंकृत भाषेचा परिणाम श्रोत्यांवर—अशिक्षित समाजावर—मुळींच होत नाहीं, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. म्हणून आमच्या परिषदांचीं, सभांचीं कामें देशी भाषेच्या द्वारा चाललीं पाहिजेत. महात्मा गांधी हे स्वदेशीभक्त होत. व्हॉइसरॉयांसमोर हिंदी भाषेंत भाषण कर-ण्याचें साहस अगर धैर्य आजपर्यंत हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणाहि माणसास झालें नाहीं. 'राजव्यवहारकोश' करवून मातृभाषेचें महत्त्व ओळखणाऱ्या शिवाजीनंतर देशोन्नतीच्या कामीं देशी भाषेचें महत्त्व एकटे गांधीच जाणतात असें म्हटल्याने अतिशयोक्ति होणार नाहीं. देशी भाषांचा आश्रय केल्यावांचून देश सुधारण्याची आशा करणें निष्फळ आहे. इंग्रेजीचा गंध नसलेले कोटयवधि लोक आहेत. त्यांच्याच भाषेंत त्यांच्याशीं बोलल्याशिवाय त्यांना सज्ञान करण्याचा दुसरा उपाय नाहीं. देशांतील मूठभर लोक सुधारल्याने देश सुधारत नाहीं. ह्यामुळेच लोकसत्ताक राज्यपद्धतींत स्वभाषेचा उत्कर्ष होत असतो. आजपर्यंत आमच्या ह्या देशांत आमच्या पुढा-ऱ्यांनी लोकांची उपेक्षा केली. त्यांची सर्व दृष्टि सरकाराकडे. त्यामुळे इंग्रेजींत बोलण्याचा प्रघात रूढ झाला. गुदस्तां प्रथमच राष्ट्रीय सभेंत शेतकरी लोक आणण्याची खटपट करण्यांत आली. त्याबरो-

बरच त्यांच्याकरता अध्यक्षांचें भाषण हिंदीमध्ये करणें भाग पडलें. 'लोकां'करतांच ज्ञानेश्वरादि संतांनी मराठींत ग्रंथरचना केली. तात्पर्य, आपल्या दृष्टीपुढे "लोक" ठेवल्याशिवाय मराठी भाषेला उत्तेजन येणार नाही. म्हणून आपले खासगी व सामाजिक व्यवहार मराठींत करण्याचा आपण निश्चय केला पाहिजे.

महाराज, आमच्या ह्या देशांत कित्येक अश्रुतपूर्व चमत्कार घडत आहेत. आमच्या कोर्टांतून खुनाच्या आरोपाची चौकशी आरोपीला न समजणाऱ्या भाषेंत केली जाते. फाशीच्या शिक्षेला पात्र असा गुन्हा केल्याचा माझ्यावर आरोप, हजारों रुपये खर्च करून मी बॅरिस्टर देतों, पण माझा वकील काय बोलला, कोर्टाने कोणत्या कोणत्या कारणांकरता माझ्यावरील आरोप शाबीत धरला, ह्याचें एकही अक्षर मला समजत नाही! आणि तुला फाशीची शिक्षा झाली आहे एवढें मात्र कोर्टाच्या माणसाकडून मला कळविलें जातें! हा किती विलक्षण प्रकार आहे बरें? पण ह्याहीपेक्षा विलक्षण म्हणजे, ह्या कामीं कांही विलक्षणता आहे असें आम्हांस भासतही नाहींसें झालें आहे!

ह्याप्रमाणे आज मराठीची स्थिति आहे. तिला सर्व ठिकाणीं सावत्र मुलीप्रमाणे वागविण्यांत येत आहे. विद्यमान परिस्थिति मराठी भाषेला उत्तेजक अशी नाही. मराठी भाषेचें रोप तयार झालें आहे खरें, पण हें वरील सावट काढल्यावांचून ह्या रोपाचा विस्तीर्ण वृक्ष बनणें अशक्य आहे. ही परिस्थिति कृत्रिम आहे; म्हणून ती सुधारण्यासारखी आहे. पण कांही गोष्टी निसर्गतःच आपल्याविरुद्ध आहेत हें मराठीची बंगालीशीं तुलना केली असतां स्पष्ट दिसून येणारें आहे. प्रथम, मुंबई इलाख्याची लोकसंख्या दोन कोटींहूनहि कमी आहे; बंगालची लोकसंख्या ४॥ कोटींहून अधिक आहे. ह्यांपैकी दोनकोटी बेचाळीस लक्ष मुसलमान असूनहि त्यांची मातृभाषा बंगालीच आहे. बंगाल्यांत ज्यांची मातृभाषा बंगाली आहे

असे शेंकडा ९२ लोक आहेत. म्हणजे ४॥ कोटींमध्ये ४। कोटी लोक बंगाली बोलणारे आहेत, आता मराठीकडे पहा. मराठी बोलणारे सर्व हिंदुस्थानांत सारे १॥ कोट लोक आहेत. त्यांपैकी शेंकडा ४५ काय ते मुंबई इलाख्यांत आहेत. त्यांतहि गुजराथी व कानडी सोडून दिले तर मराठी बोलणारांचा मुख्य भरणा मध्यभागांत आहे. ह्या भागाची लोकसंख्या ६२८७०६४ आहे. ठाणें, रत्नागिरी व कुलावा धरून एकंदर मराठी बोलणारे लोक ह्या इलाख्यांत ७० लाखहि नाहीत! ४। कोटी लोकांची असणारी बंगाली भाषा कोठे व ७० लाख लोकांची मराठी भाषा कोठे! दोहोंमध्ये कांहीच साम्य नाही. शिवाय कायमच्या धारापद्धतीने बंगाली लोक संपन्न, तर मराठी बोलणारे लोक केवळ दारिद्र्यधन; बंगाली बोलणारे लोक संकलित, तर मराठी बोलणारे चोहोंकडे विखुरलेले; ह्यामुळे बंगाली वाङ्मयाला उत्तेजन मिळतें तसें मराठी वाङ्मयाला मिळणें संभवनीय नाही. मराठी बोलणारे लोक परमुलखांत गेले म्हणजे परभाषा शिकतात आणि त्या मानाने मराठीला अपरिचित होतात. ह्याकरिता तंजावर, म्हैसूर इत्यादि दूरच्या ठिकाणीं असलेल्या मराठी लोकांशीं आपला संबंध तुटणार नाही असें आपलें धोरण असलें पाहिजे. तिकडे जाऊन इकडच्या लोकांनी मराठींत त्यांच्याकरिता व्याख्यानें द्यावीं, मराठी ग्रंथांचा प्रसार करावा. तात्पर्य, त्यांची मराठी भाषा प्रज्वलित राहून मराठी वाङ्मयांत त्यांच्याकडून भर पडेल असे हरप्रयत्न केले पाहिजेत. आपण आजपर्यंत ह्या दिशेने मुळींच प्रयत्न केले नाहीत. केतकरांच्या सूचीवरून बेळगांव, धारवाड व विजापूर ह्या जिल्ह्यांत मराठीचा संकोच होत असून कानडीचा विकास होत आहे असें दिसतें. अर्थात् मराठी लोकांनी ह्या भाषा सोडून आपणांस कानडीच्या मांडीवर बसवून घेतलें असें अनुमान करणें भाग आहे. कारण हिंदुस्थानांत मराठी बोलणारांचें प्रमाण वाढलें आहे. म्हणून ह्या

तीन जिल्ह्यांतील मराठी लोकांनी ह्या गोष्टीचा विचार करावा. महा-राष्ट्रीय ब्राह्मण आपली मातृभाषा कानडी सांगणारे मला माहीत आहेत. कानडी प्रांतांतील ब्राह्मण व मराठे ह्यांची जन्मभाषा कान-डीच झाली आहे. आपण आर्यवंशज आहों असें जर ह्या लोकांना वाटत असेल, तर त्यांनी कानडीच्या ऐवजी संस्कृतोद्भव मराठी भाषेचा स्वीकार करावा. ह्या प्रांतांत पुष्कळ लोक द्विभाषाविद् असे असतात. तेव्हा तेथे मराठी ग्रंथांचा फैलाव करण्याची जवाबदारी तत्प्रांतस्थ महाराष्ट्रीयांवर येऊन पडते. मराठी वाङ्मय कानडी वाङ्मयापेक्षा श्रेष्ठ दर्जाचें असल्यास मराठी ग्रंथांचा प्रसार होण्यास विलंब लागणार नाही; प्रयत्न मात्र कोणी केले पाहिजेत.

अशा प्रयत्नांपैकीच जागजागीं संग्रहालयें स्थापणें हा एक मुख्य प्रयत्न होय. **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय** ही मध्यवर्ती संस्था करून तिला जोडून मुंबईच्या बाहेर ठिकाठिकाणीं संग्रहालयें स्थापणें हें कितपत शक्य आहे हें मला सांगतां येत नाही. पण मुंबईमध्ये तरी निदान दुसरीं जागोजाग संग्रहालयें स्थापण्याची वेळ आली आहे. स. १८९८ सालीं ७८ वर्गणीदार जमवून स्थापन केलेल्या ह्या संस्थेचे आज ११०० वर्गणीदार आहेत. स. १९११-१२ सालीं जवळ जवळ इतकेच वर्गणीदार होते. आज ६ वर्षांत अधिक वाढ झालेली दिसत नाही. तेव्हा आता ही संस्था पूर्णावयव झाली असें म्हणण्यास हरकत नाही. तसेंच आजमितीस संग्रहालयांत साडेसात हजारांवर ग्रंथ आहेत. इ. स. १८२६ सालीं मराठींत पहिलें पुस्तक छापलें गेलें. तेव्हापासून स. १९०० पर्यंत ५००० पुस्तकें प्रसिद्ध झालीं असें गणित संशोधकांनी केलेलें आहे. दरसाल सरा-सरीने १३५ पुस्तकें प्रसिद्ध होतात. ह्या प्रमाणावरून इ. स. १८१८ पर्यंत आणखी २५०० पुस्तकें धरलीं की सर्व प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें ह्या संस्थेंत संग्रहित आहेत असें अनुमान निघतें. अर्थात् ग्रंथसंग्रहाच्या दृष्टीनेहि अपूर्णतेचा दोष ह्या संस्थेस लागत

नाहीं. जो कांहीं कमीपणा आहे तो वाचकांच्या वाचनपरिमाणासंबंधी आहे. तुमच्या रिपोर्टावरून मला असें वाटतें की, ह्या संग्रहालयाचा प्रत्येक वर्गणीदार दरसाल सरासरीनें १४ ते २० पुस्तकें वाचतो. हें प्रमाण फार आहे असें म्हणतां येत नाहीं. बर्मिंघॅम येथील पुस्तकालयांत हेंच प्रमाण २६ पडतें; आणि लिव्हर्पूल येथील पुस्तकालयांत ते ४४ पर्यंत गेलें आहे. परंतु हा दोष कांहीं संग्रहालयाच्या व्यवस्थापकांचा खास नव्हे. तात्पर्य, ह्या संग्रहालयाची पूर्ण वाढ झाली आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्यामुळे इतःपर ह्या संस्थेच्या चालकांनी आपलें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत करण्याकडे लक्ष देणें अवश्य आहे. महाराज, ठाणें मुंबई येथील संग्रहालयांच्या चालकांनी अध्यक्षांनी केलेल्या सूचनांवर जरी अगदीं उघड उघड बहिष्कार घातल्याचें दिसत आहे, तरी सुद्धा मी आणखी एक सूचना करण्याचें धाडस करतों. गेल्या सालींच रा. पाध्ये यांनी युनिव्हर्सिटी एक्सटेन्शन लेक्चर्सच्या धर्तीवर ह्या संस्थेने व्याख्यानें सुरू करावीं अशी अत्यंत बहुमोल सूचना केली होती. अशीच सूचना ठाण्यास कै. राजाराम शास्त्री भागवत यांनीहि पूर्वी केली होती. परंतु आजपर्यंत तिकडे कोणी लक्ष दिल्याचें दिसत नाहीं. वाचनवर्ग काढून वाचनाची अभिरुचि उत्पन्न केल्याशिवाय वाचकवर्ग तरी कसा वाढावा ? म्हणून ग्रंथसंग्रहालयाने ह्या दिशेनेहि प्रयत्न करणें वावगें होणार नाहीं. परंतु माझी दुसरी आणि मुख्य सूचना अशी आहे की, संस्थेच्या व्यवस्थापक मंडळींनी ह्या एकाच संग्रहालयावर संतुष्ट न राहतां मुंबईंत पण ठिकठिकाणीं दुसरीं संग्रहालयें स्थापन करण्याचें काम अवश्य हातीं घ्यावें. ताडदेव, गांवदेवी, वांद्रें, बोरिवली इत्यादि ठिकाणीं पुस्तकालयें उघडल्यास हिंद्वितर जातींतसुद्धा मराठीची अभिरुचि आपण उत्पन्न करूं शकूं. पारशी, ख्रिस्ती, मुसलमान व हिंदु अशी मिश्र वस्ती जेथे असेल तेथे संग्रहालयांच्या

द्वारें ह्या लोकांत मराठीचा शिरकाव करतां येण्यासारखा आहे. असे प्रयत्न धिम्मेपणाने व दूरदर्शीपणाने केले पाहिजेत हें खरें; पण तसें केलें असतां ते निष्फल होतील अशी भीति वाळगण्याचें कारण नाही. पण ह्याच्याहि अगोदर स्त्रियांकरितां दर चाळींत पुस्तकालय स्थापन करण्याचें आपण जर मनावर घ्याल तर आपल्या ह्या संस्थेचा उत्कर्ष होऊन स्त्रियांवर अगणित उपकार केल्यासारखें होईल. सांप्रत बहुतेक लहान मुली लग्न होण्यापूर्वी मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत शिकतातच. तेव्हा पुस्तकें वाचण्यास मुख्य पाया जी साक्षरता तो तयार झालेला असतोच. हें शिक्षण कायम ठेवणें अगर वाढविणें हें पुस्तकालयांच्या द्वारें आपणांस करतां येण्यासारखें आहे. पण हल्लींच्या परिस्थितींत स्त्रियांस घरच्या घरींच पुस्तकें वाचावयास मिळतील अशी व्यवस्था करणें अवश्य आहे. महाराज, स्त्रियांच्या संस्कृतीने आपल्या समाजाचें अपरिमित हित होणार आहे. शिक्षणाने स्त्रिया नवऱ्यांचा मान राखणार नाहीत हें भय निरर्थक आहे. असल्या ऑस्ट्रियन बादशाही विचाराचीं माणसें ह्या शतकांत फार आढळतील असें वाटत नाही. ऑस्ट्रियाच्या बादशहाने शिक्षकवर्गास एकदा असें निक्षून सांगितलें की, तुम्ही आपल्या शिष्यांना फार शिकविण्याच्या भानगडींत पडूं नका. माझ्या प्रजेंत मला विद्वत्ता नको, आज्ञाधारकता हा गुण पाहिजे. " Be careful not to teach your pupils too much. I do not want learned or scientific men. I want obedient subjects. " ह्या बादशाही मताचे नवरे आमच्या समाजांत नाहीत अशी आपण कल्पना करूं या. शिक्षणावांचून आज्ञाधारकत्व निर्माण करण्याची कल्पना बादशाही थाटालाच शोभण्यासारखी आहे. शिक्षणाच्याच योगाने आमच्या स्त्रिया अधिक कार्यदक्ष, अधिक पतिनिष्ठ बनतील, अशी खातरी बाळगा. " पूजनीया महाभागाः पुण्याश्च गृहदीप्तयः । स्त्रियः श्रियो गृहस्योक्ताः " अशा रीतीने महाभारतांत स्त्रियांची योग्यता

वर्णन केली आहे. स्त्रियांना पुरुषांपेक्षाहि अधिक मान मिळाला पाहिजे. पण आपण त्यांना अशिक्षित ठेवल्या तर त्या पूजनीय कशा होतील? निरक्षर स्त्रियांविषयी आपल्या मनांत आदर कसा वसेल? पूर्वीच्या आपल्या स्त्रिया नुसत्या सुशील नसत, नुसत्या नीतिमान् नसत, तर विद्वानही असत. ह्याचें मोठें उदाहरण म्हणजे **सुलभेचें** होय. ही एक मोठी योगिनी होती. जनक राजाची कीर्ति ऐकून तो खरोखरच मुक्त आहे कीं काय हें पाहण्याकरतां ती मिथिला नगरीला त्याच्याकडे गेली. जनकराजानें तिची निर्भर्त्सना केल्यावर ती त्यास म्हणाली: "हे राजा! तूं पुष्कळ बोललास खरा, पण तुला कसें भाषण करावें हें समजत नाहीं." असा टोला मारून सुलभेने जनकास वाक्यनियम सांगण्यास प्रारंभ केला. ती म्हणाली: "बुद्धिवाणींच्या नऊ दोषांनी अलिप्त, अठरा गुणांनी युक्त, आणि शिवाय सौक्ष्म्य, साम्य, क्रम, निर्णय व प्रयोजन ह्या पंच गुणांनी अन्वित असा जो शब्दसमुच्चय त्याला वाक्य असें, म्हणतात." पुढे सौक्ष्म्यादिकांचा जनकाला अर्थ सांगून ती म्हणाली: "मी जें आतां बोलणार तें अर्थपूर्ण, दुटप्पी नव्हे असें न्यायानुसारी, फाजील शब्द नसणारें व आटपसर असें वाक्य बोलेन. तें कोमल, स्पष्ट व श्रेष्ठ असेल. त्यांतील अक्षरें गुरु किंवा नीरस नसतील. माझें भाषण ग्राम्य, अमंगल असणार नाही. तें धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व कामशास्त्र ह्यांतील सिद्धांतांशीं विसंगत नसेल. माझ्या भाषणांत इष्ट हेतु व्यक्त होईल. छंदोव्याकरणादिकांचे दोष त्यांत नसल्यामुळे तें सुबोध असेल. वाक्यांतील पदें क्रमाला सोडून योजलेलीं नसतील. किंवा त्यांतील कांहीं शब्द अध्याहृत ठेवून तर्कानें पुरें करण्याचें कारण पडणार नाहीं. माझ्या भाषणांत काम, क्रोध. मोह, लोभ, दैन्य, दर्प, लज्जा, कृपा, किंवा अभिमान, या नऊ बुद्धिदोषांपैकीं एकही असणार नाहीं. हे राजा, जो वक्ता आपण व श्रोता या उभयतांच्या अर्थाला, अनुकूल असें भाषण

करतो तोच खरा वक्ता. कारण वक्ता स्वतःचा अर्थ बाजूस ठेवून श्रोत्याला संतुष्ट करण्याकरिता त्याचाच मतलब घेऊन बोलतो. त्या ठिकाणीं खऱ्या अर्थाबद्दल भ्रम उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे ज्या भाषणांत वक्ता श्रोत्याला न जुमानतां केवळ स्वतःला संमत असाच अर्थ स्थापित करूं पाहतो त्या भाषणांत खरा उत्कृष्ट अर्थ असला तरी तो मनांत भरत नाही." या भाषणावरून प्राचीन कालीं साहित्य-शास्त्रांतसुद्धा आमच्या स्त्रियांची प्रगति किती मोठी होती ह्याची कल्पना करतां येईल. सारांश, स्त्रीशिक्षणाशिवाय आमचा समाज सर्वांगपरिपूर्ण होणें शक्य नाही. समाज अशिक्षित असतां वाङ्मयाची वाढ कशी व्हावी? शिक्षणाविषयी सर्वसाधारण उत्कटता ही राष्ट्रीय नवजीवनाची खूण आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वी स्त्रियाही शास्त्रीय विषयांवरील व्याख्यानांना हजर असत. इटलीच्या इतिहासांतहि हीच गोष्ट दृष्टीस पडते. रात्रीच्या जागरणाची पर्वा न करतां लोक व्याख्यानास हजर असत. "Pompeus Lactus was to be seen before daybreak descending the Equiline with his lantern and on reaching his lecture-room found it always filled to over-flowing with pupils who had come at mid night to secure a place." असा शिक्षणाचा सर्वत्र फैलाव केल्या-शिवाय मराठी भाषेची धडगत लागणार नाही. करिता चाळींतून स्त्रियांकरिता पुस्तकालयें स्थापण्याबद्दल आपणांला माझी आग्रहाची विनंती आहे. आपणांपुढे अनेक मार्ग मोकळे आहेत. व्याख्यानें सुरू करा; अगर ग्रंथकारांपासून उत्तम ग्रंथ लिहिलेले असतील ते विकत घेऊन प्रसिद्ध करा; वाचनवर्ग काढा अगर आणखी ग्रंथ-संग्रहालयें काढा, पण कांहीतरी शक्य तितकें अधिक करा. आहे

एवढ्यावर संतोष मानून राहूं नका. परंतु असले प्रयत्न यशस्वी होण्यास सहकारिता पाहिजे; समानचित्त पाहिजे. ही गोष्ट संपादन करण्याकरितां वैदिक मंत्राने आपली प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

**"समानो मन्त्रः समितिः समानी समानं मनः सहचित्तमेषाम् ॥**
**समानं मन्त्रमभिमन्त्रये वः समानमेनं हविषा जुहोमि."**

———

नं.
ता.

# मराठी भाषेचा फुलोरा*

मित्रहो, या वार्षिकोत्सवाच्या प्रसंगीं आजपर्यंत जे अनेक नामांकित विद्वान् आणि मराठी भाषेचा दांडगा व्यासंग असणारे अध्यक्ष होऊन गेले, त्यांच्या पंक्तीला आपण मला आज आमंत्रण देऊन बसविलें व त्यामुळे मला पांक्त होण्याचें पुण्य आपण जें संपादन करून दिलें, त्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहें.

आजच्यासारख्या ग्रंथसंग्रहालयाच्या वाढदिवसानिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या प्रसंगीं ग्रंथांच्या वाढीची चिकित्सा करणें ओघानेच प्राप्त होतें. ग्रंथांचा संग्रह ज्या ठिकाणीं केला जातो, त्या स्थानाला ग्रंथसंग्रहालय ही संज्ञा आपण दिली हें युक्तच होय. ग्रंथ असल्याशिवाय ग्रंथांचा संग्रह कोणी करीत नाही हें उघडच आहे. आणि ग्रंथ संग्रहित करण्याचें आपण योजिलें म्हणजे त्यासाठी निवाऱ्याचें स्थळ पाहणें अवश्य होतें. थोड्याशा पुस्तकांवर व्यापार करणारा मनुष्य ज्याप्रमाणे आपलें दुकान रस्त्याच्या कडेवर पसरून बसतो, परंतु त्याचा तो धंदा वाढत जातांच ज्याप्रमाणे त्याला मोठ्या व सोयिस्कर स्थलाची अवश्यकता भासते, त्याप्रमाणे आज ३५ वर्षे मिळेल त्या जागेंत ग्रंथांची जोपासना करण्याची दक्षता व लोकांची वाचनतृष्णा भागविण्याची आपली उत्कंठा हीं जरी अवर्णनीय असलीं, तरी त्यांनी आपलें समाधान न होऊन आपण आता मराठींतील सारख्या वाढत जाणाऱ्या ग्रंथसंपत्तीची व्यवस्था स्वतःच्या योग्य व उपयुक्त अशा ग्रंथशाळेंत करण्याचें योजिलेलें ऐकून कोणासहि साभिमान आनंदच वाटेल.

---

* 'मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें' ह्या संस्थेच्या २६ व्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं ता. ३० जून १९२१ रोजीं केलेलें भाषण.

ग्रंथ लिहिण्याची जशी एक कला आहे त्याचप्रमाणे ग्रंथ व्यवस्थित रीतीने ठेवणें हीहि एक कला आहे. गृहस्थाश्रमी मनुष्य आपल्या आश्रमाला अवश्यक व उपयुक्त होईल अशी आपल्या गृहाची रचना करितो, त्याचप्रमाणे ग्रंथसंग्राहक आपल्या ग्रंथालयाची उभारणी करतो यांत शंका नाही.

आपला ग्रंथसंग्रह मराठी भाषेपुरताच आहे हें सांगावयास नकोच. या ग्रंथसंग्रहालयाने मराठी भाषेचा उत्कर्ष होईल अशी आपली सर्वांचीच अपेक्षा आहे. तथापि कोणत्याहि भाषेचा व त्या भाषेंतील वाङ्मयाचा उत्कर्ष या दोहोंचा विचार करतांना जी गोष्ट प्राधान्येंकरून आपल्या मनश्चक्षूंपुढे उभी राहते, तिच्याकडे कोणीहि दुर्लक्ष करून चालणार नाही. आपलें मनोगत दुसऱ्यास कळावें एतदर्थ भाषा अस्तित्वांत आली असें भाषाकोविदांचें म्हणणें आहे. जगांतील पुष्कळ लोक भाषेचा उपयोग आपल्या स्वतःच्या गरजा भागविण्याकरिता करीत असतात. “ मला पुस्तक पाहिजे, तें दे.” “ मला क्षुधा लागली, अन्न द्या.” “ तूं माझ्या वाटेंत उभा राहूं नकोस.” इत्यादि आपलें कार्य साधण्याकरिता प्रत्येक मनुष्य भाषेचा उपयोग करीत असतो. याव्यतिरिक्त भाषेचा अन्य उपयोग करणारे थोडेच. आपल्या स्वतःचें जीवन चालण्याकरिता आपण भाषा वापरतों तेव्हा ती नुसती बोलण्याचीच भाषा असते. कारण अशा कामाकरिता लिहिण्याच्या भाषेचें अथवा लिपीचें प्रयोजन उत्पन्नच होत नाही. अशा या बोलण्याच्या भाषेवरच आजन्म निर्वाह करणारे असंख्य लोक आजमितीस या जगामध्ये आढळतात. अशा लोकांना कोणतीहि भाषा अपुरी आहे अशी तक्रार करतांना कोणी ऐकलें नाही; अर्थात् जोंपर्यंत भाषेचा उपयोग स्वतःच्या कामना तृप्त करण्याकडेच केला जातो, तोंपर्यंत त्या भाषेंत लिपीची अथवा ग्रंथलेखनाची उत्पत्ति होत नाही. पण शारीरिक गरजा भागविण्यापलीकडे आपली जेव्हा प्रगति होते, आपली बुद्धि ज्या वेळीं काम

स्थान प्रत सं. नं. ता.

करूं लागते, जेव्हा आपणांस विचार करण्याची सवय जडते आणि त्या विचाराचें फळ म्हणून इतरांस शिकविण्याची पात्रता उत्पन्न होते, अथवा वर्तमान आणि भावी जगाला शिकविण्याची तळमळ जेव्हा हृदयांत लागून राहते, तेव्हाच त्या भाषेंत ग्रंथ निर्माण होतात. यावरून ग्रंथनिर्मितीचें कारण व ग्रंथनिर्मितीचा काळ केव्हा येतो हें आपल्या ध्यानांत येईल. मला भाषा बोलतां येते, एवढ्याचकरिता मी ग्रंथ लिहूं शकेन असें म्हणणें किंवा समजणें किती अयोग्य आहे हेंहि आपणांस यावरून दिसून येईल. दुसऱ्याला शिकवण्यासारखें जोंपर्यंत माझ्याजवळ कांही नाही, माझ्या बुद्धीचा विकास जोंपर्यंत येथवर झालेला नाही, तोंपर्यंत मी खरा ग्रंथकार होऊं शकत नाही हें उघड आहे. वर सांगितल्याप्रमाणे बहुजनसमाजाच्या संबंधाने असेंच म्हणावें लागतें की, त्यांच्या भाषेचें निमित्तकारण त्यांच्या आधिभौतिक गरजा होत; पण ग्रंथलेखनाचें कारण मनुष्याच्या बुद्धीची चळवळ होय.

म्हणून स्वराज्याच्या विस्ताराने भाषाभिवृद्धि झाली तरी ग्रंथ-संपत्तीची वाढ होईलच असा नियम नाही. अतिशय लहान समाज असूनहि उत्तम प्रकारची ग्रंथरचना समाजाकडून होण्याचा संभव असतो. स्वराज्याच्या विस्तारापासून वाङ्मयाभिवृद्धीला अप्रत्यक्षपणें फायदा होईल एवढें मात्र खरें; आधी स्वराज्याचा विस्तारच मुळी बुद्धिमत्तेवांचून होत नाही. तथापि स्वराज्यस्थापनेच्या कामीं अव-श्यक असणारी बुद्धिमत्ता ग्रंथरचनेला उपयुक्त होईलच असा नियम नाही. अगदी छोट्या ग्रीकसमाजाने जगांत श्रेष्ठ दर्जाची वाङ्मय-विषयक कामगिरी केली हें आपणांस माहीतच आहे.

कोणत्याहि भाषेंतील ग्रंथसंपत्तीला वाङ्मय असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. याचें कारण असें दिसतें की, दुसऱ्याला शिकविण्याची योग्यता मनुष्याच्या अंगीं प्रथम आली आणि नंतर मनुष्याने आप-ल्या बुद्धीने लिपीचा शोध लावला. दुसऱ्याला शिकविण्याची पात्रता

व लेखनकला यांचा एकसमयावच्छेदेंकरून उद्भव झाला असता तर वाङ्मयाच्याऐवजी आक्षर ही संज्ञा प्रचारांत आली असती; आणि हाच कार्यकारणभाव सयुक्तिक दिसतो. विचारशक्तीच्या जोरावर मनुष्याला जेव्हां कांहीं नवीन गोष्टी सुचल्या, तेव्हां त्या लोकांना समजावून देणें हेंच त्याचें पहिलें कर्तव्य झालें. म्हणून पुष्कळ काळपर्यंत अशा विचारी पुरुषानें विचार करण्याची सवय न लागलेल्या इतरांना तोंडींच आपले विचार समजावून द्यावे असें झालें. पण मनुष्याच्या नश्वरतेबरोबर त्याचे स्वतंत्र विचार अथवा नवीन शोध हेहि नश्वर होण्याचा संभव असल्यामुळे बऱ्याच काळ-पर्यंत तरी आपल्या निधनानंतरहि आपले शब्द लोकांना ऐकाव-यास मिळावे या तीव्र उत्कंठेने लिहिण्याची युक्ति अथवा लिपि अस्तित्वांत आली असली पाहिजे.

मनुष्याचें विचार तो लेखनद्वारा प्रकट करूं लागला तर शब्दो-च्चाराचा प्रसंग नसल्यामुळे या लेखनाला वाङ्मय ही संज्ञा लावणें फारसे युक्त नाहीं असा आक्षेप येण्यासारखा आहे. पण आक्षर म्हणा अथवा वाङ्मय म्हणा, त्याचें मूळ बुद्धिविकासांत आहे ही गोष्ट प्रत्येकानें ध्यानांत ठेवली पाहिजे. आणि अशाच स्वरूपाच्या लिखाणाला अथवा भाषणाला वाङ्मय म्हणून म्हणतां येईल. आपण जें कांहीं बोलतों अथवा लिहितों, त्या सर्वांचा अंतर्भाव वाङ्मयांत करणें इष्ट नाहीं. नाहीं तर कोर्टांत अर्ज लिहिणारा वकील व जिन-सांचें बिल करणारा दुकानदार यांचीहि वाङ्मयक्षेत्रांत गणना करावी लागेल. "मला पाणी दे" असें मी म्हटलें किंवा कागदावर लिहिलें तरी तें वाङ्मय होत नाहीं, हें निराळें सांगावयास नकोच. या मूल-भूत गोष्टी एकदा आपणांस समजल्या म्हणजे कोणत्या ग्रंथाची किती योग्यता आहे हें निश्चित करण्यास आपणांस किमपि अड-चण पडणार नाहीं. वाङ्मय, सारस्वत आणि साहित्य, असे तीन शब्द आपल्या भाषेंत रूढ आहेत. त्या प्रत्येकाचें अधिकारक्षेत्र

आपणांस ठरवितां येण्यासारखें आहे. कोर्टांतील अर्ज व दुकानदारांचीं बिलें यांचा अंतर्भाव जर वाङ्मयांत करावयाचा असेल, तर खऱ्या वाङ्मयाला अथवा दुसऱ्यास कांहीं नवें शिकविण्यासाठी जेथे भाषेचा उपयोग केला जातो त्याला सारस्वत ही संज्ञा उपयोगांत आणावी. अर्थात् रसायनशास्त्र, वैद्यशास्त्र, खनिशास्त्र, भूशास्त्र, इत्यादि शास्त्रीय ग्रंथांचा समावेश सारस्वतांत झाला पाहिजे हें उघड आहे. आता साहित्य हें जरी सारस्वतांत अंतर्भूत होत असलें तरी कादंबऱ्या, नाटकें, काव्य, इत्यादि विदग्ध वाङ्मय साहित्य या शब्दाने ओळखलें जातें यांत संशय नाही. तात्पर्य, मराठी भाषेचा अथवा वाङ्मयाचा जेव्हा आपण विचार करावयास लागतों, तेव्हा आपण फक्त सारस्वताचाच विचार केला पाहिजे. सारस्वतांतून साहित्य एकीकडे केल्यावर जें बाकी सारस्वत राहतें, त्याचमुळे भाषेचा अथवा वाङ्मयाचा उत्कर्ष आपणांस ताडतां येतो. कादंबऱ्या, नाटकें व काव्य यांच्या द्वारा मनुष्य दुसऱ्यास नवीन विचार सांगू शकत नाही असें नाही. परंतु शिकविण्याची ही अप्रत्यक्ष तऱ्हा होय. या तिन्ही प्रकारच्या वाङ्मयाचा मुख्य उद्देश इतरांचें मनोरंजन हा असतो. शिकवणूक हा गौण हेतु होय. कादंबरीकार, नाटककार अथवा कवि आपल्या लिहिण्याने लोकांचें मनोरंजन न करतां आपणांस कळलेल्या व इतरांस अज्ञात असलेल्या गोष्टीच सांगण्याचा प्रयत्न करील, तर तो कादंबरीकार, नाटककार किंवा कवि या संज्ञेला पात्र होणार नाही. कादंबरी, नाटक किंवा काव्य यांनी मन उल्लसित होतें, पण बुद्धीस शीण पडत नाही. म्हणून सारस्वतांतील साहित्य हा एक कप्पा कमी दर्जाचा आहे असें म्हणावें लागतें. परंतु चमत्कार हा कीं, या वेदत्रयीलाच आज सर्व उचलून धरीत आहेत. कोणत्याहि शिकवणुकींत सत्यकथन हें असलेंच पाहिजे; परंतु कादंबरी किंवा कविता यांचा सत्य हा आत्मा नव्हे. सत्यापासून जेवढा कवि दूर जातो तेवढा तो अधिक श्रेष्ठ म्हणून

समजला जातो. सत्यकथनांत रूपकादि अलंकारांना अवकाश नसतो. आणि काव्याचा तर अलंकार हा प्राणच समजला पाहिजे. समाजाच्या बाल्यावस्थेंत काव्याचा उपयोग मनुष्यांना नीतिमान् व धर्मनिष्ठ करण्याकडे केला जातो, तर तो समाज वैभवाच्या कळसास पोचला असतां तेथून मनुष्याला खालीं ओढण्यास काव्य, नाटकें व कादंबऱ्या कारणीभूत होतात. कारण या वेळीं शिकविणें हा गौणहि हेतु त्यांत असत नाही. केवळ मनाला रिझविणें हाच समाजाच्या भरभराटीच्या दिवसांत कविश्रेष्ठांचा उद्देश असतो. अज्ञान समाजाला समंजस करण्याचें काम लावण्या व लघुकथा व लावण्याहून अधिक श्रेष्ठ दर्जाचें काव्य हीं करूं शकतात. नाटकें व कादंबऱ्या यांचा उद्भव पाठीमागूनच होतो. या दृष्टीने विचार केला असतां समाजाच्या उन्नतावस्थेला साहित्य हें फार तर पर्यायाने उपकारक असूं शकेल इतकेंच म्हणतां येईल. म्हणून साहित्यसंमेलन व साहित्यपरिषद् हें अभिधान थोडेंसे अनुचित दिसतें. समाजाच्या प्रगतीला जें वाङ्मय कारणीभूत होतें, तें साहित्य नसून साहित्येतर होय. अशा वाङ्मयांत इतिहास, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र व बाकीचीं आधिभौतिक शास्त्रें एवढ्यांचाच अंतर्भाव होईल. तेव्हा सर्व राष्ट्रहितेच्छूंनी आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष मापावयाचा असेल तर तो वरील विषयांवर जे ग्रंथ निर्माण होतील, त्यांच्या अनुरोधानेच मोजला पाहिजे. विदग्ध वाङ्मयाने मनाचा कटकपणा नाहींसा होण्याचा संभव असतो. असा प्रसंग उपरिनिर्दिष्ट सारस्वताने कधीहि येणार नाही.

आमच्यामधील मोठमोठीं विद्वान् समजलीं जाणारीं माणसें, इष्ट तें सारस्वत निर्माण करण्यास मराठी भाषा विकसित झालेली नाही असा आक्षेप आणतात. परंतु या विद्वानांनी हा आक्षेप मननपूर्वक पुढे आणला असेल असें म्हणवत नाही. वर सांगितल्याप्रमाणे आपल्या बुद्धीचा विकास होऊन ज्या वेळेस आपल्या मनांत लोकांना

शिकविण्यासारखे कांही नवीन विचार उत्पन्न होतात, त्याच वेळेस आपल्या हातून ग्रंथलेखन होतें ही गोष्ट ध्यानांत ठेवली तर भाषेची अडचण आपणांस कधीहि अडवणार नाही. कारण, भाषा म्हणजे संकेत आहे व तो आपणच निर्माण केला आहे; आणि तो बुद्धीच्या जोरावर निर्माण केला आहे. तेव्हा जी बुद्धि साधा विचार प्रसवूं शकते ती भाषेचे संकेत प्रसविण्यापुरती वांझ होईल असें मानण्याचें कारण नाही. आपण स्वतः विचार न करितां दुसऱ्याचे विचार निवेदन करण्याचा जेव्हा प्रयत्न करितों, तेव्हाच आपणांस भाषेची अडचण भासते. म्हणजे केवळ भाषांतऱ्याला इतर भाषांतील ग्रंथांचें भाषांतर मराठींत करतां येणार नाही ही गोष्ट कांही खोटी नाही. आणि म्हणून इतर भाषांतील ग्रंथांचीं उतावीळपणाने मराठींत भाषांतरें करण्याचा प्रयत्न यशस्वी होत नाही व होणार नाही. निरनिराळ्या विषयांसंबंधाने स्वतः विचार करण्याची शक्ति आपल्यांत आल्याखेरीज सर्व भाषांतरें निरर्थक ठरतील. विचार करण्याची अथवा शिकण्याची पात्रता समाजांत उत्पन्न झाली नसेल तर पुष्कळ पैसे खर्च करून केलेल्या मोठमोठ्या ग्रंथांचीं भाषांतरें कपाटांत धूळ खातच पडणार.भाषांतर करणाराची योग्यता ज्या विषयांतील ग्रंथांचें तो भाषांतर करील तो विषय पूर्णपणें आकलन करून घेण्याइतकी जर नसेल तर हें भाषांतर करावयाचें तरी कोणाकरिता हा विचारकरण्यासारखा प्रश्न आहे. अशा भाडोत्री वाङ्मयाने खरें सारस्वत निर्माण होत नसतें. मी तर अशा भाषांतरांची योग्यता वाण्याच्या बिलाइतकीहि समजण्यास तयार नाही.

नुसत्या शिक्षणप्रसाराच्या योगानेहि सारस्वताची वाढ होणार नाही. पूर्वीच्या काळचें श्रवण व हल्लींचें वाचन यांच्यापलीकडे ज्याची मजल गेली नाही अशा समाजाच्या हातून वाङ्मयविषयक कामगिरी होत नसते. मनन म्हणजे विचार हें सारस्वताचें बीज होय. सांप्रत आपल्या समाजांत श्रवणवाचनाचा व्यवहार जरी दर-

रोज चालू असला, तरी त्याला मननाची म्हणजे विचाराची जोड नसल्यामुळे आपल्या हातून चांगली ग्रंथसंपत्ति निपजविली जात नाही.

असो. यानंतर सारस्वताचें निराळ्या दृष्टीने वर्गीकरण करणें अवश्य आहे. कांही ग्रंथ संकलनस्वरूपाचे असतात. संकलन म्हणजे जें कांही अस्तित्वांत आहे तें एकत्र करून जगापुढे मांडणें. त्याप्रीत्यर्थ संग्राहकाला बरेच परिश्रम करावे लागतात व थोडीशी बुद्धिहि लागते. तसेंच, अशा प्रकारचें वाङ्मय समाजाच्या प्रगतीला पोषक होतें हेंहि निर्विवाद आहे. तथापि सामान्य बुद्धीचीं माणसें अशा प्रकारचें संकलनकार्य करूं शकतात. यामध्ये सर्व कोशकार येतात हें निराळें सांगणें नकोच. बरेचसे ग्रंथ पूर्वी ज्यांनी स्वतंत्र विचाराचीं पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांचें स्पष्टीकरण करणारेच असतात. अशा ग्रंथांचेंहि महत्त्व अर्थात् दुय्यम दर्जाचें असतें हें उघड आहे. इतिहासकार हा कोशकाराहून उच्च दर्जाचा असला तरी दोघांची जात एकच मानल्याशिवाय गत्यंतर नाही असें मला वाटतें. समाजशास्त्राला आधारभूत जे इतर विषय त्यांचाहि यांतच अंतर्भाव केला पाहिजे. सर्व जगाला कांही तरी नवीन सांगण्याचें महत्कार्य ज्याच्या हातून घडतें तोच खरा ग्रंथकार होय. तत्त्वज्ञान व आधिभौतिक शास्त्रें यांमध्ये अशा बुद्धिमान् माणसाला बराच अवकाश मिळतो. त्रिकालाबाधित सत्य प्रतिपादन करणारे ग्रंथ फारच थोडे असतात. सद्यःस्थितीला अनुसरून काय केलें पाहिजे हें प्रतिपादन करणेंच सर्वांना अवश्य असतें. अशा प्रकारच्या ग्रंथांची निपज समाजांत नेहमी वाढत्या प्रमाणांत असते. पूर्वीच्या व हल्लीच्या काळांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलें आहे. प्राचीन काळीं ज्याला कांही नवीन विचार सुचत तो ते ताडपत्रावर लिहून ठेवी; व आपले हे विचार थोड्याशा विद्वानांसच समजावे इतकीच त्याची अपेक्षा असल्यामुळे विद्वत्परिषदेंत आपला ग्रंथ वाचून दाखविण्याने त्याला आपलें कार्य साधतां येत असे. विद्वानांनी जी गोष्ट मान्य केली ती बाकीचा

समाज बिनदिक्कत ग्रहण करी. त्यामुळे ग्रंथ लिहिणें कोणालाच जड वाटत नसे. परंतु आता छापण्याच्या कलेचा शोध लागल्यापासून समाजांत बहुविध क्रांति घडून आली आहे. एका दृष्टीने ही छापण्याची कला ग्रंथोत्तेजनाला उपकारक नसून अपकारक होते असें वाटूं लागतें. कारण एखाद्या खऱ्या विद्वानाने स्वतंत्र विचारांचा ग्रंथ लिहिण्याचें मनांत आणल्यास त्याला प्रथम पैशाची अडचण पडते. पूर्वी हा विचार मनांत येण्याचें कारणच नसे. छापण्याचें अशक्य असल्यास हल्ली कोणीहि मनुष्य नुसता हस्तलेख लिहून ठेवण्याच्या भानगडींत पडत नाही. छपाईचा खर्च निदान सुटेल इतकी तरी पुस्तकाची विक्री होणें सध्याच्या स्थितींत अवश्य आहे. पण ग्रंथांच्या योग्यतेचें व विक्रीचें मान व्यस्त प्रमाणांत असतें असा अनुभव आहे. अर्थात् यावरून हेंच सिद्ध होतें की, आपला समाज अद्यापि निर्बुद्धावस्थेंत आहे. विचार करण्याचें सामर्थ्य अद्याप आपल्या समाजांत उत्पन्न झालेलें नाही. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे परमेश्वराने दिलेल्या बुद्धीचा उपयोग आपण अद्याप करूं लागलों नाही. बुद्धीच्या विलासाचा आनंद काय आहे याची आपणांस अद्याप जाणीवहि उत्पन्न झाली नाही. घरांतील दिवाणखाना आपण टेबल, खुर्च्या, आरसे, तसबिरी इत्यादि जड वस्तूंनी शोभवितों, आणि त्यांतच आपणांस आनंद होतो; अशा दिवाणखान्यांत एकहि ग्रंथ नसला तरी त्यामुळे आपल्या मनाला यत्किंचितहि व्यथा होत नाही. वस्तुतः ग्रंथाव्यतिरिक्त शोभविलेला दिवाणखाना म्हणजे कुंकुमतिलकविहीन अशा स्त्रीसारखा होय. अशा सुतकी दिवाणखान्यांत बसून आपल्याला हर्ष होतो; यावरून हें उघड दिसतें की, शारीरिक सुखापुढे आपल्या आनंदाची कल्पना गेलेली नाही. ठाकूर, कातकरी, अंगभर घोंगडी मिळाल्याने जसे संतुष्ट होतात, तसे आपणहि बसण्यास कोच मिळाला म्हणजे संतुष्ट होतों. यावरून आपण ठाकूर-कातकऱ्यांपेक्षा विशेष मजल मारिली आहे असें दिसत नाही.

हल्ली आपणांस जें शिक्षण मिळतें तें कारकुनी पेशाचें असल्यामुळे ग्रंथोत्तेजनाला अगदी निरुपयोगी पडतें यांत आश्चर्य नाही. हल्ली आपल्या सर्व शिक्षणाची तऱ्हाच अशी झाली आहे की, दुसरा काय म्हणतो हें आपणांस बोलतां आलें म्हणजे झालें. मी काय स्वतः म्हणतों याचा विचार कोणाच्याच मनास शिवत नाही. मी काय म्हणतों व मला काय वाटतें हें जाणणें हेंच माझें ध्येय असलें पाहिजे. तें ध्येय गाठण्याकरितां कदाचित् दुसरा काय म्हणतो हें समजून घ्यावें लागेल. परंतु दुसरा काय म्हणतो हें समजण्यापर्यंतच आपली धांव संपतां कामा नये. परंतु दुःखाची गोष्ट ही की, विश्व-विद्यालयांतील विद्वानांना ही गोष्ट अद्याप समजली नाही. सर्व परीक्षांचा रोख विद्यार्थ्यांना दुसरा काय म्हणतो एवढेंच थोडेंबहुत ठाऊक असावें असा असतो. ही सर्व स्थिति बदलून आपला समाज अशा अवस्थेप्रत येऊन पोचला पाहिजे की, निरनिराळ्या विषयांत प्रत्येक माणसाला मी काय म्हणतों हें सांगतां यावें.

इतिहास, आध्यात्मिक व आधिभौतिक शास्त्रें या विषयांवर जेव्हा उत्कृष्ट ग्रंथ निर्माण होतात, तेव्हाच त्या समाजाची स्थिति स्पृह-णीय असते. कारण, प्रगतिपर व भरीव वाङ्मय हें एवढेंच. अध्या-त्मांत मी धर्मशास्त्राचा समावेश करीत नाही. धर्मशास्त्राला धर्मशास्त्र म्हणणें हीच आधी चुकी होय. शास्त्राला हेतु असतो, कार्यकारण-भाव लागतो. पण धर्म म्हणजे ईश्वरप्रणीत नियम किंवा आज्ञा एवढा अर्थ केल्यास तेथे हेतूचा अथवा कार्यकारणभावाचा ऊहापोह करणें अक्षम्य ठरतें. परमेश्वराची आज्ञा एवढ्याचसाठी ती आपणांस वंद्य असल्यामुळे ती आज्ञा कोणत्या हेतूने केली अगर कोणतें कार्य साधण्याकरितां केली याचा विचार करणें धाष्टर्यच होय. म्हणून धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत होत असें जे लोक मानतात, त्यांच्यांत धर्मविष-यक ग्रंथ निर्माण होणें अशक्य असतें; व अशा समाजाची बुद्धिहि एकंदरींत आकुंचितच होते. सुदैवानें आपल्याकडे आपण ज्यांना

नं. ता.

धर्मशास्त्र म्हणून म्हणतों असे जे स्मृतिग्रंथ ते ईश्वरप्रणीत आहेत अशी आमची कल्पना नसल्यामुळे आपल्याकडे धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ होऊं शकले. परंतु मला वाटतें, स्मृतिकारांनी ज्या विषयांसंबंधी नियम घालून दिले आहेत, त्यांपैकी बहुतेक विषय इतःपर समाजशास्त्रांत अंतर्भूत करावे लागतील. धर्मशास्त्राप्रमाणे नीतिशास्त्रालाहि स्वतंत्र असें अस्तित्व नाही; आणि आपल्याकडे नीति शब्द निरनिराळ्या शास्त्रांना लावण्याचा जो प्रघात आहे तो हीच गोष्ट सिद्ध करतो. यापुढे समाजशास्त्र महत्त्व पावणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. युरोपमध्येंहि या शास्त्राचा प्रादुर्भाव नुकताच झाला असल्यामुळे आमच्याकडे हें शास्त्र अद्याप अस्तित्वांत आलें नाही यांत आश्चर्य नाही. तथापि मन्वादि स्मृतिकार हे धर्मशास्त्रकार होते असें न मानतां ते मोठे समाजशास्त्रज्ञ होते असें जें मला वाटतें तें योग्य असेल, तर समाजशास्त्राचा उदय प्राचीन काळींच झाला आहे असेंच म्हणावें लागेल; व एका अर्थीं तें खरेंहि आहे. कारण न कळत का होईना पण समाजशास्त्राचे नियम थोड्याबहुत प्रमाणाने प्रत्येक समाजाला पाळावेच लागतात. समाजाचा उत्कर्ष कसा होतो, त्याच्या पायऱ्या कोणकोणत्या, निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या अवस्थेंत, निरनिराळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या समाजांचें स्वरूप कसें असतें, इत्यादि गोष्टी समाजशास्त्राच्या अध्ययनानेच निश्चित करतां येतात. आपला हिंदु समाज अत्यंत प्राचीन असल्यामुळे व त्याने आपल्या अत्यंत प्राचीन चालीरीति जपून ठेवल्यामुळे समाजशास्त्रांत आपण मोठें कार्य करूं शकूं.

आपल्या समाजाचें विद्यमान स्वरूप काय आहे हें समजल्याशिवाय कोणत्याहि समाजाच्या सुधारणेचा घाट घालणें फलद्रूप होणार नाही. म्हणून आपल्या या अफाट देशांत असंख्य जातींतील लोकांच्या चालीरीतींची नोंद करणें अगत्याचें आहे व तें कार्य घरीं बसून प्रत्येकाला करतां येण्यासारखें आहे. ही गोष्ट जर आम-

-च्या विश्वविद्यालयांतील बाहेर पडलेल्या सुशिक्षितांच्या आदरास पात्र झाली तर समाजशास्त्रावर शेकडों किंवा हजारों ग्रंथ एकदम होऊं शकतील. राजनीतिशास्त्राचा उल्लेख मी मुद्दामच गाळला आहे. कारण परकीय अमलाखाली वावरणाऱ्या लोकांना या विषयावर फारसें लिहितां येईल असें मला वाटत नाहीं; व लिहितां आलें, तरी तें लिहिण्यास कोणास फुरसतहि होणार नाहीं. परकीय अमलांत जे दोष असतात ते आपल्या देशबांधवांच्या निदर्शनास आणणें व ते त्यांना पटवून देणें व अशा रीतीने सरकारास राज्यपद्धति बदलावयास लावणें हेंच राजकारणांत पडलेल्या माणसांचें काम मुख्यतः होऊन बसतें. असल्या प्रकारचें वाङ्मय अर्थात् टिकाऊ स्वरूपाचें नसणार हें उघड आहे. समाजसुधारणा घडवून आणणें – आणि समाजसुधारणेंत व्यापक अर्थाने राजकारणाचाहि अंतर्भाव होतोच – हें आता बहुजनसमाजाच्या पसंतीवर अवलंबून असल्यामुळे आपलें सर्व लिहिणें लोकांना पटेल अशा तऱ्हेने लिहावें लागतें. म्हणजे समाजांत चळवळ उत्पन्न करणें हा हल्लीच्या लिहिण्याचा प्रायः हेतु असतो. याचा परिणाम लेखनपद्धतीवरहि होतो, हें विसरतां कामा नये. विद्वान् लोकांनाच समजेल अशी भाषा वापरणें अथवा अशीं प्रमाणें मांडणें टाळावें लागतें. भौतिक शास्त्रांत नवीन शोध व संशोधन करण्यास फार जागा आहे. आध्यात्मिक विषयांत मात्र आमच्या दृष्टीने नवीन विचारांची भर घालतां येईल असें वाटत नाहीं. इतिहास हा एकच विषय असा वाटतो कीं, तो कधी पूर्ण झाला असें म्हणतां येणार नाहीं. मात्र इतिहासशास्त्र म्हणून जें आहे त्याला शेवटची मर्यादा असते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सारांश, नाटकें, कादंबऱ्या व कविता ही त्रयी बाजूस ठेविली तर इतिहास व समाजशास्त्र यांमध्येच आपणांस नवीन संशोधनपूर्वकहि असें लिहितां येण्यासारखें आहे. आधिभौतिक शास्त्रांत नवीन संशोधनाची संधिच आपणांस मिळत

नाहीं, हीं दुर्दैवाची गोष्ट आहे. तथापि सर जगदीशचंद्र बोस यांच्या पुढाकाराखाली आधिभौतिक शास्त्रांचें स्वतंत्र विद्यापीठ निर्माण केल्यास त्या विषयांतहि आपणांस वाङ्मयाच्या दृष्टीने प्रगति करून घेतां येण्यासारखी आहे. पण आमच्या गुलाम बनलेल्या बुद्धीला ह्या गोष्टी सुचत नाहीत व सुचणार नाहीत ही नाइलाजाची गोष्ट होय.

ह्यापुढे कोणत्याहि भाषेंतील सारस्वत किंवा वाङ्मय ध्येयशील अथवा केवळ तात्त्विक असण्याचा रंग दिसत नाही. तें सामाजिक, व्यावहारिक असेंच असणार. सध्या जगाची राहटी पाहिली तर असें दिसतें कीं, कोणास क्षणाचेंहि स्वास्थ्य नाहीं; आणि आजची स्थिति उद्या टिकत नाही. गडबड आणि चांचल्य हा ह्या युगाचा धर्म दिसतो. त्याचप्रमाणे आधिभौतिक शास्त्रांची छाप सर्वत्र पसरलेली दिसते. आधिभौतिक सुखसोयींचीं साधनें वाढविण्यांत सर्व जग गर्क झालेलें दिसतें. तस्मात् ह्याला अनुरूप असेंच वाङ्मय निर्माण होणार हें खास. प्राचीनकाळचें वाङ्मय निराळ्या परिस्थितींत जन्मास आल्यामुळे त्याचें स्वरूपहि हल्लीच्या वाङ्मयाहून निराळें होतें, हें सांगावयास नकोच. पूर्वी विचारशक्तीची अखेरची सीमा गाठणें हाच उत्कृष्ट वाङ्मयाचा हेतु गणला जात असे. पण सांप्रत आपलें वर्चस्व किंवा छाप इतरांवर पडावी, इतरांना आपल्या विचाराच्या कक्षेखाली ओढावें हाच मुख्यत्वेंकरून आपल्या लिहिण्याचा उद्देश असतो.

प्राचीन वाङ्मयाची इमारत कल्पनाशक्ति व तर्क यांवर उभारलेली असे. पण आजकालचा तत्त्ववेत्ता अथवा विद्वान् यास पर्वतप्राय संशोधन करून त्या संशोधनाच्या पायावर सिद्धान्त उभारावयाचे असतात. आधुनिक काळाच्या वाङ्मयांत समाजसुधारणेची ( हा शब्द व्यापक दृष्टीने योजिला आहे ) उत्कटता दिसून येते. अन्नवस्त्राच्या समृद्धीच्या काळांत आर्थिक प्रश्न उद्भवण्याचा संभव

कमीच असतो. आजवर अशिष्ट मानल्या जाणाऱ्या जनसमूहांत समतेच्या कल्पना, अधिकाराविषयी प्रबल इच्छा आणि सांपत्तिक सुधारणेविषयी उत्कंठा याविषयी तळमळ लागल्यामुळे आजकालच्या वाङ्मयावरहि या विचारांची छाप पडणें स्वाभाविक आहे. स्वराज्य असतें तर ही तळमळ अधिक व्यक्त स्वरूपांत पाहावयास मिळाली असती. हे अशिष्ट लोक खेड्यापाड्यांत रहात असल्यामुळे खेड्यापासून अलग राहणाऱ्या ग्रंथकारांना ह्या क्रांतीचें वास्तविक स्वरूप जर कल्पनेने आकलन करतां आलें नाही, तर त्यांची ग्रंथरचना अर्थशून्य, पोकळ, अवास्तव अथवा बेगडी स्वरूपाची झाल्याशिवाय राहणार नाही.

समाजाच्या उत्कर्षाला जें सारस्वत कारणीभूत होतें तें भाषेच्या दृष्टीने पहिल्या प्रतीचें असतें असें क्वचित् होतें. भाषेचा खराखुरा विलास पहावयाचा असेल तर आपणांस ललितवाङ्मयाकडेच वळलें पाहिजे. सुंदर, रमणीय, हृदयंगम, अलंकारिक अशा भाषेचा विनियोग शास्त्रीय ग्रंथ लिहितांना करतां येत नाही व करणें इष्टहि नाही. यामुळेच ललितवाङ्मय हेंच काय तें वाङ्मयसर्वस्व अशी लोकांची समजूत होते. नाटकें, कादंबऱ्या व कविता हीं सर्व काव्य या शब्दानेच ओळखलीं जातात हें "काव्येषु नाटकं रम्यम्" या म्हणीवरून सिद्ध होतें; आणि तें बरोबर आहे. कारण या सर्वांचें मुख्य लक्षण एकच आहे आणि तें रमणीयता हें होय. पण शास्त्रीय ग्रंथांना रमणीयतेची शिफारस कधीहि खपणार नाही. काव्यकारांच्या अंगीं कमी गुण असलेले चालतात असें नाही. भाषेवर प्रभुत्व, भाषाशास्त्राचें अध्ययन, मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान, चातुर्य, बहुश्रुतपणा, कल्पकता, निरीक्षणशक्ति इत्यादि अनेक गुणांची देणगी परमेश्वराने दिली नसल्यास उत्कृष्ट काव्य निर्माण करतां येणार नाही अशी माझी समजूत आहे. म्हणून सारस्वतलेखक आणि काव्य लेखक यांच्यांत बुद्धिमत्ताविषयक भिन्नता फारशी नसली तरी कार्याच्या

दृष्टीने सारस्वताला महत्त्व अधिक आहे. कारण तें अधिक उपयुक्त असतें. काव्याचे भोक्ते पुष्कळ असतात; का कीं त्याने मनोरंजन होतें. सारस्वतग्रंथ हातांत धरणारे फार थोडे. फुरसतीच्या वेळीं किंवा कंटाळा आला असतां आपण नाटक अगर कादंबरी हातांत घेतों. आपला मुख्य वेळ त्या कामीं खर्च करण्याची आपणांस इच्छा नसते. यावरूनच काव्याची उपयुक्तता कमी ठरते; पण हा नुसता कमी उपयुक्ततेचासुद्धा प्रश्न नाही. समाजापुढे अलभ्य ध्येयें ठेवल्याने समाजाचें अहित होण्याचाहि संभव असतो. स्त्रीपुरुषविषयक प्रेम हा हल्लीच्या नाटककादंबऱ्यांचा विषय होऊन बसला आहे. ह्याची छाप समाजांतील तरुण स्त्रीपुरुषांवर बसून त्यामुळे वैवाहिक संबंधांत क्रांति घडून येणार आहे. नाटककादंबऱ्यांतली नायिका ही सुस्वरूप असावयाचीच. परमेश्वराने सौंदर्याची देणगी ज्यांना दिली नाही अशा स्त्रियांवर प्रेमांध झालेला नायक, कोणालाहि आढळणार नाही. याचा परिणाम असा होणार कीं श्यामवर्ण कुमारिकांना अविवाहित राहण्याची पाळी येईल ! हा प्रसंग अनिष्ट नाही असें कोण म्हणेल ? सौंदर्यावर लुब्ध झालेलें प्रेम सर्वत्र आढळतें. तें निसर्गसिद्ध असतें. तें अर्थात् स्वार्थी असतें. मग नाटककादंबरीकारांनी हेंच ध्येय समाजापुढे मांडण्यांत हेतु काय ? स्त्रीपुरुषांचा समागम समाजहिताकरतांच असतो. या कामीं सौंदर्यापेक्षा सद्गुणांचीच अवश्यकता अधिक. मग सौंदर्यविहीन पण सद्गुणी अशी नायिकाच कादंबरीकारांनी कां नटवूं नये मला समजत नाही. थोडेंसें व्यंग असलें तरी अथवा थोडीशी कुरूप असली तरी अशा कुमारिकेला मी वरीन असें म्हणणारे तरुण पुढे आले पाहिजेत. कादंबरीकारांनी अशा ध्येयाचे नायक नमुन्याकरितां समाजापुढे ठेवावे. हल्लीच्या स्थितींत प्रेमकथा कोणी लिहूं नये असा आग्रह धरिला तरी तो उचितच होईल. या बाबतींत "स्फूर्ति" मासिकाने पाडलेला पायंडा प्रशंसनीय आहे. राज्यकारभारांतील अन्याय व पक्षपात गोष्टींच्या रूपाने

समाजापुढे मांडल्यास नोकरशाहीविरुद्ध लोकमत तयार करतां येईल. पण जींत आवा नाही अशी कादंबरी लिहितां तरी कशी येईल असेंच पुष्कळांस वाटतें. तात्पर्य, कादंबऱ्यांचा उपयोग राष्ट्रसंवर्धनाच्या कामीं आधीच बताबाताचा,पण त्याहि ऐवजी जर ह्या कादंबऱ्यांनी तरुण-तरुणींचें कामसंवर्धन मात्र होऊं लागलें तर त्यांचा निषेध करावा तितका थोडाच. पाशवी वृत्तीला चालन मिळून ज्याच्या योगानें मनोवृत्ति उच्छृंखल बनतात असें वाङ्मय अधम म्हणण्यास हरकत नाही. मराठी भाषेवरील सावट आता कमी होऊन मराठी वाङ्मय-वृक्ष सरसावत चालला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; व वरील फुलोऱ्यानें तो शोभिवंतहि दिसूं लागला आहे. मात्र दुर्गंध पसर-विणारीं फुलें ह्या वृक्षानें धारण करूं नयेत अशीच सर्वांची इच्छा असणार. ह्या प्रेमकथांच्या योगानें सद्वाङ्मय निर्माण होण्यास अड-चण पडते. अशा प्रकारच्या गोष्टी वाचण्याकडे मनुष्यमात्राची सहज प्रवृत्ति असल्यामुळे विचारप्रवर्तक ग्रंथ घेऊन वाचण्याचें कोणाच्याच मनांत येत नाही.महाराष्ट्र अगोदरच दरिद्री;त्यामध्येहि धनिक लोकांचें आणि विद्येचें विळ्याभोपळ्याएवढें सख्य. तेव्हा बुद्धीनें व पैशानें ज्यांची मध्यम स्थितींत गणना होते असे लोक जर निरुपयोगी पुस्तकें वाचण्यांत आपल्या कालाचा व पैशाचा व्यय करूं लागले तर भारदस्त ग्रंथ घेणार कोण व वाचणार कोण? म्हणून अशा-प्रकारचें वाङ्मय सध्याच्या स्थितींत तरी जितकें कमी निपजेल तितकें बरें.

निरनिराळ्या जातीच्या वाङ्मयाचा सद्दीचा काळ असतो. मरा-ठींत प्रथमतःच जें वाङ्मय निर्माण झालें तें साधुसन्तनिर्मित भक्ति-प्रधान असें होतें. ह्या संतवाङ्मयाचा काल पुन्हा येईल असें वाटत नाही. संतांचें वाङ्मय म्हणजे धार्मिक वाङ्मय नव्हे. तथापि ईश्वरा-विषयी जी निष्ठा असावी लागते तिचा ह्या औद्योगिक युगांत पूर्ण अभाव असल्यामुळे तुकाराम–रामदास यापुढे उदयास येणार नाहीत.

संस्कृतांतहि असल्याप्रकारचें वाङ्मय नाही ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. वैदिक ऋषि देवाजवळ आपल्याला पाहिजे त्या वस्तु हक्काने मागतात; पण मराठी संत परमेश्वराजवळ द्रव्य अथवा वैभव यांची याचना करण्याऐवजी त्या परमेश्वराला भाविक अन्तःरणाने आळवितात. मात्र आमच्या संतांच्या तोंडीचें वाङ्मय सर्व जगांत तरी आढळेल की नाही याचा वानवाच आहे. म्हणून ह्या दृष्टीने हें वाङ्मय अलौकिक आहे व त्याबद्दल आपणांस योग्य अभिमान असला पाहिजे. संतवाङ्मयानंतर महाराष्ट्रांत स्वराज्याची स्थापना झाल्यावर बखरी व पोवाडे अस्तित्वांत आले. अर्थात् हें ऐतिहासिक स्वरूपाचें वाङ्मय होय. मराठी साम्राज्याचा लय झाल्यावर इंग्रजांच्या अमदानींत तत्कालीन सर्व विद्वानांची उडी इंग्रजी ग्रंथांवर पडून त्या ग्रंथांचीं मराठींत भराभर भाषांतरें होण्यास सुरवात झाली. सांप्रतकाळीं ब्रिटिश सरकाराबरोबर इंग्रजांच्या आचाराविषयी व हरएक बाबीविषयी अप्रीति उत्पन्न होऊन तत्स्थानी स्वकीयविषयक प्रेम उत्पन्न झालें आहे. त्याचा पहिला दृश्य परिणाम म्हणजे मराठींत संशोधात्मक वाङ्मय झपाट्याने वाढत आहे. ह्या कामीं सर्व श्रेय कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे आणि पुण्याचे भारत-इतिहास-संशोधक-मंडळ यांसच दिलें पाहिजे. त्याचप्रमाणे इतर शाखांतहि इंग्लिश वाङ्मय पुढे ठेवून त्याच धर्तीवर आपलें स्वतंत्र वाङ्मय निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा आजच्या पिढीने धरली आहे.

वरील विवेचनाला अनुसरून मराठी वाङ्मयवृक्षावर आलेल्या फुलोऱ्याच्या विचार करणें अवश्य आहे. परंतु अशा कामीं एक मोठी अडचण उभी राहते ती ही की, बृहन्महाराष्ट्रांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा एकत्र संग्रह जेथे केला जातो असें एकहि स्थळ नाही. सरकारी अहवालांत ब्रिटिश हद्दीच्या बाहेर संस्थानांत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा समावेश होत नाही हें आपणांस माही-

तच आहे. विद्याखात्याचे दिवाण जर खरोखरच विद्याविभूषित असते तर त्यांना विनखर्चाने मराठी, कानडी, गुजराती भाषांतील ग्रंथांचें एक जंगी संग्रहालय सहज स्थापन करितां आलें असतें. ग्रंथकाराला सरकारकडे आपल्या पुस्तकाच्या तीन प्रति पाठवाव्या लागतातच. ह्या पुस्तकांचें सरकार काय करतें असा प्रश्न कोणत्याहि आमदाराने विचारलेला नाही हें आश्चर्य होय. पण या पुस्तकांचा संग्रह जर इतःपर सरकार करूं इच्छील तर अजूनहि लोकांना अतिशय उपयुक्त होईल असें काम सरकारच्या हातून होण्याजोगें आहे. मुंबई इलाख्यांतील भाषांत प्रसिद्ध झालेले इतर इलाख्यांतील ग्रंथहि त्या त्या सरकारांकडून मागवून घेण्याची व्यवस्था करणें कठीण पडणार नाही. पण सरकार हें काम करीपर्यंत वाट पाहत बसणें कोणत्याहि कार्यकर्त्या पुरुषास योग्य वाटणार नाही. म्हणून माझी ह्या संग्रहालयाला अशी सूचना आहे की, व्यवस्थापकांनी आघाडी मारून मराठींत जेथे जेथे म्हणून पुस्तक प्रसिद्ध होईल तेथून तें त्वरित मागवून त्याचा संग्रह करावा. संग्रहालयाने प्रत्येक पुस्तक विकत घ्यावें असा नियम असला पाहिजे. आणि असा नियम एकदा केला म्हणजे कार्यकारी मंडळाच्या मंजुरीची वाट न बघतां चिटणिसाला पुस्तक प्रसिद्ध होतांच खरेदी करतां येईल. पुस्तक जन्मास आलें की त्याला आपल्या ह्या संग्रहालयांत स्थान मिळालेंच पाहिजे. ही गोष्ट आपण प्रयत्न करून घडवून आणावी. पण संग्रहालयांतून जोंपर्यंत सर्वसंग्रह केला जात नाही, तोंपर्यंत ग्रंथसंख्यानाचें काम इतर मार्गाने करणें प्राप्त आहे. सुदैवाने पुष्कळ पुस्तकें ' केसरी ' कडे अभिप्रायार्थ लोक पाठवीत असतात. तेव्हा त्या संग्रहाचाच उपयोग अधिक होईल असें वाटतें. श्री. ज. स. करंदीकर यांनी केसरीच्या अभिप्रायावरून केलेली यादी माझ्या स्वाधीन केली आहे. तिच्यावरून असें दिसतें की, केसरींत १९२८ पासून मार्च १९२९ पर्यंत एकंदर ४१५ पुस्तकांवर अभिप्राय

सं. नं. ता. १३३

देण्यांत आले. 'केसरी' कडे न जाणारीं अशीं पुस्तकें थोडींच असल्यामुळे ही यादी बरीचशी बरोबर असण्याचा संभव आहे. ह्या यादींत सुमारें ३९ चरित्रें, ४ प्रवासवर्णनें, १४ इतिहासावर, सुमारें २२ भौतिक शास्त्रें, उद्योगधंदे वगैरे विषयांवर असून २० टीकात्मक आणि १४ भाषांतरें आहेत. समाजशास्त्राखाली फार तर १५ पुस्तकेंच येऊं शकतील. बाकी जवळ जवळ ३०० पुस्तकें कादंबऱ्या, नाटकें व कविता, या सदरांखाली मोडतात. यावरून व्यक्त होतें की, समाजाच्या प्रगतीला जे ग्रंथ निकामी ठरतात अशाच ग्रंथांच्या फुलोऱ्याने आमचा मराठी वाङ्मयवृक्ष ओथंबलेला आहे.

भाषांतरांत दोन पुस्तकांचा उल्लेख प्रामुख्याने केला पाहिजे. हीं म्हणजे 'कौटिलीय अर्थशास्त्र' व 'ऋग्वेदाचें भाषांतर' हीं होत. ह्या दोन ग्रंथांच्या योगाने महाराष्ट्रसारस्वताचा दर्जा वाढल्याशिवाय राहणार नाही. भाषांतर करण्याचें काम अतिशय कठीण असतें व त्याला बरीच विद्वत्ताहि लागते. ऋग्वेदानंतर ब्राह्मण आणि सूत्रें यांचीं भाषांतरें करण्याचें कोणी मनावर घेईल तर त्याचेहि मराठी भाषेवर उपकार होतील. तसेंच प्राचीन ग्रीक ग्रंथकारांनी हिंदुस्थानासंबंधी जें कांही लिहिलें आहे तेंहि मराठींत आणणें अवश्य आहे. असल्या ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झालीं असतां इंग्रजी न जाणणाऱ्या मराठी विद्वानांना दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याचा प्रसंग पडणार नाही. अर्थशास्त्र व ऋग्वेद यांच्या जोडीला 'अर्थसंग्रह' ठेवल्यावर भाषांतराची यादी जरी अपुरी राहिली, तरी ह्या यादींतील नांवाजण्यासारखा अथवा महत्त्वाचा भाषांतरग्रंथ राहिला नाही हें खास. भाषांतराचा उत्कृष्ट नमुना कोणास पहावयाचा असेल तर तो सध्या 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेंत' प्रि. वै. का. राजवाडे यांचे 'निरुक्तांचें भाषांतर' प्रसिद्ध होत आहे त्यांत पहावयास मिळेल. प्रो. राजवाड्यांसारख्या माणसाला मराठींत निरुक्त

आणण्याची इच्छा झाली हें मराठी भाषेच्या भावी प्रगतीचें शुभ चिन्ह होय. ऋग्वेदाशिवाय इतर वेदांचें भाषांतर करण्याचें काम श्री. राजवाडे यांनी आपल्या अंगावर घेतलें तर महाराष्ट्रावर त्यांचे अनंत उपकार होतील.

ह्या यादींत चरित्रांची संख्या जरी ३९ असली, तरी वाङ्मयाचें वैभव वाढविणारीं अशीं २।३ चरित्रेंच आहेत. मंडलिकांचें चरित्र फार उशिरा का होईना पण तें एकदाचें बाहेर पडलेलें पाहून पुष्कळांना आनंद होईल. कै. विजापूरकरांच्या व्यापाच्या मानाने त्यांचीं दोन चरित्रें प्रसिद्ध होऊन तिसरेंहि प्रसिद्ध होणार आहे, यावरून त्यांच्याबद्दल महाराष्ट्राला किती आदर वाटतो तें समजण्यासारखें आहे. यानंतर टिळक आणि भांडारकर यांचीं चरित्रेंहि त्यांच्या निधनानंतर लौकरच प्रसिद्ध झालीं यावरून महाराष्ट्राची चरित्रविषयक अनास्था लोपली असें म्हणण्यास हरकत नाहीं. भांडारकरांचें चरित्र थोडें पौराणिक पद्धतीवर गेलें आहे. हा दोष न ठेवतां चिकित्सक बुद्धीचा उपयोग करून लिहिलेलें चांगलें चरित्र लवकर निघेल तर हवें आहे. चरित्र लिहितांना चरित्रनायकाच्या कागदपत्रांचा व पत्रव्यवहाराचा उपयोग करण्याची प्रवृत्ति अलीकडे जास्त प्रमाणांत दिसून येत आहे ही अत्यंत प्रशंसनीय गोष्ट होय. तथापि नुसत्या कागदपत्रांच्या साहाय्याने लिहिलेलें चरित्र चांगलें वठेलच असा नियम नाही. चरित्रनायकाचें अंतर्बाह्य स्वरूप ज्याला अवगत आहे अशा माणसाने कागदपत्रांच्या आधाराने लिहिलेलें चरित्र अधिक वाचनीय होईल. अशा दृष्टीने पाहिलें असतां मंडलिक, भांडारकर, विजापूरकर, यांचीं चरित्रें त्यांच्या विद्वान् वंशजांनी अथवा वारसांनी लिहिण्याला प्रवृत्त न होणें हें देशाचें दुर्दैव होय. मंडलिकांच्या चरित्रांत कागदपत्रांचा जरी भरपूर उपयोग केलेला असला तरी तें जंत्रीवजा झालें असून चरित्राची भाषाहि जुन्या काळची आहे; तथापि ह्या चरित्रांत संकलित

केलेल्या सामग्रीवरून कोणीहि लेखनकुशल ग्रंथकार मंडलिकांचें उत्तम चरित्र लिहूं शकेल

इतिहासाकडे पाहतां असें दिसतें की, इतिहासाच्या निरनिराळ्या शाखांत ग्रंथरचना झाली आहे. श्रीशिवचरित्र-साहित्य-खंडासारखीं केवळ इतिहासाचीं साधनें प्रकाशांत आलीं आहेत तर 'साधन-चिकित्सा' ह्या ग्रंथानें, व 'शिवभारता'च्या प्रस्तावनेनें, इतिहासाच्या स्वरूपाचें तात्त्विक विवेचनहि झालें आहे. 'नवयुगधर्म,' 'अशोकचरित्र' आणि 'बौद्ध धर्माचा अभ्युदय व प्रसार' ह्या तीन ग्रंथांची योग्यता मराठी ग्रंथसंपत्तीकडे कुतूहलानें पाहणाऱ्याला विशेष वाटल्याशिवाय राहणार नाही. 'भारतीयांची शासनपद्धति' ह्या ग्रंथानें प्राचीन राज्यघटनेचा इतिहास आपणांस अवगत होतो. श्री० गुप्ते यांनी 'कऱ्हाडचा इतिहास' लिहिला आहे. असा निरनिराळ्या स्थलांचा इतिहास अनेकांना लिहितां येईल;पण गुप्ते यांची हौस आणि मेहनत यांचा अभावच सर्वत्र दृष्टीस पडतो त्यास नाइलाज आहे. सरकारी नोकरींतील लोकांना ग्रंथलेखनाच्या कामीं स्वाभाविक आनुकूल्य असूनहि त्यांच्या हातून यत्किंचित् कार्य होत नाही यावरून सरकारी नोकरींत विद्वानांचा अभाव असावा असा संशय येतो. ही अविद्वान् हुद्देदारांची परंपरा कधी मोडेल तो मोडो! आमचे दिवाण किंवा एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर यांच्या वांट्याला जर परमेश्वरानें लेखनपटुत्व दिलें तर त्यांच्या हातून उत्कृष्ट प्रकारचें वाङ्मय निर्माण होण्याचा संभव फार आहे; पण सध्या तरी ही आशा करावयास नको!

टीकात्मक ग्रंथांत पहिला मान 'प्रतापगडच्या युद्धा'ला देणं अवश्य आहे. मराठींत अशा प्रकारचें पुस्तक अपूर्व असून त्याचा लेखक युद्धशास्त्रांत वाकबगार असल्यामुळे ह्या पुस्तकाला महत्त्व येणें स्वाभाविक आहे. ह्यानंतर 'तुकारामाच्या अभंगांची चर्चा,' 'मयूर-काव्यविवेचन' आणि 'गोविन्दाग्रज' ह्या पुस्तकांकडे लक्ष वेधतें.

एकाच विषयावर परिश्रम केले असतां किती मोठें काम करितां येतें याचें उदाहरण ‘ श्रीरामायणसमालोचना ’ हें होय.

ग्रंथसंपादनाचा उत्कृष्ट मासला ‘ ऐतिहासिक पोवाडे ’ वाचले असतां आढळून येईल. ह्या पुस्तकांत जरी बऱ्याच चुका राहिल्या असल्या तरी संपादनाची पद्धति प्रशंसनीय आहे. अतिशय आनंदाची गोष्ट म्हणजे प्रो. माधवराव पटवर्धन यांच्या हातून ‘छंदोरचने’ सारखें एक स्वतंत्र पुस्तक आपणांस उपलब्ध झालें. या एकाच पुष्पानें आमच्या मराठी वाङ्मयवृक्षाचा सुगंध सर्वत्र दरवळत राहील यांत शंका नाहीं. शोकी जनांकरिता पद्यरचना करण्याचें सोडून जर ते विवेकी माणसांकरिता लिहूं लागतील तर ईश्वरदत्त देणगीचा त्यांच्या हातून सदुपयोग होईल असें बिनदिक्कित म्हणण्यास हरकत नाहीं. स्वतंत्र विचारांचे लेख मराठींत प्रथमतः कै० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या लेखणींतून उतरले. राजवाड्यांसारखा चतुरस्र पुरुष मराठीच्या वांट्याला आजतागायत दुसरा कोणी आला नाहीं, असें म्हणण्यांत यत्किंचित्‌हि अतिशयोक्ति होणार नाहीं. राजवाड्यांचें विस्तृत चरित्र लिहिण्याची अद्यापि कोणास बुद्धि झाली नाही ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. या बाबतींत टिळकांच्या अनुयायांनी ऋण ज्याप्रमाणे पूर्णपणें फेडलें त्याप्रमाणे राजवाड्यांचें ऋण फेडण्याची जबाबदारी अप्रत्यक्षपणें भारत-इतिहास–संशोधक-मंडळावर व प्रत्यक्षपणे मंडळाचे कर्तृत्ववान् चिटणीस प्रो० पोतदार यांजवर पडते. या गोष्टीची त्यांना आठवण करून देणें अवश्य आहे. राजवाड्यांकरिता एखादा बापट पुढे येऊं नये काय ? राजवाड्यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे त्यांचें आख्यायिकाक्षेत्र बरेंच विस्तृत असल्यामुळे आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या मासिकांतील त्यांच्या आख्यायिका अपुऱ्या आहेत असेंच म्हटलें पाहिजे.

स्वाभिमान, बुद्धि व परिश्रम, यांचा एकोपा अर्थशास्त्रावरील ग्रंथ लिहिण्यास आवश्यक आहे. तथापि ज्याअर्थी ह्या शाखेंत प्रो. काळे

व कर्वे यांच्या पुस्तकाखेरीज दुसरें एकहि लिखाण प्रसिद्ध झालेलें दिसत नाही, त्याअर्थी आमचा अभिमान बुद्धिपरिश्रमहीन आहे असें म्हणावें लागतें. ही उणीव राजकारणांत प्रो० जावडेकर यांनी 'राजनीतिशास्त्रपरिचय' लिहून भरून काढली आहे. सर्व जगांतील शासनसंस्थांचा प्राचीन—अर्वाचीन इतिहास देऊन त्यांनी लोकांना राजकारणविषयक शिक्षण मिळण्यास मोठीच मदत केली आहे. मराठींत हें वाखाणण्याजोगें पुस्तक झालें आहे.

'भारतीय नाट्यशास्त्रा'चा उल्लेख केल्यावांचून १९२८ च्या पुस्तकांचें परीक्षण पुरें करणें शक्य नाही. ह्या ग्रंथाला अनेक कारणांनी महत्त्व प्राप्त झालें आहे. हें पुस्तक एका कुमारिकेने महिलाविद्यापीठाच्या एम्. ए. च्या परीक्षेसाठी प्रबंध म्हणून लिहिलें आहे. हा प्रबंध इतका उत्तम वठला आहे की, एखाद्या कसलेल्या विद्वान् लेखकाच्या नांवावर तो सहज खपण्यासारखा आहे. कुमारिकेने लिहिलेला एवढा उत्कृष्ट ग्रंथ मराठींत दुसरा नाही असें मला वाटतें. जरठ झालेल्या मुंबई विद्यापीठाला जें कार्य करतां आलें नाही तें अल्पावधींत महिलाविद्यापीठाने करून दाखविलें ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. मुंबई विश्वविद्यालयाने एम्. ए. होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस मराठीमध्ये प्रबंध लिहिण्याची परवानगी दिली तर कदाचित् भारतीय नाट्यशास्त्राच्या तोलाचीं पुस्तकें मराठीमध्ये अनेकशः प्रकाशित होतील.

'मराठी ज्ञानकोशा'चें महत्कार्य तडीस नेल्याबद्दल डॉ० केतकर हे अखिल महाराष्ट्राच्या प्रशंसेस पात्र झाले आहेत. आता त्यांच्याच साथीदारांनी 'मराठी शब्दकोशा'चें अतिशय मेहनतीचें व जबाबदारीचें काम आपल्या शिरावर घेतलें आहे. ज्ञानकोशाप्रमाणे हा शब्दकोश पुरा झाल्यास मराठी भाषेचें वैभव अपरिमित रीतीने वाढल्याशिवाय राहणार नाही. म्हणून डॉ. केतकरांप्रमाणें श्री० यशवंतराव

दाते यांचें अभिनंदन करण्याचा प्रसंग लौकरच येवो असें मनापासून इच्छितों.

अखेरीस आपण सर्वांनी ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे की, मराठीची ग्रंथसंपत्ति वाढणें हें सध्याच्या स्थितींत वाचकवर्गावर अवलंबून आहे. मागे सांगितल्याप्रमाणे पूर्वीच्या काळीं ग्रंथोत्पत्तीला ग्रंथलेखकांचीच काय ती अवश्यकता असे. पण तो काळ आता राहिला नाही. आता लेखक त्याचप्रमाणे वाचक हे होन्ही वर्ग निर्माण झाल्याशिवाय ग्रंथ निर्माण होणें शक्य नाही. मराठीच्या सुदैवाने लेखकवर्ग हल्ली जन्मास आला आहे. परंतु वाचकवर्ग मात्र अद्यापि जन्मास यावयाचा आहे. म्हणून आपलें सर्वांचें लक्ष वाचकवर्ग निर्माण करण्याकडे लागलें पाहिजे. वाचकवर्ग अद्यापि अस्तित्वांत न आल्यामुळे मराठी सारस्वताची कुचंबणा होत आहे. ग्रंथोत्पत्तिला छापण्याच्या खर्चामुळे वाचकवर्गाची अवश्यकता उत्पन्न झाली. त्याचा परिणाम असा होत आहे की, ह्या वाङ्मयक्षेत्रांतहि व्यापारी तत्त्वाचा अम्मल सुरू झाला. व्यापारांत ज्याप्रमाणे मागणीप्रमाण पुरवठा करण्यांत येतो त्याप्रमाणे वाचकांना ज्या जातीचीं पुस्तकें वाचण्याची हौस असेल, त्याच जातीचीं पुस्तकें लिहिण्यांत येऊं लागलीं. एवढ्याकरिता सद्वाङ्मयनिर्मितीला वाचकांच्या ठिकाणीं सदभिरुचिहि उत्पन्न झाली पाहिजे. अर्थात् सदभिरुचीचा वाचकवर्ग जेव्हा महाराष्ट्रांत अस्तित्वांत येईल तेव्हाच मराठी भाषेच्या फुलोऱ्याचा सुगंध सर्व जगांत पसरेल. म्हणून चांगलें पुस्तक विकत घेऊन वाचण्याचा प्रत्येकाने नियम करणें हा एकच एक मराठी वाङ्मयाच्या उत्कर्षाचा उपाय होय. चातुर्मास्यांत कांहींना कांही नियम करण्याची आपली पुरातन रीत आहेच. तिच्यांत योग्य बदल करून वरील नियम आपण जर यंदापासून करण्याचें मनांत आणिलें तर महाराष्ट्र-सारस्वताची सेवा केल्याचें पुण्य आपणांला लाभेल यांत शंका वाटत नाही.

# मराठी मासिकें

माझ्या माहितीप्रमाणे मुंबई इलाख्यांत एकंदर मराठी भाषेंत प्रसिद्ध होणारीं ४४ मासिकें आहेत.

मासिक हा शब्द येथे लक्षणेने वापरण्याचें प्रयोजन नाही. कारण ह्यांपैकी प्रत्येक दर महिन्यास प्रसिद्ध व्हावयाचें असतें. मासिकांचीं नांवें येणेप्रमाणेः—

(१) मधुकर; (२) मकरंद; (३) प्रेमोद्यान; (४) बालबोध; (५) भांडारी विहारी; (६) भगिनीसमाचार; (७) ज्ञानांजन; (८) आनंद; (९) क्षात्रदूत; (१०) मराठामित्र; (११) मराठी शालापत्रक (१२) मराठी शिक्षक; (१३) नवयुग; (१४) नवें मन्वन्तर; (१५) प्रभात; (१६) विहार; (१७) इतिहाससंग्रह; (१८) मोदक; (१९) गोवर्धनमाला; (२०) भिषग्विलास; (२१) केरळकोकिळ; (२२) खेळगडी; (२३) चतुष्पाद आणि कृषिकर्म; (२४) उद्यान; (२५) चित्रमय जगत्; (२६) दैवज्ञमासिक; (२७) धर्मविचार; (२८) लोकमित्र; (२९) ज्योतिर्विजय; (३०) लोकशिक्षण; (३१) काव्यरत्नावलि; (३२) मनोरंजन; (३३) उषा; (३४) प्रभुमासिक; (३५) वैश्यमासिक; (३६) विविधज्ञानविस्तार; (३७) ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला; (३८) विश्वब्रह्मवृत्त; (३९) धर्मजागृति; (४०) ज्योतिषरत्नभांडार; (४१) रंगभूमि; (४२) मराठा; (४३) संतांचे बोल; आणि (४४) शेती व शेतकरी.

ह्यांपैकी पांच मासिकें म्हणजे प्रभुमासिक, वैश्यमासिक, दैवज्ञमासिक, क्षात्रदूत आणि भांडारी विहारी हीं ज्ञातिविशिष्ट हितानहिताची चर्चा करणारीं आहेत.

निवळ काल्पनिक गोष्टींनीं क्षणभर चित्तरंजन करणारीं अशीं चार मासिकें आहेत. त्यांचीं नांवें—मधुकर, मकरंद, प्रेमोद्यान व विहार.

एकाच विषयाला वाहिलेलीं अशीं १५ आहेत, तीं येणेंप्रमाणेः—(१) मराठी शालापत्रक, (२) मराठी शिक्षक, (३) गोवर्धनमाला, (४) इतिहाससंग्रह, (५) भिषग्विलास, (६) चतुष्पाद आणि कृषिकर्म, (७) ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला, (८) विश्वब्रह्मवृत्त, (९) धर्मजागृति, (१०) ज्योतिषरत्नभांडार, (११) धर्मविचार, (१२) रंगभूमि, (१३) शेती आणि शेतकरी, (१४) ज्योतिर्विजय, (१५) काव्यरत्नावलि.

बालबोध, आनंद, मोदक व खेळगडी हीं चार मासिकें मुलांकरिता अवतरलीं आहेत.

स्त्रियांच्या उन्नत्यर्थ म्हणून निघालेलें असें मासिक म्हटलें म्हणजे 'भगिनीसमाचार' हें होय.

मासिक मनोरंजन द्विविध प्रकृतीचें दिसतें. यांत गहन विषयांवर मनन करण्यासारखे क्वचित् लेख असतात, तर प्रेमविषयक गोष्टीहि पुष्कळ असतात.

ज्यांमध्ये कादंबऱ्या मुळींच घेतल्या जात नाहीत व सर्व विषयांचा ऊहापोह केला जातो अशीं मासिकें चार आहेत. विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, नवें मन्वन्तर आणि उषा.

चित्रमय जगत, नवयुग, लोकमित्र, मराठामित्र, प्रभात, उद्यान, ज्ञानांजन, हीं मिश्र मासिकें होत.

संतांचे बोल हें मासिक त्याच्या नांवावरून कोणत्या जातीचें आहे तें समजण्यासारखें आहे.

स. १९१२, १३ व १४ ह्या तीन सालांत प्रसिद्ध झालेले मासिकांचे अंक मी विवेचनार्थ घेतले आहेत. मासिकांसंबंधानें एकंदर

आढावा काढण्यास गेलीं तीन वर्षें पुरीं आहेत. ह्या कामीं अथातच एकदेशीय, ज्ञातिविशिष्ट, व कादंबऱ्या प्रसिद्ध करणारीं मासिकें निरुपयोगी होत. त्यांचेंहि कार्य महत्त्वाचें आहे पण तें स्वभावतःच मर्यादित असल्यामुळे त्यांचा विचार निराळा करण्यांत येईल. सर्व समाजास उपयुक्त व समाजाची सर्वांगपूर्ण सेवा करणारीं जीं मासिकें आहेत त्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत कोणते विषय आले, तें कोणी लिहिले व त्या विषयविवेचनाचें धोरण काय हें समजणें जरूर आहे. त्याशिवाय मासिकांनी केलेल्या कामगिरीचें यथार्थ स्वरूप समजणार नाही. अशा प्रकारच्या चर्चेला साहाय्य करणारीं मासिकें म्हटलीं म्हणजे उषा, प्रभात, कोकिळ, विस्तार, लोकशिक्षण, चित्रमय जगत्, ज्ञानांजन, लोकमित्र, मराठा मित्र, नवें मन्वंतर, नवयुग व मनोरंजन हीं होत. परंतु नवें मन्वंतर, नवयुग, उषा, प्रभात व कोकिळ हीं गेल्या सालींच आणि तींहि अखेरीला प्रसिद्ध होऊं लागल्यामुळे त्यांचा विचार करण्याचें प्रयोजन नाही. ज्ञानांजनहि १९१२ च्या आरंभीं निघालेलें नाही.

विस्तार, चित्रमय–जगत्, लोकशिक्षण, मनोरंजन, लोकमित्र व मराठामित्र इतकीं मासिकें पुरीं तीन वर्षें असल्यामुळे ह्यांपैकी प्रत्येकाचे ३६ अंक प्रसिद्ध झाले आहेत. ह्या अंकांतून प्रसिद्ध झालेल्या निबंधांचा तक्ता विषयवारीप्रमाणे तयार करून सोबत जोडला आहे. ह्यावरून असें दिसेल की, गेल्या ३ सालांत एकंदर चरित्रें ८३, ऐतिहासिक लेख ३९, धर्मपर लेख ४४, तत्वज्ञानावर ३१, सामाजिक विषयांवर ५५, शिक्षणात्मक ३१, आरोग्यावर २०, औद्योगिक २२, वाङ्मयात्मक ३२, राजकीय १५; शास्त्रीय २३, अर्थशास्त्रावर ३, मराठी भाषा ७, प्रवासवर्णने १५, शेतीवर ९, आयुर्वेद ३, व्यापार २, ज्योतिष २, आणि रसायनशास्त्रावर १, ह्याप्रमाणे लेख आलेले आहेत.

चरित्रांचा भरणा बालबोध व चित्रमय–जगत् ह्यांत विशेष आहे.

चित्रमय-जगतांत ३ वर्षांत ३९ चरित्रें आलीं आहेत. अर्थात् दर महिन्यास एकाहून अधिक चरित्र पडलें आहे. त्याच्या खालोखाल बालबोध व लोकमित्र ह्यांचा नंबर येईल. लोकमित्रांत २३ चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. ऐतिहासिक विषयांवर विस्तारांत सर्वांत अधिक, म्हणजे २३ लेख आले आहेत.

सर्व मासिकें मिळून प्रसिद्ध झालेल्या ३९ ऐतिहासिक लेखांपैकी एकट्या विस्तारांत २३ लेख आले आहेत. ह्यावरून ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप म्हणजे ऐतिहासिक विषय होय असें ठरतें. धर्मपर लेखांत चित्रमय-जगताचा नंबर पहिला लागून विस्ताराचा दुसरा लागतो. एकंदर ४४ धर्मपर लेखांपैकी अनुक्रमें १५ व १२ लेख सदर मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. तत्त्वज्ञानावर सर्वांत जास्त लेख- १२ लोकशिक्षणांत असून त्याच्या खालोखाल विस्तारांत व मनो-रंजनांत आले आहेत.

सामाजिक विषयांची चर्चा करण्याचें पुष्कळसें श्रेय मनोरंजन, मराठामित्र व लोकशिक्षण यांजकडे आहे. ५५ सामाजिक लेखां-पैकी २७,१०,११ असे लेख या मासिकांतून अनुक्रमें प्रसिद्ध झाले आहेत.

लोकशिक्षणाने आपल्या नांवाप्रमाणे २० लेख लिहून लोकांस शिक्षणामृत पाजिलें आहे. ३१ पैकी २० लेख फक्त ह्या एका मासिकांत प्रसिद्धि पावल्यामुळे ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप कोणतें, तें सहज समजण्यासारखें आहे. आरोग्यावर मनोरंजनांत ७ तर चित्रमयजगतांत ६ लेख आले आहेत. स्त्रीपुरुषांच्या आरोग्यवृद्धीबद्दल मनोरंजनाची कळकळ लक्षांत घेण्याजोगी आहे.

औद्योगिक विषयांवर १४ पैकी ११ लेख एका लोकशिक्षणांत आले आहेत. ह्यावरून आपल्या लोकांची उद्योगधंद्यांत प्रगति व्हावी एतद्विषयक लोकशिक्षणकारांची उत्सुकता व्यक्त होते.

वाङ्मयचर्चेत सगळ्यांच्या वर लोकशिक्षण असून त्याच्या खालीं विस्तार व चित्रमय-जगत् येतात.

राजकीय बाबतींत विस्ताराची मुग्धता सोडून चित्रमय-जगतानें तीन वर्षांत १२ म्हणजे दर वर्षास ४ लेख लिहिले आहेत. शास्त्रीय विषयांवरही चित्रमयजगतानें सर्वांत अधिक लेख लिहिले आहेत.

प्रवास व स्थलवर्णनें चित्रमय जगतांत १६ आलीं असून मनो-रंजनांत ५ आलीं आहेत. रसायनशास्त्रासंबंधानें लोकशिक्षणांत काय तो एकच लेख प्रसिद्ध झालेला दिसतो. आयुर्वेद व व्यापार ह्यांवर-सुद्धा शिक्षणकर्त्यांशिवाय दुसऱ्या कोणी लेख लिहिला नाहीं. शेतीवर लोकशिक्षण आणि चित्रमय-जगत् ह्या दोघांनीच लेख लिहिले आहेत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, प्रत्येक मासिकाचें कांहीं तरी विशिष्ट स्वरूप व धोरण आहे. हें धोरण मासिकांना त्या त्या संपादकांनीं दिलें आहे अगर तें त्यांतील लेखकांनीं लावलें ह्या प्रश्न मात्र वादग्रस्त होईल. विस्ताराचें विशिष्टत्व ऐतिहासिक लेखांत आहे, तर लोकशिक्षणाचें शिक्षणात्मक व औद्योगिक बाबतींत आहे. पुस्तकपरीक्षणाच्या कामांत तर विस्ताराची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीं.

चित्रमय-जगताचें स्वरूप ह्या दोन्ही मासिकांहून भिन्न आहे. तत्त्वज्ञान, शिक्षण, उद्योगधंदे, अर्थशास्त्र वगैरे विषयांना साफ फाटा देऊन ह्या मासिककारांनीं धर्म, प्रवास, राजकारण, शास्त्रीय विषय, ह्यांवर लेख लिहून तद्द्वारा विशेषतः लोकशिक्षण व मनोरंजन करण्याचें योजिलें असावें असें दिसतें.

ह्याप्रमाणें प्रत्येक मासिकाला इतरांहून भिन्नत्व कशानें प्राप्त झालें आहे तें सांगितलें. आता विषयांच्या संख्येकडे पाहिलें तर सामा-जिक विषय वर्जिले असतां धर्मविषयक लेखांची संख्या सर्वांत

अधिक. हा प्रकार आम्हां भारतीयांच्या पूर्वापार परंपरेला अनुरूप आहे ह्यांत शंका नाही.

सांप्रत इतिहासाविषयी राष्ट्रांत कांहीशी जागृति उत्पन्न झाली आहे, तिचें प्रतिबिंब येथेही पडलेलें आढळेल. कारण धर्मानंतर ह्याच विषयाला लेखकांनी प्राधान्य दिलेलें दिसतें. सामाजिक विषयाची व्याप्तिहि ऐतिहासिकादि विषयांहून अधिक आहे. ह्यावरून गतकालीन गोष्टींप्रमाणे सद्यःकालीन गोष्टींकडे लोकांचें लक्ष वेधलेलें पाहून कोणासही आनंदच होईल. ह्याच्या खालोखाल शिक्षणात्मक, औद्योगिक आणि राजकीय विषयांवरील लेखांनी जागा व्यापिली आहे. बाकीच्या नानाविध विषयांवर कोणी फारसें लिहिलेलें दिसत नाही. ह्यावरून धर्म, इतिहास, शिक्षण ह्यांवांचून इतर विषयांचें अज्ञान लेखकवर्गांत तरी आहे अगर असले विषय वाचकांस आवडत नाहीत असें तरी म्हणावें लागतें.

कोणत्या विषयावर कोणत्या मासिकांत कोणते लेख आले हें दाखविणारा तक्ता सोबत जोडला आहे. ह्या लेखांच्या अंतरंगाचा विचार केला असतां काय निष्पन्न होतें हें पाहणें अवश्य आहे. प्रथम चरित्रें घेऊं. परकीयांच्या चरित्रांपेक्षा हिंदी लोकांचीं चरित्रें अधिक देण्याचा प्रघात बालबोधकारांनी पाडला होता तोच प्रशस्त आहे ह्याबद्दल मतभेद असणें शक्य नाही. बालबोधांतलीं चरित्रें अर्थातच लहान व अपुरीं; कारण तीं मुलांकरिता लिहिलेलीं असतात. ह्या बाबतींत चित्रमयताचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. आमच्यांतीलच विद्यमान व मृत श्रेष्ठांच्या चरित्रांतील अनुकरणीय गोष्टी तरुणांपुढे ठेवल्याने त्याचा परिणाम तरुण पिढीला नीतिमान्, उत्साही व कार्यक्षम करण्यांत होईल ह्यांत संदेह नाही. मोठ्या माणसांचे सद्गुण जगापुढे आल्याने सद्गुणांचा ऱ्हास होत नाही. उलट त्यांना प्रसिद्धि मिळाली नाही तर ते त्या माणसांबरोबर लय पावतात. कै. मण्डलिक, भाऊ दाजी, नाना शंकरशेट इत्यादि जुन्या पिढींतील कित्येक

माणसांच्या अंगीं कोणते विशिष्ट गुण हो[illegible]गाची कल्पनाहि नवीन मंडळीस नाही. अर्थात् ह्या श्रेष्ठ जनांचें [illegible] त्या बाबतींत अनुकरण नविनांकडून कसें व्हावें ! दुसरें असें की, मोठें म्हटल्याने मोठेपण उत्पन्न होतें. लोकांनी आपल्या अंगीं एखादा गुण लावला म्हणजे त्या गुणाला अपकर्षक होईल अशी क्रिया आपल्या हातून घडणार नाही इतकी जबाबदारी आपणांस स्वाभाविकच घ्यावी लागते. ह्यावरून हीं चरित्रें गुणपोषक कशीं होतात तें दिसून येईल. विद्यमान स्त्रीपुरुषांचीं चरित्रें दिल्याने हा लाभ विशेषच होईल. ज्या ज्या स्त्रीपुरुषांत विशेष अनुकरणीय असा कांही गुण असेल त्यांचीं चरित्रें देऊन त्या त्या गुणांचा विकास राष्ट्रांमध्ये करण्याचें श्रेय चित्रमय–जगत्कारांनी अवश्य घ्यावें. चरित्र देण्याला मनुष्याच्या मरणाची वाट पाहण्याचें कारण नाही.

धर्मविषयाची चर्चा विविधज्ञानविस्तार व चित्रमयजगताने बरीच केली आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. धर्माचें महत्त्व फार आहे. निदान ह्या देशाची उन्नति धर्माच्या बाजूनेच होणार असा कित्येकांचा समज आहे. त्यांतही सध्या बाह्य धर्मांशीं आमचा निकट संबंध आल्यामुळे आमच्या धर्माचें निरीक्षण करण्याची वासना प्रत्येक सुशिक्षितांत उत्पन्न होत आहे. आमच्या धर्माने आमच्या उद्दिष्ट भौतिक उन्नतीला विरोध येण्यासारखा आहे काय, हा प्रश्न सर्वांच्या पुढे उभा आहे व त्यास उत्तर देण्याचा प्रयत्न समाजनेत्यांनी करणें अवश्य आहे. म्हणून प्रथम आपल्या धर्माचें रहस्यस्वरूप अनावृत करून धर्माचरणाने आर्थिक व कामिक उन्नति संपादितां येते अशाबद्दल लोकांची खात्री करून दिली पाहिजे. अर्थात् हा हेतु साधण्यास इतर धर्मांची माहिती अवश्यक आहेच. शिवाय आपल्या धर्मांत चांगलें असेल त्याचें समर्थन व धर्मावर अनिष्ट पटलें चढलीं असतील त्यांचें उद्घासन ह्या दोन्ही गोष्टी झाल्या पाहिजेत. ह्या दिशेने थोडाबहुत प्रयत्न आमच्या मासिकांनी केला

| विषयाचें नांव | विविधज्ञानविस्तार | मनोरंजन | लोकशिक्षण | चित्रमयजगत् | मराठामित्र | लोकमित्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चरित्रें | ९ | ३ | १ | ३९ | ८ | २३ | ८३ |
| ऐतिहासिक | २२ | १ | ४ | ६ | १ | ४ | ३९ |
| धार्मिक | १२ | ० | ९ | १५ | ४ | ४ | ४४ |
| तत्त्वज्ञान | ८ | ८ | १२ | ० | ३ | ० | ३१ |
| सामाजिक | ४ | २७ | ११ | ३ | १० | ० | ५५ |
| शिक्षणात्मक | ३ | १ | २० | ० | ५ | २ | ३१ |
| आरोग्य | ० | ७ | ३ | ६ | १ | ३ | २० |
| औद्योगिक | २ | २ | १४ | १ | १ | २ | २२ |
| वाङ्मयचर्चा | ९ | ४ | १० | ७ | ० | २ | ३२ |
| राजकीय | ० | २ | १ | १२ | ० | ० | १५ |
| शास्त्रीय | २ | २ | १ | १८ | ० | ० | २३ |
| अर्थशास्त्र | ० | २ | १ | ० | ० | ० | ३ |
| मराठी भाषा | ६ | १ | ० | ० | ० | ० | ७ |
| प्रवासवर्णन | २ | ५ | १ | १६ | १ | ० | २५ |
| शेती | ० | ० | ३ | ५ | ० | ० | ८ |
| आयुर्वेद | १ | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| व्यापार | ० | ० | २ | ० | ० | ० | २ |
| ज्योतिष | ० | १ | १ | ० | ० | ० | २ |
| रसायनशास्त्र | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| एकूण | ८१ | ६६ | ९७ | १२८ | ३४ | ४० | ४४६ |

आहे ही संतोषाची गोष्ट होय. ह्या बाबतींत लोकशिक्षणांत प्रसिद्ध झालेले लेख फार महत्त्वाचे व मननीय आहेत. उदाहरणार्थ, " शास्त्राधाराचें महत्त्व " हाच लेख घेऊं. शास्त्राच्या पोथ्या म्हणजे

कचऱ्याच्या पाटींत टाकून देण्याच्या लायकीच्या, असा जो कित्ये-कांचा अज्ञानोत्पन्न व अविवेकजन्य समज आहे तो दूर करण्यास ह्या लेखाचा चांगला उपयोग होईल अशी आमची समजूत आहे. जुनीं शास्त्रें म्हणजे अनेक पिढ्यांचा अनुभव हें ह्या विद्वान् लेख-काचें म्हणणें आदरास पात्र आहे. ह्यामुळे ज्या ज्या वेळेस आप-णांस एखादी नवीन गोष्ट प्रचारांत आणावयाची असेल त्या त्या वेळीं शास्त्र काय म्हणतें ह्याची चौकशी करणें अगदी जरूर आहे. परंतु ह्यावर कोणी असें म्हणेल की, शास्त्रांत कांही गोष्टींस आधार मिळणार नाही व कांही इष्ट व शिष्टसंमत गोष्टींस प्रतिकूल आधार मिळेल; तेव्हा शास्त्रें निरुपयोगी होत. पण हा समज आमच्या इकडे शास्त्रीय रीत्या किंवा सूक्ष्मबुद्धीने कोणी धर्मशास्त्राचें अध्ययन करीत नसल्यामुळे उत्पन्न झालेला आहे. वरील भ्रमाचें निरसन ह्याच लेखांत लेखकांनी केलें आहे. त्यांनीं "अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्भवेत् । यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्मः स्याद-शंकितः ।" हें शास्त्रवचन देऊन ज्याच्याविषयी पूर्वी विचार झाला नाही अशा बाबतींत शिष्ट ब्राह्मण सांगतील तो धर्म निःशंकपणें मानावा असें प्रतिपादन केलें आहे. तसेंच इष्ट सुधारणेस शास्त्र प्रतिकूल असेल तर निराश होऊन बसण्याचें कारण नाही, असा अभिप्राय ह्या लेखांत व्यक्त केला आहे. "कालानुरोधाने फेरबदल करणें जरूर असेल तर तो करून घेतला पाहिजे". "सहवास आणि अनुकरण" ह्या निबंधांत लोकशिक्षणाच्या विद्वान् संपादकांनी असाच अभिप्राय पुनरुक्त पण अधिक स्पष्ट दिला आहे. ते म्हणतात, "हजारों वर्षांच्या चाली, रूढि व संस्था आमच्यांत आहेत त्या तशाच चालाव्यात असें कोण म्हणेल ?........शतकेंच्या शतकें योग्य रीतीने चाळून न मिळालेल्या धर्मशास्त्रास शिरसावंद्य मानणाऱ्या समाजाची अवस्था शोचनीय होते हें आम्ही जाणून आहों." असो. ह्यावरून धर्मसमजुतींत नवीन पिढींत कसा फरक

पडत चालला आहे हें दिसून येईल. जुन्या नव्याचा बिनडाग मिलाफ मोठ्या कुशलतेने केला जात आहे.

लोकशिक्षणांतील दुसरा उत्कृष्ट लेख "चातुर्वर्ण्य" हा होय. ह्या लेखांत चातुवर्ण्याचें जें मार्मिक समर्थन केलें आहे तसें दुसरीकडे कोठे पहावयास मिळणार नाही. जुन्याचा अभिमान पुष्कळांस असतो, पण त्याचें समर्थन बिनतोड रीतीने करणें सर्वांस साधत नाहीं. हा लेख वाचतांना बर्कच्या बुद्धिमत्तेची व पुराणप्रियतेची वाचकांस आठवण होते.

रा. ओढल्माने शास्त्री यांनी लिहिलेल्या "हल्लींचे धर्माधिपति समाजनियमनाला पात्र आहेत काय?" ह्या लेखांत धर्माध्यक्षांना प्रतिकूल असाच अभिप्राय दिला आहे. शंकराचार्य हे जर, हल्ली लौकिक समज आहे त्याप्रमाणे खरोखर धर्माधिपति असतील तर त्यांच्या एका मुख्य कर्तव्याची आठवण त्यांस ह्या लेखांत करून द्यावयास पाहिजे होती. वर सांगितल्याप्रमाणे अडचणीच्या प्रसंगीं धर्म कोणता आणि अधर्म कोणता हें विद्वान् ब्राह्मणांच्या मताप्रमाणे ठरवावयाचें असेल तर शंकराचार्यांनी लोकांच्या प्रतिनिधींचें एक मंत्रिमंडळ नियतकालीं भरवून लोकांच्या वारंवार उपस्थित होणाऱ्या प्रश्नांसंबंधी लोकमत काय आहे तें अजमावून त्याप्रमाणे आज्ञापत्रें काढणें जरूर आहे. ह्याबद्दल मासिकांतून विशेष चर्चा व्हावयास पाहिजे होती.

मूर्तिपूजेवर दोन लेख आले आहेत, त्यावरून हा विषय अद्यापि वादग्रस्त आहे असेंच दिसतें. "मूर्तिपूजा मण्डनीय नाही व खंडणीय नाही" असें एक लेखक म्हणतात, तर ती सर्वस्वी त्याज्य आहे असें रा. सातवळेकर आपल्या विस्तारांतील लेखांत प्रतिपादतात. ते म्हणतात "मूर्तिपूजा हा ईश्वरभक्तीचा खरा मार्ग नाही." ह्या म्हणण्यांत जरी फारसें गैरशिस्त नसलें तरी "मूर्तीला नैवेद्य अर्पण केला म्हणजे देव संतुष्ट होईल ही भावना मूर्तिपूजेच्या बुडाशीं

आहे " हा त्यांचा सिद्धांत एखाद्या ख्रिस्ती मिशनऱ्याच्या तोंडांतच अधिक शोभला असता. आमच्या आचारांबद्दल आमचें किती अज्ञान आहे हें ह्यावरून दिसून येतें. रा. भांडारकर यांनी " सामाजिक सुधारणेची खरी दिशा " ह्या लेखांत " मूर्तीची पूजा नको, खऱ्या ईश्वराची पाहिजे " असें आपलें मत दिलें आहे. ह्यावरून शिकलेल्या माणसांत एकंदरींत मूर्तिपूजेविषयी विरोधभक्तिच दिसते.

प्रो. कानेटकर यांनी " धार्मिक शिक्षण " ह्या लेखांत धार्मिक शिक्षणाची कॉलेजांत व कॉलेजाबाहेरही अनवश्यकता व निष्फलता प्रतिपादन केली आहे. त्यांच्या मतें धर्म हा तर्काच्या व युक्तीच्या कसोटीला उतरण्यासारखा नाही, म्हणून तद्विषयक अज्ञानच बरें. कॉलेजच्या आवाराच्या बाहेर ह्या मताचे कोणी अनुवादी असतील असें मानण्यास फारशी जागा नाही. ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल अधिक ऊहापोह व्हावयास पाहिजे होता.

" महाराष्ट्रांतील धर्मवृत्तीचें स्थूल सिंहावलोकन " ह्या निबंधांत प्रो. भानु ह्यांनी " ज्या धर्माचा पाया वैदिक सिद्धांतांवर उभारला नाही, ज्या धर्मांत मूर्तिपूजेचा किंवा वर्णाश्रमधर्माचा अन्तर्भाव होत नाही, त्या धर्माचें बीज येथे रुजावयाचें नाही " असा निष्कर्ष काढला आहे. ह्यावरून भानूंच्या मताप्रमाणें मूर्तिपूजा ही आम्हांस सुटणार नाही व वैदिक धर्मावरील श्रद्धाही आमची ढळणार नाही. हें जर खरें असेल तर त्या धर्माचें शिक्षण लोकांस मिळेल तर हितावहच होईल असा त्यांचा अभिप्राय असावा असें वाटतें.

विश्वविद्यालयांत वैदिक धर्माला जागा नसल्यामुळे त्या धर्माचें अध्ययन चिकित्सापूर्वक होत नाही. तेव्हा ही कामगिरी मासिककारांवर ह्या देशांत विशेषतः पडणार. " महाराष्ट्रांतील संतांची राष्ट्रीय कामगिरी, " " यज्ञसंस्था व त्यांचें महत्त्व, " " पंढरपूरचा विठोबा आणि वारकरी पंथ " इत्यादि लेख ह्या दृष्टीनेच लिहिलेले आहेत. " महादेवाचें स्वरूप, " " वेदांतील रोगजन्तुशास्त्र "

ह्या लेखांवरून आमच्यांत शोधक बुद्धि उद्भवत आहे ह्या म्हणण्याची साक्ष पटते.

"भारतवर्षाचें मूलभूत ऐक्य" ह्या निबंधांत आमच्या राष्ट्रैक्याला वैदिक धर्मापासून पोषणच मिळेल, विरोध होणार नाही, असें सिद्ध केलें आहे. धर्माचें साहाय्य राष्ट्रीय आकांक्षा सफल होण्यास अवश्य आहे असें लोकांस वाटत असावें असें दिसतें.

"पापमोचन" ह्या लेखांत पापमोचन हें तत्त्व ख्रिस्ती धर्मांतून उसनें घेण्याचें कारण नाही, तें मुळचें आमचेंच आहे, असें अभिमानपूर्वक उत्तर ख्रिस्त्यांना लेखकानें दिलेलें आहे.

एकंदरींत धर्मविषयक उत्कृष्ट लेख लिहून मासिकांनी आपली कामगिरी बजावली आहे. तथापि त्यांतही लोकशिक्षणांतील लेख उत्तम वठले आहेत. चित्रमय-जगतांत ह्या विषयावर आलेले लेख धर्माच्या बाबतींत लोकांस वळण लावण्याच्या कामीं उपयोगी पडतील असें वाटत नाही. ते ऐतिहासिक स्वरुपाचेच विशेष आहेत. तथापि सर्व मासिकांचा विचार करितां वैदिक धर्माबद्दल आदर बाळगणारे लेखक पुष्कळ दिसतात. त्या धर्माबद्दल अनादर उत्पन्न करणारीं मतें कोणीं प्रसृत केलेलीं नाहीत.

सामाजिक सुधारणेसंबंधानें अलीकडे सर्वांनी मौन स्वीकारलेलें दिसतें. मासिक मनोरंजनांत आपाततः लहान लहान गोष्टींच्या रुपानें समाजांतील कांही चालींचें दोषाविष्करण केलें जातें हें खरें, पण शास्त्रशुद्ध व प्रगल्भ लेख फारच थोडे आले आहेत. आरंभीं जोडलेल्या तक्तयावरून लोकशिक्षणानेच ह्या बाबतींत पुढाकार घेतलेला दिसतो. "सामाजिक विचारांची दिशा" ह्या लेखांत लेखकानें शास्त्रीय तत्त्व गोवून ठेवलें आहे तें सर्वांनी ध्यानांत बाळगण्यालायक आहे. ते लिहितात:—"संस्था व सांप्रदाय हे त्या त्या काळच्या लोकस्थितीचीं प्रतिबिंबें असतात. सबब त्या संस्थापकांना मूर्ख म्हणणें युक्त नाही. आपल्या काळाला उचित सुधारणा पूर्व-

जांना मूर्ख न म्हणतां करून घ्याव्या." परंतु दुसऱ्या एका लेखांत निकृष्टजनोद्धारण व पुनर्विवाह ह्या सुधारणा अनिष्ट म्हणून त्यांनी जो अभिप्राय दिला आहे त्यावरून ह्या विद्वान् संपादकांच्या विद्वत्ते-च्या जोडीला अद्यापि अनुभवाची जोड मिळाली पाहिजे असें वाटतें. ह्याच लेखांत स्त्रीपुरुषांचें एकत्र शिक्षण, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज, स्त्रियांच्या शिक्षणांत फाजिल पुस्तकी शिक्षण इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा नुसता नामनिर्देश केला आहे. ह्या विषयांचें विवेचन अधिक व्हावयास पाहिजे होतें. पण चमत्कार हा की, कोणत्याही लेखकाचें लक्ष इकडे गेलें नाही. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सामाजिक प्रश्नांची चर्चा कोणींच केलेली नाही. पूर्वींच्या चालीरी-तींत हल्ली किती व कसकसा बदल होत चालला आहे; त्याच्या श्रेयाची वांटणी प्रवर्तकांचा निश्चय व बाह्य परिस्थितीचा जोर ह्यांत कशी करावी; इष्ट असोत वा अनिष्ट असोत ज्या गोष्टी घडून येणार अशा कोणत्या व समाजानें मुद्दाम घडवून आणल्या पाहिजेत अशा कोणत्या, वगैरे गोष्टींचा ऊहापोह केलेला कोठेही आढळणार नाही. श्रम, अनुभव, शोध व शांत आणि प्रगल्भ विचार जेथे अवश्य आहेत असे लेख फारसे प्रसिद्ध होत नाहीत. नुसत्या बुद्धीवर भागेल असेच लेख विशेषतः येत असतात. नगरसंवर्धन, खेळ व व्यवहार, गटारें, सुजननशास्त्र वगैरे प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून सामाजिक सुधारणांची व्याप्ति दिवसेंदिवस अधिकाधिक होत चालली आहे असें अनुमित होतें.

मनोरंजनांत सामाजिक सुधारणेचें एक अंग म्हणजे स्त्रीसु-धारणा. त्यासंबंधी बरेच स्त्रीपुरुषलेखकांचे लेख आले आहेत. मातृ-त्वाची थोरवी, गृहराज्य, गृहशिक्षण, स्त्रियांची उन्नति, आईचीं कर्तव्यें, सुगृहिणीवाद इत्यादि स्त्रियांसंबंधी विषयांवर बरेंच लिहिलें गेलें आहे. सम्राट् व सम्राज्ञी यांच्या छत्राखाली व त्यांच्या आशी-र्वादानें हिंदुस्थानची सामाजिक प्रगति होत चालली आहे ही गोष्ट

सर नारायणराव चंदावरकर यांनी व स्त्रियांच्या स्थितींत सुधारणा होत आहे ही गोष्ट रा. रामभाऊ जोशी यांनी कबूल केली आहे. तथापि कांहीं गोष्टींसंबंधानें अद्यापि मतभेद आहे असें दिसतें. ह्याचें प्रत्यन्तर सुगृहिणीवाद वाचला म्हणजे समजण्यासारखें आहे. सौ. गिरिजाबाई केळकर यांनी प्रौढविवाहांतील वास्तविक अडचणींचें नुसतें दिग्दर्शन केलें आहे, पण मनोरंजनकारांस तें देखील खपलें नाहीं. एकंदरींत सर्व लेख प्रौढविवाहाला अनुकूल आहेत. "विवाहासंबंधीं कांहीं विचार" ह्यांत गांधर्वविवाह सर्वांत प्रशस्त ठरविला आहे. "स्त्रियांची उन्नति" ह्या लेखांत सौ. सोकरीबाई मानकर यांनी स्त्रियांच्या अंगचे दोष दाखविले आहेत तर सौ. राधाबाई भिडे यांनी शिक्षणाचा अभाव ही सामाजिक सुधारणेंतील मोठी अडचण एका लेखांत प्रतिपादिली आहे. "वैवाहिक नीति व दांपत्यसुख" हा सौ. गोळे यांचा लेख वाचनीय आहे. कमळाबाई केळकर यांचा "स्त्रियांचा पेहराव" हा लेख वाचला म्हणजे विकार-वश न होतां एखाद्या बाबतींत आमच्या स्त्रिया अभिप्राय देण्यास कशा लायक होत आहेत तें समजतें. मनोरंजनकारांनी जातिभेदावर थोर व प्रमुख गृहस्थांचे अभिप्राय मागवून प्रसिद्ध केले आहेत, त्यावरून एकंदरींत जातिभेदाविरुद्ध मत बनत चाललें आहे हें कोणीही कबूल करील. पुनर्विवाह, प्रौढविवाह, हुंडा वगैरे विषयांवर असेच अभिप्राय घेऊन ते प्रसिद्ध केल्यानें त्या त्या विषयाला चालन दिल्यासारखें होऊन शिवाय लोकमताचा वारा कोणत्या दिशेने वहात आहे हें समजेल. एकंदरींत सामाजिक बाबींची चर्चा जितक्या जोरानें व चिकित्सा-पूर्वक व्हावयास पाहिजे तितकी झालेली दिसत नाहीं.

मासिकमनोरंजनांतील फाजिल प्रणयाला कंटाळलेल्या लोकांना भगिनी-समाचार मासिक पसंत पडण्यासारखें आहे. ह्या मासिकाचा विशेष हा आहे कीं, ह्यांतील बरेच लेख स्त्रियांचे असतात व त्यांपैकी कांहीं प्रशंसापात्रही आहेत. उदाहरणार्थ, सौ. इंदुमतीबाई

नाईक यांचा "खऱ्या गृहिणीचें कर्तव्य" हा लेख शोधकबुद्धीने लिहिला आहे. पाश्चात्य संस्कृति जशीच्या तशीच न उचलतां आपल्यांतलें चांगलें कायम ठेवून जरूर तेथे नवीन अवश्य स्वीकारावें अशा मताचें पुरस्कर्तृत्व भगिनीसमाचाराकडे आहे. समजांत नीति वाढविण्यास ह्या मासिकाचा चांगला उपयोग होईल.

## अर्थशास्त्र

आमच्या तरुणांना सद्यःस्थितीची यथार्थ कल्पना आणून देण्यास अर्थशास्त्राचीं तत्त्वें समजावून देणें भाग आहे. शिवाय अर्थशास्त्राचीं प्रमेयें देशकालापेक्ष असल्यामुळे आमच्या दृष्टीनेच ह्या शास्त्राचें अध्ययन झालें पाहिजे. परंतु सध्या कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांना ही दृष्टि प्राप्त होत नाही व त्यामुळे पुढे उत्तरवयांत सार्वजनिक प्रश्नांची व्यवस्थित व योग्य चर्चा करण्यास ते अपात्र बनतात. म्हणून हें काम मासिककारांनी आपल्या अंगावर घ्यावयास पाहिजे होतें. पण दुर्दैवाने कोणत्याही मासिकाने ह्या विषयावर म्हणण्यासारखें लिहिलें नाही. वर दिलेल्या तक्त्याकडे पाहिलें असतां असें दिसून येईल की, या विषयावर मनोरंजनांत २ व लोकशिक्षणांत १ असे तीनच लेख उभ्या तीन वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांपैकीं "ह्याला आळा बसेल काय ?" ह्या सदराखाली लोकशिक्षणांत चैनीचे पदार्थ वर्ज करून दारिद्र्य घालविण्याचा कांहीसा तात्त्विक उपाय सुचविला आहे. रा. आपटे यांनी "हिंदुस्थानांतील नाणीं व शिक्के" हा अर्थशास्त्रांतील रूक्ष लेख मनाचें रंजन करणाऱ्या मासिकांत लिहिला आहे. ह्याच विषयावर ग्रन्थमालेंत पूर्वीं कांही लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची माहिती रा. आपट्यांस नाही असें त्यांच्या लेखावरून वाटतें. "अर्थशास्त्रांतील एक सत्याभास" हा एक लेख कोकिळेंत प्रसिद्ध झाला आहे. अशा प्रकारचे लेख पुष्कळच यावयास पाहिजे होते. हिंदुस्थान

देश दरिद्री झाला आहे असें ज्यांस वाटतें त्यांस तें सिद्ध करून दाखवा म्हटलें तर साधत नाही. आगगाड्या-आगबोटींतून गर्दी, दारूचे पिठे भरलेले, इत्यादि गोष्टींवरून हिंदुस्थानची सधनता स्थापित करण्याचा एका बाजूचा प्रयत्न असतो. तेव्हा त्यांत कितपत खरेपणा आहे हें आमच्या लोकांस कळलें पाहिजे. चैनीच्या पदर्थांचा खप वाढत आहे. ह्यावरून काय ध्वनित होतें तें बरोबर समजलें पाहिजे. सरकारी बजेटांची माहिती करून दिली पाहिजे. कांही गांवांची आर्थिक पाहणी करून काय सिद्ध होतें तें पाहिलें पाहिजे. हल्ली खेड्यांचा ऱ्हास होत आहे हें आपणांस किती श्रेयस्कर आहे, पदार्थांच्या महागाईमुळे आपलें हित अगर अनहित होत आहे हें प्रत्येकास समजलें पाहिजे. पण ह्या विषयाकडे मुळीच कोणाचें लक्ष गेलेलें नाही.

## राजकीय

प्रचलित राजकीय विषयांवर लिहिणारीं मासिकें महाराष्ट्रांत मुळीच नाहीत असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाही. ह्याचें कारण काय असावें ह्याचा खल करण्याचें प्रस्तुत स्थळ नव्हे. तथापि आहे ही गोष्ट निदर्शनास आणणें भाग आहे. सरकारच्या रोषास पात्र न होता सुद्धा राजकीय बाबतींत पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. कायदे-कौन्सिलांची वाढ झाल्यामुळे, तसें जिल्ह्यांच्या ठिकाणाहूनसुद्धा सामान्य मनुष्यास कौन्सिलांत प्रवेश करून घेण्याची संधि प्राप्त झाल्यामुळे, राजकीय विषयांचें ज्ञान सामान्य मनुष्यापर्यंत पोंचणें अवश्य झालें आहे. हा ज्ञानप्रसार कसा करतां येईल ह्याचा विचार व ऊहापोह मासिकांतून होणें अपरिहार्य होतें. पण ह्याविषयी कोणीहि लिहिलेलें दिसत नाही. तसेंच कौन्सिलच्या घटनेंत काय दोष आहेत, त्यामुळे चांगले चांगले ठराव पास होण्यास कशा अडचणी येतात, वगैरे गोष्टींकडे मासिककर्त्यांची दृष्टि कां वळली नाही समजत नाही. देशी भाषेंतून शिक्षण देण्याचा ठराव वरिष्ठ

कायदे कौन्सिलांत कसा नापास झाला हें ज्यानें विचारपूर्वक पाहिलें असेल त्यास आमच्या मासिककर्त्यांची मुग्धता अक्षम्यच वाटेल. तात्पर्य, राजकीय शिक्षण देण्याची जबाबदारी वृत्तपत्रकारांनीच उचललेली दिसते. चित्रमय—जगत्कारांनी ह्या विषयावर १०।१५ लेख लिहिले आहेत खरे, पण ते ऐतिहासिक स्वरुपाचे व परराष्ट्रीय आहेत. उदाहरणार्थ, चिनांतील राज्यक्रांति, विमानांचे सामर्थ्य, आयर्लंडांतील स्वराज्याचा तंटा, पिंवळा बागुलबोवा इत्यादि. हल्ली हिंदुस्थानांत **नेमस्त जहाल** असे जे दोन पक्ष झाले आहेत त्यांच्यासंबंधीं कोणत्याहि पक्षाचा एकहि लेख लिहिला गेला नाही. हिंदुस्थानांतच फ्रेंच व पोर्तुगीज ह्यांच्या वसाहती आहेत. तेथील राज्यव्यवस्थेची माहिती, तसेंच आमच्या संस्थानिकांचा साम्राज्यसरकारशीं संबंध कोणाचा कसा आहे व त्यांच्या राज्याची अन्तर्गत व्यवस्था कशी आहे, इत्यादि माहिती वाचकांस कोणी करून दिलेली नाही.

## शिक्षणात्मक

ह्या विषयावर **लो**कशिक्षणांतच पुष्कळ लेख आले आहेत. विस्तारांतील "स्त्रीशिक्षणाची दिशा" व मनोरंजनांतील "जपानांतील स्त्रीशिक्षण" एवढे खेरीज करून बाकी सर्व लेख शिक्षणांत प्रसिद्ध झाले आहेत. "आज काय शिकावें-" "खरें शिक्षण"— "दुय्यम शिक्षण मातृभाषेच्या द्वारें देण्याची आवश्यकता"— "गुरु आणि शिष्य ह्यांचा परस्परसंबंध" इत्यादि लेख प्रसिद्ध करून शिक्षणकारांनी ह्या विषयाचा चोहोंबाजूंनी कसा विचार करावा हें आपल्या वाचकांस शिकविलें. ह्या शिवाय युरोप व अमेरिका ह्या दोन खंडांतील शिक्षणपद्धतींशींहि त्यांनी आपल्या वाचकांचा परिचय करून दिला आहे. ह्या सर्व लेखांचा रोंख, हिंदुस्थानांतील प्रचलित शिक्षणपद्धति सदोष आहे; तिच्या योगानें मुलांचा शारीरिक व बौद्धिकहि ऱ्हास होतो व राष्ट्राचा दर्जा

वादविण्यास तें साहाय्यकारक होत नाही, असें प्रतिपादन करण्याकडे आहे. मनोरंजनकारांनी जातिभेदावर जशीं कित्येक लोकांचीं मतें मागवून तीं प्रसिद्ध केलीं त्याप्रमाणे शिक्षणकारांनीही मातृभाषेंत शिक्षण देण्याच्या अवश्यकतेसंबंधाने विचारशील माणसांकडून अभिप्राय मागविले असते तर बरें होतें. निरनिराळ्या प्रचलित प्रमुख विषयांसंबंधीं सर्व प्रकारच्या लोकांचीं मतें मागविण्याची तऱ्हा प्रशंसनीय आहे व मनोरंजनाचें अनुकरण ह्या बाबतींत इतर मासिककार करतील तर त्यांच्या हातून मोठीच कामगिरी होईल. असो. मुलांच्या शिक्षणांतील दोषांचे जसें आविष्करण झालें तसें स्त्रीशिक्षणांतील दोषांसंबंधीं झालें नाही. मुलामुलींना एकच प्रकारचें शिक्षण देणें इष्ट नाही असा एकंदर झोंक दिसतो खरा, पण त्याचे अनिष्ट परिणाम यावे तसे अद्यापि लोकांच्या लक्षांत आले नाहींत असें दिसतें. जपानांत स्त्रियांना कोणत्या तऱ्हेचें शिक्षण दिलें जातें हें सांगणाऱ्या लोकांचें लक्ष प्रो० कर्व्यांच्या आश्रमाकडे वळूं नये ह्याचें आश्चर्य वाटतें. कर्व्यांच्या आश्रमाने समाजांत बरेंच स्थित्यंतर होणार आहे, तेव्हा त्या आश्रमावर लोकांचें लक्ष वेधणें जरूर आहे. कर्व्यांच्या प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानाने थोडेंबहुत कार्य होईल. पण लोकांनी सहानुभूतिपूर्वक केलेल्या टीकेचा फायदा रा. कर्व्यांना मिळाल्याचें दिसत नाही. “ आश्रमा ” चीच एक स्वतंत्र जंगी “ अॅकडेमी ” कशी बनवितां येईल हाही विचार करण्यासारखा एक प्रश्न होता.[१]'

मुलांच्या शिक्षणाची सोय स्वतन्त्र मासिकें त्यांच्याकरितां निघाल्याने झाली आहे. त्याप्रमाणे स्त्रियांकरितां स्वतंत्र मासिकें निघालीं नाहीत. मनोरंजन हें स्त्रियांचेंच मासिक मानलें जातें हें खरें; पण तें सर्वस्वी तसें नाही. तें एकाद्या स्त्रीसंपादकाकडे सोंपविलें गेलें व

१ आतां ही अॅकडेमी बनवली गेली आहे

सं. नं. ता. १५७

त्यांत स्त्रियांचेच लेख केवळ स्त्रियांच्याच हितासहिताविषयीं प्रायः येऊं लागले तर हल्लीं दिसून येणारी उणीव नाहींशी होईल आणि भगिनीसमाचार व मनोरंजन हीं दोन मासिकें निरनिराळ्या दिशेने स्त्रीसेवा करीत राहतील.

## आरोग्य

प्राचीन पिढींतील लोकांपेक्षा अर्वाचीन पिढींतील लोक कमकुवत आहेत ह्यांत संशय नाहीं. तेव्हा आरोग्य कसें ठेवतां येईल ह्या विषयावर पुष्कळांनी लिहिणें स्वाभाविक आहे. चहा, काफी व मद्य-प्राशन ह्यांचे दुष्परिणाम स्पष्ट सांगितले आहेत, तर आरोग्याचा व दुधाचा निकट संबंध किती आहे तेंही व्यक्त करून दाखविलें आहे. शारीरिक सामर्थ्यास मांसाशन जरूर आहे ह्या भ्रमाचें निराकरण केलें आहे. फलाहार व प्राणायाम यांचें महत्त्व वर्णिलें आहे. वाहत्या पाण्याचे संस्कार लोकांस समजावून सांगितले आहेत. गरोदर व प्रसूत स्त्रियांची जोपासना कशी करावी यासंबंधाची उपयुक्त माहिती दिली आहे. सारांश, ह्या विषयासंबंधी अवश्य गोष्टी लोकांस समजून सांगण्याविषयी मासिककारांनी खबरदारी घेतली आहे. ही त्यांची कळकळ फारच प्रशंसनीय आहे. ह्या बाबतींत केरळकोकिळकारांचें अग्रेसरत्व मान्य करणें जरूर आहे. कारण मनोरंजनांत ७ तर कोकिळांत १४ आरोग्यविषयक लेख आले आहेत.

## तत्त्वज्ञान

तात्त्विक ज्ञानरूपी सागरांत बुडी मारून तळाची माती काढणारे म्हणून आमचा जो पूर्वापार लौकिक आहे तो आम्हीं घालविला नाहीं असें एतद्विषयक जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून उघड दिसतें. "ज्ञान हें कर्माकरितां का कर्म हें ज्ञानाकरितां?" "सत्य हें साधन का साध्य?" "निर्वीर्य ज्ञान आणि ज्ञानहीन कर्म,"

" कीर्तीच्या दोन बाजू " वगैरे लेख वाचण्यालायक आहेत. रा. वामन मल्हार जोशी हे एक ओजस्वी लेखक मराठींत होतील असें भाकित करण्यास आजच विपुल साधनें उपलब्ध आहेत. मनोरंजनांतील आत्मानात्मविचारांना कोणी उत्तर दिलें नाही ह्यावरून कोणी कांहीहि देवो तें आम्ही अचिकित्सापूर्वक ग्रहण करतों की काय, असा संशय येतो. तथापि हा लेख काळजीपूर्वक वाचण्यासारखा आहे ह्यांत शंका नाही. कारण तो बराच विचार करून लिहिला आहे.

## मासिकांसंबंधीं सामान्य विचार

वर मासिकांचा तक्ता जोडला आहे त्यावरून महाराष्ट्रांत एकंदर ४४ मासिकें प्रसिद्ध होतात असें दिसतें. मराठी बोलणारांची संख्या मुंबई इलाख्यांत १०७४२००० आहे. अर्थात् अदमासें अडीच लाख लोकांना एक मासिक पडतें. एक कोटी लोकांत वाचतां येणारे किती हें समजण्यास मार्ग नाहीं; त्यामुळे मराठी भाषा बोलणाऱ्या साक्षरांशीं मासिकांचें प्रमाण काढतां येणें शक्य नाही. तथापि आहेत हीं पुष्कळ आहेत असें म्हणतां येत नाही. गुजराथी मासिकें एकंदर ३३ आहेत असें सरकारी रिपोर्टावरून दिसतें. संख्येच्या बाबतींत तरी मराठी मासिकें गुजराथीच्या पुढेच आहेत. मराठी मासिकांत सर्वांत जास्त वर्गणी म्हणजे दरसाल रु. ५ चित्रमयजगताची आहे. मनोरंजन आणि नवयुग ह्यांची त्याच्या खाली म्हणजे ४ रु. आहे. गुजराथींतील " फुरसत " नांवाच्या एकाच मासिकाची ४ रु. वर्गणी आहे. बाकीच्या सर्व मासिकांची वार्षिक वर्गणी ह्याहून कमी आहे. वर्षाचे ५० रु. खर्च करणारास बहुतेक सर्व मासिकें घेतां येतील.

" त्रैमासिक ज्ञानदर्शन " काढून आपल्याकडे मासिकांचा अगर नियतकालिकांचा उपक्रम बाळ गंगाधर शास्त्री यांनी केला असें

म्हणतात. आजपर्यंत पुष्कळ मासिकें उदयास आलीं व लयही पावलीं. किती व कोणतीं हें किल्येकांस माहीतही नसेल; तथापि कोणासही निबंधमालेचा विसर पडणें शक्य नाही. मागच्या व चालू मासिकांत कोणाही वर वर पाहाणारास सुद्धा प्रथम फरक हा दिसतो की, जुन्या मासिकांतील बहुतेक लेख संपादकाचे असत. परंतु अलीकडे पाहावें तों संपादकांना दौतींत टांक बुडविण्याचा प्रसंग क्वचितच येत असेल. ह्याचें कारण हल्ली लेखकवर्ग वाढला आहे हें होय. पण ह्याचे कांही अनिष्ट अगर अनपेक्षित परिणामही दृष्टोत्पत्तीस येत आहेत. ज्या प्रकारच्या विशिष्ट मतांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने मासिकांचा अवतार होतो तो उद्देश बाजूस राहून तें मासिक निरनिराळ्या मतांची खिचडी बनतें. अशा मासिकांच्या वाचनाने वाचाळपणा अथवा बहुश्रुतपणा वाढेल, पण मनावर कायमचा परिणाम करून शील बनविण्यास तीं अनुपयुक्त होतात. अर्थात् हा प्रकार तरुण मुलांसंबंधाने घडतो. पोक्त व अनुभवशीर माणसांच्या पुढे निरनिराळीं मतें आल्याने त्यांच्या मतांचा एकांगीपणा मात्र कमी होण्याचा संभव आहे. मालाकारांच्या जोरदार भाषेने तरुण पिढीवर चांगला अगर वाईट पण कायमचा संस्कार झाला ही गोष्ट बहुधा नाकबूल करतां येण्यासारखी नाही. परंतु मालाकारांनी आपण पडद्याआड राहून निरनिराळ्या मतांच्या लेखकांना आपल्या मालेंत गोंवून घेतलें असतें तर हा परिणाम झाला असता की नाही ह्याचा वानवा आहे.

दुसरा भेद असा असतो की, पूर्वी मासिकांचें चालकत्व विद्वान् माणसांनी आपल्या हातीं घेतलें होतें. विद्यमान मासिकांपैकी फारच थोड्यांचें संपादकत्व पदवीधरांकडे आहे. मतप्रसारापेक्षा निर्वाहाचें साधन म्हणूनच वरीचशी मासिकें अस्तित्वांत येतात.

ही भिन्नता लक्षांत ठेवली म्हणजे वर्तमान मासिकांचें न्यूनत्व कोठें व कसें आहे तें दिसून येईल. आजच्यांतील सार्वजनिक गोष्टींचें

मनन करणारीं अधिकारी माणसें प्रायः कोणीच मराठी मासिकांत लिहीत नाहीत. क्वचित् खास अंकांत त्यांचीं नांवें दृष्टीस पडतात. सध्या दुय्यम प्रतीच्या माणसांवरच मासिकांतील लेख लिहिण्याचें काम पडलें आहे असें म्हटलें तरी चालेल.

"मासिकांचा उद्देश बहुश्रुतपणा होय, म्हणजे तीं वाचलीं असतां थोड्या वेळांत सहज मौजेने पुष्कळ ज्ञान नाना विषयांचें व्हावें" असें मालाकार म्हणतात. परंतु माझ्या मतें मासिकांचा उद्देश ह्याहून वेगळा आहे. विद्यार्थ्यांकरितां मासिकें काढावयाचीं असतील तर हा उद्देश डोळ्यासमोर ठेवणें वावगें होणार नाही. पण परिपक्व बुद्धीच्या व विचारशील माणसांनी वाचावयाच्या मासिकांत विकारवश न होतां साधक बाधक प्रमाणें देऊन प्रगल्भ भाषेंत लिहिलेले असे भारदस्त लेखच आले पाहिजेत. रा. चिपळूणकरांनी 'निबंधमाला' काढली तो काल देशांत शिक्षणप्रसार झाला नसल्यामुळे निराळा होता व म्हणून मौजेने पुष्कळ ज्ञान प्राप्त करून देण्याची तेव्हा अवश्यकताही होती. पण हल्ली तो मनु बदलला आहे. सरकारच्या कार्यकारी कौन्सिलमध्ये हिंदी लोकांचा प्रवेश अंशतः झाला आहे. तेव्हा कोणत्याही गोष्टीसंबंधाने सरकारचें धोरण असेल त्या धोरणाला हिंदी वळण लागण्याची शक्यता आहे. परंतु अगोदरपासून सार्वजनिक विषयांचें अध्ययन नसल्यास हिंदी सभासदांची ही जबाबदारी त्यांस नीट बजावतां येणार नाही व ती यावी म्हणून जनतेला तयार करण्याचें काम मासिककारांनी पतकरलें पाहिजे. आंकड्यांनी घोळलेले असले लेख रूक्ष असणार. आता मराठी मासिकें इंग्रजी न शिकलेल्या लोकांकरितांच आहेत असें म्हटलें तर मात्र कै. चिपळूणकरांची उद्देशदिशा अद्यापि बदलण्याचें कारण नाही. पण इंग्रजीचा गंध नसलेले लोक मराठी मासिकांचे वाचकवर्गांत पुष्कळ सापडतील असें वाटत नाही. इंग्रजी शिकलेल्यांचाच भरणा ह्या वर्गांत विशेष आहे तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये की

मध्यम सुशिक्षित वर्गच मराठी मासिकांचा विशेषेंकरून आश्रयदाता होय. मराठी मासिकांच्या अभिवृद्धीस ही एक मोठी अडचण आणणारी बाब आहे. ही अडचण दूर होण्याचा सध्या तरी संभव दिसत नाही. सार्वजनिक बावींचा ज्यांनी विचार केला आहे अशा विद्वान् व अनुभवशीर माणसांच्या हातांत मासिकें चालविण्याचें काम आल्याशिवाय मासिकांचें महत्त्व व त्यांचा अधिकार वाढणार नाही. परंतु अशा योग्यतेचे संपादक सध्याच्या परिस्थितींत मराठी मासिकांना मिळतील अशी आशा करणें व्यर्थ होय. आमच्यांतील बुद्धिश्रेष्ठांची इच्छा अर्थातच इंग्रजींत लिहिण्याची असणार; आणि तसें करणें सकारणहि आहे. तथापि केवळ महाराष्ट्रांतील समाजाचाच ज्यांशीं संबंध आहे असे विषय मराठी मासिकांत ह्यांच्या लेखणींतून उतरले तरी सुद्धा मराठी मासिकांचा दर्जा वाढल्याशिवाय राहणार नाही. पण ही बहुतेक असंभाव्य गोष्ट वगळली तर मध्यम सुशिक्षित वर्ग जसजसा योग्यतेने वाढेल तसतशी मासिकांची अभिवृद्धि होत जाईल. कारण मासिकांतील लेखक व वाचक ह्याच वर्गांतील आहेत.

गेल्या तीन सालांत लोकशिक्षण, विस्तार व मनोरंजन ह्या तीनच मासिकांत सुमारें २१३ लेखकांचे लेख आले आहेत. ह्यावरून हल्ली लेखकवर्ग वाढत आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाही. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ही वाढ कायम राहील. मासिकांच्या संपादकांनी लेखकांच्या युनिव्हर्सिटीच्या पदव्या अवश्य द्याव्या. पण ह्या साध्या गोष्टीकडेही मासिकांचे संपादक दुर्लक्ष करतात. तथापि आमच्या माहितीप्रमाणे ह्या २१३ लेखकांपैकी १३१ तरी निदान पदवीधर आहेत. अर्थात् युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्या लोकांची प्रवृत्ति आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा इतरांस देण्याकडे होत चालली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे बिनपदवीधर असे ८२ लेखक सन्मान्य अशा मासिकांच्या लेखकवर्गांत मोडत असल्यामुळे एकंदरींत विचारविनिमयाची इच्छा सर्वसाधारण

होत चालली आहे असें दिसतें. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे दिवसेंदिवस स्त्री लेखकांची संख्या वाढत चाललेली असल्याचें " दिसतें. २१३ पैकीं सुमारें ९ स्त्रिया आहेत. त्याशिवाय लोक-मित्रांत व मराठामित्रांतही कांही स्त्रियांचे लेख आले आहेत. स्त्रीलेख-कांचा भरणा मनोरंजनांत जास्त असणें साहजिकच आहे. स्त्रीलेख-कांत सौ. काशीबाई कानिटकर व पुरुषलेखकांत रा. ब. चिंता-मणराव वैद्य यांचा प्रामुख्याने नामनिर्देश करणें जरूर आहे. रा. ब. वैद्य यांचे लेख मार्मिक व विचारपरिप्लुत असतात. ह्यांच्य जोडीचे १० लेखक मराठी मासिकांच्या वांट्यास आल्यास ह्य मासिकांत स्थित्यन्तर झाल्याविना राहणार नाही. संशोधनात्मक लेखांच्या ऐवजीं राजकीय, सामाजिक, आर्थिक, शिक्षणात्मक वगैरे संबंधाच्या प्रचलित विषयांवर जर रा. ब. वैद्य लिहिण्याचा उपक्रम करतील तर त्यांचे महाराष्ट्रावर उपकार होतील.

एकाच मासिकाने सर्व वर्गांच्या वाचकांचें समाधान होणें शक्य नाही. म्हणून निरनिराळ्या वाचकांकरिता निरनिराळीं मासिकें असणें जरूर आहे. मुलांकरिता, साधारण शिकलेल्या स्त्रियांकरिता, इंग्रेजी मुळीच न शिकलेल्या लोकांकरिता, सामान्य ग्रॅज्युएटांकरिता, राजकीय चळवळींत पडलेल्या लोकांकरिता अशीं निरनिराळीं मासिकें अस्तित्वांत आलीं पाहिजेत. वाचकांच्या वर्गानुसार मासिकें निघतात तेव्हा वाचकांची सहज असणारी ज्ञानतृष्णा तृप्त करण्याकरितांच त्यांचा उद्भव होत असतो. हे मासिककार आपआपल्या वाचकांची मासिकद्वारा सेवा करीत असतात. कारण शिकलेल्या माणसांना वर्तमानपत्रांची त्याचप्रमाणे मासिकांची अवश्यकता भासत असते. गिऱ्हाईक असल्यावर त्यांस माल पुरविणारे व्यापारी निर्माण ह स्वाभाविक आहे.

परंतु विषयानुसार जेव्हा मासिकांचें वर्गीकरण होतें तेव्हा मासि-ककारांचा उद्देश उदात्त असतो. अपरिचित विषयांत लोकांस

अभ्यस्त करावें, त्या विषयाच्या ज्ञानाचा फैलाव समाजांत व्हावा, म्हणून असलीं मासिकें अवतरतात. पहिल्यांत, वाचकांच्या रुची-प्रमाणे लेख लिहावे लागतात; दुसऱ्यांत, वाचकांत त्या त्या विषयांची रुचि उत्पन्न करावयाची असते. ह्या मासिकांचें सामाजिक, राजकीय, आर्थिक, शिक्षणात्मक, वाङ्मयविषयक इत्यादि वर्गीकरण करतां येईल. समाजशिक्षणाच्या प्रथमावस्थेंत प्रथम सांगितलेलीं मासिकें अस्तित्वांत येतात. एकंदर समाज सुशिक्षित झाला म्हणजे दुसऱ्या प्रकारचीं मासिकें विशेषेंकरून निघूं लागतात. असलीं मासिकें समाजाची चोहों बाजूंनी उन्नति करण्यास कारणीभूत होत असतात. समाजाला तीं विशिष्ट वळण लावतात. ह्या दृष्टीने विचार करून आपल्या इकडे सांप्रत प्रसिद्ध होत असलेलीं मासिकें कोणत्या वर्गांत मोडतील हें पाहूं लागलें तर, दुसऱ्या वर्गांत आमच्या मासिकांपैकी एकही पडेल की नाही ह्याची शंकाच वाटते.

राजकीय विषयाला तर आमच्या इकडे जवळ जवळ बहिष्कार घातल्यासारखा आहे. त्याचीं कारणें कांहीही असोत; पण तिऱ्हाइताला ह्यामुळे आम्हांस ह्या बाबतींत कांहीच तक्रार करण्यासारखें नाही असें वाटण्याचा संभव आहे. युरोपमध्ये राजकीय परिस्थिति इष्ट व स्पृहणीय आहे. ह्यामुळे वर वर विचार करणारास, आमच्या इकडे राजकीय विषयांवर जास्त लेख यावेत व इंग्लंडमधील मासिकांत ह्या विषयांवर सर्वांनी मौन स्वीकारलेलें असावें असें वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति निराळी आहे. तिकडे राजकीय विषयांवरच फार लेख येतात यावरून स्वतंत्र राष्ट्रांत राजकीय विषयांस विशेष महत्त्व मिळतें असें दिसतें.

अंतरंग सोडून बाह्यांगाकडे आपण वळलों तर त्यांतही दिवसेंदिवस प्रगति होत आहे हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाही. अंतरंगापूर्वीं बहिरंगच दृष्टीसमोर प्रथम पडतें, म्हणून बाह्य

स्वरूप मनोहर असल्याने अंतरंगाचें ज्ञान सर्वत्र पसरण्यास तें कार णीभूत होतें. नवयुग व प्रभात ह्यांनी ह्या बाबतींत इष्ट सुधारण केली आहे. नवयुगांतील चित्रें फार चांगलीं असतात.

नवयुग व मनोरंजन ह्यांमध्ये बराच मजकूर असतो. सामान्यतः १।२ दिवसांत वाचून टाकतां येईल इतकाच व इतक्याच दर्ज्याचा मजकूर हल्लीच्या मासिकांत येतो. अर्थात् मासिकांत ह्यापेक्षा अधिक मजकूर पाहिजे. मासिकें महिन्यास निघतात, दररोज अगर आठवड्यास निघत नाहीत, हें संपादकांनी विसरतां कामा नये. मनोरंजनार्थ ज्यांचा अवतार नाही, अशा मासिकांच्या मलपृष्ठांवर चित्र नसणें चांगलें. लेखकांचीं नांवें व विषय त्या त्या स्थानीं अस इष्ट आहे. कित्येक वेळां वर्तमानपत्रांत शोभण्यासारखे लेख–म्हण अचिरस्थायी–मासिकांतून प्रसिद्ध होतात हें चांगलें नाही. चिरस्थाय लेख वर्तमानपत्रांत येणें अपरिहार्य असल्यामुळे वर्तमानपत्रें ह. मासिकांचीं प्रतिस्पर्धी म्हणण्यास हरकत नाही.

आमचीं मासिकें अनियमितपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. बालबोधाचा नियमितपणा कै. विनायकराव ओक ह्यांच्याबरोबरच न जावो. अनियमितपणाच्या सबबी अवास्तव आहेत असा पुष्कळांचा समज आहे तो खरा दिसतो. नियमितपणाने काम करण्याची संवय कोणास नाही हेंच खरें कारण दिसतें. संपादकाजवळ वाटेल तेव्हा घालतां येतील असे २-३ लेख नेहमी शिल्लक असले पाहिजेत. पुढे अडचणी येतील असें समजून आठ दिवस अगोदरच कामास लागलें तर नियमितपणा मोडण्याचा प्रसंग येणार नाही व नियतकालिकांना अनियतकालीनत्वाचा दोष लागणार नाही. ह्या बाबतींत कै. रा. विनायक कोंडदेव ओक ह्यांचें अनुकरण इतरांनी अवश्य करावें.

पाया आणि वरील इमारत ह्यांचा जो संबंध आहे तोच वर्तमानपत्रें आणि मासिकें ह्यांचा आहे. वर्तमानपत्रकार बहुजनसमूहास

हुश्रुत करून प्रगल्भ लेख समजण्यास तयार करतात. म्हणून मासिकाचें कार्य वर्तमानपत्रानंतरचें आहे. खेड्यांत वर्तमानपत्र जातें तेथे मासिक जाईलच असा नियम नाही. मासिकें वाचीत असून वर्तमानपत्राला न शिवणारे लोक ज्यांत आहेत असें एकहि खेडें आढळावयाचें नाही. ह्यावरून वर्तमानपत्रकाराचें कार्यक्षेत्र विस्तृत आहे हें उघड होतें. पण उलट मासिककाराचें काम शिक्षितांना सुशिक्षित करण्याचें आहे. अर्थात् तें अधिक थोर जबाबदारीचें आहे.

मेहनत घेऊन आस्थापूर्वक ज्यांनी लेख लिहिले असतील त्यांस कांही पारितोषक देण्याचा क्रम संपादकांनी सुरू करावा. बहुतेक चांगलीं मासिकें संपादकांनी चालविल्यापेक्षा लेखकांनी चालविलीं आहेत असें म्हणणारास कोणीं नांवें ठेवण्याचें कारण नाही. अशा पद्धतीने लेखकांस श्रम करण्यास उत्तेजन येईल व उत्कृष्ट लेख प्रसिद्ध होतील. परंतु लेखकांचे औपचारिक आभार मानण्याचें औपचारिक कृत्यहि ज्यांच्या हातून होत नाही त्यांच्याकडून द्रव्य-दानाची अपेक्षा करणें व्यर्थ दिसतें. कित्येक ठिकाणीं तर लेख प्रसिद्ध करितों हें त्या लेखकांवर आपण उपकारच करीत आहों असा समज दिसतो. मासिकांची योग्यता त्यांतील लेखांवर. पण लेखकांची योग्य किंमत जेथे होत नाही तेथे मालहि हिणकस निघाला तर त्यांत नवल नाही.

ज्ञातिविशिष्ट मासिकें एकंदरींत अन्य ज्ञातींना न दुखवितां उत्तम प्रकारें चालविलीं जात आहेत हें त्यांस भूषणास्पद आहे अशा प्रकारच्या मासिकांनी ज्ञात्युन्नतीचा मार्ग लौकर आक्रमण केला जाईल असें वाटतें.

'शेती व शेतकरी' ह्या मासिकाची धेडगुजरी भाषा सुधारल्या-विना तें लोकप्रिय अगर उपयुक्त होईल असें वाटत नाही. ह्यांतील भाषेचे मजेदार मासले एक दोन येथे देतों. "हँडल मधील लांकडी

ठोकळा त्याच्या सॉकेट मधून सुमारें २ इंच बाहेर निघालेला." "फक्त बीमचे दोन बाजूंस क्लिप्स आहेत व त्याचीं दुसरीं शेवटें बोल्टनें बीम्समध्यें बसविलेलीं आहेत." इंग्रजी शब्दांबद्दल मराठी शब्द बनविण्याचा प्रयत्नहि यशस्वी होत नाही हें demonstration बद्दल "प्रात्यक्षिक" शब्द योजला आहे त्यावरून उघड होतें. मराठींत 'राजश्रीच्या' ऐवजीं 'मिस्टर' वापरणें दोषास्पद आहे हें पुष्कळ लोक विसरतात.

एकंदरींत आमच्या मासिकांसंबंधी अगदीच निराश होण्याचें कारण नाही. लेखकवर्ग वाढतो आहे. सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र प्रचलित विषयांना अस्पृश्य वर्गाप्रमाणे टाळण्याची प्रवृत्ति हानिकारक आहे. ह्या गोष्टीकडे संपादकांनी अधिक लक्ष देणें अवश्य आहे.

REFBK-0004599

दा. क्र. ४५९९